(सभापतीस्थानी माननीय सभापती)

नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव

सभापती : माझ्याकडे सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड आणि अन्य सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेला एक प्रस्ताव आलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्याबरोबर मी माझ्या दालनामध्ये चर्चा केलेली आहे. हा नियम 289 अन्वये दिलेला प्रस्ताव मी नाकारत आहे. त्याचप्रमाणे मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या पुढच्या काळामध्ये नियम 289 अन्वये ज्या ज्या वेळी प्रस्ताव येतील त्या त्या वेळी संबंधित सन्माननीय सदस्यांबरोबर माझ्या दालनात चर्चा करुन त्या नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या बाबतीत काय करावे याचा निर्णय घेईन. एखादा महत्वाचा प्रस्ताव असेल तर त्याबाबतीत या ठिकाणी सन्माननीय सदस्यांना बोलता येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

पृ. शी. / मु. शी. : तोंडी उत्तरे

बुलढाणा जिल्हापरिषदेतील आरोग्य विभागात झालेल्या रक्कमेच्या अपहाराबाबत

(१) * ४६३५२ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदीश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. प्रकाश शेंडगे , श्री. गोपीकिसन बाजोरिया : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हापरिषदेच्या आरोग्य विभागात आरोग्य विषयक विविध कार्यक्रम राबवितांना झालेल्या शासकीय निधीच्या अपहाराबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद बुलढाण यांनी दिनांक २६ मे, २००८ रोजी आरोग्य अधिकाऱ्यांना नोटीस पाठविली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही नोटीस पाठवितांना त्यासोबत महाराष्ट्र राज्य जिल्हापरिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या तक्रारीची प्रत देखील जोडली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना नोटीस पाठवितांना तक्रारीच्या अनुषंगाने असलेले रेकॉर्ड सील करण्याचे आदेश दिले नसल्यामुळे आरोग्य अधिकाऱ्यांना त्यात खाडाखोड करण्याची संधी मिळाल्याचे कर्मचारी संघटनेने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून चौकशी करताना कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेण्याची विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर विनंतीच्या अनुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) सदरची कारवाई झाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व ती केव्हा होणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : (१) व (२) होय.

(३) अ) आरोग्य अधिकाऱ्यांना रेकॉर्डमध्ये खाडाखोड करण्याची संधी मिळाली हे खरे नाही.

ब) संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेण्याची विनंती केली होती हे खरे आहे.

(४) संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवून चौकशी केली.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी प्रश्न क्रमांक 1 आणि 2 ला "होय" असे उत्तर दिलेले आहे. प्रश्न क्रमांक 4 ला उत्तर देताना संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन चौकशी केली असे म्हटले असून प्रश्न क्रमांक 5 च्या उत्तरामध्ये प्रश्न उद्भवत नाही असे उत्तर दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने तक्रार केली की, बुलढाणा जिल्हा परिषदेमध्ये आरोग्य विषयक जे विविध कार्यक्रम राबविले जातात त्यामध्ये फार मोठ्या रकमेचा अपहार झाला आणि त्यामध्ये जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याने हा अपहार केला अशा पध्दतीची तक्रार आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने केला. तक्रार केल्यानंतर तेथील मुख्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना नोटीस दिली आणि नोटीस दिल्यानंतर तो रेकॉर्ड जप्त केला नाही. रेकॉर्ड जप्त न केल्यामुळे त्यांना रेकॉर्ड दुरुस्त करण्याची संधी दिली. या दरम्यान आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने माहितीच्या अधिकारामध्ये त्या रेकॉर्डच्या प्रती मागितल्या. त्याच्या कॉपीज आता माझ्याकडे आहेत. त्यामध्ये जी सत्यता आहे तो रेकॉर्ड बदलण्यात आला अणि दुरुस्त करण्यात आला. त्या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याला रेकॉर्ड दुरुस्त करण्याची संधी देण्यात आली आणि जो दुरुस्त केलेला रेकॉर्ड आहे त्यावरुन चौकशीमध्ये तथ्य आढळून आले नाही असा अहवाल देण्यात आला. जो मूळ रेकॉर्ड आहे त्याची प्रत माहितीच्या अधिकारात मिळाली ती माझ्याकडे आहे आणि जो मूळ रेकॉर्ड तो तो बदलला गेला आहे. हे फार मोठे प्रकरण आहे. जवळपास 20 लाख रुपयांचा अपहार झालेला आहे. हे सर्व पैसे नुसते कोऱ्या कागदावर सह्या करुन आणि कोणत्याही प्रकारचा कार्यक्रम न राबविता घेतलेले आहेत. या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी शासन करणार काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बुलढाणा जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याने केलेल्या नियमबाह्य गोष्टींच्या संदर्भात हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात जिल्हा आरोग्य कर्मचारी संघटनेच्या माध्यमातून आलेले निवेदन आणि इतर सन्माननीयांच्या माध्यमातून आलेल्या तक्रारींच्या माध्यमातून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून चौकशी केली गेली. बुलढाणा जिल्हा परिषदेचे जे मुख्य लेखा व वित्त अधिकारी आहेत त्यांना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी 12.8.2008 ला पत्र देऊन चौकशी केली. त्याचा चौकशी अहवाल 29.8.2008 ला दिला. उपसंचालक, आरोग्य मंडळ अकोला यांनी हा संबंधित अहवाल तपासलेला. तसेच उपप्राचार्य, आरोग्य व कुटुंबकल्याण प्रशिक्षण केंद्र अमरावती यांनी चौकशी करुन त्यासंदर्भातील अहवाल दिलेला आहे. यासंदर्भात उपप्राचार्य यांनी जो अहवाल दिलेला आहे त्यानुसार प्रशिक्षणाचा दर्जा चांगला ठेवला होता तसेच खर्च सुध्दा नॉर्म्सप्रमाणे झालेला होता. परंतु सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी सांगितलेली तक्रार आणि इतर सुध्दा तक्रारींच्या अनुषंगाने काही गोष्टी निश्चितपणे स्पष्ट झालेल्या नाहीत. म्हणून यासंदर्भात बाकीच्या ज्या काही तक्रारी असतील...

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46352....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. मूळ रेकॉर्ड बदलण्यात आलेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याला मूळ रेकॉर्ड बदलण्याची संधी दिली त्यामुळे तो रेकॉर्ड बदलून दुरुस्त करण्यात आला. दोन रेकॉर्डमध्ये तफावत आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, मूळ रेकॉर्ड आणि बदललेला रेकॉर्ड हे दोन्ही रेकॉर्ड समोर ठेऊन आणि उच्चस्तरीय चौकशी करुन जर ते दोषी आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई करणार कय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते सांगत आहेत त्याप्रमाणे रेकॉर्ड बदलला गेला अशातील भाग नाही. या ठिकाणी प्रशिक्षणाचे...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी रेकॉर्ड बदललेला आहे.

सभापती : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्याकडील पेपर्स द्यावेत...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी अत्यंत जबाबदारीने बोलत आहे.

सभापती : मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, विरोधी पक्ष नेता या नात्याने आपली योग्य प्रतिष्ठा डोळ्यासमोर ठेऊन जसे आपण सविस्तर प्रश्न विचारता त्याच पध्दतीने माननीय मंत्रिमहोदय ज्यावेळी उत्तराला सुरुवात करतात त्यावेळी त्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी जसे अन्य सन्माननीय सदस्यांच्या बाबतीत सुध्दा एखाद्या वेळी अशी गरज भासली तर दुसरा प्रश्न विचारण्याची संधी देतो त्याप्रमाणे आपल्यालाही संधी देईन परंतु आपण माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या ठिकाणी रेकॉर्ड बदलण्याचा मुद्दा माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेला आहे. त्यानुसार प्रशिक्षणाचा सर्व रेकॉर्ड दिनांक 9.6.2008 पासून जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या ताब्यात दिलेला होता. जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी तक्रारीच्या अनुषंगाने रेकॉर्ड सिल करण्याचा जो मुद्दा होता तो सुध्दा खरा नाही. कारण ही तक्रार जिल्हा आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी जिल्हा प्रशिक्षण केंद्र यांच्या संदर्भात असल्याने आणि आरोग्य विभाग हा जिल्हा परिषदेच्या अंतर्गत घटक असल्यामुळे हा

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रेकॉर्ड सिल करणे आवश्यक नव्हते. मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे संपूर्ण रेकॉर्ड सामान्य प्रशासन विभागाच्या ताब्यात होता. माहितीच्या अधिकारामध्ये मागितलेल्या माहितीवरुन माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, रेकॉर्डमध्ये बदल केलेला आहे. सभापती महोदय, मूळ रेकॉर्ड आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे माहितीच्या अधिकाराच्या माध्यमातून मागितलेला रेकॉर्ड हे समोर ठेऊन सुध्दा चौकशी करण्याची शासनाची तयारी आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय पुन्हा पुन्हा सांगत आहेत की, रेकॉर्डमध्ये खाडाखोड झाली नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, माहितीच्या अधिकाराखाली जी कागदपत्रे सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांना मिळाली ती खोटी आहेत काय ? दुसरा प्रश्न असा की, आजपर्यंत या सभागृहामध्ये अशा प्रकारच्या भ्रष्टाचाराची, अपहाराची अनेक प्रकरणे आली आणि ती उपसंचालकांच्या पातळीवर झाली. प्रत्येक वेळी तत्कालीन आरोग्य मंत्र्यांनी सांगितले होते की, आपण अशा प्रकारची चौकशी सुरु करु. पण त्यानंतर त्या चौकशीचे काय झाले ? पैसे मिळाले की नाही ? त्यांना शिक्षा झाली की नाही ? अशा प्रकारचा कोणताही रिपोर्ट आम्हाला मिळालेला नाही. अशा प्रकारच्या किती चौकशा गेल्या तीन वर्षामध्ये आरोग्य खात्यातर्फे करण्यात आल्या आणि किती दोषींना आतापर्यंत शासन झाले किंवा त्यांच्यावर कारवाई झाली ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा जो प्रश्न विचारलेला आहे तो प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही पण निश्तिचपणे मागच्या काळामध्ये यासंदर्भात उपसंचालक पातळीवरच्या किंवा जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या पातळीवरील अधिकाऱ्यांच्या यासंदर्भात किती चौकशा झाल्या, त्यामध्ये काय निष्पन्न झाले, त्यामध्ये किती रुपयांचा अपहार झाला यासंदर्भातील माहिती पाहिजे असेल तर ती नंतर पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी एकच मागणी केली की, जी चौकशी करणार ती बुलढाणा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून न करता संचालक, उपसंचालक पातळीवरील कोणत्याही अधिकाऱ्यांच्या पातळीवर उच्चस्तरीय चौकशी शासन करणार काय ?

यानंतर श्री. शिगम....

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखापी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे उपसंचालक किंवा संचालकस्तरावरच्या अधिका-यामार्फत या प्रकरणी चौकशी करण्यात येईल.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

धारुर तालुक्यातील (जि.बीड) चिकनगुनिया या साथीच्या आजारावर आळा घालण्याबाबत

(२) * ४७९५५ श्री हेमंत प्रभाकर टकले , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील धारुर तालुक्यात चिकणगुनिया साथीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात झाला असून बडवणी येथील खाजगी रुग्णालयात तसेच चोरअंबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांवर उपचार चालू असल्याचे व प्राथमिक आरोग्य केंद्रातील खाटाची संख्या अपुरी पडत असल्याने रुग्णांची हेळसांड होत असल्याचे माहे सप्टेंबर, २००८ रोजी वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर साथीच्या रोगास आळा घालण्याच्या दृष्टीने कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : (१) अंशत: खरे आहे.

रुग्णांची हेळसांड झाली नाही. तसेच रुग्ण उपचारासाठी खाजगी रुग्णालयात गेलेले नाही.

(२) होय.

(३) मौजे चोरअंबा, ता.धारुर येथे चिकनगुणिया साथीचा उद्रेक झाला. प्राथमिक आरोग्य केंद्र भोगलवाडी येथील आरोग्य पथकाने भेट देऊन रक्त नमुने तपासणी केली, किटकनाशक, अळीनाशक फवारणी व औषधी सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. हेमंत टकले : उत्तरामध्ये "अंशत: खरे आहे" असे म्हटलेले आहे. अंशत: खरे आहे याची व्याप्ती काय आहे याचा खुलासा केला तर ते अधिक सोईचे होईल. त्याचप्रमाणे राज्यातील आरोग्याच्या प्रश्नाबाबत साथीच्या रोगाबद्दल एक धोरण असते त्याप्रमाणे चिकनगुनिया हा साथीचा रोग झाल्यामुळे त्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना राज्यपातळीवर करण्याचे राज्य शासनाने ठरविलेले आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : बीड जिल्हयातील धारुर तालुक्यातील चिकनगुनिया साथीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. बीड जिल्हयात धारुर तालुक्यामध्ये दिनांक 31.7.2008 पासून या साथीचा प्रादुर्भाव झाला. लोकांना ताप, खोकल्याची लक्षणे सुरु झाली. या रोगाची 52 रुग्णांना लागण झाली. या रोगाच्या संदर्भात जी जी काही व्यवस्था करावयास पाहिजे तेवढी ती करण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने झालेला आहे. मथुराबाई खाडे आणि अशोक चव्हाण यांचे रक्ताचे नमुने

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तपासल्यानंतर त्यामध्ये चिकनगुनियाचे सिम्टम्स आढळले होते. मौजे चोरअंबा येथील 278 घरातील 647 पाणी तपासले. त्यापैकी ज्या 40 पाणीसाठ्यामध्ये एडिस डास आढळले ते पाणीसाठे रिकामी करण्यात आले. गप्पी मास्यांचाही उपयोग करण्यात आलेला आहे. तेथील गावांतील घरांमध्ये किटकनाशक धूर फवारणी करण्यात आलेली आहे. अशा विविध उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. किटकनाशके, अळीनाशके आणि अन्य सामग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

श्री. सुरेश नवले : प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये किती रुग्णांवर उपचार करण्यात आले ? रक्त तपासणीमध्ये काय आढळले व त्यावरुन कोणता निष्कर्ष काढलेला आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : मौजे चोरअंबा या ठिकाणी उपकेंद्र असल्यामुळे तेथे डॉक्टरांची टीम पाठविली होती. त्यानी रक्ताचे 52 नमुने घेतले. त्यापैकी 2 लोकांच्या रक्तामध्ये चिकनगुनिया सदृश्य सिम्टम्स आढळले.

श्री. सुभाष चव्हाण : मौजे चोरअंबा येथील लोकांचे रक्ताचे नमुने घेण्यासाठी भोगलवाडी येथील आरोग्य पथक पाठविण्यात आले. तेव्हा मौजे चोरअंबा याठिकाणी रक्ताचे नमुने तपासण्यासाठी पुरेशी सुविधा उपलब्ध नाही काय ? नसल्यास, ती सुविधा तेथे उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती पावले उचललेली आहेत ? प्राथमिक आरोग्य केंद्रातील खाटांची संख्या अपुरी पडत असल्यामुळे रुग्णांची हेळसांड झाल्याचे आढळून आलेले आहे. तेव्हा रुग्णांची हेळसांड होऊ नये म्हणून या प्राथमिक आरोग्य केन्द्रातील सुविधा वाढविण्यासाठी शासनाने पावले उचललेली आहेत काय ? असल्यास, त्याचा तपशील काय आहे ? नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : मौजे चोरअंबा हे उपकेंद्र आहे. तेथून 12 कि.मी. अंतरावर कोगलवाडी येथे ग्रामीण रुग्णालय आणि भोगलवाडी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. ही दोन्ही ठिकाणे मौजे चोरअंबा या गावापासून जवळ आहेत.

...नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.47955...

डॉ.राजेंद्र शिंगणे....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यापुढच्या काळात प्राथमिक आरोग्य केंद्रे, उप क्रेंद्रे, ग्रामीण रुग्णालये या ठिकाणी शासनाकडून आधुनिक सोयी जास्तीत जास्त कशा देता येतील याकडे निश्चितपणे लक्ष देण्यात येईल. एखादी साथ एखाद्या गावात अथवा त्या परिसरात येते त्यावेळी ती साथ नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना कशा करता येतील याबाबतीत देखील निश्चितपणे शासनाकडून लक्ष देण्यात येईल.

. ----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यात गतीमान विद्युत विकास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून निधी मिळणेबाबत

(३) * ४५९०१ श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील बीड, अंबोजोगाई, परळी या तीन शहराची वाढती लोकसंख्या व विकास पाहता भारनियमानाव्यतिरिक्त विनाव्यत्यय वीज पुरवठा होणेबाबत जिल्ह्यात गतीमान विद्युत विकास योजना (एपीडीआरपी) मंजूर झाली असून केंद्र शासनातर्फे २८ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी मिळवून तातडीने विकास तातडीने विकास करणेबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुराव्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ.सुनील देशमुख,श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (१) व (२) केंद्र शासनाने गतीमान विद्युत विकास योजनेअंतर्गत बीड, अंबाजोगाई व परळी-वैजनाथ या शहराकरिता अनुक्रमे रु. ६.२६ कोटी रु. ६.७० कोटी व रु. ३.७३ कोटी अशी एकूण १६.६९ कोटी रुपयांच्या योजनेला तत्वत: मंजूरी दिली असून अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये या शहरांचा समावेश असून केंद्र शासनाकडून याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना अद्याप प्राप्त झालेल्या नाहीत.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने असे उत्तर देण्यात आले आहे की, केंद्र शासनाने गतीमान विद्युत विकास योजने अंतर्गत बीड,अंबाजोगाई व परळी-वैजनाथ या शहराकरिता अनुक्रमे रुपये 6.26 कोटी, रुपये 6.70 कोटी व रुपये 3.73 कोटी अशी एकूण 16.69 कोटी रुपयांच्या योजनेला तत्वत: मंजुरी दिली आहे. सदर उत्तरात पुढे असे म्हटले आहे की, अकराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये या शहरांचा समावेश असून केंद्र शासनाकडून याबाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना अद्ाप प्राप्त झालेल्या नाहीत. या योजनेला तत्वत: मंजुरी दिली असली तरी ही योजना प्रत्यक्षांत आंमलात येण्यासाठी किती कालावधी लागेल ? परळी शहरामध्ये थर्मल पॉवर स्टेशन चालवितो. परळी येथील जनता या थर्मल पॉवरमुळे निघणा-या राखेचा त्रास सहन करतात. वेगवेगळया आजारांना तोंड देतात. त्या ठिकाणी फक्त थर्मल पॉवर स्टेशनच्या कर्मचा-यांना चोवीस तास विद्युत पुरवठा दिला जातो. परळी शहरातील जनतेला मात्र 16-16 तासांचा भार नियमनांचा त्रास सहन करावा लागत आहे. परळी शहरातील लोकांना देखील नियमित वीज पुरवठा केला जाईल काय ?

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45901....

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, वाढती लोकसंख्या व विकास पाहता भार नियमना व्यतिरिक्त विना व्यत्यय वीज पुरवठा होणेबाबत गतीमान विद्युत विकास कार्यक्रमांतर्गत बीड,अबाजोगाई आणि परळी या तीन शहरासाठी अनुक्रमे 14.20 कोटी, 8.66 कोटी, 5.12 कोटी अशी एकंदर 27 कोटी रुपयांची योजना मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविली होती. केंद्र शासनाने बीड शहरासाठी 6.26 कोटी, अंबाजोगाईसाठी 6.70 कोटी आणि परळी-वैजनाथ शहरासाठी 3.73 कोटी रुपये अशा एकूण 16.69 कोटी रुपयांच्या योजनेला तत्वत: मंजुरी दिलेली आहे. सदर योजने अंतर्गत पूर्वी 25 टक्के अनुदान, 25 टक्के कर्ज आणि उरलेले 50 टक्के इतर वित्तीय संस्थेकडून कर्ज रुपाने करण्यात यावे यासंबंधी मंजुरी देण्यात आलेली आहे. परंतु आता नवीन व्दितीय धोरणानुसार 25 टक्के अनुदान व 75 टक्के इतर वित्तीय संस्थांकडून कर्ज रुपाने मंजुरी देण्यात आली आहे. ही केंद्र शासनाची योजना असल्यामुळे त्यांच्या ज्या फायनल मार्गदर्शक सूचना येतील, त्याची शासन वाट पहात आहे. केंद्राच्या फायनल मार्गदर्शक सूचना आल्यानंतर नंतर शासन ताबडतोबीने कामास सुरुवात करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारलेला आहे, तो प्रश्न या प्रश्नाशी संबंधीत नाही. त्यामुळे त्यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे शहरातील बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात वीजेची वायर पडून युवकाचा मृत्यू झाल्याबाबत

(४) * ४९१५४ श्री. अनिल परब : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात वीजेच्या खाबांवरील लोंबकळणारी वायर दिनांक ५ ऑक्टोबर, २००८ रोजी वा त्यादरम्यान अंगावर पडून वीजेच्या धक्क्याने एक २२ वर्षीय युवकाचा जागीच मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लोंबकळणारी वायर खाली आल्याची बाब स्थानिक नागरिकांनी महावितरणचे कनिष्ठ अभियंता श्री.श्रीवास्तव याच्या निदर्शनास आणले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कनिष्ठ अभियंता श्री.श्रीवास्तव यांनी उक्त तक्रारीची गांभीर्याने दखल घेवून कार्यवाही न केल्यानेच उक्त युवकाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, संबंधित कनिष्ठ अभियंत्याविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

डॉ.सुनील देशमुख,श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (१) नाही, हे खरे नाही. ठाणे शहर, बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात अशा प्रकारची कोणतीही घटना घडलेली नाही.

परंतु महावितरणचे, लालाचक्की शाखाकार्यालय, उल्हासनगर परिक्षेत्रातील सुभाष टेकडी, उल्हासनगर, कँप-४ या परिसरात दिनांक ५ ऑक्टोबर, २००८ रोजी श्री.अजिंक्य मछिंद्र शिंदे, वय २२ वर्षे, यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे.

(२) सदर वायर लोंबकळत असल्याबाबतची तक्रार घटनेपूर्वी आलेली नाही. तथापि, वायर तुटल्याची तक्रार दिनांक ५/१०/२००८ रोजी रात्री सुमारे ८.३० वा घटना घडल्यानंतर प्राप्त झाली.

(३) हे खरे नाही. श्री.श्रीवास्तव, कनिष्ठ अभियंता, लालचक्की शाखा कार्यालय, यांनी तक्रारीची ताबडतोब दखल घेऊन संबंधित तांत्रीक मदतनीस श्री.बी.एम.धोत्रे यांना भ्रमणध्वनीद्वारे (मोबाईलवरुन) विद्युत पुरवठा खंडीत करण्याचे आदेश दिले, त्याप्रमाणे श्री.बी.एम.धोत्रे, मदतनीस यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन विद्युत पुरवठा खंडीत केला. त्यानंतर विद्युत प्रणालीची पाहणी व दुरुस्ती करुन विद्युत प्रणाली सुरळीतपणे चालु केली.

५...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(४) व (५) होय. महावितरण कपंनीतर्फे तसेच विद्युत निरीक्षण, ठाणे-२ यांच्या कार्यालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती श्री.श्रीवास्तव, कनिष्ठ अभियंता यांना पत्र क्र. अअ/गोप.३०२, दिनांक ०१/१२/२००८ अन्वये व श्री.बी.एम.धोत्रे, तारमार्गतंत्री यांना उपकार्यकारी अभियंता, उपविभाग उल्हासनगर-४, यांचे पत्र क्र. ५९ दिनांक ०१/१२/२००८ अन्वये आरोप पत्र देण्यात आले असून त्यावरील पुढील कार्यवाही चालु आहे.

ॲड. अनिल परब :सभापती महोदय, या प्रश्नाला शासनाने अतिशय चुकीचे आणि दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. घटनास्थळी इलक्ट्रीक वायर लोंबकळत पडली होती. तिकडच्या गावातील लोकांनी संबंधित कनिष्ठ अभियंता यांना कळविले होते. त्या ठिकाणी विजेची वायर तुटून पडल्यामुळे श्री. अजिंक्य शिंदे नावाचा व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. उत्तरात असे म्हटले आहे की, घटना घडल्यानंतर आम्हाला तक्रार प्राप्त झाली. ही घटना ज्या व्यक्तीने बघितली त्याचे ॲफिडेवीट मी उपलब्ध करुन देऊ शकतो. ही घटना किती वाजता घडली व त्यासंबंधी विद्युत मंडळाच्या कार्यालयाकडे कधी तक्रार केली यासंबंधीचा रेकॉर्ड दूरध्वनी कार्यालयातून उपलब्ध होऊ शकतो. शाखा अभियंता यांनी त्यांच्या कनिष्ठ अभियंता यांना या घटनेसंबंधी किती वाजता सांगितले, त्यासंबंधीचा देखील रेकॉर्ड मिळू शकतो. ही घटना घडण्यापूर्वी वीज मंडळाच्या कार्यालास यासंबंधीची माहिती मिळाली होती. या प्रश्नाच्या उत्तरात म्हटले आहे की, आरोपपत्र दिलेले आहे. जर वीज मंडळाची काही चूक नव्हती तर आरोपपत्र दाखल करण्याची गरज नव्हती. या संदर्भात माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, तक्रार अगोदर प्राप्त होऊन देखील वीज मंडळाच्या कार्यालयाकडून उचीत कार्यवाही न झाल्यामुळे एका युवकाचा यामध्ये मृत्यू झाला आहे. असे सिध्द होते की, तक्रार अगोदर प्राप्त होऊन देखील तेथील अधिका-यांनी निष्काळजीपणा केला आहे. ज्यांनी ज्यांनी या प्रकरणी निष्काळजीपणा केला आहे,त्यांचे विरुध्द सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल केले जातील काय ? ज्या तरुणाचा मृत्यू झाला आहे, त्या तरुणाच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई दिली जाईल काय ?

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की 5 ऑक्टोबर, 2008 रोजी पाऊस आणि जोराचा वारा सुटल्यामुळे वायर तुटली. सकाळी 8.30 च्या सुमारास वायर तुटली. संबंधित ठिकाणी कनिष्ट अभियंता, लालचक्की शाखेचे कार्यवाह श्री.धोत्रे व इतर अधिकारी पोहोचले होते. वायर तुटल्यामुळे मुलाचा मृत्यू झाला ही गोष्ट खरी आहे. खरे पाहता वायर तुटल्याबरोबर तेथील विजेचा प्रवाह खंडित होणे आवश्यक होते, परंतु वीज प्रवाह खंडित झाला नाही, ही पण एक मोठी चूक आहे. त्यासाठीच जे कर्मचारी दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई केली आहे. श्री.धोत्रे, सहाय्यक तारमार्ग (तांत्रिक) याला दिनांक 6.12.2008 रोजी निलंबीत केले असून श्री.श्रीवास्तव, कनिष्ट अभियंता यांची विभागीय चौकशी करुन त्यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी रोखल्या आहेत. नियमानुसार ज्या मुलाचा मृत्यू झाला त्याच्या वारसांना 1 लाख रुपये नुकसान भरपाई मंजूर केली आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, चुकीमुळे निलंबन केले परंतु हा सदोष मनुष्यवधाचा गुन्हा आहे. त्यामुळे सदोष मनुष्यवधाचा खटला दाखल करणार का?

डॉ.सुनील देशमुख : चौकशीनंतर दोषी आढळून आले तर करता येईल. परंतु तातडीने कारवाई करुन त्यांना निलंबीत केले आहे. संपूर्ण चौकशीनंतर असे वाटले की, त्यांनी संपूर्ण निष्काळजीपणा केला आहे तर तेही आपण करु शकतो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले की, पाऊस आणि जोराचा वारा यामुळे वायर तुटली. अशा प्रकारे वायर तुटून दुर्घटना घडतात म्हणूनच सेफ गार्डच्या माध्यमातून ताबडतोब विद्युत प्रवाह खंडित व्हावा अशी उपाययोजना केली जाते. या घटनेमध्ये विद्युत प्रवाह खंडित होण्याऐवजी चालूच राहिला. म्हणून हा केवळ एका लाईनमनचा गुन्हा गृहित न धरता ज्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी इन्स्पेक्शन करणे आवश्यक असते त्यांनी इन्स्पेक्शन केले नाही, अशा घटना महाराष्ट्रात वारंवार घडतात. रत्नागिरी जिल्हयामध्ये आतापर्यंत वायर तुटून 9 लोक मृत्युमुखी पडले आहेत. गार्ड नसल्यामुळे या युवकाचा मृत्यू झाला आहे. इन्स्पेक्शन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी करणे आवश्यक होते. ते न केल्यामुळे त्यांना देखील जबाबदार धरुन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाईल का?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.49154.....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी जो प्रश्न विचारला तो योग्य आहे. म्हणून याबाबत वरिष्ठ पातळीवर तांत्रिक वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत योग्य ती चौकशी करु आणि अशी व्यवस्था असणे आवश्यक आहे, जेणेकरुन तारा तुटतात त्यावेळेला फ्युज जाऊन विद्युत प्रवाह खंडित होणे आवश्यक असते. अशा प्रकारची खबरदारी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर अशा तारा फार जुन्या झालेल्या आहेत, पोल सडलेले आहेत म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात तारा आणि पोल बदलण्याचा कार्यक्रम मंडळामार्फत सुरु असल्यामुळे भविष्यात याची खबरदारी निश्चितपणे घेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, नुकसान भरपाई म्हणून 1 लाख रुपये जाहीर केल्याबद्दल धन्यवाद देतो. परंतु जसे बेस्ट किंवा रेल्वे विभागात आपल्या चुकीमुळे अपघात होऊन कोणाचा मृत्यू झाला तर नुकसान भरपाई देण्याबाबत निकष ठरविले आहेत. त्याच धर्तीवर महावितरण कंपनीच्या माध्यमातून तांत्रिक चुकांमुळे कोणा नागरिकाचा मृत्यू झाला तर त्याबद्दल नुकसान भरपाई कायद्याने दिलीच पाहिजे, अशी तरतूद नियमावलीत करणार आहात का? तरतूद आहे का?

डॉ.सुनील देशमुख : नियमावलीत तरतूद आहे म्हणूनच 1 लाख रुपये मदत दिली आहे.

श्री.भास्कर जाधव : हा नियम आहे. परंतु 22 वर्षाचा तरुण मृत झाला आहे. म्हणजे त्यांच्या आयुष्याचा आणि पुढच्या भवितव्याचा विचार करुन त्याच्या वारसाला जे मिळणे आवश्यक आहे ती मदत दिली जाईल का?

सभापती : सन्माननीय राज्यमंत्री आणि मंत्री यांनी या प्रश्नाचे गांभीर्य ओळखले आहे. मला वाटते की, या अनुषंगाने अशा पध्दतीचे अपघात होतात त्या बाबतीत अत्यंत काळजीपूर्वक दुर्दैवाने असा प्रकार घडला तर जे मृत्यमुखी पडले त्यांच्या बाबतीत भरीव मदत कशी करता येईल यादृष्टीने आपण पहावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक

(५) * ४६२०० प्रा. बी. टी. देशमुख , श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे

: सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूकीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ ची याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासनाने काय कारवाई केली आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री.राजेश टोपे : (१) व (२) याचिका क्रमांक ९९८/२००७ वर मा.उच्च न्यायालयाने दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार उचित असा निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून त्याप्रमाणे मंत्रिमंडळासमोर लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यात जो निर्णय होईल तो संगणक शास्त्र विषयाच्या बाबतीत लागू होईल.

परंतू प्रशासकीय कारणास्तव असा निर्णय घेण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 46200.....

प्रा. बी.टी.देशमुख : संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना जो भेदभाव करण्यात येतो त्या अनुषंगाने मला असे विचारावयाचे आहे की, संगणक शास्त्र हा विषय विज्ञान शाखेअंतर्गत शिकविला जातो म्हणून विज्ञान शाखा 100 टक्के अनुदानावर असल्याने संगणक शाखा या एका विषयाच्या ओघाने अनुदान देणे क्रमप्राप्त ठरते. असे असतांना काही महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र विज्ञान शाखाअंतर्गत असतांनाही अनुदान दिले तर काहींना दिले नाही, ही गोष्ट खरी आहे काय? त्याचप्रमाणे महाविद्यालयात विज्ञान शाखा 100 टक्के अनुदानावर असूनही संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आली आहे त्यामुळे अशा कॉलेजेसमधील विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण होतो असे निदर्शनास आले. त्यामुळे अनेक महाविद्याल्यात संगणक शास्त्र या विषयाची कायम विना अनुदानित ही अट काढून टाकली तर काही कॉलेजेसची कायम विनाअनुदानित ही अट काढली नाही, हे खरे आहे काय?

श्री. राजेश टोपे : महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन प्रश्न विचारले ते दोन्ही प्रश्न खरे आहेत. एक मात्र नक्की आहे की, जे धोरण राज्यशासनाने निश्चित केले होते त्यानुसार सन 1991 नंतर वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित ग्राह्य धरणार होतो. त्यानंतर सुध्दा अशा काही मान्यताप्राप्त विज्ञान शाखा आणि त्यांना अटॅच असलेले वैकल्पिक विषय असतील त्यांना अनुदान देण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात निश्चित प्रकारे शासन आणि संचालक पातळीवर डिस्क्रीमिनेशन झाले आहे, जी विसंगती घडलेली आहे ते मी सांगू इच्छितो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सन 1991 नंतर धोरण नसताना सुध्दा काही महाविद्यालयांमध्ये अनुदानित आणि काही महाविद्यालयांना विना अनुदानित विषय दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने डिसेंबर, 2001 पासून या राज्यात कायम विना अनुदानित धोरणाची अंमलबजावणी सुरु केली. प्रश्न असा आहे की, कायम विना अनुदानित तत्व डिसेंबर, 2001 ला शासनाने स्वीकारले असले तरी त्यापूर्वी सुध्दा काही महाविद्यालयांना संगणक शास्त्र विना अनुदान तत्वावर दिलेले आहेत तर काहींना अनुदानित तत्वावर या विषयांना मान्यता दिलेली आहे. अशा प्रकारे भेदभाव झालेल्या सर्व महाविद्यालयांना या विषयासाठी शासन

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुदान देणार काय? त्याचबरोबर संगणक शास्त्र विषयात जसा भेदभाव झाला तसाच भेदभाव शारीरिक शास्त्र या विषयाच्या बाबतीत सुध्दा झालेला आहे. म्हणून डिसेंबर, 2001 पूर्वी ज्या महाविद्यालयांना शारीरिक शास्त्र हा वैकल्पिक विषय असणाऱ्या आणि संगणक शास्त्र वैकल्पिक विषय असणाऱ्या महाविद्यालयांना शासन अनुदानावर आणण्यासंबंधीचा निर्णय घेणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी अगोदरच, सन 1991 नंतर वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित म्हणूनच मान्यता राहील, असे स्पष्ट धोरण असताना काही प्रमाणात राज्यात ज्या घटना घडल्या ते मान्य केले. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, सन 2001 ला कायम विना अनुदानित तत्वावर महाविद्यालयांना मान्यता देण्यासंबंधीचे धोरण शासनाने स्वीकारले. त्यामुळे सन 1991 ते 2001 या काळात कायम विना अनुदानित कॉलेजेसना मान्यता देणार काय? यासंदर्भात मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, यापूर्वी ज्या चुका घडल्या त्यांच्याबाबत चौकशी होणे आवश्यकच आहे आणि ती करण्यात येईल. परंतु कोर्टाने मधल्या काळात ऑर्डर्स दिल्या होत्या की याबाबत शासनाने उचित निर्णय घ्यावा. त्या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अनेक वैकल्पिक विषय मग त्यात कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, शारीरिक शास्त्र या विषयांची व्याप्ती तसेच त्यासाठी नेमलेले प्राध्यापक आणि अधिव्याख्याते तसेच विद्यार्थ्यांची संख्या ही सर्व व्याप्ती लक्षात घेऊन निश्चितपणे मंत्रिमंडळासमोर हा विषय जाणार आणि लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

श्री. वसंतराव खोटरे : महोदय, ही अत्यंत गंभीर बाब आहे की काही महाविद्यालयांची विना अनुदानित ही अट काढून टाकली तर काहींची काढली नाही, अशा प्रकारे भेदभाव जो केलेला आहे तो नष्ट करुन ज्या अधिकाऱ्यांनी असा निर्णय घेतला त्यांच्यावर कारवाई करणार काय? तसेच उर्वरित महाविद्यालयांना भूतलक्षी प्रभावाने विना अनुदानितमधून अनुदानित तत्वावर मान्यता देऊन फायदा देणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीरहित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र. : 46200....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात विसंगती झालेली आहे हे मी सांगितलेले आहे त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या संदर्भात जो निर्णय असेल तो घेण्यात येईल. परंतु सर्वांना सरसकट अनुदान देण्याच्या दृष्टीने बॅक इफेक्टच्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात हायकोर्टाने जे ऑर्डर्स दिलेले आहेत त्याचे पालन करण्यामध्ये शासनाकडून विलंब झालेला आहे हे मी मान्य करतो. हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी निश्चितपणे आणला जाईल आणि येणा-या अधिवेशनाच्या अगोदर या संदर्भात निर्णय घेतला जाईल. या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा विषय मूळ प्रश्नापासून दूर जाता कामा नये अशी विनंती आहे. या सभागृहात संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणकू दिली आहे, हे मान्य करावयाचे परंतु हा भेदभाव दूर करण्यासाठी काहीही प्रयत्न करावयाचे नाहीत, असे या शासनाचे धोरण आहे. या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने 26 नोव्हेंबर, 2007 रोजी जे निर्देश दिलेले आहेत ते मी या ठिकाणी वाचून दाखवतो.

" However, if the State Government has granted permission to some colleges and institutions to start the above subject on No Grant Basis, in that case, we permit the Petitioner to make representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representatio0n is made, the State Government is directed to take decision on merit, according to the Law and Procedure applicable in this regard, within a period of 8 weeks of the date of such representation."

या प्रश्नाच्या संदर्भात भेदभाव झाला हे मान्य करावयाचे परंतु हा भेदभाव दूर करण्यासाठी शासनाकडून काहीही प्रयत्न होत नाहीत. घटनेच्या कलम 114 प्रमाणे आपल्याला अशा प्रकारचा भेदभाव करता येत नाही, असे असतांनाही या प्रश्नाच्या संदर्भात शासनाकडून भेदभाव झालेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने 19 डिसेंबर, 2007 रोजी 8 आठवडयात निर्णय घ्यावा, असे निर्देश दिलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात एकूण 23 मुद्दे आहेत, हे सर्व मुद्दे महत्वाचे आहेत. 19 डिसेंबर, 2007 रोजी 8 आठवडयात निर्णय घ्यावा, असे कोर्टाने निर्देश दिलेले असतांना एक

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .....

वर्ष उलटून गेले तरी शासनाकडून काही सुध्दा कार्यवाही झाली नाही, निर्णय घेतला गेला नाही. कोर्टाने जे निर्देश दिलेले आहेत त्याच्या विरुध्द आपल्याला वागता येत नाही. त्यामुळे कोर्टाने सांगितल्या प्रमाणे या विषयाच्या संदर्भात 8 आठवडयात निर्णय घेतला जाईल काय ? तसेच हे जे कागदपत्र ज्या अधिका-याने दाबून ठेवले त्या अधिका-यावर कोणती कारवाई केली जाईल ?

श्री. राजेश टोपे : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख यांनी विचारलेल्या दोन्ही प्रश्नांना होय असेच उत्तर आहे.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, शासन एका बाजूने संगणकीकरणाचा आग्रह धरते परंतु दूस-या बाजूने संगणकीकरणाच्या प्रशिक्षणासाठी लक्ष दिले जात नाही, संगणकीय शिक्षण देणा-या संस्थांना अनुदान देण्यासाठी टाळाटाळ केली जाते. तेव्हा संगणकीकरणाच्या संदर्भात शासनाकडून होणारा हा विरोधाभास बंद केला जाईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातच माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेबांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात उच्च शिक्षण विभागाचा पॉझीटीव्ह रोल राहील. हा सर्व विषय फक्त उच्च शिक्षण विभागाच्या कक्षेत येत नाही. या विषयाच्या संदर्भात मंत्रीमंडळाचा निर्णय महत्वाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांना सांगितल्या प्रमाणे पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. अजित.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46200.....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, विज्ञानशाखा असलेल्या काही महाविद्यालयांना अनुदान देण्यात आलेले आहे. त्या महाविद्यालयांनी वैकल्पिक विषय बदलले म्हणून त्या महाविद्यालयांना अनुदान नाकारणे बरोबर होणार नाही. यापूर्वी वैकल्पिक विषय असलेल्या महाविद्यालयांना कायम स्वरुपी अनुदान देण्यात आलेले आहे. शासनाने हा भेदभाव केलेला आहे तो योग्य नाही. तेव्हा या संदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, तेच तेच प्रश्न रिपीट होत आहेत. कॉम्प्युटर सायन्स या व्यतिरिक्त अनेक वैकल्पिक विषय आहेत. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, अभियांत्रिकी शास्त्र, शारीरिक शास्त्र, इत्यादी वैकल्पिक विषय विज्ञान शाखेला जोडण्यात येतात.एखाद्या महाविद्यालयात कॉप्युटर सायन्स हा विषय असतो, तर दुसऱ्या महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स सायन्स असतो. हा व्यापक प्रश्न आहे. फक्त कॉम्प्युटर सायन्स पुरता हा प्रश्न मर्यादित नाही. या संदर्भात अभ्यास करावा लागेल. त्यामुळे मंत्रिमंडळासमोर हा विषय घेण्यात येईल व त्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल अशी खात्री मी सभागृहाला देतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ढेकरी (ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद) येथील शाळेच्या वर्गखोल्यांच्या दुरुस्तीबाबत

(6) * 47499 श्री. सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे , श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ढेकरी (ता.तुळजापूर,जि.उस्मानाबाद) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्गखोल्या पावसामुळे गळत असल्यामुळे गावकऱ्यांनी दिनांक 5 ऑगस्ट, 2008 रोजी शाळेला कुलूप ठोकले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शाळेच्या इमारतीच्या दयनीय अवस्थेबद्दल व दुरूस्तीबाबत प्रशासनाने काय उपायोजना केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे,श्री.विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याकरिता : (1) नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 2 व 3 च्या उत्तरात सुधारणा आहे. या दोन्ही प्रश्नांची उत्तरे "प्रश्न उद्‌भवत नाही" अशी देण्यात आलेली आहेत. त्याऐवजी "काही खोल्या गळत आहेत. काही खोल्या नादुरुस्त आहेत. नादुरुस्त खोल्यांची आवश्यक ती दुरुस्ती जिल्हापरिषदेमार्फत करण्यात येईल." असे कृपया वाचावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी केलेली सुधारणा आमच्यापर्यंत पोहोचली नाही. पहिल्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे देण्यात आलेले आहे. त्या उत्तरावर मंत्रिमहोदय ठाम आहेत काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. ढेकरी येथील जिल्हापरिषद शाळेच्या वर्गखोल्या पावसाळ्यात गळत असल्यामुळे तेथील गावकऱ्यांनी त्या शाळेस कुलूप लावले होते. वर्तमानपत्रात तशा बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. त्यासंबंधीचा पुरावा माननीय मंत्रिहोदयांकडे दिल्यास ज्या अधिकाऱ्यानी ही असत्य माहिती दिलेली आहे त्यांच्यावर कारवाई करणार काय ? जिल्हापरिषद शाळेच्या वर्गखोल्या पावसाळयात गळतात ही गोष्ट एकाच ठिकाणी नसून राज्यातील अनेक भागांत अशी परिस्थिती आहे. आज जिल्हापरिषदेच्या शाळांची अतिशय बिकट अवस्था झालेली आहे. अनेक शाळा नादुरुस्त झालेल्या आहेत. तेव्हा राज्यांतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 47499.....

श्री.विक्रम काळे.....

सर्व जिल्हापरिषदेच्या शाळा दुरुस्त करण्याचा धडक कार्यक्रम शासन राबविणार आहे काय ? तसेच जिल्हापरिषदेच्या शाळांतील रिक्त पदे त्वरित भरणार काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ढेकरी, ता.तुळजापूर, जि.उस्मानाबाद येथील जिल्हापरिषदेच्या सात शाळांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत तीन वर्ग खोल्यांचे नवीन बांधकाम हाती धेण्यात आले आहे. मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत एक वर्ग खोलीचे बांधकाम होती घेण्यात आलेले आहे. तर दोन वर्गखोल्यांचे सादील अंतर्गत तरतूद एक लाख सात हजार रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. दुसऱ्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, शिक्षकांची रिक्त झालेली पदे वेळोवेळी भरण्यात येतात. पुढील काळात देखील रिक्त पदे भरण्यात येतील.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ढेकरी येथील जिल्हापरिषदेच्या शाळेच्या वर्गखोल्या पावसाळ्यात गळत असल्यामुळे तेथील गावकऱ्यांनी शाळेस कुलूप ठोकले. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, वर्गखोल्यास अनुदान दिलेले आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, या वर्गखोल्यांची दुरुस्ती झालेली आहे काय ? तसेच शाळेस अजून कुलूप लावलेले आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ढेकरी येथील जिल्हापरिषदेच्या शाळेस कुलूप लावलेले नाही. सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली त्याबाबत निश्चितपणे चौकशी करुन जर अधिकाऱ्यांनी असत्य माहिती दिली असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 47499....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगाने मुलभूत स्वरुपाचा प्रश्न निर्माण होत असून तो प्रश्न मी माननीय मंत्रिमहोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सर्व शिक्षा अभियानाच्या अंतर्गत सध्या मोठया प्रमाणावर कार्यक्रम राबवावा यासाठी शासनाने आर्थिक तरतूद केलेली आहे. तसेच हा कार्यक्रम राबवत असतांना काही निकष ठरविण्यात आलेले आहेत. ज्या गावात शाळेसाठी इमारत नाही त्या ठिकाणी प्राधान्याने इमारत बांधण्यात यावी त्या नंतर ज्या ठिकाणची शाळेची इमारत नादुरुस्त आहे त्या ठिकाणचे काम हाती घेण्यात यावे आणि त्यानंतर अन्य ठिकाणचे काम घेण्यात यावे अशा प्रकारचे निकष् ठरविण्यात आलेले आहेत. अनेकदा जिल्हा परिषदेमध्ये असे होते की ज्यांची सत्ता आहे ते पदाधिकारी हे निकष बाजूला ठेवून ज्या ठिकाणचे काम हाती घेणे आवश्यक आहे ते काम सारुन आपल्या कार्यकर्त्यांना खूश करण्यासाठी दुस-या ठिकाणच्या शाळा इमारतीचे वा दुरुस्तीचे काम हातात घेतात. ज्या ठिकाणी शाळेच्या इमारतीच्या बांधकामास प्राधान्य देणे आवश्यक आहे वा दुरुस्तीच्या कामास प्राधान्य देणे आवश्यक आहे त्या ठिकाणच्या कामाला प्राधान्य न देता दुस-या कामांना प्राधान्य दिल्यामुळे यासंबंधीची समस्या निर्माण झालेली आहे काय? ही बाब तपासून या संबंधीचा शासनाचा धोरणात्मक निर्णय योग्य रीतीने राबवता येईल यासाठी काही निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे :होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदूर्ग जिल्ह्यातील ग्रंथालयांमधील कर्मचाऱ्यांना पुरेसा पगार व सुविधा मिळण्याबाबत

(७) * ४६७४८ श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. गोविंदराव आदिक , सुरेश नवले : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यात ११८ ग्रंथालये असून सदर ग्रंथालयांमध्ये कार्यरत असलेल्या २२५ कर्मचाऱ्यांना वेतना शिवाय इतर कोणत्याही सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबांवर उपसमारीची वेळ आली असल्याचे माहे ऑगस्ट, २००८ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कर्मचाऱ्यांना पुरेसे वेतन व इतर सर्व सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (१) नाही.

(२) व (३) ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात भरीव वाढ होण्याच्या दृष्टीने शासनाने महाराष्ट्र ग्रंथालय अधिनियम व त्या अंतर्गत नियम १९७० लागू केल्यापासून आजतागायत एकूण ५ (पाच) वेळा ग्रंथालयांच्या अनुदानात दुप्पट वाढ केली असून त्यातील ५०% रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करणे आवश्यक आहे.

श्री.राजन तेली :सभापती महोदय, हा प्रश्न फक्त सिंधुदूर्ग जिल्हयातील ग्रंथालयातील कर्मचा-याचा नसून संपूर्ण राज्यातील ग्रंथालयात काम करणा-या कर्मचा-यांचा आहे. ज्या प्रमाणे विद्यार्थ्यांना घडविणा-या शिक्षकांना महत्व दिले जाते त्याप्रमाणे ग्रंथालयालासुध्दा महत्व दिले पाहिजे. परंतु दुर्देवाने शासनाकडून ग्रंथालयात काम करणा-या ४ हजार ५१८ क वर्गाच्या आणि ४ हजार ५२५ ड वर्गाच्या कर्मचा-यांना अर्ध वेतन दिले जाते. तीन तास काम करणा-या कर्मचा-यांना एक हजार ते दीड हजार रुपये वेतन दिले जाते. त्यामुळे संपूर्ण राज्यातील ग्रंथालयात काम करणा-या कर्मचा-याचा हा महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांच्या बाबतीत पत्की समिती नेमण्यात आली असून त्या समितीने शासनाकडे अहवाल सादर केला होता त्या समितीने आपल्या अहवालात केलेल्या शिफारशी स्वीकारुन ग्रंथालयात काम करणा-या कर्मचा-यांचा प्रश्न शासन कायम स्वरुपी सोडविणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, पत्की समितीने शासनाकडे अहवाल सादर केला होता परंतु अधिनियम आणि नियम यात दुरुस्ती करण्या पुरताच भाग शासनाने मान्य केलेला आहे या ग्रंथालयात काम करणा-या कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात ८ हजार ६४९ ग्रंथालयातील १६ हजार कर्मचा-यांना सरकारी कर्मचा-यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करावी अशा प्रकारची शिफारस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली होती. परंतु त्यामुळे पडणा-या मोठया आर्थिक भारामुळे ही शिफारस मान्य करणे शक्य नाही हे वेळोवेळी सांगितलेले आहे. ग्रंथालयात काम करणारे कर्मचारी हे सरकारी कर्मचारी नाहीत. त्याचप्रमाणे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय अधिनियम १९७० अंतर्गत जे नियम करण्यात आले होते त्यामध्ये परीरक्षणासाठी निधी देण्यात यावा अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे या कर्मचा-यांना सरकारी कर्मचा-यांप्रमाणे वेतन द्यावे अशा प्रकारची तरतूद कायद्यात करण्यात आलेली नाही. हे कर्मचारी तीन तास काम करीत असतात त्याचबरोबर क आणि ड वर्गाचे कर्मचारी हे अप्रशिक्षित आहेत. या १६ हजार कर्मचा-यांना वेतनश्रेणी लागू करण्यासाठी कायदेशीर बाबी तपासून पहावयाच्या असेल तर सेवाविषयक अन्य बाबी हाताळण्यासाठी स्वतंत्र विभाग तयार करावा लागेल. त्याचबरोबर ग्रंथालय ही लोक चळवळ आहे ज्या वेळी यासंबंधीचे नियम तयार करण्यात आले होते. त्यावेळी ग्रंथालय चळवळीला लोक चळवळीचे स्वरुप देण्यात आले होते. ते लोक चळवळीचे स्वरुपच ठेवावे` त्यांना सहाय्यक अनुदान जरुर द्यावे असे ठरविण्यात आले असून त्या अनुषंगाने मी या ठिकाणी अत्यंत अभिमानाने सांगू इच्छितो की, संपूर्ण देशात जास्तीत जास्त पैसे खर्च करणारे आपले पहिल्या नंबरचे राज्य असून ५१ कोटी रुपये दरवर्षी खर्च केले जातात त्याचबरोबर नवीन ग्रंथालये सुध्दा सुरु केली जातात त्याचा आर्थिक भारसुध्दा राज्याच्या तिजोरीवर पडतो.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटलेले आहे की, पाच वेळा ग्रंथालयाच्या अनुदानात दुप्पट वाढ केली असून त्यातील ५० टक्के रक्कम कर्मचा-यांच्या वेतनावर खर्च करणे आवश्यक आहे " अशा प्रकारे दिलेल्या अनुदानापैकी ५० टक्के रक्कम कर्मचा-यांच्या वेतनावर खर्च करणे बंधनकारक असतांना शासनाने त्याप्रमाणे खर्च केलेला आहे काय , हा खर्च केला नसल्यास तो करण्यात येणार आहे काय, तसेच तो खर्च करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

नतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46748 ....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये निश्चितप्रकारे जे अनुदान दिले जाते ते अ, ब, क आणि ड श्रेणीतील ग्रंथालयांसाठी दिले जाते आणि त्या अनुदानातल 50 टक्के रक्कम वेतनावर खर्च केली जावी असे बंधन ग्रंथालय चालविणाऱ्या व्यवस्थापन समितीवर आहे. तसे होत नसेल आणि त्याबाबत तक्रार आली वा त्याबाबत काही त्रुटी होत असतील तर त्याबाबत जरूर चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, पत्की समितने या ग्रंथालयांच्या संदर्भात जो अहवाल दिलेला आहे त्यात ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत जी शिफारस केलेली आहे ती शासनाने स्वीकारलेली नाही. परंतु ही ग्रंथालय चळवळ महत्त्वाची असून या ग्रंथालयांच्याबाबतीत या चळवळीतून महत्त्वाचे काम होत आहे म्हणून माझी या निमित्ताने विनंती आहे की, या ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत सरकार पुनर्विचार करणार काय ? दुसरे म्हणजे या ग्रंथालयांच्या बाबतीत पत्की समितीने जो अहवाल सादर केलेला आहे त्यातून त्यांनी ग्रंथालय अधिनियमाचे प्रारूपदेखील दिलेले आहे. कारण आपल्या सध्याच्या या संबंधीच्या कायद्यात गेल्या 50 वर्षामध्ये काहीही सुधारणा झालेली नाही. म्हणून पत्की समितीने जे अधिनियमाचे प्रारूप दिलेले आहे आणि त्याद्वारा या कायद्यात ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्यांचा विचार करून त्यात बदल सरकार करणार आहे का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्याबाबतीत पुनर्विचार करणार काय असा जो प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे त्याला स्पष्ट शब्दात 'नाही' असे उत्तर आहे. कारण त्यांना आपण वेतन देऊ शकत नाही व त्याची कारणे देखील मी यापूर्वी येथे नमूद केली आहेत. त्यामुळेच वेळोवेळी या ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याच्या दृष्टीने आपण पावले उचलत असतो. आताही दोन वर्षापूर्वी त्यांच्या अनुदानात आपण दुपटीने वाढ केलेली आहे. अशा प्रकारे त्यांच्या अनुदानाची व्याप्ती वाढवून पुढील काळात देखील त्यांच्या अनुदानात वेळोवेळी वाढ करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे विचार करता येऊ शकेल. तेव्हा अनुदान आणि अधिनियम या बाबतीत पत्की समितीच्या अहवालात ज्या शिफारशी आहेत त्या स्वागतार्ह आहेत आणि त्याबाबत उचित निर्णय करण्याच्या बाबतीत शासन निश्चितपणे सकारात्मक दृष्टीकोन दाखवील.

..... जे 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या ग्रंथालय कर्मचाऱ्यांना वेतन देण्याचे शासनाचे धोरण नाही आणि शासन त्यांना वेतन देणार नाही असे उत्तर माननीय मंत्र्यांनी येथे दिले आहे. म्हणजे या ग्रंथालय कर्मचाऱ्यांना जीवनास आवश्यक इतके वेतन मिळण्याचा, त्यांना जीवन जगण्याचा अधिकार नाही असे शासनाचे धोरण आहे काय ? दुसरे असे की, आपण ग्रंथालयाला दिलेल्या अनुदानापैकी 50 टक्के अनुदान संबंधित ग्रंथालय चालविणाऱ्या व्यवस्थापनाने ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च केले पाहिजे असे बंधन असल्याचे आणि तसे होत नसेल तर संबंधितांवर आम्ही कारवाई करू असेही माननीय मंत्री महोदयांनी येथे आता सांगितले आहे. पण मग त्यांना वेतनासाठी आपण स्वतंत्र अनुदान देण्याची आवश्यकता आहे ते तरी देण्याची भूमिका शासन घेईल का ? अन्यथा या कर्मचाऱ्यांना जगण्याचाही अधिकार नाही अशी शासनाची भूमिका आहे का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत मी आताच सांगितले की, हे कर्मचारी सरकारचे कर्मचारी नाहीत त्यामुळे त्यांना किमान वेतन या ठिकाणी लागू होत नाही. दुसरे म्हणजे ते व्हॉलंटरी काम करणारे, 3 तासासाठी काम करणारे कर्मचारी असतात. आणि म्हणूनच त्यांच्या व्यवस्थापनाने आपण ग्रंथालयासाठी देऊ केलेल्या अनुदानातील 50 टक्के रक्कम या कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च करावी असे बंधन घालून दिलेले आहे. आता त्यासाठी वेगळे पैसे द्यावयात असे आपण सुचविले आहे तर त्याबाबत जरूर वेगळा विचार करता येऊ शकेल.

***

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 49447</u>

सन्माननीय सदस्य अनुपस्थित.

***

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जळगाव जिल्ह्यातील केळी पिकावर विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे नुकसान भरपाई मिळणेबाबत

(9) * 46276 **श्री.दिलीपराव सोनावणे, श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. चरणसिंग सप्रा , श्री. गुरुमुख जागवानी , श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर** : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जळगाव जिल्ह्यात माहे एप्रिल-मे, 2008 मध्ये कथित वाढत्या उष्मानामुळे आणि पाणी टंचाई व त्यातच भारनियमनामुळे केळी बागायतीदारांना पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे केळी पिकावर विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे केळी उत्पादक बागायतीदारांची केळ्यांची पिके धोक्यात आली असल्याचे निदर्शनात आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सन 2007 मध्ये केळी पिकावर करपा रोगांमुळे हजारो हेक्टर केळीचे नुकसान झालेल्याचा सर्व्हे करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या नुकसानीचा सर्व्हेक्षणाचा पंचनामा होऊनही अद्याप केळी बागायतीदारांना नुकसानभरपाई अदा करण्यात आलेली नाही हे खरे आहे काय,
(4) असल्यास, याबाबत संबंधित कृषि (फलोत्पादन) विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(5) उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

श्री.विनय कोरे : (1) अशंत: खरे आहे.
(2) सन 2007 मध्ये केळी पिकावर करपा रोगामुळे झालेल्या नुकसानीची संयुक्त पाहणी कृषि विभागातील अधिकारी व कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ यांच्यामार्फत करण्यात आली आहे.
(3) किड व रोग ही बाब नैसर्गिक आपत्तीच्या स्थायी आदेशामध्ये समाविष्ट नसल्याने नुकसान भरपाई देय नाही. तथापि जळगांव जिल्ह्यातील केळी पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी राज्य पुरस्कृत पीक संरक्षण योजनेअंतर्गत अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले असून त्यामधून 50% अनुदानावर औषधांचा पुरवठा करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे करपा रोगाच्या नियंत्रणासाठी उपाययोजना करण्याबाबत शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, 2008 च्या एप्रिल-मे मध्ये अतिशय उष्मा वाढल्याने तसेच पाणी टंचाई आणि भारनियमन यामुळे केळ्यांच्या पिकांवर व्हायरस होऊन रोग आले. त्यामुळे केळीच्या बागा संपूर्णपणे बसल्या गेल्या. त्याबाबत उपाय योजना विचारली असता तज्ज्ञांचा सल्लादेखील मिळाला पण त्याचा काही उपयोग झाला नाही आणि जे काही व्हायरस हाते त्यामुळे संपूर्ण केळीचे पीक खाली बसले व शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या संकटामध्ये केळी

.... जे 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सोनावणे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 46276 ....

बागायतदार शेतकरी गेल्या दोन वर्षांपासून होरपळून निघत आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, केळींवर जो करपा रोग पडला आहे आणि व्हायरस पसरला आहे त्यावर काहीही उपाय नसल्यामुळे कोठल्याही तज्ज्ञांचा सल्ला तेथे लागू पडत नाही आणि परिणामी केळीच्या बागा उपटून टाकाव्या लागल्या आहेत. तेव्हा द्राक्षे, आंबा इत्यादी फळपिकांवर नैसर्गिक आपत्ती, रोग आल्यामुळे झालेल्या नुकसानीबद्दल नुकसान भरपाई दिली जाते त्या धर्तीवर या केळी बागायतदार शेतकऱ्यांना देखील शासन नुकसान भरपाई देईल काय ?

(यानंतर श्री. सरफरे ..... के 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, केळी पिकावर करपा नावाचा रोग आल्यामुळे जळगाव जिल्हयात केळीच्या पिकांचे नुकसान झाले ही वस्तुस्थिती खरी आहे. कोणताही किडजन्य रोग नैसर्गिक आपत्तीच्या व्याख्येमध्ये बसत नसल्यामुळे आपण त्या पिकाला नुकसान भरपाई किंवा मदत देत नाही. परंतु "राज्य पुरस्कृत एकात्मिक शेड व्यवस्था" नावाची योजना आहे त्या योजनेच्या माध्यमातून 50 टक्के अनुदानावर त्याला लागणारी औषधे उपलब्ध करुन दिली आहेत.

श्री गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, जलगांव जिले में पिछले चार साल से केले की फसल पर विषाणुजन्य रोग का प्रादुर्भाव होने के कारण किसानों को काफी नुकसान उठाना पड़ रहा है. इसलिए किसानों ने मांग की है कि उनके जिले में अल्ट्रामार्डन प्रयोगशाला की स्थापना की जाए ताकि किसानों को उसका फायदा हो सके. इस संबंध में क्या सरकार ने कोई विचार किया है ? दूसरा मेरा यह प्रश्न है कि केले की फसल नष्ट हो जाने के कारण किसानों का जो नुकसान हुआ है, क्या उसकी भरपाई किसानों को देने के बारे में सरकार विचार कर रही है ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयात केळीचे उत्पादन घेण्यासाठी टिश्यू कल्चर केळीच्या रोपाचा वापर झाला पाहिजे. या प्रकारची रोपे, बियाणे म्हणून वापरले जातात. या बियाण्यांवर सर्व प्रकारच्या व्हायरसचा प्रादुर्भाव झाल्यानंतर तो तपासणारी यंत्रणा अस्तित्वात आणली आहे.माननीय सदस्यांनी याठिकाणी व्यक्त केलेल्या भावनेनुसार नॅशनल हार्टिकल्चर मिशन अंतर्गत अशाप्रकारची अद्ययावत प्रयोगशाळा त्याठिकाणी उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयात केळी पिकावर विषाणुजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याची वस्तुस्थिती खरी आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. पिकाला पाणी कमी मिळाल्यामुळे करपा नावाचा रोग झाल्याचे म्हटले आहे. विषाणुजन्य रोग हा नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडतो. बाकीच्या ठिकाणी आपण पिकांवर पडलेल्या रोगाबद्दल नुकसान भरपाई देतो. त्याप्रमाणे केळी या पिकावर पडलेल्या रोगासाठी नुकसान भरपाई कां दिली जात नाही? ज्या शेतकऱ्यांच्या केळीच्या पिकावर रोग पडल्यामुळे पीक वाया गेले आहे त्यांना आपण अनुदान देणार काय ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46276....

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मी दिले आहे. किडजन्य बुरशीमुळे उत्पन्न होणाऱ्या रोगाबद्दल कोणत्याही प्रकारचे अनुदान देय नाही. त्या पिकाच्या निवारणासाठी 50 टक्के अनुदानातून औषधे देण्याची व्यवस्था करतो. अशाप्रकारे जळगाव जिल्हयामध्ये औषधांचे वाटप मोठया प्रमाणात करण्यात आले आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, किडजन्य रोग नैसर्गिक आपत्तीच्या स्थायी आदेशामध्ये नाही. तरमग मानवनिर्मित आहे काय? अलिकडेच सोयाबीनच्या पिकावर आलेल्या रोगाबाबत आपण मदत दिली आहे, ती कोणत्या आदेशाने दिली आहे? म्हणून माझा प्रश्न असा आहे की, किडजन्य रोगाचा नैसर्गिक आपत्तीच्या स्थायी आदेशामध्ये समावेश करणार काय?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, करपा हा रोग प्रामुख्याने पाण्याचा निचरा न होणे, प्रमाणापेक्षा दाट केळींची लागवड करणे, दमट हवामान यामुळे होतो. ही या रोगाची प्रमुख कारणे आहेत. हा रोग मानवनिर्मित आहे असे 100 टक्के म्हणता येणार नाही. तो टाळता येणे शक्य असलेला रोग आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे वाया जाणाऱ्या पिकाच्या बाबतीत आणि अशाप्रकारे किडजन्य रोगाच्या बाबतीत स्थायी आदेशामध्ये बदल केला आहे. ज्या रोगाच्या बाबतीत औषधे उपलब्ध आहेत, आणि त्या औषधांच्या माध्यमातून हा रोग टाळता येऊ शकतो तो रोग आपण नैसर्गिक आपत्तीमध्ये धरत नाही. परंतु ज्यांच्यावर उपचार करता आले नाही, ज्या पिकांची पेरणी वाया जाण्याची पाळी शेतकऱ्यांवर आली अशाप्रकारच्या पिकांचा आपण नैसर्गिक आपत्तीमध्ये समावेश केला आहे.

सभापती : दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांच्या भावना अशा आहेत की, जळगाव जिल्हा हा केळीचे कोठार म्हणून आपण मानतो. त्या जळगाव जिल्हयात किंवा अन्य ठिकाणी अशाप्रकारे फार मोठा रोग केळीच्या पिकावर आला आहे. याठिकाणी जरी आपण 50 टक्के अनुदानाची मर्यादा घातली असली तरी हे कोठार संपण्याच्या अवस्थेत आहे. त्यादृष्टीने राज्य सरकारने विशेषत: आपण त्या बाबतीत पुढाकार घेऊन 100 टक्के अर्थसहाय्य करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणार काय? हा खरा प्रश्न आहे.

(यानंतर श्री. बरवड)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील केळी उत्पादक हा महाराष्ट्राच्या फलोत्पादन विभागातील प्रमुख घटक आम्ही मानतो आणि म्हणून या सगळ्या आलेल्या परिस्थितीवर या विभागाचे गांभीर्याने लक्ष आहे. त्याही पुढे जाऊन अजून काही मदतीच्या योजना आखाव्या लागल्या तर त्याबाबतीत सकारात्मक दृष्टीकोन घेऊन निर्णय घेण्यात येईल.

श्रीमती मधु जैन : सभापति महोदय, राज्य में 60 प्रतिशत केले का उत्पादन जलगांव जिले में होता है. लेकिन अतिवृष्टि और अनावृष्टि के कारण केले के उत्पादन की समस्या बनी रहती है. अब इसके साथ ही साथ फसल पर रोग का प्रादुर्भाव यह एक और समस्या किसानों के सामने खड़ी हो गई है. जिस प्रकार सरकार ऐसी आपदा आने पर अन्य फसलों के नुकसान के संबंध में किसानों को सहायता प्रदान करती है उसी प्रकार से केले की फसलों के नुकसान पर किसानों को सहायता देने के बारे में सरकार को सहान ुभूतिपूर्वक विचार करना चाहिए. इसके अलावा अब किसानों के सामने एक और समस्या आ गई है वह है केले के बिक्री की. क्योंकि गुजरात का केला सस्ता है. इसलिए किसानों की मदद करने के लिए सरकार को कोई न कोई सुविधा प्रदान करनी चाहिए, यह मेरा निवेदन है.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, केळी उत्पादकांना प्राधान्य देऊन अजून काही मदतीच्या योजना आखाव्या लागत असतील तर शासन सकारात्मक निर्णय करील.

सभापती : यानंतर प्रश्न क्रमांक 48749 घेण्यात येईल.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : मी शेतकऱ्यांच्या प्रश्नाला सगळ्यात जास्त न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सुध्दा या अनुषंगाने 50 टक्के वगैरे असे काही न करता 100 टक्क्यामध्ये कसे बसेल यादृष्टीने प्रयत्न करण्याचे मान्य केलेले आहे. याबाबत भरपूर चर्चा झालेली आहे असे मला वाटते. आता मी पुढचा प्रश्न पुकारलेला आहे.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन सरकारच्या वतीने सकारात्मक विचार करण्यात येईल.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र. क्र. 46276 .....

सभापती : सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये शांतता ठेवावी.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, या प्रश्नाचे राजकारण करण्यापेक्षा हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने सभागृहात विचार व्हावयास पाहिजे असे मला वाटते. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन केळी उत्पादकांसाठी यापेक्षाही चांगली मदतीची योजना आणण्यासाठी शासन गांभीर्याने विचार करील. मी अगोदरच सांगितले आहे. यामध्ये सकारात्मक उत्तर दिले असताना सन्माननीय सदस्य पुन्हा....

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

सभापती : यानंतर प्रश्न क्रमांक 48749 घेण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ KTG/ MMP

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देतात)

कोथळा (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील १ ली ते ४ थी च्या वर्गावर शिक्षक नेमण्याबाबत

(१०) * ४८७४९ श्री. गुरुमुख जागवानी , श्री. संजय केळकर , श्री. प्रतापराव सोनवणे , श्री. रामनाथ मोते : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील कोथळा गावातील १ ली ते ४ थी चे वर्ग असलेल्या शाळेत विद्यार्थी संख्या ९८ असून १ मुख्याध्यापक व ३ शिक्षक कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेत दिनांक १७ सप्टेंबर, २००८ रोजी पासून मुख्याध्यापक व सर्व शिक्षक गैरहजर असल्यामुळे ४ थीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांना शिकवले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांमुळे या शाळेतील विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानामुळे पालक वर्ग संतप्त झाला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी नुसार संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील :(१) जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोथळा, ता.शहापूर विद्यार्थीसंख्या ९६ असून ३ शिक्षक कार्यरत आहेत.

(२) अतिवृष्टीमुळे शाळा दि. १९.०९.२००८ रोजी बंद होती.

(३) नाही.

(४) होय. दिनांक १९.०९.२००८ रोजी गैरहजर शिक्षकांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

(उपप्रश्न विचारण्यात आले नाहीत)

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादकांच्या अनुषंगाने या सदनामध्ये जास्तीत जास्त चर्चा करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. मंत्रिमहोदयांनी सुध्दा सगळे प्रयत्न करण्याचे ठरविलेले आहे. ज्या सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न दिलेला आहे आणि ज्यांनी उपप्रश्न विचारले त्यांना आणि सन्माननीय मंत्रिमहोदयांना माझ्या दालनामध्ये.....

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : अध्यक्ष महाराज, मला एक प्रश्न विचारावयाचा आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलत असतात.)

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री.सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "आयुर्वेद, होमिओपॅथी अभ्यासक्रमाच्या खाजगी संस्थांच्या मॅनेजमेंट कोट्याच्या फी रचनेच्या स्वरुपाबाबत" या विषयावरील डॉ. दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री अरविंद सावंत, अनिल परब, रामनाथ मोते, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर वि.प.स तसेच सर्वश्री अनंत तरे, विलास अवचट, डॉ.अशोक मोडक, श्रीमती संजीवनी रायकर, माजी वि.प.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक 9354 ला दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी सभागृहात अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती छापण्यात यावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अंदाज समितीचे अहवाल सादर करणे

श्री.मोहन जोशी (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा विसावा, एकविसावा, बाविसावा व तेविसावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : अंदाज समितीचे अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे

श्री.विक्रम काळे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा तिसरा व चौथा अनुपालन अहवाल (2008-2009) सभागृहाला सादर करतो.

सभापती : पंचायती राज समितीचे अनुपालन अहवाल सभागृहाला सादर झाले आहेत.

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे

डॉ.नीलम गोऱ्हे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा नांदेड-वाघाळा महानगरपालिका, नांदेड जिल्हा परिषद व इतर विभागांच्या संदर्भातील पंधरावा अहवाल सभागृहाला सादर करते. असे करताना मी काही महत्वाच्या बाबींकडे सभागृहाचे लक्ष वेधते.

महोदय, या महानगरपालिकेत जवळजवळ पाच वर्षांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही महिला व बालकल्यापण समितीचे गठन करण्यात आलेले नव्हते. कारण त्या ठिकाणच्या महापौरांनी हा विषय सर्वसाधारण सभेच्या कामकाजपत्रिकेवरच घेतला नाही. महिला व बालकल्याण समिती गठित करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर आणण्याचा अधिकार महापौरांना असल्यामुळे त्यांनी आपला अधिकार वापरुन हा विषय सर्वसाधारण सभेसमोर आणला नाही. म्हणून अशी समिती गठित करण्याबाबत कायद्यात तरतूद करावी. समिती गठित करण्याचे महापालिकेवर बंधन असावे, अशी समितीने शिफारस केलेली आहे.

सभापती महोदय, महिलांसाठी विविध प्रवर्गात 30 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. मात्र हे आरक्षण विविध सबबीखाली महापालिका भरत नसल्याची बाब सुध्दा समितीच्या निदर्शनास आली. याबाबत समितीने सखोल चर्चा केली. हे आरक्षण मागासवर्गीय उमेदवारांप्रमाणे सक्तीने भरण्याचे महानगरपालिकेवर बंधनकारक असावे. जर महिला उमेदवार मिळत नसतील तर जागांचा अनुशेष पुढे न्यावा. परंतु कोणत्याही परिस्थितीमध्ये महिलांच्या अनुशेषातील जागेवर पुरुष उमेदवार नेमण्यात येऊ नये अशी समितीने शिफारस केली आहे.

अनेक वेळा महिला व बालकल्याण समितीकडून जिल्हा परिषद व नगरविकास विभागाकडे यासंदर्भात शिफारस केली जाते, पण त्याची अंमलबजावणी होत नाही. या महानगरपालिकने 2002 ते 2004 या आर्थिक वर्षामध्ये आपल्या अंदाजपत्रकात 5 टक्क्याप्रमाणे निधी राखून ठेवला, मात्र तो खर्च केला नाही. ही बाब सुध्दा समितीस अत्यंत गंभीर वाटते. त्यामुळे महानगरपालिकेतील महिला व बालकल्याण समितीने दरवर्षी 5 टक्क्याप्रमाणे तरतूद करुन त्याच आर्थिक वर्षात खर्च करावी असे महापालिकेला बंधन असावे अशी समितीने शिफारस केली आहे.

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ KTG/ MMP/

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, महिला बचत गटांना अनुदान दिले जाते त्याच्यावर महानगरपालिका व्याजाची आकारणी करते. महिला बचत गटाला दिलेल्या अनुदानावर महानगरपालिका व्याज आकारत असेल ती अयोग्य गोष्ट आहे. बँकांनी बचत गटांना जाचक अटी लावू नयेत अशीही समितीने शिफारस केलेली आहे. सदर शिफारशींवर शासनाने त्वरेने अंमलबजावणी करावी अशी मी विनंती करीत आहे.

सभापती : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

श्री. नाना पंचबुध्दे (शालेय शिक्षण राज्यमंत्री तथा समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की, "राज्यातील मुस्लिम समाजाचे शैक्षणिक आधुनिकीकरण करण्यासाठी मदरसा शिक्षण बोर्ड स्थापन करण्याबाबत" या विषयावर दिनांक 26 जुलै, 2008 रोजी गठीत करण्यात आलेल्या तदर्थ समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेली मुदत पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यन्त वाढविण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "जिल्हाधिकारी, अमरावती यांनी लिपिक टंकलेखक पदासाठी जाहीर केलेल्या अंतिम निवड यादीमध्ये अमरावती येथील श्री. निलेश अरविंद पांडे हे राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असूनही त्यांची निवड खेळाडूच्या संवर्गातून न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व जगदीश गुप्ता यांनी "कोळशावर आधारित वीज निर्मिती प्रकल्पांना नांदगांवपेठ औद्योगिक क्षेत्रील जमिनी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय उद्योग विभागाने तातडीने रद्द करण्यासाठी अमरावती जिल्हा नियोजन व विकास समितीने केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "यावर्षी ऊसाचे उत्पादन कमी झाले असून ऊसाला प्रतिटन 1500 रुपये पहिला हप्ता जाहीर केल्याशिवाय कारखाने सुरु होणार नाहीत अशी शेतकरी संघटनेने मागणी केल्यानंतर केंद्रीय कृषि आयोगाने किमान भाव दर जाहीर करणे, शेतकरी संघटनेने ऊसाला प्रतिटन 1800 ते 1900 रुपयांची मागणी करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "भिवंडी तालुक्यातील अंजूर फाटा, राहनाळ, काल्हेर, पूर्णा अशा ग्रामपंचायतीच्या हद्दीत शेकडो ट्रान्स्पोर्टची गोदामे असून मोठमोठ्या शहरातून आलेला माल या गोदामामध्ये साठविला जाणे, सदर गोदामे बेकायदेशिररित्या बांधले गेल्यामुळे वारंवार या भागात मोठ्या दुर्घटना घडणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते,मधुकर चव्हाण व केशवराव मानकर यांनी "महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीअंतर्गत नागपूर येथील कार्गोहब निहान प्रकल्पासाठी खापरी, दहिगांव, तेल्हारा इत्यादी भागातील जमिनी अधिगृहीत करण्यात येऊन या प्रकल्पाकरिता आरक्षित केलेल्या एकूण जमिनीपैकी 361 हेक्टर जमीन वगळण्याचा कंपनीने घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे व रामनाथ मोते यांनी "मुंबईला पाणी पुरवठा करणा-या जलवाहिन्या सुरक्षित नसणे, सदर जलवाहिन्यांवर वाहनांची ये-जा, झोपडपट्टयांचे अतिक्रमण होत असल्याने त्यांना होत असलेला धोका, भिवंडीमध्ये असलेल्या जलवाहिन्यांच्या सुरक्षा रक्षकांना फक्त काठ्या देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी " सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात कुणकेश्वर पर्यटन संकुलाची मुहूर्तमेढ रोवून एक महिना होत आला तरी या संकुलाच्या कामाची सुरुवात तसेच आनंदवाडी प्रकल्पाचे काम अद्यापही सुरु न झाल्याने देवगडची विकास प्रक्रिया रखडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....नंतर श्री.गिते...

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "संत्रा पिकांना पाणी नसल्यामुळे तसेच त्यावर कीड" आल्याने विदर्भात संत्र्याचे पीक हातचे गेल्याने संत्री उत्पादक बागायतदार आर्थिक कोंडीत सापडल्याने त्यांना आर्थिक मदत देणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र शासनाने याबाबतीत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील यांनी राज्यात गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण 11 टक्के असून गुन्हेगारांना शिक्षा होण्यासाठी न्यायालयात सबळ पुरावे दाखल करण्यास पोलीस अधिकारी अयशस्वी होत असल्यामुळे गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे राज्यात कायदा व सुव्यवस्था ढासळण्याची स्थिती या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण यांनी कोल्हापूर शहरात पोलिसांनी दोन पोलीस ठाण्यातून बेवारस वाहने व इतर भंगार साहित्य संगनमताने चोरुन भंगार विक्रेत्यास विकून लाखो रुपये कमावल्याचा गुन्हा एप्रिल, 2008 मध्ये उघडकीस येऊनही त्यावर कार्यवाही न होणे या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "नागपूर येथील आदिवासी प्रकल्प अधिकारी यांनी नागपूर व वर्धा येथील आदिवासींच्या विविध योजनांमध्ये मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवार केल्याचे उघडकीस येणे, आदिवासींसाठी सुमारे 4 कोटी रुपयांच्या दुधाळ गाई खरेदीत गैरव्यवहार होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र याबाबीत शासनाने निवेदन करावे.

उर्वरित सूचना मी माझ्या दालनात नाकरल्या आहेत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: श्री.भिकाजी वरोकार,शेगाव,जि.बुलढाणा यांच्या मालकिची जमीन अवैधरित्या सावकाराने बळकावणे

मु.शी.: श्री.भिकाजी वरोकार,शेगाव,जि.बुलढाणा यांच्या मालकिची जमीन अवैधरित्या सावकाराने बळकावणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, प्रकाश शेंडगे, वि.प.स. यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

श्री. हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर,प्रकाश शेंडगे,वि.प.स.यांनी " श्री.भिकाजी वरोकार, शेगाव,जि.बुलढाणा यांच्या मालकिची जमीन अवैधरित्या सावकाराने बळकावणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, दिनांक 26.7.2007 रोजी श्री.धानुका यांच्या 6 नमुना सहया 2 पंचासमक्ष घेण्यात आल्या. त्यानंतर श्री.वरोकार यांनी हजर होऊन श्री.धानुका यांच्या सहया त्यांच्यासमक्ष घेण्यात याव्यात असा आग्रह धरल्यामुळे श्री. धानुका यांच्या सहया पुन्हा श्री. वरोकार यांच्यासमक्ष घेण्यात आल्या व या सहयांची कागदपत्रे व श्री.धानुका यांच्या जबाबाची प्रत तपासणीसाठी शासकीय दस्तऐवज परीक्षक यांच्याकडे त्याच दिवशी पाठविण्यात आली होती. तथापि, शासकीय दस्तऐवज परीक्षक, नागपूर यांनी दिनांक 26.12.2007 रोजी सहायक निबंधकांचे दिनांक 26.7.2007 चे पत्र त्यांना मिळाले नसल्याचे कळविले आहे. माझे असे म्हणणे आहे की, या प्रती हस्ताक्षर तज्ज्ञांकडे पाठविल्या नाहीत. हस्ताक्षर तज्ज्ञांकडे प्रती न पाठविण्याचे कारण काय ? सहाय्यक निबंधक, शेगाव व गैर अर्जदार सावकार यांच्या विरोधात अवैध सावकारी प्रकरणात कागदपत्रे गहाळ करुन फसवणूक केल्याबाबत चौकशी होण्याबाबतची तक्रार श्री.वरोकार यांनी पोलीस स्टेशनमध्ये दाखल केलेली आहे. जिल्हाधिकारी, बुलढाणा आणि जिल्हा उप निबंधक,सहकारी संस्था, बुलढाणा यांच्याकडे फौजदारी संहिता कलम 197 प्रमाणे कारवाई करण्यास मंजुरी मिळण्याबाबत पत्र दिले. परंतु जिल्हाधिकारी यांना आणि पोलीस अधीक्षक यांना बेजबाबदारपणे उत्तर दिले की, अर्जदार श्री. वरोकार यांनी ही माहिती अधिनियम 2005 अंतर्गत लेखी माहिती मागितली आहे. त्यांचे समाधान झाले नसेल तर त्यांनी माहिती आयुक्तांकडे अपील करावे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक हे जिल्हा उप निबंधकांकडे अशी परवानगी मागते. अशा वेळी जिल्हाधिकारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना त्यांनी योग्य प्रकारे उत्तर दिले पाहिजे. परंतु जिल्हा उप निबंधकांनी सुध्दा उर्मटपणे त्यांना उत्तर दिलेले आहे. कागदपत्रे ए.आर.ऑफीसमधून गहाळ झाली. सावकारांच्या सहयांचे नमुने घेतले होते, ते कागदपत्रे त्यांनी संबंधितांनी गहाळ करुन टाकले. जिल्हा उप निबंधकांकडे केसेस करण्यासंबंधी परवानगी त्यांनी मागितली असता त्यांना उर्मटपणे उत्तरे दिली गेली. त्या अनुषंगाने शासन माहिती घेऊन संबंधितांवर काही कारवाई करणार आहे काय ? सध्याचे जिल्हा उप निबंधक हे खामगाव येथे ए.आर.होते. ते ए.आर.असताना त्यांनी सावकारांच्या बाजुनेच उत्तरे दिलेली आहेत. त्यामुळे या सावकारास देखील ते पाठिशी घालत आहेत. संबंधित डी.डी.आर.ची या प्रकरणी चौकशी करुन त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल काय ?

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, श्री.भिकाजी मोतीराम वरोकार या अर्जदाराच्या तक्रारीनुसारच या संदर्भातील चौकशी करण्याचे आदेश दिले होते. जी मूळ कागदपत्रे आहेत ती काही कागदपत्रे गहाळ झाली आणि नागपूरच्या विभागीय कार्यालयाकडे कळविले होते की, या संदर्भात व्हेरिफिकेशन करावे. मूळ कागदपत्रे त्यांच्यापर्यंत पोहोचली नाहीत. त्यामुळे पुढील कार्यवाही होऊ शकली नाही. म्हणून निश्चितपणे सगळया प्रकरणाची चौकशी करु. यासाठी वेगळा अधिकारी नियुक्त करु आणि पुढील एक महिन्यात चौकशी करुन पुढची कार्यवाही करु.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पूर्वीच्या रेडीरेकनरप्रमाणे जमिनीच्या खरेदी विक्री दस्तऐवजावर आकारले जाणारे अन्यायकारक शुल्क

मु. शी. : पूर्वीच्या रेडीरेकनरप्रमाणे जमिनीच्या खरेदी विक्री दस्तऐवजावर आकारले जाणारे अन्यायकारक शुल्क याबाबत श्री. गोपीकिसन बाजोरिया,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राणा जगजितसिंह पाटील (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी "पूर्वीच्या रेडीरेकनरप्रमाणे जमिनीच्या खरेदी विक्री दस्तऐवजावर आकारले जाणारे अन्यायकारक शुल्क" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, निवेदनात म्हटल्याप्रमाणे रेडीरेकनरचा उपयोग करणार नाही असे हमीपत्र उच्च न्यायालयात 1993 साली देण्यात आले होते. असे असताना सुध्दा पूर्ण राज्यात आजही रेडीरेकनरचा उपयोग करण्यात येत आहे. ही पध्दत इतकी क्लिष्ट आहे की, प्रत्येक वर्षी कोणतीही शहानिशा न करता 15 टक्के वाढ केली जाते. प्रत्येक वर्षी रेडीरेकनर तयार करीत असताना अधिकारी मिळकतीच्या शुल्कामध्ये 15 टक्के वाढ करीत असतात. सध्याच्या परिस्थितीत पूर्ण राज्यात मिळकतीमध्ये 30 टक्के घट आलेली आहे. अशा परिस्थितीत 15 टक्के वाढ करणे म्हणजे रेडीरेकनरमध्ये पूर्ण राज्यात 45 टक्के वाढ करण्यात आलेली आहे. जर एखाद्या मिळकतीचा दर कमी जास्त दर्शविला असेल तर सेक्शन 32 प्रमाणे अपील करण्यात येते. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, प्रत्येक मिळकतीचा रेडीरेकनरमध्ये जो रेट दिला आहे तो पूर्णपणे चुकीचा आहे. 100-100 पटीने जास्त किंवा कमी असा रेट दिला आहे. कलम 32 अन्वये एखाद्या माणसाने अपील केले तर त्याबाबत पुढील कारवाई करण्याचे अधिकार फक्त अधिकाऱ्यांपुरते मर्यादित आहेत. राज्यात भयंकर मंदी असताना यावर्षी रेडीरेकनरमध्ये 30 टक्के दर कमी केले जातील का? हे रेडीरेकनर ज्याअर्थी उच्च न्यायालयाने बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे तर आजुबाजूच्या लोकांच्या मिळकतींना न्याय देणार का? यावर्षी कोणतीही वाढ न करता स्टेटस को ठेवणार आहात का?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो अनेकांच्या दृष्टीने महत्वाचा आहे. रेडीरेकनर हा शब्दप्रयोग 1993 पासून वापरावयाचे बंद केले आहे. त्याऐवजी वार्षिक बाजारमूल्य दर तक्ते (Annual Statement of rates of immovable properties) असा शब्द आपण उपयोगात आणतो. तो फक्त मार्गदर्शक तत्व म्हणून आहे. त्याचा आधार घ्यावा असे कुठेही लिहिलेले नाही. त्याचा अर्थ असा की, एखाद्या भागामध्ये रेट साधारण काय असावा याबाबत तो मार्गदर्शन करतो. स्टॅप डयुटीचा दर ठरवित असताना तत्व म्हणून हे तक्ते वापरले तर संबंधित व्यक्तीला स्टॅम्प डयुटी योग्य वाटली नाही तर क्लिअरकट अशी तरतूद आहे. कलम 31 अन्वये मागणी करता येते. त्यात स्थळाचे निरीक्षण करुन तेथील इतर घटक, इमारत कशा पध्दतीची आहे वगैरे इतर गोष्टींचा विचार करुन रेटमध्ये बदल करण्याची तरतूद आहे. फक्त रेडीरेकनरची आधीची व्याख्या, ज्यामध्ये स्टॅम्प डयुटी फिक्स असायची अशी आज तरी परिस्थिती नाही.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : नियम 93 च्या निवेदनावर एकच प्रश्न विचारण्याची प्रथा आहे. परंतु हा अत्यंत महत्वाचा प्रश्न असल्यामुळे अपवाद म्हणून मी दोन तीन सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देणार आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, तत्पूर्वी मला दोन प्रश्नांबाबत स्पष्टीकरण करावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा होता की, मंदीमुळे जे रेटस कमी झाले आहेत त्यानुसार आपण दर तक्ता ठरवित असतो. साधारणपणे ही कार्यप्रणाली आपण वर्षाच्या सुरुवातीला म्हणजेच 1 जानेवारीपासून लागू करतो. त्यापूर्वीची प्रक्रिया म्हणजे लोकप्रतिनिधींना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावून त्यांच्यासोबत याबाबतची चर्चा होत असते. त्यानुसार अकोला व अमरावतीबाबत सांगावयाचे झाले तर सप्टेबर आणि ऑक्टोबर महिना आणि बुलडाणा जिल्हयात नोव्हेंबर महिन्यात अशा बैठका ऑलरेडी झालेल्या आहेत. तसेच मंदीची परिस्थिती लक्षात घेऊन स्टॅम्प डयुटीचे दर कमी करण्यासंबंधी शासन निर्णय घेणार काय, अशी जी सूचना केली त्याबाबतची काळजी घेतली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा अत्यंत गंभीर व महत्वाचा विषय आहे. जो गाळेधारक गाळा खरेदी करतो अथवा विक्री करतो त्याला फासावर चढविण्याचाच हा प्रयत्न आहे. आपण हा तक्ता मार्गदर्शक असल्याचा शब्द वापरला परंतु त्या शब्दाचा अर्थ आणि खुलासा निदान आपल्याला तरी समजला काय असा माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे. यासंदर्भात मी माझेच उदाहरण सांगू इच्छितो की, जो सर्व्हे करणारा अधिकारी असतो तो गाळ्यांचे मूल्यांकन आणि सर्टिफाय करुन दाखला देतो, त्याप्रमाणे त्याने दाखला दिला. परंतु ज्यावेळेस रजिस्ट्रेशनसाठी डाक्यूमेंट दाखल करायला मी गेलो त्यावेळेस त्यांनी सांगितले की, बाजार मुल्यानुसार जी किंमत असते त्याप्रमाणेच आपल्याला स्टॅम्प डयुटी भरावी लागेल आणि तशी मलाही भरण्यास सांगितले. शासनाने आताच सांगितले की, सन 1993 मध्ये न्यायालयात ॲफिडेव्हीट दाखल करुन रेडीरेकनर उपयोगात आणणार नाही असे सांगितले परंतु त्या खटल्याचा निकाल काय लागला ? याचेही स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी इतर घटक लक्षात घेऊन हा जो शब्द वापरला त्याबाबत देखील स्पष्टपणे खुलासा झालेला नाही. कारण रेडिरेकनरनुसार ज्या ज्या ठिकाणी तलावाची सोय असते, शॉपिंगची सुविधा असते अशा भागात आणि जेथे काहीच

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

नसते अशा भागात एकच दर लावला जातो, म्हणून ही पध्दत चुकीची आहे. या इतर घटकांमध्ये कोणत्या गोष्टींचा अंतर्भाव असतो ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, विषय असा आहे की, रेडिरेकनर हा शब्दप्रयोग किंवा ती कार्यप्रणाली असा शब्दप्रयोग करु नये असाच निर्णय झालेला आहे. सन 1993 मध्ये कोर्टात ॲफिडेव्हीड सुध्दा दिलेले आहे, त्यामुळे ती प्रक्रिया आता बंद झालेली आहे. तसेच कोर्टाने सुध्दा रेडिरेकनर किंवा कार्यप्रणाली पुढे चालू ठेवू नये, असे सांगितले आहे.....अडथळा.....सभापती महोदय, मी प्रथम समजावून सांगू इच्छितो की, आपण जे स्टेटमेंट्स तयार करतो ते फक्त मार्गदर्शक म्हणून वापरावे असाच शासनाचा निर्णय आहे. म्हणजे एखाद्या ठिकाणी 500 रुपये चौरस फुटाचा दर असेल आणि त्या भागात 500 रुपयापेक्षा प्रत्यक्ष खरेदी-विक्री होत असताना त्या व्यक्तिला वाटले की, या भागात जो 500 रुपयाचा दर आहे तो जास्त आहे तर त्याला तसे म्हणणे मांडण्याची पूर्ण मुभा आहे.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय सांगतात ते जरी खरे मानले तरी स्टॅम्प डयुटी भरताना तेथील ऑफिसर्स हे म्हणणे ऐकूनच घेत नाही.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : यासंदर्भात आपल्याला कायद्याचे बंधन आहे. त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, यातील कलम 31 च्या बाबतीत लोकांना जास्त माहिती नाही, ती माहिती देण्याचाच मी प्रयत्न करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, समजा बी वॉर्ड आणि सी वॉर्ड आहेत. त्या ठिकाणी एक रस्ता आहे. एका बाजूला वाळकेश्वरची वस्ती आहे आणि दुस-या बाजूला ताडदेवची वस्ती आहे. वाळकेश्वर येथे ज्या ऊंच इमारती आहेत त्या ठिकाणी रेडीरेकणरचा जो रेट आहे तो रेट वाळकेश्वरच्या चाळीतील लोकांना आपल्याला कसा काय लावता येईल?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कलम 31 चा नियम साधारणत: कोणाला माहित नाही. कलम 31 खाली कोणी अर्जच केलेले नाहीत. आम्हाला हा रेट मान्य नाही यासंदर्भात कलम 31 खाली कोणी अर्जच केले नाहीत वस्तुस्थिती आहे. आम्हाला हा रेट मान्य नाही त्यामुळे अमुक अमुक रेट असावा यासंदर्भात कलम 31 खाली कोणी मागणीच केली नाही. त्यामुळे मी हे समजून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे की, रेट तुम्हाला मान्य नसला तर त्या संदर्भात कायद्यामध्ये तरतूद आहे. त्यामुळे यासंदर्भात पुन्हा एकदा सर्व्हे करुन आपल्याला जो योग्य दर वाटतो तो योग्य दर परत मिळवून देण्याची मुभा आपल्याला कलम 31 मध्ये आहे. या नियमांच्या संदर्भात अधिका-यांनी कोणाला माहिती दिली नसेल परंतु आपल्याला नियमाप्रमाणे काम करणे शक्य आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी नियम 93 अन्वयेची सूचना सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया साहेबांनी मांडलेली आहे. या ठिकाणी मांडण्यात आलेल्या सूचनेचा विषय संपूर्ण महाराष्ट्राकरिता व मुंबईच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे. मुंबईतील मालमत्तेच्या संदर्भात आता आपल्याकडे एक बील आलेले आहे त्यामुळे मुंबईतील मराठी माणूस भिकेला लागणार हे शब्द मी मुद्दाम रेकॉर्डवर आणीत आहे. या बिलामुळे मुंबईमध्ये एकाही मराठी माणसाला राहता येणार नाही. आज मुंबईतल्या माणसाला 500 रुपये कर भरावा लागतो आहे तोच कर त्याला उद्या 5000 रुपये भरावा लागणार आहे. मुंबई शहराला वेगळे करण्याकरिता अधिका-यांनी भयानक कांड रचलेले आहे. हे बील सभागृहात जेव्हा मांडले जाईल तेव्हा मी त्यावर जरुर विचार मांडणार आहे. आज आपण नियम 93 ची जी चर्चा येथे उपस्थित केलेली आहे ती नियम 93 अन्वयेची चर्चा पुढील अधिवेशनात अडीच तासाची चर्चा म्हणून कनव्हर्ट करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कलम 31 हे सर्वसामान्यांपर्यंत पोहचणे गरजेचे आहे. सर्व लोकप्रतिनिधींना माझी विनंती हीच आहे की, कलम 31 जे आहे....

उपसभापती : या विषयावर मी माझा निर्णय देणार आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आपण निर्णय देण्यापूर्वी मला दोन शब्द बोलावयाचे आहेत. अशा प्रकारे आमदारांची बैठक बोलावली जाते असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. अशा प्रकारच्या मुंबईतील बैठकीत आम्हाला आपण कधी बोलावले यासंदर्भात आपल्याकडे नोंद असेल तर कृपया माननीय मंत्रीमहोदयांनी सांगावे. मला दुसरी विनंती आपल्या मार्फत माननीय मंत्रीमहोदयांना करावयाची आहे ती अशी आहे की, देशाचे माननीय पंतप्रधान, माननीय वित्त मंत्री हाऊसिंगच्या व्याजाचे दर कमी करीत आहेत, स्पेशल इन्सेंटीव्ह देत आहेत त्या भूमिकेतून आताच्या काळामध्ये हाऊसिंग इंडस्ट्रीजला आणि सामान्य माणसाला बेनिफिट मिळावा यासाठी केंद्रसरकारने जी काही पाऊले उचलली आहेत तशा प्रकारची पाऊले मुद्रांक शुल्काच्या संदर्भात महाराष्ट्र शासन उचलू शकते त्यामुळे यासंदर्भातील काही विचार आपल्या सरकारने केलेला आहे काय? घरे घेणा-यांना महाराष्ट्र शासन काही फायदा देणार आहे काय? खरे म्हणजे या 93 च्या चर्चेतून या विषयाला न्याय मिळणार नाही. त्यामुळे माननीय रावते साहेबांनी सांगितल्या प्रमाणे या विषयाच्या संदर्भात अडीच तासाची चर्चा लावली तर हाऊसिंग इंडस्ट्रीज आणि सामान्य माणसाला त्याचा फायदा व्हावा म्हणून शासनाने नवीन काही घोषण करता आल्या तर त्याचा महाराष्ट्रातील जनतेला फायदा होईल. हाऊसिंगच्या संदर्भात तसेच शेतीच्या मुद्रांक शुल्काच्या संदर्भात सुध्दा उपयोग होऊ शकेले. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात स्वतंत्र अडीच तासाची चर्चा लावली आणि त्या चर्चेतून सामान्य माणसाला लाभ करुन दिला तर आम्ही आपले आभारी राहू.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, स्टॅप डयूटीच्या संदर्भात आपण रियालिस्टीक व्हयू घेत असतो. आता हाऊसिंगच्या संदर्भात जी परिस्थिती आहे त्यासंदर्भात स्टॅप डयूटीच्या संदर्भात काही बदल होणे अपेक्षित आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. बाजोरिया साहेबांनी उल्लेख केल्या प्रमाणे दर वर्षी जी वाढ होते त्या प्रमाणात वाढ होणार नाही. प्रॅक्टीकल पोजीशन लक्षात घेऊन काम करण्यात येईल. सर्व ठिकाणी प्रॉपर्टीचे रेट कमी झालेले आहेत.

...2...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील.....

रियालिस्टीक व्हयूचा अर्थच असा आहे की, प्रॉपर्टीचे जर रेट कमी झाले तर जी काही स्टँप डयूटी भरावी लागते त्यामध्ये सुध्दा तशाच प्रकारचा व्हयू घेणे बंधनकारक आहे. त्यामुळे यासंदर्भात निश्चितपणे विचार होईल. मी पुन्हा एकदा सांगतो की, कलम 31 ची माहिती लोकांपर्यंत पोहचलेली नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील.....

ती माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचा आम्ही प्रयत्न करु. वर्तमानपत्रात देखील माहिती देण्यात येईल.

उपसभापती : मी सभागृहात उपस्थित झाल्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते आणि विनोद तावडे यांनी या प्रश्नाच्या संदर्भात अडीच तासाची चर्चा घेण्यात यावी असा मुद्दा मांडला. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना मी माननीय सभापतींपर्यंत पोहोचवितो....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्या निर्णयाचे स्वागत करतो आणि आपणास धन्यवाद देतो. परंतु माझे असे म्हणणे आहे की, डिसेंबर महिन्यात नवीन रेडीरेकनर आणण्याचा प्रयत्न होईल. या संदर्भात मुंबईत बैठक होणार होती. परंतु मुंबईवर झालेल्या अतिरेकी हल्ल्यामुळे ती बैठक झाली नाही. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ही बैठक होईपर्यंत आपण मुद्रांक शुल्क वाढीस स्थगिती देणार आहात काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मुद्रांक शुल्क वाढविण्यात येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : पूर्णा नदीला आलेल्या पुरामुळे बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनींचे झालेले नुकसान

मु. शी. : पूर्णा नदीला आलेल्या पुरामुळे बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनींचे झालेले नुकसान याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर व नितीन गडकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.सतीश पाटील (भूकंप पुनर्वसन आणि मदत राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व नितीन गडकरी, वि.प.स. यांनी "पूर्णा नदीला आलेल्या पुरामुळे बुलढाणा जिल्ह्यातील नांदूरा तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या जमिनींचे झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन 2006 मध्ये बुलढाणा जिल्ह्यात अतिवृष्टी होऊन हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. बुलढाणा जिल्ह्यातील 626 गावातील 31 हजार 626 शेतकऱ्यांच्या जवळपास 15 हजार 987 हेक्टर जमिनींचे नुकसान झाले. या जमिनींच्या दुरुस्तीसाठी 1287 लाख रुपयांचे अनुदान मागण्यात आले होते. त्यापैकी फक्त 300 लाख रुपये बुलढाणा जिल्ह्यास मिळाले. या 300 लाख रुपयांपैकी 24 लाख रुपये नांदूरा तालुक्यासाठी प्राप्त झाले. 2006 मध्ये पूर आला आणि 2008 वर्ष संपत आले तरी अजून शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही. म्हणजे हे सरकार किती गतिमान आहे हे दिसून येते. नांदूर तालुक्यासाठी 139.07 लाख अनुदान शासनाकडून लवकर उपलब्ध केले जाणार आहे असे निवेदनात म्हटले आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, लवकरात लवकर म्हणजे नेमके केव्हा अनुदान उपलब्ध होणार?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो शेतकऱ्यांच्या जमिनींचे नुकसान झाले. या जमिनींच्या दुरुस्तीसाठी रुपये 1287.30 लाख अनुदानाची मागणी शासनाकडे करण्यात आली होती. त्यापैकी 300 लाख रुपयांचे वाटप झालेले आहे.शेतकऱ्यांना मदत मिळण्यास दिरंगाई झाले हे मला मान्य आहे. पुढील एक महिन्याच्या आत शेतकऱ्यांना पैशाचे वाटप करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आमगाव, जिल्हा गोंदिया येथे जनावरांची कत्तल झाल्याबाबतची माहिती पोलिसांना मिळूनही त्याबाबत पोलिसांनी वेळीच कारवाई न करणे

मु. शी. : आमगाव, जिल्हा गोंदिया येथे जनावरांची कत्तल झाल्याबाबतची माहिती पोलिसांना मिळूनही त्याबाबत पोलिसांनी वेळीच कारवाई न करणे याबाबत सर्वश्री केशवराव मानकर व पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय,सर्वश्री केशवराव मानकर व पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "आमगाव, जिल्हा गोंदिया येथे जनावरांची कत्तल झाल्याबाबतची माहिती पोलिसांना मिळूनही त्याबाबत पोलिसांनी वेळीच कारवाई न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, दिनांक 9.12.2008 रोजी मुसलमानांचा बकरी ईदच्या पवित्र सणाच्या दिवशी पूर्व विदर्भातील भंडारा आणि गोदिंया या दोन जिल्हयात दोन घटना घडल्या आहेत. भंडारा जिल्हयामध्ये लाखणी येथे 4 गाईची हत्या करण्यात आली होती. त्यामध्ये लाखणीच्या वकिलाला अटक करण्यात आली होती. त्याचप्रमाणे् आमगाव येथे 4 गाईचे मास सापडले व चार डोके सापडलेले होते. .निवेदनात फक्त एक गाय आणि 2 बैलांची कत्तल करण्यात आली असल्याचे कबूल करण्यात आले आहे. त्या ठिकाणी 44 बैल आणि 1 गाय असे एकूण 45 गोवंश जनावरे जीवंत कत्तलीसाठी आणण्यात आले होते. उत्तरामध्येच असे सांगण्यात आले आहे की, पोलिसांना सामाजिक कार्यकर्त्यानी कळविलेले आहे.म्हणजे तेथील सामाजिक कार्यकर्त्यानी पोलिसांना सहकार्य केलेले आहे. तेथील पी.आय.ने पेट्रोलिंग केले होते परंतु पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना हे कृत्य दिसून आले नाही म्हणूनच यासंबंधीचा प्रश्न निर्माण झाला आहे या बाबतीत तातडीने कारवाई करावी यासाठी सामाजिक कार्यकर्त्यानी रास्ता रोको केले होते तसेच तेथे टायर जाळले होते अणि पोलिसांना जागे केले होते.त्याठिकाणी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती त्या ठिकाणी सर्व राजकीय पक्षाची प्रोसेशन निघाली होती....

उपसभापती :सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.केशवराव मानकर :सभापती महोदय, मी थोडक्यात प्रश्न विचारतो परंतु ही घटना अत्यत गंभीर स्वरुपाची आहे. प्पोलिसांनी जे काम करावयास पाहिजे ते काम करण्यामध्ये जनतेने त्यांना सहकार्य केले असतांना या जनतेच्या विरुध्दच पोलिसांनी कारवाई केली होती. यामध्ये एकूण दहा आरोपी असून त्यापैकी आठ आरोपींना अटक करण्यात आली. दोन आरोपीना पोलीस का संरक्षण देत आहे ? सरगना मुस्ताक शेख् या आरोपीला का अटक करण्यात आली नाही. तो तस्करीचे काम करीत असता,तो. गोमास निर्यात करतो. आमगाव येथून रेल्वेच्या माध्यमातून गोमास परदेशी दररोज पाठविले जात आहे. गेल्या 20 वर्षापासून तेथे गोमासाचा कत्तलखाना सुरु आहे तेव्हा हा अवैध कत्तलखाना तातडीने बंद करण्यात येणार आहे काय त्याचप्रमाणे दोन आरोपी फरार असून त्यांना पोलीस पाठीशी घालत आहेत. त्या दोन आरोपींना तातडीने अटक करण्यात येणार आहे काय ? या दोन आरोपी पैकी एका आरोपीचे नाव मी आताच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

सागितले आहे. त्या ठिकाणच्या सामाजिक कार्यकर्त्याविरुध्द दोन वेळा हीच कलमे लावण्यात आलेली आहेत. जिल्हाधिका-यांनी कलमे जाहीर केलेली असल्यामुळे पोलिसानी कारवाई करणे बंधनकारक आहे हे मी मान्य करतो परतु या कार्यकर्त्याविरुध्द जी कलमे लावण्यात आलेली आहेत ती शासन परत घेणार आहे काय ? दुसरी जी घटना घडली होती त्याबाबत मी आपल्याला सांगतो की पोलीस स्टेशनमध्ये शांतता राखण्याच्या संबंधी बैठक घेण्यात आली होती त्या बैठकीला आम्ही दोन आमदार उपस्थित होतो. कार्यकर्त्यामध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती त्यांच्यामध्ये मोठयाप्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता. अशा प्रकारणी पोलिसांनी पुन्हा तीच कलमे या कार्यकर्त्याविरुध्द लावली होती. .या प्रकरणी आम्ही पोलिसाना सहकार्य केलेले असताना आमच्या जीवावरच ते उठले आहेत. दोन्ही आमदारांना त्या दिवशी धोका निर्माण झाला असता. कार्यकर्ते इतके संतापले होते की ते कोणाचेही म्हणणे ऐकण्यास तयार नव्हते.. शांतता बैठकीत असे ठरले होते की सकाळी 9 ते 1.00 च्या दरम्यान बाजार बंद ठेवावयाचा आणि शांतता पाळावयाची अश प्रकारे शांततेने बाजार बंद ठेवण्यात आला होता. परंतु सरगना मुस्ताक शेखच्या माणसाने बनगाव मस्जिदसमोर तीन जनावरे बाधून ठेवली होती.....

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.केशवराव मानकर: सभापती महोदय, मला शेवटी असे विचारापवयाचे आहे की, त्या ठिकाणी तीन जनावरे बांधून ठेवण्यात आली होती. मी पोलिसाना सांगून जर ही तीन जनावरे पकडून दिली नसती तर ती कत्तल खान्याकडे गेली असती. ईदच्या दिवसापासून सतत तीन दिवस त्या ठिकाणी संतापाची लाट निर्माण झाली होती. जे दोन आरोपी फरार आहेत त्यांना तातडीने अटक कण्यात येणार आहे काय ? या कार्यकर्त्याविरुध्द दोन वेळेस कलमे लावली आहेत व त्यांच्या विरुध्द कारवाई केली आहे ती परत घेतली जाणार आहे काय तसेच कुंभार टोली अवैध कत्तलखाना सुरु आहे तो तातडीने बंद करणार आहात काय ?

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, शासनातर्फे नियम 93 अन्वये जी निवेदने केली जातात त्यावर आपल्या नियमानुसार एखाद दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांना विचारता येतो आणि तो प्रश्नही अगदी नेमका आणि थोडक्यात विचारला पाहिजे. तरी सन्माननीय सदस्यांनी याची नोंद घ्यावी. तसेच यावर मी अधिक सदस्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देणार नाही.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, बकरी ईद या पवित्र सणाच्या दिवशी ही गोहत्या करण्यात आली आणि ती बेकायदेशीरपणे केली होती. त्याबद्दल महाराष्ट्र जनावरे संरक्षण कायदा 1976 यातील कलम 5, 6, 9 व 11 आणि सहकलम 4, 25, 27 नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्यामध्ये दोन आरोपी होती त्यांना अटक करण्यात आलेली नाही असे जे सांगण्यात आले ते खरे असून त्या दोघांनाही तत्काळ अटक करण्यात येईल. तसेच कोणत्याही प्रकारे कत्तल कारखाना चालू दिला जाणार नाही. तसेच याबाबत कार्यकर्त्यांनी स्वत: सूचना दिल्या होत्या हेही खरे आहे. अशा वेळेस त्या ठिकाणी आंदोलनाची भूमिका लोकांनी घेतली असेल तर साहजिकच तेथे प्रक्षोभक जमाव जमतो आणि त्यातून वाईट गोष्टी घडू शकतात. म्हणून त्या दिवशी तेथे जमावबंदीचे आदेश होते पण तरीही त्यांनी बेकायदा जमाव केला होता आणि वाहतुकीला अडथळा आणून रस्ता रोको केले होते. या सगळ्या गोष्टी सर्वसाधारणपणे अशा वेळी होत असतात हे लक्षात घेऊन त्या कार्यकर्त्यांवरील ते गुन्हे देखील परत घेण्यात येतील.

श्री. केशवराव मानकर : धन्यवाद.

***

..... यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नागपूर जवळील कोराडी परिसरात सशस्त्र अतिरेकी लपले असण्याची शक्यता.

मु. शी. : नागपूर जवळील कोराडी परिसरात सशस्त्र अतिरेकी लपले असण्याची शक्यता याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "नागपूर जवळील कोराडी परिसरात सशस्त्र अतिरेकी लपले असण्याची शक्यता " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 अन्वये मा.गृहराज्यमंत्र्यांच्या निवेदना (क्र.5) नंतर ---)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या संदर्भातील बातम्या सतत 2-3 दिवस बहुतेक सगळ्याच वर्तमानपत्रांतून येत होत्या आणि त्या नुसारच आम्ही नियम 93 अन्वये सूचना या ठिकाणी दिली होती. त्यातच नागपूरला विधीमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू होणार होते व अतिरेक्यांच्या हिटलिस्टवर नागपूर शहर देखील असण्याची शक्यता आहे हे लक्षात घेऊनच आम्ही ही सूचना दिली होती. सभापती महोदय, असे असतानाही या निवेदनातून मात्र माननीय राज्यमंत्र्यांनी असा कोणताही प्रकार घडलेला नाही. येथे काहीही भीतीचे वातावरण नाही. पोलिसांची गस्त चालू आहे, काही भुरट्या चोऱ्या होत आहेत असे सांगितले गेले आहे. मात्र कालच्याच वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आली आहे की, एटीएसच्या पोलिसांनी नागपूर स्टेशवर रफी नावाच्या एका अतिरेक्याला अटक केली असून तो विप्रो कंपनीमध्ये मोठ्या हुद्यावर काम करणारा आहे असेही त्या बातमीमध्ये सांगण्यात आले आहे. तेव्हा येथे कोणत्याही अतिरेकी कारवाया होत नाहीत, वृत्तपत्रांतील अहवाल अतिरंजित असावेत असे आपण येथे सागता तर मग एटीएसच्या पोलिसांनी आता जी कारवाई केली आहे ती लक्षात घेता आपण हे निवेदन, हे उत्तर दुरूस्त करणार आहात का ? तसेच नागपूरमध्ये एटीएसने एका अतिरेक्याला पकडले आहे अशी जी बातमी आली आहे ती खरे आहे काय आणि अतिरेकी या नागपूरामध्ये सापडला आहे तर त्याबाबत सगळी चौकशी करून या नागपूर शहरात देखील अतिरेकी कारवाया चालू आहेत काय ? आणि हे सत्य असेल तर ज्या आपल्या अधिकाऱ्यांनी आपल्याला चुकीची माहिती दिली त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. ती आपण करणार का ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, हा प्रकार जेथे घडला ते म्हसळा गाव माझ्या मतदारसंघाच्या सीमेजवळच आहे आणि ते सारे क्षेत्र माझ्या माहितीचे आहे. तसेच त्या बाईचे घर तेथील कॅनॉलच्या कोपऱ्यावर आहे आणि तेथील केटीपीएस 4 कि.मी.दूर आहे. त्याठिकाणी नहमीच सशस्त्र पोलिसांची गस्त सुरू असते आणि एके 47 घेऊन ही गस्त सुरू असते. पोलीस मित्रांना बरोबर घेऊन तेथे पेट्रोलिंग सुरू असते. अशा वेळी पोलीस पाटील मोबाईल-दूरध्वनीवर उपलब्ध असतात. सभापती महोदय, या घटनेच्या दिवशी देखील तेथे गस्त सुरू होती. तसेच यापूर्वी गस्त घालणाऱ्यानी दोन वेळा भंगारवाल्यांना पकडून दिलेले आहे. आता येथे जो प्रश्न उपस्थित केला आहे की, काल एटीएसने एका व्यक्तीला नागपूरमध्ये अतिरेकी म्हणून पकडले आहे आणि त्याचा

..... यू 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राऊत ....

संबंध याच्याशी जोडण्याचा जो प्रयत्न होत आहे त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, अशा प्रकारे अतिरेकी कधीही पाच-पाचशेच्या नोटा देऊन कोणालाही माहिती विचारीत नसतात तर ते सरळ कारवाई करीत असतात त्यामुळे येथे पुरेशी सुरक्षा व्यवस्था आहे आणि या निवेदनाद्वारे जे उत्तर दिलेले आहे त्यामध्येही काही बदल करण्याची गरज नाही. सभापती महोदय, या ठिकाणी या निमित्ताने सुरक्षेच्याबाबतीत जो प्रश्न उपस्थित केला आहे. निश्चितपणे सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन येथे जास्त सुरक्षा कशी वाढविता येईल तसेच ही ज काही घटना घडली आहे तिच्या तळाशी जाण्यासाठी चौकशीचे आदेश दिले जातील.

(यानंतर श्री. सरफरे ..... व्ही 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोल्हापूर जिल्हयामध्ये श्री. भास्कर ठाकरे यांचा गोळी लागून झालेला संशयास्पद मृत्यू

मु. शी. : कोल्हापूर जिल्हयामध्ये श्री. भास्कर ठाकरे यांचा गोळी लागून झालेला संशयास्पद मृत्यू याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नितीन राऊत (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "कोल्हापूर जिल्हयामध्ये श्री. भास्कर ठाकरे यांचा गोळी लागून झालेला संशयास्पद मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्हयातील हातकणंगले तालुक्यामध्ये श्री. भास्कर भालचंद्र ठाकरे यांचा संशयास्पद मृत्यू झाला. ही घटना फेब्रुवारी महिन्यात घडल्यानंतर कोल्हापूर जिल्हयातील पोलीस अधिक्षक, डी.आय.जी. यांच्याबरोबर सुध्दा माझे बोलणे झाले. श्री. भास्कर भालचंद्र ठाकरे यांचे वडील शिवसेनाप्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे चुलत बंधू आहेत. त्यांनी सुध्दा माननीय शिवसेनाप्रमुखांकडे आपल्या मुलाच्या झालेल्या संशयास्पद मृत्यूबाबत विनंती केली होती. याठिकाणी पोलिसांतर्फे करण्यात आलेल्या पंचनाम्यामध्ये मोठया प्रमाणात विसंगती आहे. त्याचप्रमाणे त्यांना वेगवेगळया प्रकारे सहकार्य न करण्याचा प्रयत्न झालेला आहे. कोल्हापूरमधील संबंधित पोलीस अधिकाऱ्यांशी मी स्वत: बोलले. त्यावेळी माझी अपेक्षा होती की, तीन महिन्याच्या मर्यादीत काळात गुन्हा दाखल होईल आणि निश्चितपणे आरोपी सापडतील. म्हणून मी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये नियम 93 अन्वये सूचना मांडली नाही. मला वाटले होते की, याबाबतीत कोल्हापूरच्या पोलिसांकडून योग्य पध्दतीने तपास करण्यात येईल. फेब्रुवारी महिन्यामध्ये ही घटना घडल्यानंतर डिसेंबर महिना सुरु असून यामध्ये सहा महिन्यांपेखा जास्त कालावधी झाला आहे. माझा याबाबतीत प्रश्न असा आहे की, निवेदनामध्ये "याप्रकरणी अधिक तपास सुरु आहे" एवढेच उत्तर दिले आहे. श्री. भास्कर ठाकरे यांचा संशयास्पद मृत्यू गोळया लागून झाल्याचे म्हटले आहे. या प्रकरणाची आपण संपूर्ण चौकशी सी.आय.डी. कडे सोपविणार काय? जेणेकरुन योग्य त्या आरोपींपर्यंत आपल्याला पोहोचणे शक्य होईल. कारण या प्रकरणातील साक्षी पुराव्यामध्ये हस्तक्षेप करण्यात आला असावा अशी मला शंका वाटते?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी श्री. भास्कर ठाकरे यांच्या झालेल्या मृत्यूबाबत याठिकाणी प्रश्न विचारला आहे. ते आपल्या दोन मित्रांसोबत नेहमी शेतावर जात असत. आणि त्या शेतावर त्यांच्या नेहमी पाटर्या होत असत. त्या शेतावर जंगली डुकरे चरण्यासाठी येत असल्यामुळे त्यांना मारण्याचे काम त्याठिक्राणी होत असे. श्री. भास्कर ठाकरे ज्यावेळी मरण पावले त्यावेळी त्यांच्याजवळ रेमिंग्टन मॉडेलची बंदूक होती. श्री. माधव यादव आणि श्री. नचिकेत मंडलिक हे त्यांचे सहकारी होते. त्यांचे हार्टचे ऑपरेशन झाले असल्यामुळे हे सहकारी त्यांच्याबरोबर गेले नव्हते. ज्यावेळी त्यांना गोळी लागली त्यावेळी ते उताणे पडल्याचे आढळले. कारण त्याठिक्राणी ते डुकरे मारण्यासाठी गेले होते. त्यांच्याजवळील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री. नितीन राऊत....

बंदूक लोडेड होती. ज्यावेळी त्यांना बंदूकीची गोळी लागली ती गोळी त्यांच्या नाकातून गेल्यामुळे ते उताणे पडले. त्यामुळे जमिनीवर कोठेही रक्ताचे डाग नव्हते. याबाबत पोलीस यंत्रणेने व्यवस्थित तपास केला आहे. याबाबतीत मुंबईच्या फॉरेन्सिक लॅबोरेटरीकडून बॅलेस्टिक रिपोर्ट पेंडींग आहे, त्यामुळे तपास सुरु आहे. आपण याबाबतीत जो संशय व्यक्त केला आहे, तसा संशय मी देखील व्यक्त केला असता. परंतु यामधील रिॲलिटी बघितल्यानंतर पोलीस यंत्रणा व्यवस्थितरित्या काम करीत आहे, असा मी आपणास विश्वास देऊ इच्छितो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रकरणाचा तपास सी.आय.डी. कडे देण्याबाबत माझी आपणास विनंती आहे. याचे कारण कोल्हापूर जिल्हयामध्ये 30 ते 40 जणांच्या वेगवेगळया प्रकारच्या तक्रारी माझ्याजवळ आहेत मी त्या वेळेअभावी या सभागृहामध्ये मांडू शकत नाही.

उपसभापती : आपण मंत्रिमहोदयांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्याकडे तक्रारी द्याव्यात.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, हे प्रकरण सी.आय.डी. कडे तपासाकरिता सुपूर्द करावे अशी माझी मागणी आहे.

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी कधीही माझ्याकडे यावे. मी त्यांना याप्रकरणी संपूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :ठाणे जिल्हापरिषदेमध्ये शिक्षक सेवकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना स्थान न मिळणे

मु. शी. : ठाणे जिल्हापरिषदेमध्ये शिक्षक सेवकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना स्थान न मिळणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. नाना पंचबुध्दे (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, पाशा पटेल यांनी " ठाणे जिल्हापरिषदेमध्ये शिक्षक सेवकांच्या भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना स्थान न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळा आहेत. या प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षकांच्या भरती संदर्भात शासनाने जी.आर. काढला होता. त्यानुसार ज्या परिक्षा घेण्यात आल्या त्यांची राज्य स्तरावर गुणवत्ता यादी तयार करण्यात आली. तिचा विपरीत परिणाम आज या शिक्षकांवर झाला आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

राज्य स्तरावर तयार करण्यात आलेल्या निवड यादीमध्ये स्थानिक उमेदवारांना फार कमी प्रमाणात स्थान मिळालेले आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये 700 पैकी फक्त 26 स्थानिक उमेदवारांना पदे मिळालेली आहेत. डी.एड. भरती प्रक्रियेमध्ये ज्याप्रमाणे 70 टक्के स्थानिक विद्यार्थ्यांना आणि 30 टक्के राज्य स्तरावरील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो त्याच पध्दतीने या निवड प्रक्रियेमध्ये सुध्दा स्थानिक डी.एड. उमेदवारांना 70 टक्के आणि राज्य स्तरावरील उमेदवारांना 30 टक्के जागा देण्याच्या बाबतीत शासन निर्णय घेणार काय ? दुसरा प्रश्न असा की, त्या ठिकाणी हे सर्व उमेदवार जिल्हा परिषदेचे एम्प्लॉई होणार आहेत. शालेय शिक्षण विभाग अशा प्रकारे जिल्हा परिषदेमध्ये म्हणजे ग्रामविकास खात्याच्या एम्प्लाईजच्या बाबतीत या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत योजना फॉर्म्युलेट करील काय ? आपण शिक्षण सेवकांची जी भरती करतो त्यामध्ये यवतमाळचा विद्यार्थी राज्यस्तरीय विद्यार्थी म्हणून गुणवत्तेनुसार ठाण्याला येणार आहे. असे सर्व विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीमध्ये आपल्या मूळ जिल्ह्यामध्ये बदलून जाणार नाही अशा प्रकारचे हमीपत्र शासन त्यांच्याकडून लिहून घेणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील शिक्षण सेवक भरतीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये एकंदर 26021 अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी जवळपास 25214 अर्ज पात्र ठरले. गुणवत्तेप्रमाणे 22246 अर्ज होते. ठाणे जिल्ह्यातील 198 आणि बाहेरच्या जिल्ह्यातील 812 अशा एकूण 931 विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न शिक्षक भरती डी.एड.च्या प्रवेश प्रक्रियेप्रमाणे करण्यात येईल काय याबाबत विचारला. ज्याप्रमाणे डी.एड.च्या भरतीमध्ये 70:30 या रेश्योचा अवलंब करतो त्याप्रमाणे याबाबतीत अजूनपर्यंत निर्णय घेतलेला नाही परंतु भविष्यामध्ये त्या जिल्ह्यातील विद्यार्थी त्याच जिल्ह्यात राहावेत याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्याबाबत

उपसभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजात दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 1 पुढे ढकलण्यात येत आहे.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना 19 तारखेला दाखविण्यात आली होती. त्यावेळी लक्षवेधी पुढे ढकलण्यात आली आणि आज 23 तारखेला लक्षवेधी सूचना लागलेली आहे. आता पुन्हा माननीय मंत्रिमहोदयांनी पत्र दिले आहे. ही लक्षवेधी सूचना आपण निश्चितपणे उद्या घेणार काय याबाबत ठोस सांगावे. लक्षवेधी सूचना सतत पुढे ढकलणे बरोबर नाही. हा प्रकार दुसऱ्यांदा झाला आहे. ही लक्षवेधी सूचना निश्चितपणे उद्या घेणार काय ?

श्री. नाना पंचबुध्दे : सभापती महोदय, याबाबत माननीय मंत्रिमहोदयांना विचारुन उद्या ही लक्षवेधी सूचना घेण्यात येईल की नाही हे तपासून घेण्यात येईल.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, याबाबत आपल्याकडून निर्णय अपेक्षित आहे.

उपसभापती : ही लक्षवेधी सूचना उद्या घेण्यात येईल.

लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्याबाबत

उपसभापती : आजच्या दिवसाच्या कामकाजात दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात येत आहे.

श्रीमती मधू जैन : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 2 चे उत्तर आलेले नाही. ही लक्षवेधी सूचना उद्या घ्यावी.

उपसभापती : उद्या शक्य झाले नाही तर ही लक्षवेधी सूचना शनिवारी घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

पृ. शी. : कोल्हापूर येथील चित्रनगरीचा खाजगीकरणातून विकास करण्याचा घेतलेला निर्णय

मु. शी. : कोल्हापूर येथील चित्रनगरीचा खाजगीकरणातून विकास करण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठी चित्रपटसृष्टीची पंढरी म्हणून कोल्हापूरला ओळखले जाणे, शासनातर्फे कोल्हापूर येथे चित्रनगरीची 78 एकर जागेत स्थापना करण्यात येणे, कोल्हापूर येथील चित्रनगरीचा दिनांक 20/2/2008 रोजी खाजगीकरणातून विकास हा निर्णय होणे, शासनाने दिनांक 27/2/2008 रोजी मुंबईतील मिटकॉन कंपनीला चित्रनगरीचा विकास आराखडा तयार करण्याचे काम देणे, गत 8 महिने उलटूनही या प्रकरणी कोणतीही प्रगती न होणे, तसेच कोल्हापूरच्या कलानगरीतील कलाकारांचा व कोल्हापूरच्या मराठी चित्रपट सृष्टीच्या अस्मितेचा प्रश्न निर्माण होणे, शासनाचेही याकडे दुर्लक्ष होणे, कोल्हापुरातील चित्रनगरी विकसित करण्यासाठी मराठी चित्रपट कलाकारांची होत असलेली मागणी, सदर मागणीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. सुरेश वरपुडकर (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मराठी चित्रपटांपैकी 70 टक्के मराठी चित्रपटांचे चित्रिकरण कोल्हापूरमध्ये होत असते. त्याठिकाणी जयप्रभा व शालिनी असे दोन स्टुडिओ आहेत. या स्टुडिओंच्या माध्यमातून मराठी चित्रपटांचे चित्रिकरण सुरु असताना या उद्योगाला चालना मिळावी म्हणून या चित्रनगरीची स्थापना करण्यात आली होती. परंतु ही चित्रनगरी तोट्यात चालत असल्यामुळे शासनाने ही चित्रनगरी बंद करण्याचा निर्णय घेतल्यामुळे कोल्हापूरमध्ये मोठया प्रमाणावर आंदोलने चालली. या आंदोलनाचा भाग म्हणून दिनांक 30.4.2008 रोजी मराठी चित्रपट महोत्सवामध्ये त्यावेळचे माननीय सांस्कृतिक मंत्री आणि विद्यमान माननीय मुख्यमंत्री यांनी घोषणा केली की, ही चित्रपट नगरी बंद होऊ देणार नाही. त्यानंतर ही चित्रपट नगरी बी.ओ.टी.तत्वावर विकसित करुन पुन्हा सुरु करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला. त्यानुसार मिटकॉन या कंपनीला सर्वेक्षण करुन या कामासाठी किती आर्थिक खर्च येणार आहे याबाबतचा अहवाल सादर करण्यास सांगितले. मिटकॉन कंपनीने आठ महिन्यापूर्वी शासनाला अहवाल सादर केलेला आहे. बी.ओ.टी.तत्वावर टेंडर काढून हे काम करावयाचे आहे, यासाठी शासनाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही. पण आठ महिन्यानंतरही या कामाची प्रक्रिया सुरु झालेली नाही. चित्रपट नगरीच्या 77 एकर जमिनीवर काही जणांचा डोळा आहे. त्यामुळे ही चित्रपट नगरी पुन्हा सुरु होऊ नये यासाठी प्रयत्न सुरु आहेत. एका खाजगी कंपनीचे मराठी चित्रपटांचे व मालिकांचे चित्रिकरण करण्यासाठी वेगळी चित्रपट नगरी उभी करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. म्हणजे खाजगी कंपनीची चित्रपट नगरी उभी करावयाची आणि शासकीय चित्रपट नगरी बंद करावयाची यादृष्टीने शासनाची वाटचाल सुरु आहे. ही जमीन महत्वाच्या ठिकाणी आहे. या चित्रपट नगरीपासून विमानतळ 1कि.मी.अंतरावर आहे, 3 कि.मी.अंतरावर कोकण आहे, 5 कि.मी.अंतरावर गोवा आहे. यादृष्टीने ही जमीन महत्वाची आहे. माझा प्रश्न असा आहे की, मिटकॉन कंपनीने सर्वेक्षणाचा अहवाल सादर केलेला असल्यामुळे या कामाचे टेंडर लवकर काढले जाईल काय ?

श्री.सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, कोल्हापूर येथील चित्रनगरी ब-याच दिवसांपासून तोटयात चालल्यामुळे उपासनी समितीने ही चित्रनगरी बंद करण्याची शिफारस केली होती. माननीय मुख्यमंत्र्यांनी एका कार्यक्रमामध्ये या चित्रनगरीचे पुनरुज्जीवन करण्याची घोषणा केली

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश वरपुडकर.....

होती हेही सत्य आहे. त्यामुळे दिनांक 10 मार्च, 2008 रोजी शासनाने ही चित्रनगरी पुनरुज्जीवित करण्यासाठी महामंडळाकडे सर्वेक्षणाचे काम दिले होते. त्यानंतर मिटकॉन कंपनीने सर्वेक्षणाचा अहवाल सादर केला आहे. शासनाने सिकॉम कंपनीला हा अहवाल तपासण्यास सांगितले होते. सिकॉम कंपनीने हा अहवाल तपासून चित्रपट महामंडळाच्या मान्यतेसाठी ठेवला आहे. यातील प्रस्ताव असा आहे की, 50 एकर जागेत चित्रपटनगरी उभी करावयाची आणि 27 एकर जागा व्यवसायिकांना वा एखाद्या मॅनेजमेंटला देऊन तेथे त्यांना थ्री स्टार हॉटेल, चित्रिकरणासाठी येणा-यांची राहण्याची व्यवस्था करावयाची असेल तर या कामासाठी द्यावयाची. हा करार 20 वर्षासाठी अस्तित्वात राहणार आहे. बी.ओ.टी.तत्वावर त्यांनी 20 वर्षे ही जागा वापरावयाची आहे. 20 वर्षानंतर ही जमीन त्यांनी सोडून द्यावयाची आहे. या कालावधीनंतर ही जमीन चित्रपट नगरी व सांस्कृतिक विभागाच्या मालकीची होईल. हा प्रस्ताव महामंडळासमोर ठेवलेला आहे. याबाबतची प्रक्रिया कशी असावी, टेंडर कसे काढावे यासाठी कायदेशीर सल्ला देखील मागविलेला आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याची शासनाची तयारी झालेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोल्हापूरच्या चित्रनगरीच्या संदर्भात तत्कालीन सांस्कृतिक मंत्री आणि विद्यमान माननीय मुख्यमंत्री यांनी एक कार्यक्रमात घोषणा केली होती. त्यानंतर त्याबाबत काहीच प्रगती झाली नसल्यामुळे आता लोकांमधून अशी प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. लोक असे म्हणतात की, "गेली शाहू मिल बघता बघता, चित्रनगरी तरी वाचेल का, चित्रनगरीसाठी वरनं पैका येईल का, सीएम साहेब कोल्हापूरला दिलेला शब्द पाळाल का ?

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत पत्र / शीघ्रलिपीची नाही

(श्री. विनोद तावडे...

प्रश्न असा आहे की 20 फेब्रुवारी 2008च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कोल्हापूर चित्रपट नगरी पुनरुज्जीवित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर मे. लिटल ॲण्ड कंपनीकडून कायदेशीर सल्ला प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई आपण सुरु करणार आहात. त्या आधी विधी व न्याय विभागाकडून आपण कायदेशीर सल्ला घेतलेलाच असेल. एखादी गोष्ट करण्याचे टाळायचे असेल तर त्याबाबतीत कायदेशीर सल्ला घेतला जातो. या चित्रनगरीची जमीन आपली आहे. याबाबतीत मिटकॉन आणि सिकॉमचाही पॉझिटिव्ह अहवाल प्राप्त झालेला आहे. मंत्रिमंडळाने देखील प्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. असे असताना मे. लिटल ॲण्ड कंपनी या नामवंत कंपनीकडून सल्ला घेण्याची गरज का भासली ? ही चित्रपट नगरी किती कालावधीत पुनरुज्जीवित करणार आहात ? माननीय मंत्री महोदयांनी माझ्या या प्रश्नाचे नेमके उत्तर द्यावे किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर द्यावे. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये येईपर्यन्त ही लक्षवेधी राखून ठेवावी.

श्री. सुरेश वरपुडकर : मे. लिटल ॲण्ड कंपनीने पूर्ण तपासणी केलेली आहे. मिटकॉनने जून 2008ला आपला अहवाल दिला. त्यानंतर सिकॉम मार्फत तपासणी झाली. अखिल भारतीय प्रतिनिधींबरोबर देखील यासंदर्भात चर्चा करुन हा अहवाल तपासून पाहिला. मिटकॉनने तीन वेळा सुधारित अवाल सादर केला. आता दिनांक 1.10.2008ला अंतिम अहवाल मिटकॉनने सादर केलेला आहे.

श्री. विनोद तावडे : कोणत्या कायदेशीर अडचणीमुळे सल्ला मागण्याची गरज भासली ?

श्री. सुरेश वरपुडकर : कायदेशीर अडचण काही नाही. कायदेशीर अडचण येऊ नये आणि टेंडर कशा प्रकारचे असले पाहिजे या बाबी तपासून घेतलेल्या आहेत. आता महामंडळासमोर ठराव आलेला आहे. महामंडळाने मान्यता दिल्यानंतर त्यास अंतिम स्वरुप देण्यात येईल. अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत महमंडळाची मिटींग घेण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय राज्यमंत्री महोदय हे अंदाज समितीचे समिती प्रमुख होते. हे चुकीचे उत्तर आपण वाचल्यानंतर ते ताबडतोब फाडून टाकायला पाहिजे होते. अंदाज समितीमध्ये आपणासमोर यासंबंधीची झालेली चर्चा आणि आता दिलेले उत्तर बरोबर आहे काय ? हे उत्तर वाचल्या बरोबर आपण ते फाडून टाकायला पाहिजे होते. किती बेजबाबदारपणे हे उत्तर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....

दिलेले आहे. ताज महाल हॉटेलला आग लागल्यानंतर त्याच्या फाईल्स आपण क्लिअर केल्या. इच्छाशक्ती कशी असते ते मी सांगतो. ताज महाल हॉटेलला आग लागल्यानंतर श्री. रतन टाटा यांनी सांगितले की, उद्ध्वस्त झालेला भाग आम्ही एका महिन्यात तयार करु आणि त्या आधी त्यांनी त्या हॉटेलचे उद्घाटन केले. राज्यकर्त्यांची देखील इच्छाशक्ती अशी असली पाहिजे हे मला सांगावयाचे आहे. निवेदनाच्या शेवटी "त्यामुळे कोल्हापूर चित्रनगरी विकसित करण्याबाबत शासनाने दुर्लक्ष केले आहे असे म्हणता येणार नाही." असे उत्तर दिलेले आहे. यासारखा मानसिक बेशरमपणा कुठला नाही. 30 एप्रिल 2006 रोजी आपण आश्वासन दिले आणि त्यानंतर 20 फेब्रुवारी 2008ला म्हणजे 2 वर्षानंतर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणलेला आहे. हॉलीवुडला युनिर्व्हसला स्टुडियो आहेत. आता कुठे मराठी चित्रपटांना आणि सिनेमांना वैभव प्राप्त व्हायला लागले आहे. असे असताना त्यांना एक स्टुडिओ देखील नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, त्या ठिकाणी 77 एकर जमीन शासनाच्या मालकिची असताना कायदेशीर सल्ला घेण्याची गरज काय ? माझ्या जमिनीवर काय बांधावयाचे आहे, ते बांधण्यास शासनास कोण आडकाठी घालणार आहे ? मिटकॉन या निम शासकीय संस्थेने यासंबंधी अहवाल तयार केलेला आहे. त्या अहवालाची पुन्हा छाननी करण्यासाठी सिकॉमची नेमणूक करण्याची गरज काय ? ही चित्रपटसृष्टी त्या ठिकाणी होऊ नये म्हणून काही लोक प्रयत्नशील आहेत या गोष्टीची माननीय मंत्री महोदयांना देखील माहिती आहे. अंदाज समितीने त्या ठिकाणी भेट दिली असता तेथील अधिका-यांनी सांगितले की, हा स्पॉट अतिशय महत्वाच्या जागेवर आहे. या जमिनीवरील वरच्या बाजूस ओव्हर हेड वायरी गेलेल्या नाहीत. पौराणिक दृश्य चित्रित करावयाचे असले वा प्राचीन दृश्य चित्रित करावयाचे असेल तर त्यास कोणतीही आठकाठी येत नाही. या जमिनीच्या लगत नैसर्गिक सर्व गोष्टी उपलब्ध आहेत. त्यामुळे त्या परिसरात आर्टिफिशल गोष्टी करण्यासाठी कोणतीही गरज भासत नाही. म्हणून माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, ही चित्रपटनगरी एक वर्षाच्या आत तयार करण्यात येईल काय ?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे ती खरी आहे. त्या ठिकाणी चांगल्या प्रकारच्या चित्रपटनगरी होऊ शकते अशी तेथील जमीन आहे. त्या जमिनीपासून पाच कि.मी.अंतरावर एक विमानतळ आहे. ही जमीन अत्यंत महाग किंमतीची आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. या 77 एकर जमिनीवरील 50 एकरच्या संदर्भातील अभ्यासपूर्व अहवाल तयार केलेला आहे. त्यातील उर्वरित 27 एकर जमीन डेव्हलपर्ससाठी देण्याचे ठरते आहे. मिटकॉनने यासंदर्भातील अहवाल दिलेला आहे, परंतु त्या अहवालात काही त्रुटी निघू नयेत म्हणून त्या अहवालाची पुन्हा छाननी करण्यासाठी सिकॉमची नेमणूक केली आहे. सिकॉमला अहवाल छाननीचे काम देण्याचा निर्णय झाला त्यावेळी तो अहवाल तीन वेळा बदलावा लागला. मिटकॉनचा अहवाल सिकॉमने तपासल्यानंतर त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारचा अंतिम अहवाल शासनास सादर केलेला आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर महामंडळाची बैठक घेऊन त्या बैठकीस सदर अहवालास मान्यता देऊन सदर ठिकाणच्या कामाचे टेंडर काढण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल.

डॉ.नीलम गो-हे : या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी 15 दिवसांचे आश्वासन दिले त्याबद्दल त्यांचे मी आभार मानतो. माननीय मंत्री महोदयांचा याबाबतचा अभ्यास भरपूर आहे याची मला माहिती आहे. कोल्हापूर शहरात शालिनी, जयप्रभा हे स्टुडिओ बंद पडले आहेत. कोल्हापूर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

चित्रनगरीस तोटयात असलेली चित्रनगरी असे म्हटले जाते. सांस्कृतिक विभागाचे लक्ष हिंदी चित्रपटांकडे जेवढे आहे. तेवढे लक्ष मराठी चित्रपटांकडे नाही. त्यामुळे तेथील मराठी सिनेउद्योग बंद पडत चालला आहे. या ठिकाणच्या चित्रनगरीच्या कामासाठी 15 दिवसात टेंडर काढणार आहेत ही स्वागतार्ह गोष्ट आहे. परंतु मराठी चित्रपटाकडे सांकृतिक कार्य विभागाच्या अधिका-यांनी वारंवार दुर्लक्ष केले आहे, आणि मोठया प्रमाणात अनास्था दाखविली आहे. त्या अधिका-यांच्या मानसिकतेमध्ये काही बदल करणे आवश्यक आहे. रामोजी स्टुडिओ, हैद्राबाद येथे ज्या प्रमाणे स्टुडिओ उभारला आहे, तशाच प्रकारचा स्टुडिओ कोल्हापूर नगरीत उभारण्यासाठी एका विशिष्ट अधिका-याची नेमणूक केली जाईल काय ?

श्री. सुरेश वरपुडकर : मराठी चित्रपटासाठी कोल्हापूर येथील चित्रनगरी होती. या चित्रनगरीमध्ये भोजपुरी, दक्षिणी चित्रपट निर्माण होत होते. आता देखील दहा ते पंधरा खाजगी चित्रपट निर्मित होत आहेत. या चित्रपटनगरीसाठी स्वतंत्र अधिकारी नेमण्याची काही गरज नाही. कारण या चित्रनगरींचा विकास ज्वाईंट व्हेंचर तसेच बी.ओ.टी.तत्वावर करण्यात येणार आहे. तसा प्रस्ताव विभागाकडून तयार करण्यात आलेला आहे. हे अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसांच्या आत त्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : कोल्हापूर येथील शालिनी आणि जयप्रभा स्टुडिओचा विषय सभागृहात चर्चेला आलेला आहे. परंतु हे स्टुडिओ विकसित करण्यासाठी शासनाची इच्छाशक्ती कमी पडते आहे. सदर स्टुडिओ दुरुस्त करण्यासाठी काय पावले उचलली जाणार आहेत ?

श्री. सुरेश वरपुडकर : चित्रपटनगरी विकसित करण्यासाठी नवीन अधिका-यांची नियुक्ती करण्यापेक्षा यासंदर्भात पूर्णपणे प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. सदरहू चित्रनगरीचा विकास ज्वॉईंट व्हेंचर आणि बी.ओ.टी.तत्वावर करण्यासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे. ही जागा विकसित केल्यानंतर त्याचे 20 वर्षानंतर काय परिणाम होणार आहेत, त्यासंबंधीचा अभ्यास झाला असून त्या प्रस्तावास अंतीम स्वरुप प्राप्त झाले आहे. त्या प्रस्तावास मान्यता देऊन टेंडर काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, अधिवेशन संपल्यानंतर यासंदर्भात 15 दिवसांच्या आत महामंडळाची बैठक घेऊन त्या प्रस्तावास मान्यता देण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मराठवाडयातील अनेक जिल्हयात वन्यप्राण्यांमुळे होणारे शेती पिकाचे नुकसान

मु. शी. : मराठवाडयातील अनेक जिल्हयात वन्यप्राण्यांमुळे होणारे शेती पिकाचे नुकसान यासंबंधी सर्वश्री सुरेश जेथलिया, किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वनमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मराठवाड्यात लातूर, औरंगाबाद, नांदेड, जालना आदी जिल्ह्यातील कोवळी पिके हरणांच्या कळपांनी शेतात शिरुन फस्त करीत असणे, आधीच मराठवाड्यात यंदा पावसाळा लांबल्याने खरीपाच्या लांबलेल्या पेरण्या, हरणांचा उपद्रव वाढल्याने शेतकरी जेरीस येणे, तसेच जालना जिल्ह्यातही रानडुक्करांनी शेतीचे मोठे नुकसान केलेले असणे, किमान दोनशे हरणांचा एक याप्रमाणे कित्येक कळपांनी गंगापूर, कन्नड व वैजापूर तालुक्यातील पिकांची केलेली नासाडी, हरणांच्या कळपांनी शेतीची नुकसानी केल्याचे भरपाई अर्ज मोठ्या प्रमाणावर तेथील वन विभागाकडे येत असणे, त्यावर निर्णय नसणे, वन्यजीवन संरक्षा कायद्यान्वये हरिणांची शिकार करण्यास परवानगी नसणे, ती मिळावी म्हणून राज्य शासनाने तसा प्रस्ताव पाठविण्याबाबत शासनाने दाखविलेली अक्षम्य उदासिनता, आधीच तेथील शेतकरी कर्जबाजारी असता आलेल्या पिकांची हरणांचे कळप करीत असलेली नासाडी, परिणामी तेथील शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता हरणांच्या कळपापासून मराठवाड्यातील शेतीचे नुकसान टाळण्यासाठी व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.बबनराव पाचपुते (वनमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश जेथलिया : सभापती महोदय, मराठवाडयातील अस्तित्वात असलेल्या आठ जिल्हयांपैकी हरणाचे व काळविटाचे कळप शेतात शिरुन शेतकऱ्यांच्या पिकाची नासाडी करतात हे शासनाने निवेदनामध्ये मान्य केले आहे. मराठवाडा हा अगोदरच दुष्काळाच्या छायेत आहे. अशा स्थितीत जर वन्यप्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत असेल तर वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रत्येक जिल्हयातून किती अर्ज प्राप्त झाले? त्यापेकी किती अर्जावर निर्णय झाला? जिल्हानिहाय किती नुकसान भरपाई वाटप केली? किती अर्ज प्रलंबित आहेत? अर्ज प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत? रानडुक्करासंबंधी जो कायदा आहे त्याबाबत निवेदनामध्ये विवेचन केले आहे. परंतु वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, 1972 च्या कलम 11(1)(ब) नुसार रानडुक्कर मारण्याचे अधिकार वनक्षेत्रपाल यांना आहेत. ज्यांच्या शेतीचे नुकसान होते त्यांनी अधिकाऱ्यांना बोलवेपर्यंत व अधिकारी पोहोचेपर्यंत वन्यप्राणी शेती पिकाची नासधुस करुन निघून जातात. हे अधिकार शेतकऱ्यांना देण्यास शासनाला कोणती अडचण आहे? रानडुक्कर मारण्याचे अधिकार शेतकऱ्यांना दिले तर वनरक्षक येईपर्यंत शेतामध्ये काही शिल्लक रहात नाही, शेतीचे प्रचंड नुकसान होते ते नुकसान थांबविता येईल. यासाठी शासन वेगळी तरतूद करणार आहे का?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, हरण आणि काळवीट या वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या शेती नुकसानीबाबत निवेदनात माहिती दिलेली आहे. 2005-06, 2006-07, 2007-08 व 2008-09 या चार वर्षात किती नुकसान भरपाईचे अर्ज आले? किती प्रकरणात पंचनामे झाले याची माहिती निवेदनात दिली आहे. जिल्हानिहाय माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. साधारणत: औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड व उस्मानाबाद या पाच जिल्हयांची माहिती उपलब्ध आहे. पहिल्या वर्षी म्हणजे 2005-06 मध्ये औरंगाबादमध्ये 26, परभणी व नांदेडमध्ये काही नाही, बीडमध्ये 3, उस्मानाबादमध्ये 3 घटना घडल्या. 2006-07 मध्ये औरंगाबाद 95, परभणी 41, बीड 47, उस्मानाबाद 1, 2007-08 मध्ये औरंगाबाद 275, परभणी 99, बीड 4 अशा एकूण 378 घटना घडलेल्या आहेत. 2008 मध्ये मोठया प्रमाणात घटना घडल्या आहेत. औरंगाबादमध्ये 6285, परभणीमध्ये 258, नांदेडमध्ये 1, बीडमध्ये 2663 आणि उस्मानाबादमध्ये 6 घटना घडल्या. या घटना वाढण्याचे कारण असे की, पूर्वी हरण आणि काळवीट या प्राण्यांमुळे नुकसान होत होते त्याबाबत भरपाई दिली जात नव्हती. आता नुकसान भरपाई द्यायला सुरुवात केल्यामुळे लोक पंचनामे करु लागले आहेत आणि घटनांची नोंद व्हावयास लागली आहे. याशिवाय रानडुक्कर हा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

प्राणी संबंधित शेडयूलमधून वगळलेला आहे. त्याची शिकार करण्यास परवानगी दिलेली आहे. शेतकऱ्यांना सुध्दा त्यांच्या शेतामध्ये रानडुक्कर शेतीचे नुकसान करीत असतील तर त्यांची शिकार करण्यास, पारध करण्यास परवानगी दिली आहे. त्यामध्ये जी अडचण होती ती दूर केली आहे. त्यांनी अर्ज दिल्यानंतर 48 तासाच्या आत शासन परवानगी देते. विभागाकडून परवानगी मिळाली नाही तरी ती दिली आहे असे गृहित धरुन त्यांनी शिकार करावी अशा प्रकारचा जी.आर. काढला आहे. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे होणारे नुकसान कमीत कमी कसे होईल यासाठी शासन सतर्क आहे. हरण आणि काळवीट यांच्यामुळे होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे करण्यात जी अडचण होती ती सुध्दा दूर केली आहे. आता सरपंच, तलाठी/ग्रामसेवक, वन खात्याचे वनपाल यांची संयुक्त समिती तयार केली आहे. त्यांनी पंचनामे करायचे आहेत. तक्रार दिल्यानंतर ताबडतोब पुढील कारवाई करायची आहे. नुकसानभरपाई 90 दिवसाच्या आत दिली पाहिजे अशा प्रकारचा जी.आर.काढला आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, यासंदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. एक म्हणजे वन्य जीव संरक्षण कायद्यान्वये हरिणांना आपण मारु शकत नाही म्हणून त्यांना एकत्रितपणे प्रत्येक जिल्ह्यातील सहा तालुके मिळून जमीन घेऊन या हरिणांना ठेवण्याची योजना शासन राबविणार आहे काय ? तसेच आंध्र प्रदेश सरकारने लाईट अँड साऊंड सिस्टमच्या माध्यमातून हरिणांना पकडून ठेवले जाते, अशी योजना राबविली आहे. ती पध्दत आपल्या राज्यात देखील अवलंबिली जाणार काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून जी रक्कम देतो ती फारच कमी असते आणि गेल्या तीन चार वर्षात दिलेली रक्कम पाहिली तर एखाद्या वर्षी फक्त 1 लाख रुपये एवढीच मदत दिलेली आहे. एखाद्या वर्षी ती 40 लाख दिली असेल परंतु सरासरी अत्यंत कमी अशी ही नुकसान भरपाई आहे. अशा प्रकारे कोटीचे नुकसान आणि मदत मात्र तुटपुंजी यामध्ये शासन वाढ करुन देणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, काळवीट, चिंकारा, बारशिंगे अशा प्रकारे वेगवेगळ्या हरिणांच्या जाती असून पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये या हरिणांची संख्या मोठया प्रमाणात आहे. विशेषत: औरंगाबादमध्ये तर ही संख्या हजारांमध्ये आहे. हे कळप एकदा शेतात आल्यानंतर संपूर्ण शेत फस्त तर करतेच परंतु खाण्यापेक्षा जास्त प्रमाणात नुकसानच करते. हरिणांनी केलेल्या नुकसानीपोटी आपण यापूर्वी प्रति गुंठा 10 ते 12 रुपये एवढी नुकसान भरपाई देत होतो. अर्ध्या गुंठयासाठी ही भरपाई 5-6 रुपये देत होतो. परंतु शासनाने कॅबिनेटसमोर हा विषय नेऊन ती 500 रुपयावर नेण्याचा या नुकसान भरपाईमध्ये वाढ करण्याच्या संदर्भात विचार सुरु केला आहे. तसेच पूर्वी कुटुंबाला आपण 2 हजार रुपये देत होतो त्यात वाढ करुन ती 5 हजारावर करावी, त्यापेक्षा जास्त असल्यास त्यात आणखी 30 टक्के रक्कम ॲड करुन 10 ते 15 हजारापर्यंत ही नुकसान भरपाई देता येईल काय याबाबतही विचार सुरु आहे. मागील वर्षी आपण 9.25 कोटी रुपये वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीपोटी दिलेले आहेत. वन्य प्राण्यांमुळे झालेल्या नुकसानीच्या बाबतीत संपूर्ण देशाचा विचार केला तर आपल्या राज्याचा सर्वात अगोदरचा नंबर लागेल. दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मी असा खुलासा करु इच्छितो की, या हरिणांना एकत्रित करता येईल काय किंवा त्यांना सौर उर्जा कंपाऊंड घालून ठेवता येईल काय ही जी सूचना केली आहे ती शासनाच्या विचाराधीन असून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते.....

त्याबाबत गांभीर्याने विचार करीत आहोत. औरंगाबादमध्ये तर अशी परिस्थिती निर्माण झाली होती की, एकदा हजारो लोक या हरणांच्या जाचामुळे रस्त्यावर आले होते. त्यावेळेस शासन स्तरावर अशीही चर्चा झाली की, यासंदर्भात काय करता येईल ? काय पण शेडयुल्ड-1 मध्ये हा प्रकार येत असल्यामुळे शासनालाही अडचणी येतात. यातून मार्ग काढण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे आंध्र प्रदेशने जी सिस्टम ॲडॉप्ट केलेली आहे त्याची पाहणी करण्यासाठी आमची टीम आंध्र प्रदेशात जाऊन आली. असे अनेक पर्याय आहेत. त्यात मग या हरिणांना पकडण्यासाठी इंजेक्शन देऊन पकडावे काय याचा विचार केला तरी ते शक्य नाही. कारण हा प्राणी अत्यंत भित्रा असल्यामुळे तो जगण्याची शक्यता जवळजवळ नसते. म्हणून रात्रीच्या वेळेस या हरिणांना पकडावे असेही लक्षात आले. त्याचप्रमाणे आंध्र प्रदेशात एक पथक पाठविले होते. त्या पध्दतीचा अभ्यास करुन आपल्या राज्यातही अशाच प्रकारची टीम तयार करावी असाही कार्यक्रम हाती घेतला आहे. यासंबंधीचा पायलट प्रोजेक्ट म्हणून आपण नांदेड जिल्ह्यातील किनवट येथे करीत आहोत. त्यानंतर बाकीच्या ठिकाणी, जेथे जेथे आवश्यक असेल त्या त्या ठिकाणी करणार असेही शासनाने ठरविले आहे, त्यासाठी जो खर्च येईल तो करण्याची शासनाची तयारी आहे. तसेच नंतरचा पर्याय म्हणजे हरीण पकडून आणून या प्रोजेक्टमध्ये सोडणाऱ्यांना 750 रुपये देण्याचीही तरतूद आपण करीत आहोत, त्याचबरोबर ही नुकसान भरपाईची रक्कम वाढविण्याचाही शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. किशनचंद तनवाणी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी हरिणांना एकत्रित करण्यासंबंधी येथे सांगितले आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, सन 2005-06 मध्ये संभाजीनगर जिल्हयातील वैजापूर तालुक्यात तलवाडा आणि पारवा या गावात वन विभागाची जागा असून त्या जागेवरील प्रकल्पासंबंधीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे आलेला आहे त्याबाबत विचार शासन करणार काय ? तसेच संभाजीनगर जिल्ह्यात सन 2005-06 मध्ये नुकसानीच्या ज्या घटना घडल्या त्यात वाढ होऊन सन 2008 पर्यंत हया घटनांमध्ये सतत वाढ होत आहे. त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अत्यंत कमी दिली जाते. परंतु ज्या प्रमाणात नुकसान होते ते भरुन निघण्यासाठी काही तरी ठोस उपाययोजना करण्याबाबत विचार शासन करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किसनचंद तनवाणी ....

यासंदर्भात आपण उत्तरामध्ये माहिती दिली आहे की, अशा प्रकारे समिती नेमून,पंचनाना करुन संबंधितांना भरपाई दिलेली आहे. परंतु जवळपास 75 टक्के लोकांना अनुदान जरी मिळाले असले तरी आमच्या जिल्हयात पंचनामे होऊनही आमच्या जिल्हयातील शेतक-यांना पैसे मिळाले नाहीत. त्यामुळे नुकसान भरपाई मिळण्याच्या संदर्भात आपण लवकरात लवकर आदेश दिले तर आमच्या जिल्हयातील शेतक-यांचा फायदा होऊ शकेल.

श्री. बबनराव पाचपुते : माननीय सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन. सन्माननीय सदस्यांनी या विषयाच्या संदर्भात ज्या सूचना केलेल्या आहेत त्या संदर्भात शासन काम करण्यास तयार आहे. वीज पडल्यानंतर तहसीलदार आकस्मिक निधीतून त्वरित पैसे उपलब्ध करुन देत असतात तशाच प्रकारे वन्य जीवाकडून जे काही नुकसान होते त्याचे पैसे सुध्दा आकस्मिकता निधीतून देण्याच्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव दाखल केलेला आहे. यासाठी आपण स्वतंत्र हेड आपण उघडलेले आहे. नुकसान भरपाईचे पैसे मिळण्यास विलंब होत होता परंतु आता ऑन लाईन सेवा सुरु केल्यामुळे यासंदर्भात ऑनलाईन काम सुरु झालेले असल्यामुळे पैसे मिळण्यामध्ये अडचणी येत नाहीत. दोन्ही जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी आमच्याकडे पंचनामे दाखल केलेले आहेत. प्रायोगिक तत्तवावर एक प्रोजेक्ट केल्यानंतर मग बाकीच्या गोष्टी हाती घेणार आहोत. परंतु याच पध्दतीने आपल्याला सगळीकडे काम करावे लागेल ही वस्तुस्थिती आहे. आता काळविटाची संख्या जवळपास 10-12 हजारापर्यंत पोहचलेली आहे ही बाब शेतक-यांच्या दृष्टीने गंभीर जरी असली तरी वन्य जीवनाच्या दृष्टीने ही अत्यंत महत्वाची बाब आहे. मांस खाणारे प्राणी आणि गवत खाणारे प्राणी असे दोन भाग आहेत. या दोन्ही प्राण्यांना एकत्र आणता येईल काय यासंदर्भात सुध्दा विचार सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : दरोडेखारांविरुध्द आरोपपत्र सादर न करणे

मु. शी. : "दरोडेखारांविरुध्द आरोपपत्र सादर न करण्याबाबत".

डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्या श्रीमती नीलम गो-हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यामध्ये महाराष्ट्राला धक्का बसेल अशा काही घटना घडलेल्या आहेत. बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील काठोडा या गावामध्ये दरोडेखोरांनी गावावर हल्ला करुन अनेक लोकांना जखमी केले,या हल्ल्यामध्ये दरोडेखोरांनी 2 अल्पवयीन मुलींवर बलात्कार केले तसेच या हल्ल्यामध्ये खून देखील झालेला आहे. या घटनेमुळे खुप मोठा प्रश्न तयार झाला होता. ब-याच दिवसानंतर या हल्ल्याच्या संदर्भात पोलीस स्टेशनमध्ये नोंदणी झाली. याच प्रकारे परभणी जिल्हयातील पारवा शिवारात दरोडेखारांनी हल्ला करुन महिलांवर अत्याचार केले. या दोन्ही घटनांमध्ये अनेक मान्यवरांनी काठोडा गावाला प्रत्यक्ष भेट दिलेली आहे. या ठिकाणी मी स्वत: गेले होते तसेच माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे, अनेक मंत्री आणि उपसभापती महोदयांनी सुधदा भेट दिली होती. हिवाळी अधिवेशन होऊन आता बरेच दिवस उलटलेले आहेत. बीड जिल्हयाच्या त्यावेळच्या पालकमंत्र्यांनी काठोडयाच्या संदर्भात अनेक आश्वासने दिली होती. या प्रकरणाच्या संदर्भात चार्जशीट नुकतेच दाखल झालेले आहे. द्रुतगती न्यायालय करुन या खटल्याचे वकीलपत्र ॲड. उज्वल निकम यांच्याकडे देण्यात यावे अशी मागणी देखील झाली होती. या हल्ल्यामध्ये ज्या मुलींवर बलात्कार झाले त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली होती परंतु यासंदर्भात प्रत्यक्ष काहीही घडलेले नाही. आमच्या स्वयंस्फुर्तीमुळेच या ठिकाणच्या मुलींच्या शिक्षणाला सुरुवात झालेली आहे. त्यामुळे काठोडा प्रकरणी द्रुतगती न्यायालय प्रत्यक्षात सुरु करण्याच्या संदर्भात निर्णय व्हावा. या हल्ल्यातील काही आरोपी जामिनावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

सुटलेले आहेत त्यामुळे या आरोपींना जामीन मिळता कामा नये अशी माझी सूचना आहे. अलिकडे मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला होता त्या संदर्भातही ॲड. उज्वल निकम यांची मागणी झाली होती. आमच्या प्रश्नाचे पुढे काय झाले आहे, आम्हाला या विषयाच्या संदर्भात भिती वाटते यासंदर्भात काठोडा आणि पारवा येथील हल्ल्यातील जखमी लोकांचे आम्हाला सातत्याने फोन येतात. पारवा येथे जो दरोडा पडला त्यातील काही आरोपी जामिनावर देखील सुटलेले आहेत. या विषयाच्या संदर्भातील डीएनए रिपोर्ट आलेला नाही. त्यामुळे परभरणी प्रकरणात सुध्दा द्रुतगती न्यायालयाचा खटला उभारण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा यासाठी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेध्त आहे.

.....4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी मिळणा-या फीचे दर वाढवून देण्याताबाबत.

मु. शी. : :शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी मिळणा-या फीचे दर वाढवून देण्याबाबत श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. विक्रम काळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यातील शासकीय व अशासकीय शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी फीची सवलत मिळत होती. ही योजना प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी आहे. ज्या वेळेस ही योजना आली त्या वेळेस फीचे दर अतिशय कमी होते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्रिकम काळे.....

परंतु आज व्यावसायिक शिक्षण फीचे दर प्रचंड वाढलेले आहेत. शासनाकडून ह्या फीची प्रतिपूर्ती करताना दर वाढलेले नाहीत.

तेव्हा शासनाने त्वरित शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणाऱ्या फीच्या सवलतीसाठी दर वाढवून त्याची प्रतिपूर्ती करण्यासाठी अधिक तरतूद करावी अशी सूचना मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :माननीय राष्ट्रपतींनी जाहीर केलेली पारितोषिके पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेवर न मिळणे

मु.शी. :माननीय राष्ट्रपतींनी जाहीर केलेली पारितोषिके पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना वेळेवर न मिळणे याबाबत श्री.किरण पावसकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.किरण पावसकर, वि.प.स. यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"पोलीस दलातील धाडसी व उल्लेखनीय सेवा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना दरवर्षी स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रपती खास पारितोषिक जाहीर करतात. राज्याचे पोलीस महासंचालक या समारंभासाठी मुख्यमंत्री तसेच राज्यपालांची वेळ व तारीख नक्की करतात व त्यानंतर हा समारंभ होतो. परंतु महासंचालक कार्यालयाच्या उदासीनतेमुळे राष्ट्रपतींनी जाहीर केलेली पदके कधीच वेळेवर प्रदान होत नाहीत. 26 जानेवारी 2008 रोजी राष्ट्रपतींकडून जाहीर झालेले हे पदक नुकतेच ज्यांच्या हौतात्म्याचे पोवाडे देशभरात गायले जात आहेत त्या हेमंत करकरे यांना वर्षभरापूर्वी जाहीर होऊन केवळ पोलीस दलाच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे मिळू शकले नाही. महासंचालक कार्यालयाचा हा चालढकलपणा केवळ हेमंत करकरे यांनाच सहन करावा लागलेला नसून तर महाराष्ट्रासाठी 2007 व 2008 या दोन वर्षात जाहीर झालेली 120 राष्ट्रपती पोलीस पदके अजूनही प्रदान करण्यात आलेली नसणे, पोलीस दलातील कर्मचारी आजही या पदकांच्या प्रतिक्षेत आहेत. पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पारितोषिक जाहीर झाल्यानंतर ती त्यांना सेवानिवृत्तीनंतर किंवा शहीद झाल्यानंतर देण्यात येणार असतील तर त्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा तो अपमान आहे. तेव्हा ज्यावर्षी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पारितोषिक जाहीर होतात त्याच वर्षी ती पारितोषिके देण्यात यावीत" अशी मी या विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय संवेदनशील आहे. पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना जी पारितोषिके जाहीर होतात ती मिळण्यास पोलीस विभागाकडून अक्षम्य दिरंगाई होते ही वस्तुस्थिती आहे. आतापर्यंत किती पारितोषिके घोषित होऊन ती प्रदान करण्यात आलेली नाहीत आणि ती केव्हा प्रदान करण्यात येणार आहेत याबाबतचे सविस्तर निवेदन उद्या सभागृह सुरु असताना करण्यात यावे अशाप्रकारचे मी निर्देश देत आहे.

श्री.नवाब मलिक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे या संदर्भात उद्या सविस्तर निवेदन करण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबईतील रुईया आणि पोद्दार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून पावतीविना देणगी घेत असल्याबाबत.

मु. शी. : मुंबईतील रुईया आणि पोद्दार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून पावतीविना देणगी घेत असल्याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.भगवान साळुंखे, वि.प.स. यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांच्या मुंबईतील रुईया व पोद्दार महाविद्यालयात वारेमाप देणगी पावतीविना गोळी केली जाते. हे प्राप्तीकर विभागाच्या दिनाक 21 जुलै, 2008 च्या छाप्यात लक्षात आले.

संस्थेच्या नियामक मंडळाचे उपाध्यक्ष श्री.अनंत माटे यांनी प्राप्तीकर विभागाला दिलेल्या कबुलीजबाबाबत अशाप्रकारे विनापावत्या देणग्या गोळा केल्याचे मान्य केले.

छापा घातला त्यावेळी श्री.माटे यांच्याकडून रोख 10 लाख रुपये व संस्थेच्या कार्यालयाकडून 12 लाख 12 हजार 730 रुपये जप्त करण्यात आले. याशिवाय वह्यांमध्ये लिहून ठेवलेल्या विद्यार्थ्यांची यादी व त्यापुढे लिहिलेल्या रकमांचा तपशील काही कोटीच्या घरात जातो. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची नितांत गरज,याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष" याबाबत मी विशेष उल्लेखाद्वारे ही सूचना देत आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती :सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी पहिली विशेष उल्लेखाची सूचना मांडली असून बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यातील काठोडा आणि परभणी जिल्हयातील पारवा शिवारात ज्या घटना घडलेल्या आहेत त्या दोन्हीही ठिकाणचे खटले द्रूतगती विशेष न्यायालये स्थापन करुन त्या न्यायालयाकडे वर्ग करणे अत्यंत आवश्यक आहे. या धटनेमुळे संपूर्ण राज्यामध्ये खळबळ माजली होती तेव्हा राज्य शासनाने या बाबतीत त्वरित उचित कार्यवाही करावी अशी मी राज्य शासनाला सूचना करतो.

श्री.नवाब मलिक : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

ॲड.उषा दराडे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांच्या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या संदर्भात आपण शासनाला जी सूचना केली त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देते परंतु त्यांनी आपल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेमध्ये सरकारी वकील नेमण्याची मागणी केली होती . माननीय सभापती महोदयांनी त्याही बाबतीत गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

उपसभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृशी.: कापसावरील लाल्या रोगाच्या प्रादूर्भावामुळे नुकसान झालेल्या शेतक-याना अद्याप अनुदान न मिळणे

मु.शी : कापसावरील लाल्या रोगाच्या प्रादूर्भावामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना अद्याप अनुदान न मिळणे याबाबत ॲड.उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती :सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, 2005-2006 साली केज आणि बीड जिल्हयातील इतर अनेक तालुक्यामध्ये शेतक-यांच्या कापसावर लाल्या रोगाचा प्रादूर्भाव झाला होता संबंधित शेतक-याना अनुदान देण्याचे शासनाने मान्य केले होते. त्याचा प्रस्तावही दोन वर्षापासून प्रलंबित आहे परंतु अजूनही तो प्रस्ताव मान्य का होऊ शकत नाही हे समजत नाही. या वर्षीसुध्दा कापूस पिकविणारा शेंतकरी अडचणीत आलेला आहे. तेव्हा दोन वर्षापूर्वी शेतक-यांना द्यावयाचे अनुदान शासनाने त्वरित द्यावे. अशी मी शासनाला विनती करते. प्रत्येक अधिवेशनामध्ये विडा गावाच्या सरपंचाकडून मला फोन वरुन सांगितले जाते की, काहीही करुन लाल्या रोगाचे अनुदान शासनाकडून मिळवून देण्यात यावे. तेव्हा या संदर्भात शासनाने गांभीर्याने तातडीने दखल घ्यावी . या वर्षी सुध्दा बीड जिल्हयामध्ये एकूण घेतलेल्या कापसाच्या क्षेत्रापैकी एक लाख 71 हजार हेक्टर कापसाच्या पिकावर लाल्या रोगाचा प्रादूर्भाव झाला आहे. मान्सूनमध्ये दोन महिने पाऊसच पडला नाही. पुन्हा पेरणी झाल्यानंतर 1 सप्टेंबर ते 15 सप्टेंबर या काळात सतत पाऊस पडत राहिला त्याचा पिकाच्या वाढीवर परिणाम झाला होता. पिकाच्या वाढीसाठी जी पोषण द्रव्ये आवश्यक होती ती द्रव्ये मिळाली नाहीत. प्रत्येक झाडाला खालच्या बाजूला थोडी बोंडे फुटली होती परतु लाल्याचा प्रादूर्भाव झाल्यानंतर लहान आकाराची बोंडे किंवा नंतर आलेली बोंडे वा मध्यम आकाराची जी बोंडे होती त्या बोंडामध्ये कापूस भरला नाही. कापसाचा उतारा एकरी सात क्विंटल असतो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परतु या वर्षी दोन क्विंटल सुध्दा कापूस होणार नसल्यमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे तेव्हा या शेतक-यांनासुध्दा विना विलंब अनुदान जाहीर करावे अशी मी या विशेष ं उल्लेखाव्दारे विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मु.शी: ग्रंथालय चळवळ वाढविण्यासाठी जाचक अटी रद्द करण्याबाबत श्री.प्रतापराव सोनवणे,वि.प.स. यानी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती :सन्माननीय सदस्य श्री.प्रतापराव सोनवणे यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रतापराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, वाचन संस्कृती ही तळागाळापर्यंत रुजली पाहिजे ही काळाची गरज आहे. त्यासाठी ग्रंथालय चळवळ प्रभावीपणे राबवली जाणे आवश्यक आहे. गाव तेथे ग्रंथालय ही चळवळ अनेक समाज सेवी संस्थांच्या माध्यमातून राबवली जात आहे. शासन स्तरावरुन ग्रथालयांना मान्यता व वर्गवारी देतांना ग्रंथसंख्या, सोयी सुविधा, सेवकवृदांची संख्या वगैरे मुद्यांवरुन दिली जाते. सदरची मान्यता प्रक्रिया ही सोपी व सुटसुटीत असावी . चांगले काम करणा-या व अ वर्ग प्राप्त करु इच्छिणा-या ग्रंथालयाना ज्या अकरा अटी शासनाने घातल्या आहेत त्यामध्ये वाचनालयास स्वत:च्या मालकीची इमारत असली पाहिजे, ही जाचक अट घातलेली आहे. या अटीची पूर्तता करणे अनेक वाचनालयाच्या दृष्टीने अशक्यप्राय बाब आहे. खरेतर महानगरपालिका नगरपालिका, ग्रामपंचायती यांच्या मालकीच्या जागा तसेच ओपन स्पेसमधील बांधकामे या हेतूसाठी नाममात्र भाडयाने उपलब्ध होऊ शकतात. तेव्हा वाचनालयांना अ वर्ग प्राप्त करतांना स्वत:च्या मालकीची इमारत असावी ही जाचक अट शिथिल करावी ही गरजेची बाब आहे.

सभापती महोदय, अनेक सेवाभावी संस्थांना ग्रंथालय चळवळीचे काम उत्तम प्रकारे करावयाचे आहे परंतु सध्याच्या अनुदान मर्यादेमुळे त्यांना अडचणींना सामोरे जावे लागते तेव्हा व्यावहारिक टप्पा सध्या ड वर्गाला 62,500 रुपये, क वर्गाला 1 लाख 25 हजार रुपये, ब वर्गाला 2 लाख 50 हजार रुपये आणि अ वर्ग वाचनालयास 5 लाख रुपये याप्रमाणे शासनाने अनुदान मंजूर करावे ही सुध्दा तातडीची गरज आहे.

सभापती महोदय, ग्रंथालय चळवळीमध्ये ग्रंथपालाचे योगदान अतिशय महत्वाचे आहे या ग्रंथालय सेवकांना शासकीय वेतनश्रेणीनुसार वेतन मंजूर करावे तसेच त्यांना सेवा शाश्वती द्यावी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ग्रथपालांना इतर शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सवलती मिळाव्यात व 25 वर्षाच्या वर ग्रथपालांचे कर्तव्य पार पाडणा-या व्यक्तीं ना निवृत्ती वेतन द्यावे या सदर्भात व्यंकाप्पा पत्की समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकाराव्यात व लागू कराव्यात.

सभापती महोदय, ग्रंथालय चळवळीस खरोखर गती द्यावयाची असेल, खरोखर न्याय द्यावयाचा असेल अशी शासनाची इच्छा असेल तर शासनाने वर उल्लेखिलेल्या सर्व मागण्या तातडीने मान्य कराव्यात अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे विनंती करतो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : नवी मुंबईतील पोलीस वसाहतीतील मोडकळीस आलेल्या चाळ टाईप घरांना अडीच चटईक्षेत्र वाढवून देऊन त्यांचा नव्याने विकास करणे.

मु. शी. : नवी मुंबईतील पोलीस वसाहतीतील मोडकळीस आलेल्या चाळ टाईप घरांना अडीच चटईक्षेत्र वाढवून देऊन त्यांचा नव्याने विकास करणे याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ मांडते. ..

नवी मुंबई येथील पोलीस कर्मचाऱ्यांची जी वसाहत आहे त्यामध्ये हे पोलीस कर्मचारी गेली 30-35 वर्षे राहत आहेत आणि त्या वसाहतीतील जी घरे आहेत ती सारी चाळटाईप आहेत व ती आज मोडकळीस आलेली आहेत. मी यापूर्वीही अनेकदा या सदनामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून हा विषय सातत्याने मांडलेला आहे आणि या वसाहतीतील मोडकळीस आलेली चाळटाईप घरे पाडून नवीन इमारती बांधून देण्यासाठी त्यांना तेथे अडीच चटईक्षेत्र दिले जावे अशी मागणी केली आहे. इतकेच नव्हे तर अंदाज समितीच्या माध्यमातून देखील आम्ही हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला असून अंदाज समितीची एक बैठक या प्रश्नाबाबत माहिती घेण्याच्या दृष्टीने आमच्या जिल्ह्यात घेतली असता त्यावेळी समितीचे प्रमुख असलेले आणि आता माननीय मंत्री असलेले श्री.वरपुडकर यांच्या नेतृत्त्वाखाली नवी मुंबईतील पोलीस वसाहतीला भेट दिली आणि तेथील सिडको अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली असता सिडको अधिकाऱ्यांचे म्हणणे असे होते की, या वसाहतींच्या इमारती नव्याने बांधण्यासाठी तेथे अडीच चटईक्षेत्र दिले तर आम्ळी पोलिसांना नवीन इमारती तेथे बांधून देऊ. तरी माझी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती आहे की, गेली 30-35 वर्षे या मोडकळीस आलेल्या घरांमध्ये हे कर्मचारी राहत आहेत आणि राज्यातील जनतेची सेवा करीत आहेत. तरी आता माननीय मंत्री महोदयांनी पुढाकार धेऊन मानीय मुख्यमंत्र्यांसमवेत या प्रश्नावर एक बैठक घेऊन तेथे नवीन इमारती बांधण्यासाठी पोलीस वसाहतीसाठी अडीच चटई क्षेत्र वाढवून घ्यावे. आपण असे केल्याने संपूर्ण महाराष्ट्रातील पोलीस वसाहतींना यातून दिलासा मिळेल तरी याबाबत आपण पुढाकार घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारा विनंत करते. .... FF 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईत अतिरेक्यांनी हल्ला केला असतानाच्या काळात मुंबईच्या नगरपाल श्रीमती इंदू साहनी यांनी केलेला परदेश दौरा.

मु. शी. : मुंबईत अतिरेक्यांनी हल्ला केला असतानाच्या काळात मुंबईच्या नगरपाल श्रीमती इंदू साहनी यांनी केलेला परदेश दौरा. याबाबत श्री.विनोद तावडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. विनोद तावडे यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, मी आपले आभार मानतो की, या पद्धतीने आपण मला विशेष उल्लेखाद्वारा हा विषय येथे मांडण्याची परवानगी दिली. सभापती महोदय, मुंबईला इंग्रजांच्या काळापासून 'नगरपाल' हे पद आहे आता या पदाची खरोखरी गरज आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. परंतु हे पद मुंबईमध्ये आजही अस्तित्वात आहे. या पदाची काय गरज आहे याच्या खोलामध्ये मी जात नाही वा त्याबाबत मी चर्चाही येथे करू इच्छित नाही. परंतु जी काही घटना घडली आहे त्याकडे म सरकारचे या निमित्ताने लक्ष वेधू इच्छितो. त्यातूनही हा प्रश्न पुन्हा निर्माण होऊ शकेल की, खरोखरी आज या पदाची गरज आहे काय ?

सभापती महोदय, मुंबईचा नगरपाल हा मुंबईच्या नागरिकांची काळजी घेणारा प्रमुख नागरिक आहे. पण ज्यावेळेस या मुंबईमध्ये अतिरेक्यांचा हल्ला झाला आणि त्यावर प्रतिहल्ला करण्यासाठी कमांडो ऑपरेशन राबविण्यात आले. हे ऑपरेशन संपायच्या आत म्हणजे 26 तारखेला अतिरेकी हल्ला झाला आणि त्यावरील कमांडो ऑपरेशन 28 तारखेला संपले. पण ते संपायच्या आतच 28 तारखेच्या रात्रीच मुंबईच्या नगरपाल श्रीमती इंदू साहनी यांनी आपल्या सोबत श्रीमती उषा मुकुंदलन, झुनझुनवाला कॉलेज, श्रीमती मिनू नदलानी, रहेजा कॉलेज, डॉ. संजय देशमुख, हेड ऑफ द डिपार्टमेंट,लाईफ सायन्स, डॉ. नरेशचंद्र, बिर्ला कॉलेज, श्री.दिनेश पंजवाणी इत्यादींचे शिष्टमंडळ घेऊन ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडच्या शैक्षणिक दौऱ्यावर निघून गेला. अर्थात हा दौरा अगोदरच ठरला होता हे मान्य आहे. पण मुंबईत अतिरेकी हल्ला झाला असताना येथे आमचे काम

..... एफएफ 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. तावडे ....

काय आहे, आम्ही परदेश दौऱ्यावर गेल्याने त्यात काय फरक पडणार आहे अशा भूमिकेतून त्यांनी हा परदेश दौरा केला. खरे तर मुंबईच्या नगरपाल पदी असणाऱ्या माणसाने अशा काळात मुंबईत असणे आवश्यक होते. मुंबईचा तो प्रथम नागरिक असतो. या हल्ल्याच्या काळात आणि त्यानंतरही मुंबईतील प्रत्येक नागरिकाला या घटनेचे महत्त्व कळले होते. किंबहुना कमांडो ऑपरेशन संपल्यानंतर मुंबईतील जवळपास प्रत्येक नागरिकाने, अगदी विद्यार्थ्यांपासून साऱ्यांनी मेणबत्त्या हाती घेऊन या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांना श्रद्धांजली दिली. म्हणजे विद्यार्थ्यांना देखील या घटनेचे गांभीर्य समजले होते. परंतु नगरपाल असलेल्या श्रीमती इंदू साहनी यांना मात्र आपला विदेश दौरा महत्त्वाचा वाटला. मुळात हा दौरा आयोजित कोणी केला ? त्यासाठी खर्च कोणी केला ? हे प्रश्न उपस्थित होतातच पण नगरपाल असणाऱ्या व्यक्तीने मुंबईत अशा फार मोठ्या घटना घडत असताना आपली जबाबदारी टाळून अशा प्रकारे दौऱ्यावर जाणे कदापि योग्य नाही. तेव्हा शासन याबाबत काय कारवाई करणार आहे वा त्यांना कानपिचक्या देणार आहे काय ? खरे तर या पदाची मुंबईत तरी गरज नाही, ते पद रद्द केले पाहिजे असे माझे स्वतःचे मत आहे. नगरपाल असणाऱ्या श्रीमती इंदू साहनी यांनी मुंबईतील नागरिकांचा अवमान केलला आहे, येथील शहिदांचा अपमान केला आहे. या त्यांच्या शिष्टमंडळामध्ये कुलगुरू आणि सचिव देखील जाणार होते पण त्यांनी ही घटना घडल्यानंतर या दौऱ्यावर जायचे नाही असे ठरविले व ते गेले नाहीत. तसेच इतरांनीही या दौऱ्यावर जाऊ नका, हा दौरा रद्द करा अशा सूचना अनेकांनी श्रीमती इंदू साहनी यांना केल्या होत्या. ..

(यानंतर श्री. सरफरे ..... जीजी 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. विनोद तावडे...

आणि माझ्या या दौऱ्यामधून या राज्याचे, मुंबईचे कसे हित होणार आहे, अशाप्रकारचे थोतांड सांगून मुंबईतील जनतेची व शासनाची दिशाभूल करीत आहेत असे माझे म्हणणे आहे. याबाबत चौकशी झाली पाहिजे आणि त्यांच्याकडून शासनाने स्पष्टीकरण मागितले पाहिजे. "नगरपाल" हे पद शासनाने रद्द केले पाहिजे, किंवा त्यांना त्या पदावरुन दूर केले पाहिजे. कारण त्यांनी दहशतवादी हल्ल्यामध्ये मरण पावलेल्या शहिदांचा, कमांडोंचा, व नागरिकांचा अपमान केला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विधीमंडळ सदस्यांना क्लबचे सभासदत्व मिळणे

मु. शी. : विधीमंडळ सदस्यांना क्लबचे सभासदत्व मिळणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, या विषयावर मागील दोन अधिवेशनामध्ये मी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. मुंबईमध्ये ज्या आमदारांचे कायम स्वरुपी वास्तव्य आहे, किंवा मुंबईच्या आजूबाजूला ठाणे किंवा अन्य भागातून आमदार मुंबईमध्ये येतात. त्यांच्याकरिता मुंबईमध्ये एम.आय.जी., वेलिंग्टन, एम.एस.सी.आर. आणि सचिवालय जिमखाना या क्लबमध्ये कायम स्वरुपी सभासदत्व मिळाले पाहिजे.हे क्लब शासकीय जागेवर उभारण्यात आले असल्यामुळे ते शासनाच्या अखत्यारित आहेत, त्यावर शासनाचे नियंत्रण आहे. त्या क्लबमध्ये आमदारांना सभासदत्व मिळावे अशी मी दोन वेळा सभागृहात मागणी केली होती. त्यावेळी ज्यांचे रोस्टरवर नाव होते ते मुंबईचे माननीय पालक मंत्री सभागृहात उपस्थित होते. त्यावेळी आपण त्यांना निर्देशित केले होते की, यासंबंधी आपण त्वरित 15 दिवसामध्ये बैठक घेऊन निर्णय ध्यावा. त्यानंतर आपण याबाबत वेळोवेळी आठवण करुन दिली, स्मरण करुन दिले. परंतु आजतागायत या विषयावर शासनाकडून कोणतीही कारवाई झाली नाही. याबाबतीत त्वरित निर्णय होणे आवश्यक आहे म्हणून मी ही विशेष उल्लेखाची सूचन मांडीत आहे. आतापर्यंत माझ्याकडून मांडण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांबाबत मला पोच मिळालेली नाही. तेव्हा याबाबत आपण पुन्हा एकदा निदेश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

आणि आपण मला विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो."

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेच्या निमित्ताने मला एक मुद्दा याठिक्राणी उपस्थित करावयाचा आहे. एम.आय.जी. क्लबमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

डॉ. दीपक सावंत....

म्हाडाच्या व्हाईस चेअरमनना नॉमिनेटेड सभासदत्व देण्यात आले आहे. त्यामुळे त्याठिक्राणी त्यांना नॉमिनेटेड मेंबर म्हणून ट्रीट केले जाते अशी माझी माहिती आहे. मुंबई शहरामध्ये ज्या ज्याठिक्राणी म्हाडाच्या जागा क्लबना देण्यात आल्या आहेत त्या क्लबचे सभासदत्व म्हाडाचे अधिकारी घेतात. तेव्हा अशाप्रकारे महाराष्ट्रात ज्या ज्याठिक्राणी शासकीय जागेवर क्लब आहेत त्याठिक्राणी आमदारांना सभासदत्व देण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

उपसभापती : माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे एक चांगली सूचना केली आहे. विधीमंडळ सदस्यांना त्या क्लबमध्ये सभासदत्व मिळावे अशी त्यांनी विनंती केली आहे. हे सभासदत्व मिळवीत असतांना त्या क्लबची असलेली ठराविक फी आपणास भरावी लागेल याची आपणास जाणीव असावी. यानिमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विनंती करतो की, जे विधीमंडळ सदस्य क्लबचे सभासद होऊ इच्छित असतील आणि त्या क्लबच्या नियमांची पूर्तता ते करु शकतील त्यांना निश्चितपणे क्लबचे सभासदत्व देण्याबाबत आपण संबंधितांना सूचना द्याव्यात. माननीय सदस्यांनी केलेली ही सूचना मान्य करण्यास हरकत नसावी.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, मुंबईमध्ये शासकीय जागेवर जे विविध क्लब उभारण्यात आले आहेत त्याठिकाणी रिक्रिएशनल फॅसिलिटी सुरु आहेत. शासनाने त्या जागा काही अटी व शर्तीवर क्लबना दिल्या आहेत. मुंबईमध्ये जे आमदार वास्तव्य करतात, तसेच आपल्या कामासाठी जे आमदार मुंबईमध्ये येतात. अशा आमदारांना त्या क्लबमध्ये सभासदत्व मिळण्याबाबत संबंधितांची मुंबईमध्ये एक बैठक घेण्यात येईल. आणि त्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात येईल. आमदारांना मुंबईतील सर्व क्लबचे सभासदत्व मिळणार नाही, परंतु किमान एका क्लबचे सभासदत्व मिळण्याबाबत त्यांना निदेश देण्यात येतील. आमदारांनी क्लबची फी भरल्यानंतर त्यांना क्लबचे सभासदत्व देण्यात येईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुंबईमध्ये असलेल्या वेगवेगळया क्लबची परिस्थिती काय आहे? याची माहिती मी आपणास देऊ इच्छितो. मुंबईमध्ये ब्रीच कँडी नावाचा क्लब आहे. हा क्लब ब्रीच कँडी हॉस्पिटलच्या बाजूला आहे. त्यावेळी त्या जागेवर ब्रिटीशांचे साम्राज्य होते. अजूनही त्याठिक्राणी "इंडियन्स अँड डॉग्ज नॉट अलाऊड" असे म्हणून प्रवेश नाकारला जात आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. जितेंद्र आव्हाड....

आज त्याठिक्राणी कोणत्याही भारतीय माणसाला प्रवेश दिला जात नाही. तुमच्याकडे जर फॉरेनचा पासपोर्ट असेल तर तुम्हाला त्वरीत टेंपररी मेंबरशीप मिळते, किंवा सहजरित्या प्रवेश मिळतो. मी त्या क्लबमध्ये अनेक वेळा जाऊन मला सभासदत्व मिळण्याबाबत अर्ज लिहून दिला होता.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

पण त्यांनी कधी कंसिडर केले नाही. एवढेच नव्हे तर मुंबईतील अनेक प्रतिष्ठित व्यक्तींना त्या ठिकाणी अपमानित होऊन बाहेर यावे लागले. ही वस्तुस्थिती मी आपल्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. ही संपूर्ण जमीन रेव्हेन्यू खात्याची आहे. कोर्टाने आदेश दिलेले आहेत असे ते खोटे सांगतात. त्यांच्या 9 सदस्यांपैकी 7 सदस्य फॉरेनर्स आहेत. एकंदर त्या क्लबचा कारभार पाहिला तर जणू काही शासनाच्या बाहेरच्याच जमिनीवर आणि महाराष्ट्राच्या, देशाच्या किंवा आपल्या राष्ट्राच्या बाहेरचा कारभार असल्यासारखे त्यांचे धोरण असते. त्यांनी आम्हाला सदस्यत्व दिले नाही तरी चालेल पण त्या ठिकाणी होणारा भारतीयांचा अपमान थांबवावा.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले की, ती शासनाची जागा आहे. त्यासंदर्भात सर्व फाईल्स मागवून तपास करण्यात येईल आणि भारतीयांना प्रवेशापासून वंचित ठेवण्याची भूमिका कोणत्या यंत्रणेची किंवा संस्थेची असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई होईल. तेव्हा संदर्भाधीन माहिती मागवून जर शासनाची जागा असेल तर त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना काही अधिकार देता येत असतील तर ती बाब तपासून घेण्यात येईल.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, वेगवेगळ्या क्लबची फी प्रचंड आहे. याबाबतीत धोरण ठरवून फी आकारणी करावी.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, 5 लाख रुपये, 10 लाख रुपये देऊन सदस्यत्व देतात असे नाही. परंतु जी व्यावहारिक फी असेल त्यासंदर्भात बैठक घेऊन ठरवू आणि जे जवळपासचे आहेत त्यांना सदस्यत्व देण्याच्या बाबतीत प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मराठवाड्यात सहकार न्यायालयाच्या विभागणीचा निर्माण झालेला वाद

मु. शी. : मराठवाड्यात सहकार न्यायालयाच्या विभागणीचा निर्माण झालेला वाद याबाबत श्री. दिवाकर रावते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. दिवाकर रावते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"मराठवाड्यामध्ये दोन विभागीय कार्यालये असावीत ही वर्षानुवर्षाची माणगी लक्षात घेऊन आपल्या राजकीय प्रभावाचा लाभ घेऊन अनेक मूळ विभागीय कार्यालयाची उपविभागीय कार्यालये ही एकतर नांदेड किंवा लातूर येथे हलविण्याचा सपाटा सुरु आहे. आयुक्तालयाला आवश्यक असणारी काही कार्यालये नांदेडमध्ये आहेत व काही कार्यालये लातूरमध्ये आहेत. त्यामुळे नागरिकांना त्यांच्या कामासाठी त्या त्या गावी जावे लागते. जी कार्यालये लातूरमध्ये आहेत त्यांच्या कक्षेत लातूर परभणी आणि हिंगोली हे जिल्हे येतात तर नांदेडमधील एकच जिल्हा येतो आणि नांदेडला असलेली लार्यालये लातूरवासियांस दूरची पडतात अशा सबबीखाली आता सहकार न्यायालयाच्या विभागणीचा नवीन वाद निर्माण करण्यात आलेला आहे. जोपर्यंत दुसऱ्या विभागणी कार्यालयाचा निर्णय होत नाही तोपर्यंत अशा प्रकारच्या विभागणीस जनतेचा विरोध असताना शासनाकडून असा निर्णय होत असल्यास त्यास त्वरित स्थगिती द्यावी याकरिता हा विशेष उल्लेख मांडत आहे व तसे निवेदन शासनाने तात्काळ करावे."

सभापती महोदय, मराठवाड्यामध्ये दुसरे विभागीय कार्यालय असावे अशी मागणी गेली अनेक वर्षे होत आहे. त्यासंदर्भातील मुद्दा या विशेष उल्लेखाव्दारे मी या ठिकाणी मांडत आहे. या प्रकारची विभागीय कार्यालये आपल्या विभागामध्ये यावीत यासाठी नांदेड, परभणी आणि लातूर यांच्यामध्ये शर्यत आहे. यामध्ये लातूरला जास्तीतजास्त उपविभागीय कार्यालये आणण्याचा सपाटा तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी लावला. त्याचबरोबर नांदेडमध्ये अशा प्रकारची कार्यालये आणावीत यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

संबंधित लोकांनी आपल्या राजकीय पदाचा उपयोग करुन सपाटा लावलेला आहे. आता एक नवीन वाद निर्माण झालेला आहे. नांदेडमध्ये असणारे जे सहकार विभागाचे कार्यालय आहे त्याचे तातडीने विभाजन करुन त्याचे उपविभागीय कार्यालय लातूरमध्ये स्थापन करण्याची मंजुरी माननीय मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी आताच देऊन टाकली आहे आणि आपल्याला परत मंत्रिमंडळामध्ये ठेवल्याबद्दलची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संपूर्ण नांदेडमध्ये असंतोष आहे. माननीय मंत्रिमहोदय सभागृहामध्ये आल्यानंतर ते नुकतेच मंत्री झाले आहेत असे आपण म्हणतो परंतु या माननीय मंत्र्यांना या खात्याचे संपूर्ण ज्ञान झाल्यामुळे त्यांनी याबाबतचा जी.आर. सुध्दा काढून टाकला. यासंदर्भामध्ये नांदेडमध्ये प्रचंड असंतोष आहे. इकडच्या लोकांनी तिकडे लांब जावयाचे आणि तिकडच्या लोकांनी इकडे लांब यावयाचे असा वाद निर्माण करुन विभाजन होणार असेल तर ते प्रशासकीय कामाच्या दृष्टीने योग्य नाही आणि अशा प्रकारचा निर्णय झाला तर सर्व जिल्ह्यामध्ये उग्रता निर्माण होईल. म्हणून या माध्यमातून मी आपल्याला विनंती करतो की, सहकार न्यायालयाची नवीन विभागणी करण्याचे जे प्रशासकीय आदेश काढण्यात आलेले आहेत त्याला स्थगिती द्यावी आणि त्या भागातील असंतोष ताबडतोब थांबवावा. यासंदर्भात जो निर्णय घ्यावयाचा असेल तो भविष्यामध्ये दुसऱ्या विभागीय कार्यालयाचा जो निर्णय होईल त्यावेळी घेण्यात यावा अशा पध्दतीने मी मराठवाड्यातील या असंतोषाला या विशेष उल्लेखाव्दारे वाचा फोडत आहे.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, नांदेडमधील लोकांच्या मनामध्ये असंतोष आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, नांदेडमधील जनतेच्या मनामध्ये असंतोष राहणार नाही या पध्दतीने कार्यवाही करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजाबाबत

उपसभापती : यानंतर नियम 260 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. परंतु त्यापूर्वी शासकीय विधेयके घेण्याच्या संदर्भात मला सभागृहाला विनंती करावयाची आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे अधिवेशन लांबले असल्यामुळे शासकीय विधेयकांसाठी भरपूर वेळ उपलब्ध आहे. शासनाच्या एखाद्या निर्णयाच्या विरोधात लोकशाही मार्गाने विरोध करणा-यांवर अन्याय करणारे हे विधेयक आहे. या विधेयकाबाबत अनेक माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे या विधेयकाबाबत घाई करण्यात येऊ नये.

उपसभापती : आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावयाची का याबाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

श्री.दिवाकर रावते : मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक स्थगित करावी अशी जवळपास सर्व सन्माननीय सदस्यांची इच्छा आहे.

उपसभापती : ठीक आहे. आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन्हा भरेल.

(दुपारी 1.51 ते 2.30 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्यंतरानंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर झालेला परिणाम

मु.शी.: जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर झालेला परिणाम या विषयावर सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, संजय दत्त, एस.क्यू. जमा, जैनुद्दीन जव्हेरी, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रतापसिंह मोहिते-पाटील, चंद्रकांत रघुवंशी, मुझफ्फर हुसेन, यशवंतराव गडाख, रमेश शेंडगे, श्रीमती मधु जैन, प्रा. फौजीया खान, श्रीमती अलका देसाई, वि.प.स. याचा नियम 260 अन्वये प्रस्ताव

श्री. जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

"जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा परिणाम राज्यातील कामगार व उद्योग धंद्यावर होत असून, राज्यातील प्रामुख्याने असलेले वाहन उद्योग, बांधकाम व्यवसाय, कॉल सेंटर, (बी.पी.ओ.) माहिती तंत्रज्ञान (आय.टी.), सिमेंट उद्योग, मच्छिमार व्यवसाय, दुग्धव्यवसाय व किरकोळ व्यापार अशा विविध क्षेत्रातील लक्षावधी कामगार बेरोजगार होण्याची निर्माण झालेली भीती, त्याचबरोबर राज्यातील स्वयंरोजगार, लहानमोठे व्यवसाय बंद होण्याच्या मार्गावर असून, त्यामुळे भविष्यात कामगार वर्गाला सोसावे लागणारे नुकसान, परिणामी लाखो कामगारांत व लहान मोठ्या व्यावसायिकांत पसरलेले तीव्र चिंतेचे वातावरण, आर्थिक परिस्थितीमुळे सामाजिक समतोल बिघडण्याचा निर्माण झालेला धोका, राज्यामध्ये अशांतता व अराजकतेची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन शासनाने आवश्यक तो निर्णय तात्काळ घेण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे उद्योगधंद्यामध्ये आणि व्यापारामध्ये अग्रगण्य राज्य मानले गेले आहे. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रामध्ये परकीय गुंतवणूक येऊन अनेक कारखान्यांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयप्रकाश छाजेड...

निर्मिती झाली. मुक्त अर्थव्यवस्थेचे चांगले आणि वाईट परिणाम देशामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये दिसायला लागलेले आहेत. आज जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट आलेले आहे आणि त्याचा परिणाम देशावर आणि विशेषत: आपल्या राज्यावर होत आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी गणली गेली आहे. या देशातील अनेक उद्योग ज्यामध्ये पायाभूत व्यवस्था आहे त्या उद्योगाकडे प्रामुख्याने लक्ष देण्याची वेळ आपल्यावर येणार आहे. म्हणून यानुषंगाने काही मुद्दे मी शासनासमोर मांडत आहे. या राज्यातील आणि देशातील महत्वाचा उद्योग कोणता असेल तर तो ऑटोमोबाईल्स इंडस्ट्रिज हा आहे. टेल्को, महिन्द्रा, बजाज टू व्हिलर्स, फोर्ज पूर्वीची बजाज टेम्पो, अशोक लेलॅण्ड या सगळया उद्योगांमध्ये आज काय परिस्थिती आहे हे पाहाण्याची वेळ आलेली आहे.

...नंतर श्री.गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड...

आणि हीच योग्य वेळ आहे. यावर आपण तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर फार गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. विदर्भातील भंडारा जिल्हयात अशोक ले-लँड कंपनी आहे. ही ॲटोमोबाईल कंपनी आहे. या कंपनीमध्ये 599 कामगार आहेत. पूर्वी 24 दिवसांचा ले-ऑफ दिला आहे आणि कालपासून पुन्हा आठ दिवसांचा ले-ऑफ दिलेला आहे. टाटा कंपनीमध्ये गेल्या सहा दिवसापासून काम बंद झालेले आहे. पुणे शहरातील एका टेल्को कंपनीवर सुमारे तीन ते चार हजार लहान मोठे उद्योग अवलंबून आहेत. या लहान, मोठया उद्योगात सुमारे 1 लाख कामगार कार्यरत आहेत. बजाज टेम्पो ज्याला फोर्ज म्हणून ओळखले जाते, ती कंपनी डिसेंबर पासून आठवडयातून चार दिवस बंद करण्यात आली आहे. गाडी बनविणारी कंपनी असेल, तर शेकडो उद्योग त्यावर अवलंबून आहेत. टेल्को कंपनीवर पुणे-चिंचवड विभागात देखील शेकडो लहान उद्योग अवलंबून आहेत. औरंगाबाद येथे बजाज ॲटो कंपनी आहे. ती दहा दिवस बंद ठेवण्याचे जाहीर केले आहे. अटोमोबाईल इंडस्ट्रीज ही इतर इंडस्ट्रीजमध्ये महत्वाची गणली जाते. नाशिक येथे मायको बॉस कंपनी आहे. त्या कंपनीतील 70 टक्के कामगारांना काम उपलब्ध नाही, अशा प्रकारची परिस्थिती आहे. त्या कंपनीतील 1500 कंत्राटी कामगारांना बाहेर जाण्याची वेळ आलेली आहे. महेंद्र ॲन्ड महेंद्र कंपनीत काम उपलब्ध असेल तरच त्याला काम मिळते. कंपनीत जेवढे काम असेल तेवढेच काम कामगारांना मिळते, अशी अवस्था या कंपनीची झालेली आहे. ॲटोमोबाईल इंडस्ट्रीज्चा ग्राफ आपण बघितला तर राज्यात यापासून मिळणारे उत्पन्न, ॲटोमोबाईल इंडस्ट्रीजच्या अनुषंगाने त्या ठिकाणी कार्यरत असलेला कर्मचारी वर्ग, तसेच या इंडस्ट्रीपासून उभारल्या गेलेल्या ॲन्सीलरी लहान,मोठया युनीटस् ज्या आहेत, त्या युनीटस् बंद पडण्याची तसेच त्या मधील कर्मचारी बेघर होण्याची शक्यता मोठया प्रमाणात निर्माण झाली आहे. आजही मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद येथील एम.आय.डी.सी.एरियामध्ये विशेषत: जेथे ॲटोमोबाईल कंपन्या काम करीत आहेत, त्या कंपन्यांमधील कामगारवर्ग कंपनीतून बाहेर आला आहे, तो बेघर झाला आहे. ज्या कामगाराला चार महिन्यापूर्वी 250 रुपये रोज मिळत होता, त्यास आता बाहेर 75 ते 100 रुपयांवर काम करावे लागते आहे या गंभीर गोष्टीकडे मी शासनाचे लक्ष वेधतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड...

सभापती महोदय, या देशात व या राज्यात दुसरा महत्वाचा उद्योग बांधकाम व्यवसाय आहे. बांधकाम व्यवसायामध्ये देखील मंदीचे सावट आलेले आहे. मंदीचा फटका प्रथम ॲटोमोबाईल इंडस्ट्रीजला बसला आहे. त्यानंतर दुसरा फटका बांधकाम व्यवसायास बसला आहे ही गोष्ट आपल्याला विसरुन चालणार नाही. मी उदाहरणादाखल सांगू इच्छितो की, मुंबई शहरात 7 हजार बांधकाम प्रोजेक्ट सुरु झाले होते. ते सर्व प्रोजेक्ट आजच्या क्षणाला बंद पडलेले आहेत. या व्यवसायातील 1 लाख असंघटीत कामगार कामापासून वंचीत झाला आहे. कामगारांना आज कामे नाहीत. ज्यांच्याकडे कामे आहेत, ती मंडळी कामगारांचे शोषण करीत आहे. बांधकाम व्यवसायात कडीयाला 200 रुपये रोज मिळत होता, त्यास आता 50 रुपये रोजावर काम करावे लागत आहे अशी परिस्थिती या बांधकाम व्यवसायामध्ये निर्माण झाली आहे. बांधकाम व्यवसायात मंदी आल्याने कामगारांच्याच प्रश्न निर्माण झाला अशी परिस्थिती नाही. बांधकाम व्यवसायाशी संबंधीत स्टील, सिमेंट, हार्डवेअर, छोटे व्यापारी, सॉ-मील, यांचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. बांधकाम व्यवसायातील हजारो बांधकाम प्रकल्प पडले आहेत. उदाहरण म्हणून मी मुंबई शहरातील 7 हजार बांधकाम प्रोजेक्ट बंद पडल्याचे उदाहरण या ठिकाणी दिले आहे. आज राज्यातील हजारो बांधकाम प्रकल्पांची कामे बंद पडलेली आहेत. बांधकाम क्षेत्राशी निगडीत अभियंते तयार झालेले आहेत, जे अभियंते बांधकाम प्रोजेक्टमध्ये काम करीत होते, ते देखील आज बेकारीच्या खाईत जाऊन पडले आहेत. या पलिकडे जाऊन सांगू इच्छितो की, जे सदनिका मिळवून देणारे एजन्ट आहेत, त्यांच्यावर देखील सदर मंदीचा मोठा परिणाम होत चालला आहे.

सभापती महोदय, तिसरा उद्योग जो आहे, त्या उद्योगाचा महाराष्ट्राला स्वाभिमान वाटतो. बी.पी.ओ.सेंटर्स आणि कॉल सेंटर्स हा उद्योग या देशात या राज्यात मोठया प्रमाणात चालतो आहे. बी.पी.ओ.आणि कॉल सेंटर्ससाठी उत्तम कर्मचारी कमी पैशात मिळतो म्हणून जगातील मोठया कंपन्यांनी सदर सेंटर्स मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणी उघडले आहेत. त्या उद्योगाची आज काय परिस्थिती आहे ? या मंदीमुळे देखील कॉल सेंटर, बी.पी.ओ.सेंटर्समधील कर्मचा-यांवर देखील बेकारीची कु-हाड आलेली आहे. तेथील कर्मचा-यांना नोकरी पासून मुकावे लागते आहे. आपल्याकडे आय.टी.सारखे मोठे औद्योगिक क्षेत्र उभारली गेली आहेत. हिंजवडी येथे मोठे औद्योगिक क्षेत्र उभारले गेले. या सगळया क्षेत्रात काम करणा-या कर्मचा-यांची देखील अवस्था

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाईट झालेली आहे. अमेरिकेचे वेटींग प्रेसीडेन्ट आहेत, त्यांनी त्यांच्या भाषणात असे सांगितले की, आऊट सोर्सींग बंद करण्याचा आमचा विचार आहे. आऊट सोर्सींग जर बंद झाले तर हा नवीन असणारा उद्योग आहे, त्या उद्योगामध्ये काम करणा-या कर्मचा-यांना घरी बसावे लागणार आहे. या उद्योगात काम करणा-या कंपन्यांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण नाही. त्या कर्मचा-यांसाठी कोणत्याही प्रकारचा कायदा लागू नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड.....

हा देखील तरुणवर्ग बेकार होण्याची, समाजातील तरुण पिढी बेकार होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यादृष्टीने अतिशय गांभीर्याने बघावे लागणार आहे. अन्यथा एक नवीन तरुणवर्ग मोठया प्रमाणात या राज्यात बेकारीच्या खाईत ओढला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सभापती महोदय, जगाच्या पार्श्वभूमीवर मुंबई आणि महाराष्ट्रामध्ये हिरे आणि ज्वेलरीचा व्यापार मोठया प्रमाणात चालतो. आज डायमण्ड मार्केट जवळपास 50 टक्के घसरला आहे. एकट्या मुंबईमध्ये 50 हजारपेक्षा जास्त कामगार हिरे उद्योगामध्ये कामाला लागलेले आहेत, ते बेकार होण्याच्या मार्गावर आहेत.

सभापती महोदय, जगाच्या दृष्टीने हॉलिवूडनंतर बॉलिवूडचा नंबर लागतो. बॉलिवूडमध्ये आज मंदीची परिस्थिती निर्माण झाली आहे. गेल्या पाच-सहा महिन्यात बॉलिवूडमधील सामान्य कामगारांचा संप मिटविण्यास कोणी पुढे आले नाही. नंतर त्यांना तडजोड करावी लागली. बॉलिवूड देखील या आर्थिक मंदीच्या तडाख्यामध्ये सापडला आहे. मोठमोठया सिनेनट्यांना आपले रेट कमी करावे लागले आहेत. त्यांचे रेट आणि खालच्या पातळीवर काम करणाऱ्या कामगारांचे रेट यामध्ये जमीन अस्मानाचे अंतर आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा उद्योग म्हणजे रिटेल व्यवसाय हा आहे. या देशामध्ये रिलायन्सने भाजी विकण्याची दुकाने थाटली. गोदरेज कंपनीने भाजी विक्रीची दुकाने उघडली. स्पेन्सर्स, बिग बझार, मॉल्स वगैरे मोठमोठी चेन असणारी रिटेल शॉप्स सुरु झाली. बारा बलुतेदार, सर्वसामान्य विक्री करणारी गरीब माणसे रोजंदारीपासून वंचित झाली. या मंदीचा परिणाम आणि नफ्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे रिलायन्स कंपनीने ग्रामीण भागातील आणि काही शहरी भागातील दुकाने बंद करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या या कृतीने अनेक लोकांना बेकार करण्यास सुरुवात झाली आहे. म्हणून आम्हाला या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी लागणार आहे.

सभापती महोदय, या देशातील दुग्ध व्यवसाय हा उद्योग अतिशय महत्वाचा आहे. देशाचे कृषिमंत्री सन्माननीय श्री.शरद पवार यांनी एका भाषणात सांगितले की, मंदीच्या तडाख्यामध्ये या देशाचा दुग्ध व्यवसाय येऊन ठेपला आहे. आदरणीय कै.अण्णासाहेब पाटील यांच्यावरील ग्रंथ प्रकाशनाच्या वेळी केंद्रीय कृषिमंत्र्यांनी हे निवेदन केले. या सगळया मंदीचा परिणाम हा डायरेक्ट

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिसतो, त्यापेक्षा देशातील लक्षावधी लोक, सर्वसामान्य माणसे, ज्यांना इंडेक्सची आकडेवारी कळत नाही, परंतु शेअरमध्ये मिळणारा नफा आणि केल्या जाणाऱ्या जाहिरातीच्या आकर्षणाच्या मोहापायी मध्यमवर्गीय माणूस शेअर आणि म्युच्युअल फंडामध्ये पैसे गुंतवू लागला आहे. आज कंपन्यांचा नफा कमी झाला असून अनेक कंपन्या दिवाळखोरीत जाण्याच्या मार्गावर आहेत. अमेरिकेत मेरिल लिंचसारखी आर्थिक व्यवहार करणारी कंपनी दिवाळखोरीत गेली. याचा परिणाम आपल्या देशातील अनेक म्युच्युअल फंडांवर देखील होणार आहे. त्यामुळे सर्वसामान्य माणसांनी म्युच्युअल फंडांत जी गुंतवणूक केली आहे, अशी माणसे आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, सहकार चळवळ या महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात फोफावली आहे. महाराष्ट्रातील सर्वसामान्य कामगाराला एखादी सायकल घ्यायला, घर खरेदी करायला सहकारी बँकांच्या माध्यमातून कर्ज दिले जाते. आज मंदीच्या तडाख्यात सापडल्यामुळे अनेक कामगारांची नोकरी जाण्याची शक्यता लक्षात घेतली तर असे कर्जदार आपल्या कर्जाची परतफेड करु शकणार नाहीत. त्यामुळे सहकार चळवळीतील लहान पतपेढया, सहकारी बँका यांना देखील या संकटाची तीव्र झळ बसणार आहे, त्यांना देखील या संकटाला तोंड द्यावे लागणार आहे.

सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने निवेदन करताना सांगितले आहे की, अतिशय वाईट बातमी आहे. जो पगारदार नोकरवर्ग आहे त्यांना पेनफूल संकटाचा सामना करावा लागणार आहे. त्यांना तडजोड करावी लागेल, कमी पगारात काम करावे लागेल. राज्यात तशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. आपल्याला कल्पना आहे की, आपले राज्य हे शांततेचे, प्रगतीचे राज्य आहे. आपल्या राज्यावर या संकटाचा परिणाम होणार आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. केवळ एवढाच परिणाम होणार असे नसून याचा समाज व्यवस्थेवर सुध्दा परिणाम होणार आहे. लहान माणसाच्या कुटुंबावर देखील परिणाम होणार आहे. नोबेल पारितोषिक विजेते डॉ.अमर्त्य सेन यांनी सांगितले आहे की, परिस्थिती जेव्हा गरिबीची येते, कुटुंब व्यवस्था चालवित असताना पगार कमी झाला, आर्थिक झळ बसली तर त्याचा पहिला परिणाम हा मुलींवर, स्त्रियांवर होतो. ज्या कुटुंबात एक मुलगा व एक मुलगी आहे त्या कुटुंबात बापाच्या निम्म्या पगारात घर चालवायचे असल्यास आईबापाचे प्राधान्य मुलाला शिकविण्याकडे, मुलाला कपडे घेण्याकडे असते. पर्यायाने आपोआप मुलीकडे दुर्लक्ष होते. ही कुटुंबव्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता तुम्हाला आम्हाला नाकारता येणार नाही.

(नंतर श्री.खर्चे....

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड .....

म्हणून मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या मंदीचा परिणाम आपल्या देशाने सन 1929 मध्ये पाहिला होता परंतु त्यावेळी आपला देश उद्योगधंद्यात एवढ्या प्रमाणात अग्रेसर नसल्यामुळे त्याची झळ फारशी सहन करावी लागली नाही. परंतु आता आपल्याकडे उद्योगधंद्यात वाढ झालेली आहे व त्यामुळेच त्याचा परिणाम आपल्याला सहन करावा लागणार आहे. सन 1929 नंतर आता जी आर्थिक मंदी निर्माण झाली त्याची झळ विशेषत: लोकशाही असलेल्या देशांमध्ये बसली व वेगळ्याच प्रवृत्ती यातून निर्माण झाल्या आहेत.....अडथळा.....त्या अनुषंगाने मला असे सुचवावयाचे आहे की, केवळ या मंदीचा परिणाम व्यक्तिगत स्वरुपात दिसणार नाही तर आपण जी लोकशाही अवलंबिली आहे तिच्या पायाला सुध्दा या मंदीचा फटका बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात हा फटका बसेलच असे मी म्हणत नाही कारण आपली समाजव्यवस्था व आपली लोकशाही अत्यंत सुदृढ आहे. परंतु ती झळ बसू नये यादृष्टीने उपाययोजना करण्याची गरज आहे, याकडे शासनाने लक्ष द्यावे. या मंदीचा फटका केवळ उद्योगांनाच बसणार नाही तर या देशात जो पान खाणारा माणूस आहे तो पान खाणे बंद करेल, अशा प्रकारे संपूर्ण समाजव्यवस्थेवर त्याचा परिणाम होणार आहे. हे सर्व करण्याकडे आपण थोडे जरी दुर्लक्ष केले तर राज्यात एक प्रकारचा असंतोष निर्माण होऊ शकतो कारण ही मंदी आपल्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे व त्याची झळ लागायला सुरुवात झालेली आहे. एका बाजूला अर्थव्यवस्थेमध्ये 10-15 हजार कोटीच्या कंपनीचा आपण विचार करतो पण नॅशनल लेबर ऑर्गनायझेशनच्या म्हणण्याप्रमाणे राज्यात असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या 92 टक्के मजुरांचा विचार करणेही तितकेच महत्वाचे आहे. तसेच यात 7 टक्के पगारदार नोकर आहेत. आपण या असंघटित कामगारांसाठी कायदा केला आहे तरी देखील आपण त्यांना पैसे देऊ शकणार नाही, त्यामुळे त्यांचे घरही चालविणे कठीण होऊन बसणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. आंबेडकर आणि महात्मा फुले यांचे नाव घेऊन आपण राज्य करतो परंतु येणाऱ्या भविष्याचा विचार केला नाही, येणाऱ्या काळाबाबत उपाययोजना केली नाही तर त्याचा परिणाम म्हणून भविष्यात उपाशीपोटी माणसांची संख्या जास्त होऊन त्याची जागा असंतोष आणि हिंसक प्रवृत्ती घेतल्याशिवाय राहणार नाही. ज्याप्रमाणे आदिवासींच्या शोषणातून नक्षलवाद फोफावला परंतु आता जर यासंबंधची उपाययोजना केली नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

श्री. जयप्रकाश छाजेड .....

तर भविष्यात कायदा व सुव्यवस्था सांभाळणेही शक्य होणार नाही. म्हणून अशा मंदीच्या तडाख्यात उद्योजकांना ज्यावेळी पॅकेज जाहीर करण्यात येते तेथे असणाऱ्या कंपनीचे कर्ज परत करण्यासाठी हे पॅकेज देणार असाल तर त्याचा उपयोग कामगारांना काहीच होणार नाही. आणि जर आपल्या बेलाऊट पॅकेज द्यावयाचे असेल तर कंपनीने एकाही कर्मचाऱ्याला कमी करता कामा नये हेही लिहून घ्यावे लागणार आहे, तरच अशा पॅकेजचा फायदा होईल. अन्यथा हा कामगार रस्त्यावर येईल आणि आत्महत्त्यांचे सत्र त्यांच्यात देखील सुरु होईल व दुसऱ्या बाजूला उद्योजक मात्र आपल्या बायकोला विमान आणि बोट खरेदी करुन देणार अशी विषमता निर्माण होईल म्हणून याबाबतचाही विचार करावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश छाजेड ....

खरे म्हणजे अजून आपल्याला जागतिक मंदीची झळ पोहचलेली नाही. अशा प्रकारचे जे काही संकट येतात त्यावर मात करण्यासाठी तसेच सर्व सामान्य माणसांची क्रय शक्ती शिल्लक ठेवण्यासाठी शासनाला दीर्घकालीन उपाय योजना अंमलात आणण्याची आवश्यकता आहे. देशपातळीवर कामगार, शासन आणि उद्योजक यांच्या काही समित्या आहेत. परंतु भविष्यामध्ये येणा-या संकटांना तोंड देण्यासाठी माझी शासनाला विनंती आहे की, उद्योजक, कामगार आणि शासन यांच्या प्रतिनिधींची कायमस्वरुपी समिती नेमा. येणा-या प्रसंगावर कशी उपाययोजना करावयाची यासाठी आपण जर दीर्घकालीन समिती नेमली तर मला वाटते आपण सर्वजण या आव्हानाला सामोरे जाऊ एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो व आपली रजा घेतो. धन्यवाद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : आता या प्रस्तावावर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे आपले विचार मांडतील. ही चर्चा आपल्याला अडीच तासामध्ये पूर्ण करावयाची असल्यामुळे सन्माननीय मंत्रीमहोदय, आपल्या उत्तराला 4.30 वाजता सुरुवात करतील. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपल्याला जो अवधी दिलेला आहे त्या अवधीतच आपले भाषण पूर्ण करावे व मला सहकार्य करावे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचा प्रस्ताव या ठिकाणी सत्ताधारी पक्षाकडून आलेला आहे. त्यामुळे अत्यंत महत्वाच्या प्रस्तावाला थोडा वेळ वाढवून दिला तर चांगले होईल. प्रस्तावावर बोलण्यासाठी सन्माननीय सदस्यांची जी काही नावे आपल्याकडे येतात ती एकामागून एक न पुकारता पक्षवाईज सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी अशी विनंती आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, एका महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे. सर्वबाजुने विचार मंथन होऊन आपल्याला चांगले मार्गदर्शन मिळेल. सत्ताधारी पक्षाने हा प्रस्ताव आणलेला असला तरी सत्ताधारी पक्षाच्या वक्त्यांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची परवानगी मिळाली पाहिजे एवढी आमची आपल्याला विनंती आहे.

तालिका सभापती : या प्रस्तावाला आपण 2.30 वाजता सुरुवात केलेली आहे. नियमा प्रमाणे अडीच तासाचा अवधी या प्रस्तावाला देण्यात आलेला आहे. या प्रस्तावाला बरोबर 4.30 वजता माननीय मंत्रीमहोदय उत्तर देतील. आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आपले विचार मांडण्यास सुरुवात करावी.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे. जागतिक मंदीच्या प्रश्नावर मात करावयाची असेल तर दोन्ही बाजुंचे सन्माननीय सदस्य या विषयावर आपले जे काही विचार मांडतील ते महाराष्ट्राच्या 10 कोटी जनतेच्या हितासाठीच मांडतील त्यामुळे सदस्यांनी या प्रस्तावावर मांडलेल्या विचारांच्या संदर्भात योग्य ती अंमलबजावणी शासनाने करणे आवश्यक आहे, महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेच्या हितासाठी या ठिकाणी निर्णय घेणे आवश्यक आहे. मी माननीय जयप्रकाश छाजेड यांचे अभिनंदन करतो की, कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश न ठेवता, मी सत्ताधारी पक्षाचा असल्यामुळे सत्य दडपून ठेवून गोड गोड बोलावे असे न करता त्यांनी या ठिकाणी आपले विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्यांनी खरोखर चांगले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. या चर्चेला माननीय मंत्रीमहोदय उद्योग मंत्री उत्तर देणार आहेत. या विषयाच्या संदर्भात सन्माननीय नवाब मलिक साहेब मुद्दे लिहून घेत आहेत. खरे म्हणजे माननीय श्री. नवाब मलिक हे कॅपेबल मंत्री आहेत. या प्रस्तावाच्या संदर्भात आता जी काही चर्चा सुरु आहे त्यास रिझल्ट ओरिएंटेड डिसक्शन होऊन उत्तर मिळाले पाहिजे. या प्रस्तावाला चांगले उत्तर मिळाले नाही तर जसे बुडबुडे तयार होतात आणि ते किना-यावर येऊन फुटतात असे या चर्चेच्या उत्तरातून दिसता कामा नये, या ठिकाणचे शब्द केवळ व्याकरणातील शब्द न होता त्या शब्दांना, त्या चर्चेला जर अर्थ प्राप्त करुन द्यावयाचा असेल तर या ठिकाणी सन्माननीय सदस्य या प्रस्तावाच्या अनुषंगाने ज्या काही सूचना करतील त्यासंदर्भात शासनाने उपाययोजना अंमलात आणण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

सन्माननीय सदस्यांनी एका चांगल्या मुद्याला स्पर्श केलेला आहे. 1929 मध्ये पहिले महायुध्द संपल्यानंतर जगात मंदी आली. इंग्लंड वसाहतीवादी देश असल्यामुळे गुलाम असलेल्या देशांमधून, मांडलिक असलेल्या देशांतून ते स्वत:च्या देशात संपत्ती आणत होते. त्यामुळे त्या मंदीची झळ त्या देशाला बसली नाही. मंदीचे सावट त्या देशावर आले नाही. उलट त्या तेथील लोक अधिकाधिक श्रीमंत होण्याचा प्रयत्न करीत होते.

सभापती महोदय, असे म्हणतात की, अमेरिकेची लोकसंख्या ही जगाच्या लोकसंख्येच्या चार टक्के आहे. अमेरिका जगातील 40 टक्के साधनसंपत्ती एक्स्प्लॉईड करते. म्हणजे जगाच्या लोकसंख्येच्या चार टक्के लोकसंख्या असलेला देश माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचे 40 टक्के एक्सप्लॉयटेशन करतो. आता जी मंदीची लाट आलेली आहे त्या पापाचा धनी अमेरिका आहे. आपल्या देशातील चुका आपण काढू. परंतु अमेरिकेने सर्व देशात एक काल्पनिक श्रीमंती निर्माण केली आणि त्याचा परिणाम असा झाला की अमेरिका बँक करप्ट झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांचा प्रत्येक मुद्दा आम्ही ऐकत होतो. ते टाकाऊ असे एकेही असे वाक्य बोलले नाहीत. तेव्हा त्यांनी मांडलेल्या प्रत्येक वाक्यावर विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आता जी मंदीची लाट आलेली आहे त्याचे परिणाम आपल्या सर्वांना भोगावे लागतील काय ? जसा वनात वणवा लागल्यानंतर त्यामध्ये पक्षी, प्राणी, झाडेझुडपे, माणसे सर्वच जळून जातात. त्याप्रमाणे या वणव्यात आपण सुध्दा होरळपून जाणार काय ? आपल्या भारतीयांची प्रवृत्ती अशी आहे की, ज्यावेळी असे एखादे राष्ट्रीय संकट येते किंवा आपला दोष नसताना मानव समुहाला आर्थिकदृष्टया त्रास देणारे संकट येते त्यावेळी आपण सर्वजण एकत्र होतो आणि आपले एकत्र राहणे आवश्यक आहे. त्यावेळी आपण पक्षाभिनिवेष आणावयास नको. लोकशाही पध्दतीमध्ये जनतेने आपणास सत्ता दिलेली आहे. त्यामुळे आम्ही विरोधक टीका करु. ते आमचे काम आहे. कधी कधी त्याचा अतिरेक होत असेल तो अतिरेक सुध्दा लोकशाहीमध्ये होता कामा नये. त्यातील अतिरेक बाजूला ठेवला तर आम्ही केलेल्या टीकेतून सरकारने काहीतरी शिकले पाहिजे असे मला वाटते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, आपल्याकडे आर्थिक मंदीची झळ लागू नये म्हणून कोणकोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत हे मी छोट्या छोट्या गोष्टींचे उदाहरण देऊन सांगतो. सरकारने पायाभूत सुविधा देण्याचे मान्य केले. जोपर्यंत या देशात पायाभूत सुविधा चांगल्या होणार नाहीत तोपर्यंत विकास होणार नाही. एखाद्या गावामध्ये शेतकरी वांगी-भेंडी करीत असेल तो माल गावातून तालुक्याच्या ठिकाणी आणि तेथून जिल्ह्याच्या बाजारपेठेत आणण्यासाठी चांगला रस्ता पाहिजे. तेव्हा गाव तालुक्याला जोडला पाहिजे आणि तालुका जिल्ह्याला जोडलेला असला पाहिजे. अशाप्रकारच्या पायाभूत सुविधा देत असताना आपण त्यासाठी कालमर्यादा ठेवली नाही. जेथे चार रुपये खर्च व्हावयास पाहिजे त्याठिकाणी चारशे रुपये खर्च का झाले याचे आत्मपरीक्षण आपण केले नाही तर आपल्या चुका आणि आपल्या चुका नसताना जागतिक मंदीमुळे येणारे आर्थिक संकट यामध्ये आपण कुठेच टिकून राहणार नाही. तेव्हा प्रथम आपल्या चुका सुधारण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपण घर बांधताना भूकंप झाला तर काय होईल याचा विचार करुन घराचा पाया चांगला मजबूत करतो. जितकी उंच इमारती असती तितकाच त्या इमारतीचा पाया खोलवर मजबूत करण्यात येतो. जेणेकरुन भूकंप झाल्यास ती उंच बिल्डींग कोसळणार नाही. तेव्हा या जागतिक आर्थिक मंदीवर आपणास मात करावयाची असेल तर आपणास आपला पाया जो आपणच खुळखुळा करुन टाकला आहे तो पक्का करण्याची आवश्यकता आहे. मी आपणास उदाहरण देतो. आपण पेडर रोडवर ब्रीज बांधणार होतो. त्यावेळी त्या ब्रीजचे एस्टीमेट किती होते, आता किती झालेले आहे. हे एस्टीमेट का वाढले याचा आपण विचार करावयास पाहिजे. आपल्या कर्तृत्वाने एखाद्या महनीय व्यक्तीने केवळ मला त्रास होत आहे म्हणून काम थांबविणार असाल आणि जनमत घेणार असाल तर राज्य कधी पुढे जाणार नाही. हिटलरच्या पाशवी अभिलाषेतून इंग्लंडला चर्चिलने वाचविले असले तरी इंग्लंडच्या जनतेकडे त्यांनी अश्रू मागितले, घाम मागितला, श्रम मागितले. पण त्याच वेळेला त्यांनी खुशाल चेंडू साखरे बेजबाबदारपणे राज्य केले नाही. सर्व लोकांना विश्वासात घेऊन राज्य केले. त्यावेळी आलेल्या आर्थिक मंदीमध्ये जर्मनीला सर्व लोकांनी लुटले.

यानंतर श्री.गायकवाड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

श्री.मधुकर चव्हाण .....

ज्यावेळी आर्थिक मंदी आली होती त्यावेळी सर्व जगाने जर्मनीला लुटले होते. त्यावेळी जी ट्रिटी झाली होती त्या ट्रिटीमुळे इटाली आणि जर्मनीला दोस्त राष्ट्राने लुटले होते त्यावेळी सपूर्ण जर्मनी भुके कंगाल झाले होते त्यातून हिटलर निर्माण झाला होता. माझ्या देशाला का लूटत आहेत या व्देषापोटी आणि प्रतिशोधापोटी हिटलर निर्माण झाला होता. त्यानंतर हिटलरने ज्यू लोकांची कत्तल करण्यास सुरुवात केली होती. अशा प्रकारची राक्षसी प्रवृत्ती हिटलरने स्वत:मध्ये निर्माण केली होती. हिटलर हा तिरस्करणीय होता, अमानुष होता त्याचा जेवढा निषेध करता येईल तेवढा केलाच पाहिजे कारण माणसाने माणसाचे रक्त पिण्याची प्रवृत्ती जर निर्माण झाली तर हे सुंदर जग संपल्याशिवाय राहणार नाही आणि आपल्याला हे सुंदर जग संपविण्याचा काहीही अधिकार नाही कारण हे जग आपण निर्माणच केलेले नाही. तो हिटलर सोडून दिला तरी जर्मनीला आर्थिक मंदीतून वैभवाकडे नेण्यासाठी हिटलरने काय केले होते ? त्याने शेतक-याना, कामगारांना , शिक्षकांना तसेच प्रशासनाला विश्वासात घेतले होते जो जो नागरिक जर्मनीच्या भूमीवर जन्माला आला होता त्याला त्याने विश्वासात घेंतले होते. माझ्या माहितीप्रमाणे तो 1935 साली जर्मनीचा चॅन्सलर झाला होता. त्यावेळी केलेल्या भाषणातील त्याचे पहिले वाक्य तशा प्रकारचे होते . जर्मनीवर दोस्त राष्ट्रांचे एवढे कर्ज झाले होते की त्याचे व्याज देण्यासाठी पुन्हा त्यांच्याकडूनच कर्ज घ्यावे लागणार होते. ज्याप्रमाणे एखाद्या पठाणाकडून 100 रुपये कर्ज घेतले असेल आणि त्याचे दहा रुपयांचे व्याज द्यावयाचे असेल तर ते दहा रुपये देण्यासाठी त्याला असे सांगावयाचे की, " मी दहा रुपये तुला देऊ शकत नाही तेव्हा तूच ते दहा रुपये कर्जात वाढले आहे असे समज " त्यामुळे 110 रुपये कर्ज वाढले आहे असे तो समजतो. जर्मनीतील सर्व लोकांना हिटलरने विश्वासात घेतले होते. महाराष्ट्रातील सर्व जनतेला शासनाने विश्वासात घेतले पाहिजे. हिटलरने नागरिकांना जीवन जगण्यासाठी अनेक सवलती दिल्या होत्या. तशा प्रकारच्या सवलती हे शासन राज्यातील जनतेला देत नाही. मुंबईला पेडर रोड येथील जो उड्डान पूल बांधावयाचा होता तो सुध्दा बांधण्यात आला नाही. बांद्रा - वरळी सी लिंक रोडच्या कामाचे एस्टिमेट 600 कोटी रुपयांची असतांना आता त्याची किंमत 1600 कोटी रुपये का झाली कशामुळे झाली ? कोणामुळे झाली ? अर्थात यां संबंधीची चर्चा करणे आता आपण सोडून देऊ या.आज आपण वेगळया पध्दतीने चर्चा करु या.मुंबईवर अतिरेक्यांनी केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

मागच्या आठवडयात ज्या प्रमाणे आपण येथे वेगळया पध्दतीने चर्चा केली होती तशाच प्रकारे आज आपण या विषयासंबंधी वेगळया पध्दतीने चर्चा करु या. आज प्रत्येक फाईलसाठी पैसे घेतले जातात राजकीय पक्ष चालविण्यासाठी सर्वानाच पैसे लागतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतची इंग्रजाची वखार लुटली होती परंतु जिजामातेच्या आणि स्वत:च्या बायका मुलाच्या अंगावर सोन्याचे दागिने घालण्यासाठी त्यांनी ती वखार लुटली नाही. तर आपल्याला स्वराज्य निर्माण करावयाचे आहे, राष्ट्र उभे करावयाचे आहे असे समजून जी संपत्ती मिळाली होती त्या सपत्तीचा उपयोग व्यापक हितासाठी त्यांनी केला होता. आपण टेन्डर देत असतांना मिळणा-या पैशाचा उपयोग व्यापक हितासाठी करतो काय ? 600 रुपये त्या कामाची किंमत असता आता ती किंमत 1600 कोटी पर्यत गेली होती. तेव्हा याचा देखील विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी उद्योगाच्या संदर्भात एक चांगला मुद्दा मांडला होता. त्यानी हा मुद्दा अगदी बरोबर मांडला होता. एखाद्या उद्योगाला परवानगी देत असताना शासनाने अट घातली पाहिजे की, तुला सक्षम करण्यासाठी मी मदत करीन परतु तुला मिळालेल्या ताकदीचा उपयोग दुष्टपणाने दुस-याला मारण्यासाठी करता कामा नये, कामगारांचा बळी घेता कामा नये. अशा प्रकारची अट घालण्यात आली पाहिजे. शासनाने गिरण्यांची जमीन विकण्यास मालकांना परवानगी दिली. आपण कै. दत्ता सामंत यांच्या गिरणी कामगारांच्या संपा नंतर सगळया वर्तमानपत्रातील कात्रणे काढून वाचून पहावे . त्यानंतर शासनाने असे सांगितले होते की, गिरण्या बंद पडत आहेत, गिरण्या तोटयात चालल्या आहेत. मला असे सांगावयाचे आहे की, ही मंदी जेव्हा यावयाची असेल तेव्हा येईल परतु आपण आपल्या कर्तृत्वाने आर्थिक मंदी आणि संकट आणले आहे ते प्रथम थांबविण्यात आले पाहिजे म्हणून मी याठिकाणी उदाहरणे देत आहे. मी या ठिकाणी टिकेच्या अभिनिवेशाने बोलत नाही. या सगळया गिरणी मालकांनी असे सागितले की , आम्हाला जमीन विकण्यास परवानगी देण्यात यावी. या गिरण्यांच्या जमिनीच्या विक्रीतून कालबाहय झालेली जी यंत्रणा आहे ती आम्ही बदलून टाकू, गिरण्यातील जुने साचे टाकून देऊ आणि आधुनिक काळाला अनुरुप अशी यंत्रणा उभी करु तसेच कर्ज फेडू आणि कामगारांची देणी देखील देऊ तसेच हा उद्योग वाढवू परंतु कोणत्या गिरण्या त्याप्रमाणे चालल्या आहेत ? म्युझियममध्ये ठेवतात त्याप्रमाणे गिरण्यांचे भोंगे फक्त ठेवले आहेत. सगळया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

जमिनीच्या विक्रीतून प्रचंड संपत्ती मालकाकडे जमा झाली त्यातून मॉल्स उभे राहिले परंतु मुंबईतील सगळे मॉल्स आता बंद पडत चालले आहेत हे मी सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांना सांगू इच्छितो. एका बाजूला माणसाला अभिलाषा होते की मला दोन बेड रुम किचन पाहिजे किंवा थ्री बेड रुम किचन पाहिजे किंवा फोर बेड रुम किचन पाहिजे परंतु काही दिवसानंतर मुलांचे लग्न झाल्यानंतर त्या ठिकाणी फक्त म्हातारा म्हातारीच राहतात आणि त्यांना एवढे मोठे धर साफ करणे शकय होत नाही मोठे घर घेत असतांना त्याची निगा किती राखू शकता येईल हे तर पाहिले पाहिजे. अशाच प्रकारे या जमिनीच्या जागांवर जे मॉल्स उभे् करण्यात आले होते ते सुध्दा बंद पडलेले आहेत. त्याचासुध्दा काही उपयोग झाला नाही. एम.आय.डी.सी. साठी तसेच एम.एस.एस.आय.डी.सी. साठी राज्यातील जमिनी संपादन करण्यात आल्या होत्या. सवलतीच्या दरात उद्योजकांना त्या जमिनी दिल्या परंतु तेथील उद्योग देखील बंद पडल्या असून कामगार बेकार झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री छाजेड यांनी सागितले की, आपल्या उंबरठयावर मंदी आलेली आहे ती आपल्या घरात येईपर्यंत थाबता कामा नये. परंतु घराला जर अगोदर आग लागलेली असेल आणि बाहेरुन एखाद्याने पेटोलचा बोळा टाकला तर काहीही फरक पडणार नाही. अगोदरच लागलेल्या आगीत या बोळयामुळे आणखी् आग मिसळली जाते. आपल्या घरात मंदी येण्यापूर्वी काय चालले आहे याकडे लक्ष दिले पाहिजे जागतिक मंदीचे वादळ आले तर सर्वानी मिळून त्याला समर्थपणे उत्तर द्यावयाचे असेल तर मी सांगितलेल्या गोष्टी करणे आवश्यक आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

सभापती महोदय, दुसरी गोष्ट म्हणजे ही मंदी का आली ? आपण आपल्याकडे गेल्या 9 वर्षामध्ये एक मे.वॅ. देखील वीज निर्माण केलेली नाही. मुळामध्ये मंदी येईल तेव्हा येईल आणि त्यामुळे कारखाने बंद पडतील तेव्हा पडतील. पण आपल्या अदूरदृष्टीमुळे जर काही असे घडले असेल, कारण आपण राज्यकर्ते आहात आणि आपल्या काळात वीज निर्मिती बंद झाल्यामुळे आपल्या राज्यातील उद्योग शेजारच्या राज्यांमध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरात मध्ये गेले. कारण त्यांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आपल्याकडे निर्माण करण्यात आपण अपयशी ठरलो वा कार्यक्षम ठरलो नाही, शासनाच्या वतीने या उद्योगांना पायाभूत सुविधा आम्ही उपलब्ध करून देऊ शकलो नाही. म्हणून हे उद्योग दुसऱ्या राज्यात जाण्यास आणि परिणामी आपल्या राज्यात मंदी येण्यामध्ये आपण राज्यकर्ते म्हणून देखील जबाबदार आहोत असे माझे मत आहे.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट म्हणजे हौसिंग लोन. आज प्रथमत: या उद्योगामध्ये मंदी आलेली आहे. त्यामुळे सर्व घरांचे दर कमी झालेले आहेत. इमारतीच्या इमारती उभ्या आहेत पण त्यातील गाळे विकले जात नाहीत. सगळा पैसा अडकून राहिलेला आहे. आपण यामधील वाद आणि राजकारण नंतर करू या. त्या बिल्डरकडे दोन नंबरचा पैसा किती आहे, 3 नंबरचा की 4 नंबरचा पैसा किती आहे वगैरे येथे बोलण्यात अर्थ नाही. परंतु त्या बिल्डरने आपल्या या राष्ट्रातील रिझर्व बँकेने छापलेल्या नोटाच गुंतविलेल्या आहेत हे आपण येथे लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजे त्याने राष्ट्रीय संपत्ती त्या अुद्योगात गुंतविलेली आहे. पण तुम्ही त्याच्याबाबतीत काय केले ? या मंदीच्या काळात त्याला मदत करायची सोडून तुम्ही त्याच्यावर सर्विस टॅक्स लावला. शिवाय नंतर सेस टॅक्स लावला. प्रति चौरस मीटर 7 हजार रूपये आणि प्रति फूट 700 रूपये याप्रमाणे आपण हा कर लावला. आज मला एखादा फ्लॅट घ्यायचा असेल आणि तेथे 2000 रूपये चौ.फूट दर असेल तर तो बिल्डर, त्याच्याकडून तुम्ही सर्विस टॅक्स आणि सेस टॅक्स लावून जे पैसे वसूल करता ते पैसे तो बिल्डर येणाऱ्या फ्लॅट खरेदीदाराकडूनच वसूल करतो. तो मला सांगणार की, हा फ्लॅट 2700 रूपये दराने घ्यावा लागेल. खरे तर त्यात तुमची गुंतवणूक काहीच नसते पण तरीही तुम्ही त्याच्याकडून कर वसूल करीत असता. म्हणजे मुळात तुम्हीच येथील लोकांना भिकारी करून येथे काही चालू नये अशी परिस्थिती निर्माण केली आहे. सभापती महोदय, हौसिंग लोनवरील व्याजदर तुम्ही मध्यंतरी किती वाढविले होते ? आता ते कमी झाले आहेत हा भाग वेगळा.

..... क्यूक्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चव्हाण ....

केंद्रामध्ये अर्थमंत्री पद हे आता माननीय पंतप्रधान यांनी स्वत:कडे घेतले आहे. आणि मला चांगला विश्वास आहे ते यामध्ये चांगल्या प्रकारे पावले टाकतील कारण ते यापूर्वी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते आणि त्या काळात त्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला चांगली दिशा देण्याचे काम केलेले आहे. तेव्हा ते श्री.नरसिंह राव यांच्या मंत्रिमंडळात होते. परंतु तरीही हिंदीतील म्हणीप्रमाणे 'बूंद से गई वो हौद से नही आती'. तेव्हा गेल्या 7-8 वर्षात तुम्ही जो सगळा गोंधळ घातलेला आहे त्यामुळे आता माननीय पंतप्रधानांनी अर्थखाते आपल्याकडे घेतल्याने आणि काही सुधारणा केल्यामुळे लगेच काही आपल्याला आर्थिकदृष्ट्या वैभवाचे दिवस येतील असे होणार नाही. तुम्ही कर्जाचे व्याजदर वाढविल्यामुळे लोकांचा कर्ज घेण्याकडे कमी कल होता. आता व्याजदर कमी झाल्याने पुन्हा त्यात सुधारणा होऊ शकेल.

सभापती महोदय, आणखी एक गोष्ट म्हणजे स्टॅम्प ड्युटी घेतो शिवाय 12 टक्के वॅट देखील घेतो. हा वॅट तुम्ही 8 टक्के का करीत नाही ? आणि हा वॅट फ्लॅट खरेदीवर त्या ठिकाणी कशासाठी पाहिजे ? आता सकाळी माननीय राज्यमंत्री श्री.राणा जगजितसिंह पाटील यांनी येथे उत्तर देताना सांगितले की, आम्ही स्टॅम्प ड्युटी कमी केलेली आहे. पण प्रत्यक्षात तसे नाही. 75 लाख रूपये किंमतीच्या वर तुमचा फ्लॅट असेल तर त्या ठिकाणी स्टॅम्प ड्युटी कमी घेण्याचा विचार केला जातो. दुसरे असे की, या स्टॅम्प ड्युटीचे रेडी रेकनर ठरलेले आहेत. तुम्ही दादरला, परेलला फ्लॅट घेणार तर दादरचे रेट ठरलेले आहेत रेडी रेकनरनुसार. स्टॅम्प ड्युटी लावणारा अधिकारी आपल्याला सांगतो की, तुम्ही तो फ्लॅट फुकटात घेतला असला तरी तुम्हाला अमुक इतकी स्टॅम्प ड्युटी त्यावर भरावीच लागेल कारण या भागातील जागेचा दर सरकारने ठरवून दिलेला आहे. म्हणून यामध्ये देखील तुम्ही या गोष्टीचा देखील विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शिवडी-न्हावाशेवा पूल आहे तो तुम्ही जाहीर केला. आपण सगळ्या विकासाच्या योजना भराभर जाहीर करतो. पण त्याप्रमाणे त्यांची अमलबजावणी करू शकतो की नाही याचे भान मात्र आपण ठेवत नाही. परिणामी त्या सगळ्या योजना फसतात. आता देखील त्या पूल करण्याचे आपण जाहीर केले पण अजून त्याची वर्क ऑर्डर काही आपण दिलेली नाही. उड्डाणपूलाचे तर सोडूनच द्या. आपण मेट्रो रेल्वेची उद्घाटने केलीत. आता मंदी मंदी म्हणून ओरड होते पण ही मंदी यायची तेव्हा येईल. पण आपल्याला आज दोन रूपयाची वस्तू खरेदी

..... क्यूक्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावयाची आहे पण ती वेळेवर खरेदी न केल्यामुळे भविष्यात त्यासाठी 200 रूपये द्यावे लागणार असतील तर ही किंमत आपल्या निष्क्रियतेमुळे, उदासिनतेमुळे, किंकर्तव्यमूढतेमुळे .. करू की नको या विचारात आपण राहतो त्यामुळेही ही किंमत वाढते. तेव्हा आर्थिक बाबीमध्ये टू बी ऑर नॉट टू बी हे वाक्य कधी चालत नाही. आर्थिक स्थितीचे भान ठेवूनच तुम्ही योजना आखल्या पाहिजेत आणि त्या तितकेच भान ठेवून राबविल्या देखील पाहिजेत. म्हणजे मग राज्याचा आराखडा ठरला की, तुम्ही त्या योजना त्याप्रमाणे पूर्ण केल्या पाहिजेत. सभापती महोदय, परवाच येथे अर्थसंकल्पातील आकडे प्रसिद्ध झाले. बजेटमध्ये एकदा तरतूद केल्यानंतर त्यामध्ये 3, 4, 5 टक्के खर्च झालेला आहे तर काही 33 टक्के खर्च झालेला आहे. म्हणजे या राज्याचे जे बजेट प्रोविजन केल होते त्यातील नोव्हेंबर पर्यंत केवळ 33 टक्केच खर्च केला आहे. उरलेल्या तीन चार महिन्यात बाकी 67 टक्के आपण खर्च करणार आहात काय असल्यास कसा करणार आहात ? तुम्ही तो खर्च पूर्ण करू शकणार नाहीत. मग पुन्हा व्हेरिएशन होणार. आता सुदैवाने किंवा दुर्दैवाने जागतिक मंदीचे दिवस आले आहेत आणि त्यामुळे सिमेंट व स्टीलचे भाव कमी झाले आहेत. असे असले तरी ज्यांनी या कामांसाठी निविदा भरल्या असतील ते निविदाकार आता भाव कमी झाले आहेत म्हणून तुम्हाला 600 च्या जागी 400 रूपये किंमत कोट करणार नाहीत. ...

(यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. मधुकर चव्हाण...

जर त्याचे भाव वाढले तर तो व्हेरिएशनसाठी येतो. मी मघाशी जो दर सांगितला होता त्यामध्ये आता फरक झालेला आहे. आणि म्हणून तुम्ही ज्या इन्फ्रास्ट्रक्चरच्या योजना केल्या आहेत त्या सर्व योजनांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, हर्षद मेहताला आपण "बिग बुल" म्हटले. त्याने शेअर बाजार काल्पनिकदृष्टया उंचावला. एवढा उंचावला की, सामान्य माणसाला "शेअर" या शब्दाचे स्पेलिंग माहीत नव्हते, तोसुध्दा आपल्या नातेवाईकांना, मित्रांना विचारुन शेअरमध्ये गुंतवणूक करावयास लागला. ते शेअर मार्केट आज चटकन खाली आले. आज महालक्ष्मीच्या रेसकोर्सवर दोन टक्के सुध्दा गिरणी कामगार, गरीब माणूस रेसवर पैसे लावण्यासाठी जात नाही. श्रीमंतांच्या खिशामध्ये भरपूर पैसा आहे, त्याला पैश्याची चिंता नाही तो रेसकोर्सवर जातो. परंतु सामान्य माणसाने शेअर मार्केटमध्ये गुंतविलेले पैसे ज्यावेळी बुडतात त्यावेळी त्याला आयुष्यातून उठावे लागते.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा आहे. शेती व्यवसाय कमी होत चालला आहे, त्यामुळे या महाराष्ट्रातील 48 टक्के लोक आज हातावर पोट घेऊन शहराकडे येत आहेत. शहरामध्ये नोकऱ्या नाही, व्यवसाय नाही., रहायला घर नाही, आणि जमीनही नाही. आपण मागील 40 वर्षामध्ये जास्तीत जास्त जमीन पाण्याखाली आणून शहरातील माणूस पुन्हा ग्रामीण भागाकडे कसा जाईल यासाठी प्रयत्न केले. या धरतीमधून तो सोने कसे उगवेल यासाठी आपण योजना आखल्या. उलट आज आपण प्रत्येक ठिकाणी सबसिडी देतो. आम्ही देखील त्याप्रमाणे मागणी करतो की, केळयाच्या पिकाला सबसिडी द्या, ऊसाला सबसिडी द्या, कापसाला सबसिडी द्या, सोयाबीनला सबसिडी द्या. सबसिडीने राजकारण किंवा अर्थव्यवस्था जगात कुठेही चालू शकत नाही. परंतु विकसनशील राज्य म्हणून सामान्य माणसाला जगविण्यासाठी आपल्याला सबसिडी द्यावीच लागते. एका बाजूला सबसिडी द्यावयास पाहिजे हा मानवतावाद झाला, आणि दुसऱ्या बाजूला व्यवहारवाद आहे. आज आपण सिलेंडरवर सबसिडी देतो. जर सबसिडी दिली नाहीतर सामान्य माणूस जेवणही करु शकणार नाही. सबसिडी दिली तर अर्थ व्यवस्था ढासळून जाते.सर्व पैसा सबसिडीमध्ये खर्च होत आहे. या देशामध्ये 70 ते 75 टक्के खर्च हा एस्टॅब्लिशमेंटवर होतो. मुंबई महानगरपालिकेचा 60 ते 70 टक्के खर्च हा एस्टॅब्लिशमेंटवर होतो हे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना माहीत आहे. म्हणून आपल्याला सांगावयाचे आहे की, आर्थिक संकट येऊ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. मधुकर चव्हाण...

नये असे आपणास वाटत असेलतर ज्या योजना आखल्या आहेत त्या लवकर कशा पूर्ण होतील हे आपण बघितले पाहिजे. परदेशी लोकांनी सर्व्हिस सेंटरमध्ये काम करणाऱ्या तरुणांना 40 हजार, 50 हजार, 60 हजार रुपये पगार देण्यास सुरुवात केली. मी बी.कॉम. झालो, मी सर्व्हिस सेंटरमध्ये काम करीत आहे, मला 40 हजार रुपये पगार आहे. माननीय श्री. तावडे साहेब बी.कॉम. झाले म्हणून त्यांना बँकेमध्ये 7 ते 8 हजार रुपये पगार मिळत आहे. पगारामधील फरकामुळे जीवन व्यस्त झाले, इम्बॅलन्स झाले. आता सर्व्हिस सेंटर कमी झाले. जेट कंपनीला दणका दिल्याबरोबर त्यांनी काढून टाकलेल्या 800 कामगारांना पुन्हा कामावर घेतले. त्यावेळी त्यांनी कामगारांना सांगितले की, तू 60 हजार रुपये पगार घेत होतास., त्यातील 30 हजार कमी करुन तुला कामावर घेतो. त्याला पहिल्या चार महिन्यात संपन्नतेची संवय लागली होती. आयुष्यभर काम करुन तो मोटर सायकल घेऊ शकत नव्हता. परंतु सर्व्हिस सेंटरमध्ये काम करणाऱ्या मुलांनी पहिल्या दोन-चार वर्षात मारुती कार घेण्यास सुरुवात केली. आणि आता त्या गाडया त्यांना विकण्याची वेळ आली आहे. कारण नोकरी गेल्यामुळे त्या गाडीचे मेंटेनन्स तो करु शकत नाही. याचे कारण पगाराचे आमिष दाखवून गॅटमुळे परदेशी लोकांनी या देशामध्ये आपली गुंतवणूक केली. म्हणून मला असे वाटते की, या सर्व गोष्टींचा आपण विचार केला पाहिजे. आपण स्टँप डयुटी कमी करा, व्याजाचा दर 8 टक्क्यावर आणा. कंस्ट्रक्शनवर आपण सर्व्हिस टॅक्स लावला आहे, तो खाली आणा. आणि पायाभूत सुविधांच्या योजना मोठया प्रमाणात आणण्यासाठी कुठलाही मुलाहिजा ठेऊ नका. कुणाच्याही विरोधाला घाबरु नका. जी विकासाची कामे आहेत ती आपण केली पाहिजेत. आपला देश फार मोठा आहे. ही आर्थिक मंदी महाराष्ट्रातून जाणार आहे. या देशातील नागरिक असा आहे की, त्याला जास्त कष्टाने आणि कमी गरजांमध्ये आनंदीत रहाण्याची परंपरागत संवय लागली आहे. तो आपल्या घरावर सोन्याची कौले चढवायला मागत नाही. तो चंदनाचा पाट, चंदनाचा ताट आणि सोन्याचा चमचा जेवायला मागत नाही. तो भरजरी साडी मागत नाही, चालायला गालीचा मागत नाही. फिरायला विमान मागत नाही. माणूस म्हणून जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी मला द्या. माझी कष्ट करण्याची तयारी आहे. असे तो सांगत आहे. अशा देशामध्ये आपण जर नीट आर्थिक नियोजन केलेतर जागतिक मंदी आली तरी चालेल आपण त्याला समर्थपणे उत्तर देऊ शकू एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--------- (यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी या सभागृहामध्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला काही प्रमाणात अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी अतिशय परखडपणे मंदीची लाट आणि त्या लाटेमुळे होणारे परिणाम दाखवून दिले आहेत. आपण मंदीच्या बाबतीत खूप चर्चा करतो. मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय असे याचे विश्लेषण केले तर मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय या मंदीच्या लाटेमध्ये भरडले जाणार आहेत हे सत्य आहे. आपण जागतिकीकरणाच्या नावाखाली अनेक गोष्टी केल्या. आपण अनेकांना या ठिकाणी गुंतवणूक करण्याचे निमंत्रण दिले. अनेक लोकांना या महाराष्ट्रामध्ये आणि आपल्या देशामध्ये संधी उपलब्ध करुन दिली. आज आपल्याकडे जी संधी किंवा परकीय गुंतवणूक आली ती किती प्रमाणात आली आणि त्याचा महाराष्ट्राला किती प्रमाणात फायदा झाला हा संशोधनाचा विषय आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी दाखवून द्यावे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी अमूक उद्योग महाराष्ट्रात आणला, त्यातून इतक्या लोकांना रोजगार मिळाला, महाराष्ट्राला इतका फायदा झाला. आपण मुंबई, न्युयॉर्क, लंडन ,सिडनी किंवा आखाती प्रदेशातील दुबई, अबुधाबी घ्या. या सर्व भागामध्ये मंदीचे सावट दिसते. महाराष्ट्रातील अनेक तरुण-तरुणी आय.टी. क्षेत्राकडे वळले. त्यांनी आय.टी. क्षेत्राची डिग्री किंवा डिप्लोमा घेऊन परदेशामध्ये नोकरी करण्याचा प्रयत्न केला. परंतु आज आपल्याला परत महाराष्ट्रात यावे लागते की काय, मुंबईमध्ये परत यावे लागते की काय, नागपूरला, पुण्याला किंवा नाशिकला परत यावे लागते की काय अशा उंबरठ्यावर ते आलेले आहेत. त्यांचे पालक चिंतेमध्ये आहेत. त्याच्याशी सामना करावयाचा असेल तर पक्षभेद बाजूला ठेऊन सर्वांनी मिळून, आपण राज्यकर्ते आणि आम्ही विरोधक असे सर्वांनी मिळून एकत्रितपणे याचा मुकाबला केला तरच ते शक्य आहे, अन्यथा ते शक्य नाही. कारण जर आर्थिक मंदी असेल तर त्याचा समाचार राज्य शासनाने येथील विरोधकांची मते ऐकून, विरोधक काय सांगत आहेत ते पाहून, आपला हात थोडा ढिला सोडून, दोन पावले मागे येऊन याबाबतीत काही उपाययोजना सांगितली तर ती अंगीकारणे आवश्यक आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, जर आपण महाराष्ट्रातील एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज पाहिलीत तर महाराष्ट्र शासनामार्फत महाराष्ट्रात जो रोजगार दिला जातो त्या विषयाच्या संदर्भात मी यापूर्वी बोललो आहे. आज जे एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज आहेत त्यांना एक्स्चेंजचे स्वरुप नाही. माननीय मंत्रिमहोदय श्री. राणा जगजितसिंह पाटील यांच्याकडील बैठकीमध्ये मी यासंदर्भातील वेदना बोलून दाखवली होती. महाराष्ट्रात मुंबईमध्ये, नागपूरमध्ये असलेले एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज हे एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज नाही तर त्या ठिकाणी 4 बाकडे, 2 टेबल्स आणि 3 खिडक्या यापेक्षा काहीही नाही. आज आपल्याला परफेक्ट आकडेवारी पाहिजे असेल तर या महाराष्ट्रामध्ये, या मुंबईमध्ये, नागपूरमध्ये, नाशिकमध्ये किती बेरोजगार आहेत याची माहिती दुर्दैवाने राज्य शासनाकडे उपलब्ध नाही. जी काही माहिती उपलब्ध आहे त्यावरुन महाराष्ट्रामध्ये बेरोजगारांची संख्या साधारणपणे 13 लाख आहे. 1991 मध्ये 21 ते 24 वयोगटातील बेरोजगारांची संख्या एकूण संख्येच्या 6 टक्के होती. माझी माहिती चुकीची असेल तर आपण दुरुस्त करु शकता. 2001 मध्ये ती संख्या 23 टक्के झाली आणि 2007 मध्ये त्यामध्ये आणखी 7 टक्क्याने वाढ होऊन जवळजवळ 28 ते 30 टक्क्याच्या घरात बेरोजगारांची संख्या गेली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

जगाच्या 1.6 टक्के इतकी लोकसंख्या भारतामध्ये आहे. या महाराष्ट्रामध्ये 21 ते 28 वय वर्षे असलेल्या गटातील तरुणांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. राज्यात अनेक धंद्यांमध्ये मंदी आहे. मग ती सिमेंट उद्योगात असेल, वाहन उद्योगात असेल, कॉल सेंटरमध्ये असेल, आय.टी.क्षेत्रात असेल, दुग्धव्यवसायात असेल या सर्व क्षेत्रात मंदीचे वातावरण आहे. दुर्दैवाने आपली अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे हे आपण विसरतो. पण शेती देखील निर्सगावर अवलंबून आहे. आज अनेक भागातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत, ही वस्तुस्थिती सरकारला नाकारता येणार नाही. उर्वरित 40 टक्क्यामध्ये बाकीच्या लोकांचा समावेश होतो. प्रसार माध्यमामध्ये केवळ 15 टक्के नोकऱ्या आहेत, आय.टी.मध्ये 15 टक्के, इन्व्हेस्टमेंट बँकिंगमध्ये 15 टक्के, ॲसेट मॅनेजमेंटमध्ये 13 ते 14 टक्के नोकऱ्या उपलब्ध आहेत. हे शासनाने समजून घेतले पाहिजे. शासन सध्या काय करीत आहे ? सध्या अनेक कामे आऊट सोर्सिंगद्वारे करुन घेतली जात आहेत आणि जे उद्योग आहेत ते बंद केले जात आहेत. कारण आपल्याला कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम पाहिजेत. हे खरे असले तरी आहेत ते विभाग बंद करुन आऊट सोर्सिंगद्वारे कामे सुरु करणे योग्य नाही. यासंदर्भात मी परिवहन विभागाचे उदाहरण देतो. सध्या परिवहन खात्याची अनेक कामे आऊट सोर्सिंगद्वारे सुरु आहेत. त्याच्यातून किती बेरोजगारी वाढणार आहे त्याचा विचार शासनाने केला आहे काय ? आपल्याला जागतिकीकरण पाहिजे, फायदेशीर असलेल्या उद्योगांची आवश्यकता आहे. पण सध्या आहेत ते उद्योग बंद करुन नवीन उद्योग सुरु करणे चुकीचे आहे. सध्या अनेक कामे कंत्राटदारांकडून करुन घेतली जातात. अमेरिकेमध्ये आय.टी.मध्ये पदवी घेतलेल्या तरुणांचे भारतामध्ये आल्यावर भवितव्य काय आहे ? तेथील सरकारने हाकलून दिल्यानंतर ते येथे आल्यानंतर त्यांनी काय करावयाचे ? हिंदुस्थानमध्ये 3 कोटी 25 लाख नोकऱ्या उपलब्ध आहेत, त्यापैकी महाराष्ट्रात 36 लाख नोकऱ्या उपलब्ध आहेत. शासनाच्या माध्यमातून गेल्या वर्षी केवळ 9 हजार लोकांना नोकऱ्या देण्यात आल्या. माझ्याकडे 'असोचेम' चा अहवाल आहे. शासनाने त्यातील आकडेवारी पहावी. देशात 93 लाख पदवीधर आहेत त्यापैकी 10-12

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत....

लाख पदवीधर महाराष्ट्रात आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी बँकिंग लोनबाबतचा मुद्दा मांडला आहे. सध्या वाहन उद्योगात मंदी आलेली आहे. अनेक बँकांनी कार लोन देणे बंद केले आहे. सभापती महोदय, मी माहितीसाठी सांगत आहे. अनेक बँका आमदारांना कार लोन देत नाहीत, वकिलांना लोन देत नाहीत, पोलिसांना लोन देत नाहीत, डॉक्टर राजकारणात असतील तर त्यांनाही लोन देत नाहीत. मग लोन देण्याचे बँकांचे धोरण आहे तरी काय ? हा आमदारांचा, वकिलांचा अपमान आहे असे मला वाटते. पान टपरीवाल्याला मात्र लोन मिळू शकते. आयसीआयसीआय सारखी नामवंत बँक तर you are politicians, go back, असे म्हणते. (अडथळा).....

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हा विषय याच्याशी निगडित नाही. तरी देखील लोनचा प्रश्न असल्यामुळे मी ते येथे सांगितले. सर्वसाधारणपणे आज 40 टक्के पदवीधर अमेरिकेत नोक-या करीत आहेत. हे लोक उद्या हिन्दुस्थानामध्ये आणि मयहारीाष्ट्रामध्ये आले तर त्यांचे काय होणार आहे ? कॉल सेंटर्स, बीपीओ आणि केपीओ यामध्ये 9 लाख लोक काम करीत आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, संभाजीनगर या ठिकाणी मोठमोठे सर्व्हिस प्रोव्हायडर्स आहेत. सभापती महोदय, या कॉलसेंटर्सद्वारे 17 अब्ज डॉलर्सची कमाई होते. पूर्वी कॉल सेंटर्समध्ये छोटी छोटी कामे होत होती. आता विमा क्षेत्र, आरोग्य सेवा क्षेत्र, शेअर मार्केट, बँकीग यामध्ये आपण काम करीत आहोत. असे म्हटले जाते की, 2010पर्यनत 15 लाख रोजगार या कॉल सेंटर्सद्वारे उपलब्ध होतील. ही गोष्ट खरी असली तरी जर आर्थिक मंदी आली तर ही 15 लाख रोजगारांची संख्या कमी होण्याचा संभव आहे हे देखील लक्षात घेतले पाहिजे. नॉलेज प्रोसेसिंग आऊटसोर्सिंग - केपीओ यामध्ये जगभरात 71 टक्के भारतीय आहेत. या केपीओ मार्फत जवळ जवळ अडीच लाख रोजगार उपलब्ध होतील. सगळयात महत्वाचे हे आहे की, मॉल आणि रिटर्न धंद्यामध्ये सर्वसाधारणपणे 32 लाख रोजगार उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे बांधकाम व्यवसायात साडेचार लाख, ॲनिमेशनमध्ये 5 लाख, हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेण्टमध्ये 2 लाख,पत्रकारितेमध्ये साधारणपणे 1 लाख, आय.टी.मध्ये 2010 पर्यन्त 12 लाख, आणि जैव व तंत्रज्ञान यामध्येही नोक-या उपलब्ध होणार आहेत. म्हणजे या आऊटसोर्सिंगमुळे अकुशल आणि असंघटित कामगारावर त्याचा रोजगार जाण्याची पाळी आलेली आहे. या असंघटित कामगाराला स्थिर रोजगार मिळावा यासाठी कोणतेही नियम नाहीत. सभापती महोदय, राज्य शासनामार्फत रोजगार वाहिनी चालविली जाते. त्या रोजगार वाहिनीमध्ये केवळ राज्य शासनाच्याच जाहिराती असतात आणि त्या जाहिरातीमधील पदे कधीच भरली जात नाहीत. कोणत्याही कंपनीच्या पदांची जाहिरात या रोजगार वाहिनीवर दाखविली जात नाही. किती नोक-या उपलब्ध आहेत आणि किती लोकांना रोजगार मिळाला याची माहिती घेण्याचा माझा छंद आहे म्हणून मी नेहमी ही वाहिनी पाहात असतो. आता ही रोजगार वाहिनी अद्यावत केलेली असल्यामुळे त्यामध्ये बाहेरचे लोक देखील आमंत्रित केलेले आहेत. परंतु दुर्दैवाने कोणत्याही नवीन कंपनीने या वाहिनीवर जाहिरात दिली नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी आहे की, बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी हे राज्य शासन काय करते ? राज्य सरकार रोजगार मेळावे भरवते. हे रोजगार मेळावे नाममात्र भरविले जातात. त्याठिकाणी कोठल्याही प्रकारचा रोजगार दिला जात नाही. ती एक प्रकारची जत्रा असते. तेथे केवळ कंपनीचे स्टॉल्स लागलेले असतात. एकाही बेरोजगाराला तेथे नोकरी लागत नाही. राज्य शासन त्यांना हजारो रुपये देते. सभापती महोदय, बेरोजगारांची दुस-या एका मार्गाने फसवणूक केली जाते. रोजगार प्लेसमेण्ट सर्व्हिसेस आहेत. आपल्या मुलाला नोकरी मिळावी म्हणून मुलाचे आई-वडील 5 हजार रु. भरुन मुलाची सर्टिफिकेट त्या प्लेसमेंटमध्ये देतात. परंतु त्यांच्या मार्फतही नोकरी दिली जात नाही तर निव्वळ भूलथापा देऊन फसवणूक केली जाते. तेव्हा अशा प्रकारे कोणी भूलथापा देऊन बेरोजगारांची फसवणूक करीत असेल तर त्याबाबतीत सरकारने लक्ष द्यायला पाहिजे. आजची परिस्थिती पाहिली तर रोजगार निर्मितीचे एक काल्पनिक चित्र आपल्या समोर उभे केलेले आहे.

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

माझी मागणी आहे की, जर तुम्हाला खरोखर हा प्रश्न सोडवायचा असेल, बेरोजगारांना रोजगार द्यावयाचा असेल तर स्थानिक 80 टक्के भूमीपुत्रांना नोकरी देणार अशी जी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी घोषणा केली त्यादृष्टीने शासनाने कायदा बनविणे आवश्यक आहे. कायदा बनवून आस्थापनांना दंड ठोकावा, त्यांना जेलमध्ये टाकावे, त्याशिवाय या कायद्याची अंमलबजावणी होणार नाही आणि स्थानिक मुलांना कधीही रोजगार मिळणार नाही. 1972 पासून कायदा अस्तित्वात आहे. परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे कधीही झाली नाही. बेरोजगारांना भत्ता देण्याची जी परदेशातील संकल्पना आहे त्या संकल्पनेनुसार मंदीच्या काळात विशेष बाब म्हणून बेरोजगारांना भत्ता दिला जावा. आज शासनामार्फत सेवा सोसायट्यांना 1200 रुपये वार्षिक बेरोजगार भत्ता दिला जातो. या भत्त्यामध्ये वाढ करावी अशी मागणी करुन मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी जागतिक मंदीच्या संदर्भात राज्यातील कामगार व उद्योगधंद्यांवर होणाऱ्या परिणामाच्या संदर्भातील एका महत्वपूर्ण अशा विषयावर याठिकाणी प्रस्ताव मांडलेला आहे. मंदी कुणी आणली? कशासाठी आणली? केव्हापासून आणली? याचा जर विचार केला तर या मंदीचा उगम भारतात झालेला नाही. या मंदीचा उगम अमेरिकेत झालेला आहे. हा उगम होत असताना गेल्या दोन-तीन महिन्यापूर्वी अमेरिकेतील काही बँका, काही वित्तीय संस्था या डबघाईस आल्यामुळे मंदीला सुरुवात झाली असे सर्वांना वाटायला लागले.

सभापती महोदय, मंदी तीन प्रकारची असते. एक म्हणजे किंमतीची मंदी, दुसरी मागणीची मंदी आणि तिसरी मानसिकतेची मंदी. आता ही मंदी किंमतीची आहे की मागणीची मंदी आहे याकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. मानसिकता बदलेल. Calamity is an opportunity या भावनेतून या मंदीकडे पाहिले तर या मंदीमधून देखील आपल्याला लाभ मिळू शकेल. काही जाहिराती मी पाहिल्या. "मध्यमवर्गीयांना आम्हाला श्रीमंत करायचे आहे. आमच्याशी तुम्ही गाठीभेटी घ्या. या मंदीत आपल्याला चार पैसे कसे जास्त मिळतील या संदर्भातील विचार करु या." म्हणून मंदी आहे, मंदी आहे अशा प्रकारची मानसिकता आपण बाळगली तर आपली आर्थिक व्यवस्था सुधारेल अशातला भाग नाही. ज्या ज्याठिकाणी गरज असेल त्याठिकाणी शासनाने निश्चितपणे दखल घेणे अत्यंत महत्वाचे आहे. मंदी आहे की नाही याचे काही निकष आहेत. आपला जीडीपी हा अत्यंत महत्वाचा आहे. मागील 2002 ते 2005 या वर्षात आपला जीडीपी 8 टक्के होता. 2005 ते 2008 या काळात तो 7 टक्के होता आणि केंद्र शासनाचा असा अंदाज आहे की, या वर्षी जीडीपी 6 टक्क्यावर येईल. ज्यावेळी जीडीपीचा दर कमी होतो त्याअर्थी काही प्रमाणात मंदी आहे हे शासनाने स्वीकारले आहे. काही वेळेला मंदी फार आहे असे भासवून आपल्याला काही अनुदान मिळते का याचा देखील प्रयत्न स्वार्थी लोकांकडून केला जातो आणि म्हणून मंदीतून बाहेर पडायचे आहे याकरिता ती रक्कम अनुदान म्हणून कोणाला द्यायची आहे हे शासनाने निश्चित निकष लावून ठरविले पाहिजे. शेअर बाजाराचा निर्देशांक कमी झाला म्हणून मंदी आणि शेअर बाजाराचा निर्देशांक वाढला म्हणून तेजी असे समजले जाते.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

हे एकमेव या मंदीचे निकष असू शकणार नाहीत. शेअर बाजारात ज्यांचा संबंध आहे असे संपूर्ण देशात फक्त एक टक्काच लोक असतील. म्हणून शेअर बाजाराचा निर्देशांक आणि त्याची तेजी-मंदी याच्या फार खोलात जाण्याची आवश्यकता नाही. परंतु दरडोई उत्पन्न कमी होणे किंवा कामगारांना कमी पगार घेऊन काम करा तरच कारखाने सुरु ठेवतो. किंवा टाटासारख्या उद्योजकांकडून आठवड्यांतून दोन दिवस कारखाना सक्तीने बंद ठेवणे हे निकष लावले तर या देशात मंदीची सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. ही मंदी सहा महिन्यांची असेल, दोन वर्षांची असेल किंवा आठ वर्षांची असेल, त्याबाबत आज तरी काहीच सांगता येणार नाही. पण कारखाना आठवड्यातून दोन तीन दिवस बंद राहिला तर त्याचा निश्चितपणे राज्यशासनाने विचार केला पाहिजे. कारण अशा वेळेस कामगारांना नवीन नोकरी मिळणे बंद झालेले असते व त्याचा ग्रोथ सुध्दा निगेटीव्ह राहील. सका बाजूला कारखाने किंवा उद्योग क्षेत्रात भांडवल वाढत असताना त्या प्रमाणात मात्र रोजगाराची उपलब्धता होत नाही. म्हणजे अगोदर कारखान्यात 60 माणसे असतील आणि रोबोट आणला तर तो या 60 माणसांचे काम एकटाच करणार अशा प्रकारे आपल्या देशाची संस्कृती आज रिमोट आणि रोबोट स्वरुपाची होत चालली आहे. म्हणून रोजगाराचा प्रश्न असेल त्या ठिकाणी एक यांत्रिक माणूस आणला तर तो 60 माणसांना घरी पाठविण्यास मदत करतो. या बाबीचा आर्थिक मंदीशी संबंध नसला तरी कायमस्वरुपी रोजगारासंबधीचा विचार मात्र प्रकर्षाने शासनाला करावा लागणार आहे. म्हणून ज्यावेळी दरडोई उत्पन्न कमी होते, जी.डी.पी. रेट कमी होतो, निगेटिव्ह एम्प्लॉयमेंट असते, रोजगार वाढत नाही, असलेल्या कामगारांना सक्तीने दोन-तीन दिवस थांबावे लागते किंवा कमी दराने नोकरी करा म्हणून सांगावे लागते. या सबंध बाबी विचारात घेतल्या तर मंदीचा मुकाबला आपल्याला करावा लागेल, ही वस्तुस्थिती आहे. लोखंडाचा भाव चार महिन्यापूर्वी 49 हजार रुपये टन इतका होता पण आता एक महिन्यापूर्वीचा भाव 29 हजार रुपये प्रति टन एवढा होता आणि आजचा भाव 34 हजार रुपये टनावर आला आहे. मला रेल्वेमध्ये एक तांब्याचा व्यापारी भेटला होता. तो म्हणाला की, देशात परिस्थिती फार कठीण आहे, कारण तांब्याचे भाव सन 1980 मध्ये होते तेवढे झालेले आहेत. सन 1980 मध्ये हाच भाव तांब्याचा होता आणि आज सन 2008 साल आहे तरी देखील 28 वर्षापूर्वीचाच भाव आहे. याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/

श्री. अरुण गुजराथी .....

जरी रोजगाराशी डायरेक्ट संबंध नसला तरी या सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. सोन्याच्या बाबतीत बोलायचे तर काल सोने जर 13 हजार रुपये तोळा असले तरी आज मात्र 12 हजार रुपये तोळा आहे, आणि तिसऱ्या दिवशी एकदम 13500 रुपये प्रति तोळा एवढे होते, ही परिस्थिती दोलायमान स्वरुपाची आहे. यापूर्वी दोन ते तीन टक्क्यांनीच तेजी-मंदी होत होती परंतु आता ही तेजी-मंदी 10-20 टक्क्यांवर यायला लागली. म्हणून अर्थव्यवस्थेत निश्चितपणे सुधारणेची आवश्यकता आहे. मी या निमित्ताने असे सुचविणार आहे की, मंदीचा मुकाबला करणे म्हणजे प्रथम त्यातला पहिला भाग असा आहे की, तेथील रोजगाराची निर्मिती, तसेच नितीयुक्त रोजगार निर्माण करुन देणे महत्वाचे आहे. मी उदाहरण म्हणून सांगणार आहे की, एका व्यक्तिचा एक रुपया विहिरीत पडला. तो रुपया काढण्यासाठी एका मजुराला विचारले असता तो म्हणाला की मी हा रुपया काढण्याची मजुरी दोन रुपये घेणार. त्यावर ती व्यक्ती म्हणाली की, एक रुपया काढण्यासाठी दोन रुपये मजुरी असेल तर मला तो रुपया नको. त्यावर तो मजूर म्हणाला की, आपला रुपया काढण्यासाठी दोन रुपये मी मागतो कारण मी विहिरीत उतरल्यानंत मला जे श्रम पडणार आहेत त्याचे ते दोन रुपये. अर्थात तुमचे पाच रुपये किंवा चांदीचे नाणे जरी पडले असते तरी माझी मजुरी दोनच रुपये राहिली असती...

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

तो म्हणाला मी दोन रुपयांपेक्षा कमी घेणार नाही. त्यावेळेस ज्याचा रुपया पडला होता तो म्हणाला माझा रुपया तू काढू नकोस. परंतु त्या ठिकाणी उभा असलेला दुसरा माणूस म्हणाला अरे त्याला एक रुपया काढू दे. एक रुपया काढला तर त्याला दोन रुपये मिळतील, विहिरीतील एक रुपयांचे चलन काढले तर बाजारात एकूण तीन रुपयांचे चलन फिरेल. बाजारात चलन फिरवणे ही देखील मंदीच्या काळातील एक उपाययोजना आहे.

सभापती महोदय, हिंदुस्तानातील पहिली रोजगार हमी योजना या राज्यात आली. त्यावेळी रोजगार हमी योजनेवर टीका होत होती. "रोजगार हमी, दाम कमी, अर्धे तुम्ही आणि अर्धे आम्ही." अशा प्रकारची टीका होत होती. रोजगार हमी योजनेत सर्वात मोठा भाग होता तो तो म्हणजे रोजगाराची निर्मिती व गरीब माणसाच्या हातात पैसे उपलब्ध करुन देणे असा या योजनेमागील उद्देश होता. रोजगार हमी योजनेतून रोजगाराची निर्मिती होईल परंतु गरीब माणसाच्या हातात पैसे पडतील व त्यामुळे त्याची खरेदीची शक्ती वाढेल. त्यामुळे मंदीवरील अत्यंत महत्वाचा उपाय खरेदी शक्ती वाढवणे हा आहे.

सभापती महोदय, शासनाने यासंदर्भात निश्चितपणे अनुदान दिले पाहिजे. अनुदान कोणाला आणि कसे द्यावयाचे हे अत्यंत महत्वपूर्ण आहे. व्हॅटच्या संदर्भातील विषय असेल, उद्योगधंदे अडचणीत असेल तर बाबारे व्हॅटचे वर्षभराच्या कराचे कलेक्शन तू घरात ठेव त्या व्हॅटचे पैसे तीन वर्षानंतर आम्हाला दिले तरी चालतील. मंदीवरील उपाययोजनेसाठी भांडवल महत्वाचे आहे. केवळ कर्ज देऊन चलणार नाही. काही ठिकाणी टेंपररी इक्वीटी दोन वर्षासाठी, तीन वर्षासाठी दिली तर चांगले होईल. मी असे म्हणणार नाही की, शासनाने आपले पैसे कुठल्याही प्रकारचा डिव्हीडंट, व्याज न देता ठेवावे. परंतु शासन देखील एक व्यवस्था आहे. सर्वांना न्याय देण्याच्या संदर्भात शासन एक व्यवस्था आहे. म्हणून भांडवलाची उपलब्धता निर्माण करणे, आपण आता जे कर घेत आहोत ते कर आता आपण रोखीत न घेता दोन तीन वर्षात रक्कम भरा असे सांगणे हे देखील फार महत्वाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

सभापती महोदय, क्रियेशन ऑफ इन्फ्रास्ट्रक्चरच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. जोपर्यंत आपण पायाभूत विकास सुविधा देऊ शकत नाही तोपर्यंत आपण जागतीक स्पर्धेला तोंड देऊ शकत नाही. म्हणून पायाभूत विकास सुविधा निर्माण करणे अत्यंत महत्वाचे आहे. मला माननीय मंत्रीमहोदयांना सांगावयाचे आहे की, शासनाकडून देण्यात येणार अनुदान हे कॅपिटल इम्पलॉईला देण्यात येते त्याऐवजी ते लेबर इम्पलॉईला दिले पाहिजे. कॅपिटल इम्पलॉई कोटीमध्ये काम करतात तर लेबर कमी किमतीत काम करीत असतात. ते सुध्दा शक्य नसेल तर काही प्रमाणात कॅपिटल इम्पलॉई आणि काही प्रमाणात लेबर इम्पलाईच्या संदर्भातील निर्णय शासनाला घ्यावा लागेल.

सभापती महोदय, आपल्याला जर उद्योगधंदे प्रगतीवर आणावयाचे असतील तर कृषी अर्थव्यवस्था सुध्दा निर्माण केली पाहिजे. जोपर्यंत कृषी अर्थव्यवस्था बळकट होत नाही तोपर्यंत उद्योगधंद्याला चालणा मिळणार नाही. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी कापसाला 2850 ते 3000 रुपये प्रती क्विंटल भाव दिलेला आहे. आपण कापसाला जेवढा भाव दिलेला आहे तेवढा भाव आज जगात कोठेच देण्यात आलेला नाही. परंतु यामध्यमातून जी काही सबसिडी दिली जाईल ती शेतक-यांपर्यंत जाईल व त्याच्या माध्यमातून कृषी अर्थव्यवस्था बळकट होईल हा उद्देश त्यामागे आहे. त्यामुळे शेती सुधारणा हा देखील फार महत्वाचा भाग आहे. शेतीमध्ये सुधारणा झाली नाही तर त्याचा लाभ उद्योगांना होणार नाही. त्यामुळे कॉस्ट, कॉलीटी आणि कॉन्टीटी यासंदर्भात आपल्याला निश्चितपणे विचार करावा लागणार आहे. या देशात 66 टक्के लोक शेतामध्ये काम करतात. जर सर्व्हीस सेक्टर आणि इंडस्ट्रीअल सेक्टरमध्ये उर्वरित 40 टक्के देखील इम्पलॉई काम करीत नाहीत. आपण उद्योग धंद्याचा विचार करीत असतांना आपण केवळ 35 ते 40 टक्क्याचा विचार करीत आहोत. जे 66 टक्के इम्पलॉई शेतीवर अवलंबून आहेत त्यांचा विचार करुन नंतर या 40 टक्क्यांचा विचार केला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, काल मी महाराष्ट्र टाईम्स मधील स्वामी नाथन यांचा एक लेख वाचला त्यामध्ये त्यांनी म्हटले होते की, एसइझेड प्रमाणे तुम्ही एसएझेड तयार करा, स्पेशल ॲग्रीकल्चरल झोन तयार करा. त्यामुळे ही बाब शासनाने विचारात घ्यावी असे मला वाटते.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, आज उद्योगधंदे का बंद पडत आहेत. त्याचे कारण म्हणजे या उद्योगधंद्यामागे लिक्विडीटी नाही. प्रॉपर्टी कोटयावधी रुपयांची परंतु लिक्विडीटी लाखाची देखील नाही अशी परिस्थिती आहे. माल विकल्यानंतर हातात पैसे येतील किंवा नाही अशी शंका पुरवठादाराला किंवा कारखानाला येते. कारखानदार म्हणतो Befor selling the goods, I am Seller. After Selling the goods I am beggar. माल विकल्यानंतर घरात पैसे येतील किंवा नाही हे याची त्यास खात्री नाही. मग तो तुकडे करुन देतो. आता 50 हजार रुपयांचा चेक घ्या. त्या चेकवर 15 दिवसानंतरची तारीख टाकून देतो. ती तारीख जवळ येण्यापूर्वी दोन दिवस अगोदर सांगतो की, चेक बँकेत जमा करु नका.

सभापती महोदय, आज प्रॉपर्टीच्या किंमती कमी होत आहेत. त्याच्याशी आपणास काही देणे घेणे नाही. आपण लिक्विडीटी वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी माझी मंत्रिमहोदयांना सूचना आहे. कोणाचीही चूक नसताना काही पतपेढ्या व बँका लिक्विडेशनमध्ये जात आहेत. संचालकाच्या नातेवाईकांना आणि मित्रपरिवारांना पत नसताना कर्जाचे वाटप करायचे आणि नंतर बँक तोट्यात काढायची. अशा बँकेत ज्यांचे पैसे असतात त्यांची लिक्विडीटी संपली. तेव्हा याचा देखील विचार होणे आवश्यक आहे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सुदैवाने महागाई थोडी कमी झाली. नाहीतर इतकी महागाई झाली होती की, उत्पन्नाच्या 30 ते 35 टक्के रक्कम किचन बजेटमध्ये जात होती. महागाई ही गरिबांवर अप्रत्यक्षरित्या कर आहे. Indirect taxation for the poor. महागाई तूर्त कमी झालेली आहे, ती वाढणार नाही याची सरकारने काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, आज समाजात दुसरे एक चित्र दिसत आहे, हॉटेल व्यवसाय जोरात चालत आहे,पेट्रोल पंपावर गर्दी आहे, पीक अवर्समध्ये टॅक्सीज आणि रिक्षा मिळत नाहीत, रस्त्यावर भरपूर वाहने येत आहेत, दारुची दुकाने मोठ्या प्रमाणावर चालू आहेत, प्रत्येकाच्या कानाला मोबाईल लावलेले पहायला मिळत आहेत असे चित्र पाहिल्यानंतर खरेच मंदी आहे काय असा प्रश्न निर्माण होतो. पाच-दहा टक्के लोकांच्या बाबतीत हे सर्व लागू असेल. पण हे चित्र पाहिल्यानंतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

असे वाटते की, कुठे मंदी दिसते आहे, बाजारात तर तेजी आहे. मंदीची झळ ही फिक्स इन्कम ग्रुप आणि गरीब लोकांना लागते, ती श्रीमंत लोकांना लागत नाही. उलट मंदी आली की, श्रीमंतांना लक्झरी कमी दरात मिळते. म्हणजे श्रीमंतांचा फायदा आहे. एखादी लक्झरी 10 हजार रुपयांस मिळत असेल तर ती त्यांना 5-6 हजार रुपयांस मिळते. म्हणजे चैनीसाठी मंदी ही फार चांगली आहे असे म्हणणारा वर्गसुध्दा आपल्याकडे आहे.

सभापती महोदय, या जागतिक मंदीवर मात करण्यासाठी केंद्र शासनाने 20 हजार कोटी रुपयांचे बेलआऊट पॅकेज जाहीर केले. या बेलआऊट पॅकेजचे आपण स्वागत केले पाहिजे. 100 - 110 कोटी लोकसंख्या असलेल्या देशात केवळ 20 हजार कोटी रुपयांचे पॅकेज देऊन चालणार नाही तर त्यासाठी केंद्र शासनाकडे हे बेलआऊट पॅकेज वाढवून देण्यासाठी मागणी केली पाहिजे.

सभापती महोदय, मध्यंतरी निर्यातीवर फार मोठा परिणाम झाला. रुपया इतका मजबूत झाला की त्यामुळे आपली निर्यात घटली. रुपया फार मजबूत होत आहे म्हणून रिझर्व्ह बँक आणि इतर इन्स्टीटयुशन बाजारात आल्या आणि त्यांनी डॉलर्सची खरेदी केली. त्यामुळे डॉलर वाढत गेला. म्हणून निर्यातीच्या आणि आयातीच्या संदर्भातील धोरण चांगल्या पध्दतीने स्वीकारले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत छाजेड यांनी दोन-तीन मुद्दे फार चांगल्या पध्दतीने मांडले. आज मुंबई शहरात आणि अन्य मोठ्या शहरात मोठ्या प्रमाणावर रोजगार दिसत आहे तो कन्स्ट्रक्शनमुळे दिसत आहे. परंतु रिअल इस्टेटवाले म्हणत आहेत की, फार मोठ्या प्रमाणावर मंदी आहे. परंतु त्यांना अजून मंदीची झळ बसलेली नाही. कारण त्यांनी सुरुवातीलाच इतक्या मोठ्या प्रमाणावर भाव वाढविले होते की त्यांनी त्यामध्ये काही घट केली तरी त्यांचे काही नुकसान होणार नाही. सुरुवातीला पाच हजार रुपये स्वे.फूट भाव होता तो त्यांनी वीस हजार रुपये स्वे.फूटवर नेला. आता तो भाव बीस हजार रुपयांवरुन अठरा हजार रुपयांवर आल्यावर मंदी आहे असे त्यांचे रडणे मला योग्य वाटत नाही. तेव्हा यासर्व गोष्टींचा राज्य सरकारने विचार करणे आवश्यक आहे. केवळ केंद्र सरकारच्या मदतीवर अवलंबून न राहता राज्य सरकारने स्वत:ची जबाबदारी ओळखून केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यासाठी एक बेलआऊट पॅकेज दिले पाहिजे. अशाप्रकारचे पॅकेज देताना रोजगाराचा विषय लक्षात घ्यावा अशी माझी राज्य सरकारला सूचना आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) :सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. गेल्या अनेक वर्षानंतर या सभागृहात या विषयावर चर्चा उपस्थित केल्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड ,उल्हास पवार आणि इतरही सन्माननीय सदस्यांचे मी आभार मानतो व त्यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, अमेरिकेमध्ये जागतिक मंदी सुरु झाल्यामुळे त्याचे परिणाम भारतावरसुध्दा झालेले आहेत त्यामुळे विविध आर्थिक धोरणासबंधीची चर्चा आज होत आहे. मी देखील एका पक्षाचा कार्यकर्ता असल्यामुळे एका स्कूल ऑफ थॉटस्ला मी बिलॉग करतो त्या थॉटसमध्ये जे आर्थिक विचार आहेत त्या विचाराशी मी देखील कटीबध्द आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील हे डाव्या विचारांचे आहेत, कॉग्रेसने समाजवाद स्वीकारला आहे परंतु आपल्या सर्वाना आर्थिक चिंतन करुन राज्यापुरता हा प्रश्न जर सोडवावयाचा असेल तर काय केले पाहिजे ? हा बराचसा प्रश्न केन्द्र सरकारशी सबंधित आहे. राज्या पुरता प्रश्न सोडवत असतांना काही मार्ग काढावयाचा असेल आणि कामगारांना, शेतक-यांना, गरीब लोकांना मंदीपासून वाचवावयाचे असेल तर कोणते मार्ग यशस्वी होऊ शकतात याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चा अत्यंत महत्वाची आहे त्यामुळे ही चर्चा लोकांपर्यत पोहोचली पाहिजे. 1947 साली देशाला स्वातंत्र्य मिळाले होते. त्यावेळी कै. पंडित जवाहरलाल नेहरु पंतप्रधान झाले होते. रशियाच्या आर्थिक विचारांची छाप कै. पंडित नेहरुच्या विचारावर होती. रशियामध्ये त्यावेळी साम्यवाद होता. चीनमध्ये मार्क्सवादाचा विचार आहे. रशियामधील स्टॅलिन आणि गार्बाचेव्ह यांच्या संदर्भातील विषयामध्ये मी आता जाऊ इच्छित नाही. परतु कम्युनिस्ट विचारांमध्ये आर्थिक बाबतीत वेगळया प्रकारची मतभिन्नता होती. कै. पंडित नेहरु यांनी रशियाचे मॉडेल भारताकरिता स्वीकारले होते. त्यावेळी प्रत्येक क्षेत्रात सरकारनेच काम केले पाहिजे अशा प्रकारचे धोरण ठरविण्यात आले होते. नोटा छापण्याचा कारखानासुध्दा सरकारने आपल्या मालाकीचाच ठेवला पाहिजे अशा प्रकारचे धोरण ठरविण्यात आले असून ते बरोबर आहे. डिफेन्ससाठी ज्या सिक्रेट वस्तू तयार करावयाच्या असतात व ती कार्यवाही गोपनीय असल्यामुळे ती सरकारनेच केली पाहिजे ते काम बाहेर देता कामा नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

सभापती महोदय कै.पंडित जवाहरलाल नेहरु हे मोठे नेते होते तसेच ते द्रष्टे होते. या ठिकाणी भाषण करीत असतांना मला त्यांच्यावर वा त्यांच्या विचारावर प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे कोणतीही टीका करावयाची नाही.परंतु 21 व्या शतकात जर जावयाचे असेल आणि पाश्चात्त्य देशामध्ये होणा-या आर्थिक स्थित्यंतरावर जर विचार करावयाचा असेल तर आज मी एका विचाराचा आहे.दुसरी व्यक्ती दुस-या विचाराची आहे अशा प्रकारे विचारांच्या चौकटीतून किंबहुना पुस्तकात लिहिलेल्या अर्थशास्त्रावरुन आता देशाचे प्रश्न सुटू शकणार नाहीत. पंडित दीन दयाल उपाध्याय , डॉ.शामाप्रसाद मुखर्जी किंवा गोळवलकर गुरुजी यांच्या आर्थिक विचारांचाच मी आहे. आपण समाजवादी विचाराचे आहात. पंडित जवाहरलाल नेहरुचे जे विचार होते ते विचार सुध्दा आपले असू शकतील.. मी जगातील 35 देशामध्ये जाऊन आलो आहे त्याचबरोबर अमेरिकेमध्ये पुष्कळ फिरलो आहे. काही दिवसापूर्वीच मी इस्त्रायलला जाऊन आलो आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने जो विषय मांडण्यात आला आहे आणि ज्या विषयावर मला बोलावयाला मिळाले आहे तोच माझ्या सर्वात आवडीचा विषय आहे. कोणत्याही पुस्तकात लिहिलेल्या आर्थिक विचारामधून 21 व्या शतकातील देशाचे अर्थकारण होऊ शकत नाही हे जागतिक सत्य आहे. एखाद्या पुस्तकात लिहिले असेल की हा हत्ती आहे म्हणून मी म्हणावयाचे की हा हत्ती आहे असे म्हणून चालणार नाही. जर प्रत्यक्ष डोळयांनी तो हत्ती दिसला तरच तो हत्ती आहे आणि डोळयांनी जर तो बैल दिसला तर तो बैलच आहे. असे म्हणूनच त्याचा विचार करावा लागेल.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. गडकरी ....

पंडितजींनी ज्याप्रमाणे हॉटेल्स उद्योगामध्ये पैसे घातले तसेच त्यांनी धरणे बांधली, पूल बांधले कारण ते आवश्यक होते. तसेच भिलई सारखे स्टील प्लँट तयार केले, पॉवर प्लँट देखील सरकारने टाकले. महोदय, मध्यंतरी मुंबई विद्यापीठाच्या एक प्राचार्या आहेत त्यांना मी या संदर्भात मला मदत करण्यास सांगितले आणि त्यांनीही मला चांगल्या प्रकारे मदत केली आणि आकडेवारी-माहिती काढून दिली. स्वातंत्र्यानंतर जवळपास 2006 सालापर्यंत 5 लाख 60 कोटीची सार्वजनिक आणि सरकारी क्षेत्रामध्ये आपण गुंतवणूक केली त्यातील 98 टक्के गुंतवणूक ही आज डेड झालेली आहे. ती गुंतवणूक इतकी मृत झाली की, त्यातून व्याज आणि नफा देखील निघत नाही व ॲसेटस् डेड झाल्या आहेत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशाची पहिली प्रॉयॉरिटी कोणती होती ते पाहिले पाहिजे. आपल्या देशाची विकासाची क्षेत्रे कोणती होती ? आपली विकासाची क्षेत्रे दोन आहेत. एक म्हणजे कृषी क्षेत्र आणि दुसरे उद्योग क्षेत्र. उद्योग क्षेत्रात विकास करावयाचा झाला तर त्यासाठी 4 गोष्टी आवश्यक आहेत. एक म्हणजे पाणी, दुसरी म्हणजे पॉवर, तिसरी ट्रान्सपोर्ट आणि चौथी कम्युनिकेशन. तसेच कृषी क्षेत्रामध्ये विकास करावयाचा झाला तर त्यासाठी देखील चार गोष्टी आवश्यक आहेत आणि त्या म्हणजे पाणी, सिंचन, उत्तम बी-बियाणे आणि चौथे अतिशय महत्त्वाचे आहे व ते म्हणजे शेतीतून उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग व त्यासाठी आवश्यक त्या सोयी, त्यात निर्यातीच्याही सोयी असल्या पाहिजेत. परंतु दुर्दैवाने आजही त्याकडे आम्ही पुरेसे लक्ष दिलेले नाही हे मला आवर्जून येथे सांगितले पाहिजे. केंद्रामध्ये बाजपेयी सरकार होते तेव्हा त्यांनी पंतप्रधान ग्रामसडक योजना तयार केली आणि माझ्या अध्यक्षतेखाली त्यासाठी एक समिती तयार केली होती. सभापती महोदय, देशामध्ये 5 लाख 60 हजार गावे आहेत पण आजही त्यातील अडीच लाखापेक्षाही जास्त गावांमध्ये रस्ते नाहीत. ग्रामीण भागातील विकासाला प्राधान्य मिळाले नाही आणि मोठमोठ्या स्टील प्लँटस् व आयटीसी सारखी हॉटेल्स सरकारने निर्माण केली. परिणामी 5 लाख 60 हजार कोटीची गुंतवणूक ही डेड इन्व्हेस्टमेंट झाली. अर्थात सगळेच असे झाले असेही नाही. सभापती महोदय, आज भेल नावाची संस्था भारत सरकारची आहे आणि ती टर्बाईन आणि बॉयलर तयार करण्याचे काम करते. या भेलकडे तीन वर्षे पुरतील एवढ्या कामाच्या ऑर्डस पडलेल्या आहेत. पण ते त्या पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे चीनमधील जी शांघाय इलेक्ट्रिक कंपनी आहे तिच्याकडे आपल्याकडील अनेक कंपन्यांनी हे काम

..... एएए 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेले आहे. या कंपनीची उत्पादनक्षमता दरवर्षी 60 हजार मे.वॅ.ची वीज उपकरणे बनविण्याची आहे. हिंदुस्थानातील उद्योजकांनी चीनमधील तीन कंपन्यांना ज्या ऑर्डर्स दिल्या आहेत त्यांची किंमत 1 लाख 10 हजार कोटी रूपयांची आहे आणि एक प्रकारे आज चीनची इकॉनॉमी आपण चालवित आहोत असे म्हटले तर आश्चर्य वाटू नये. सभापती महोदय, एकट्या रिलायन्सने, श्री.अनिल अंबानींच्या कंपनीने 25 हजार कोटीच्या ऑर्डर्स चीनच्या या शांघाय इलेक्ट्रिक कंपनीला दिल्या आहेत. माझ्या डोक्यामध्ये एक प्रश्न आला की, टेक्नॉलॉजीमध्ये ज्या भेलचे सीमेन्स कंपनीशी जॉईन्ट व्हेंचर आहे तर ते या कंपनीचे एक्स्पान्शन का करीत नाही ? का देशातील ऑर्डर्स बाहेर चालल्या आहेत ? पण ती कंपनी पब्लिक अंडरटेकिंग आहे आणि मंत्री राज्य करतात. प्रत्येक प्रस्ताव मंजुरीसाठी कॅबिनेटपुढे जावा लागतो. येथे तर चार-चार महिने त्यासंबंधीची टिप्पणीच आणता येत नाही. परिणामी लवकर निर्णयच होत नाहीत. म्हणून एक गोष्ट खरी आहे की, जे चांगले होते त्याला आपण एक्स्पान्शन केले नाही. आणि पॉवर प्रोजेक्टमध्ये तर आपण हे भोगलेच आहे. मी जेव्हा बांधकाम मंत्री होतो तेव्हा जगामध्ये तीन गोष्टींबाबत चर्चा सुरू होती. एक म्हणजे खाजगीकरण, दुसरे म्हणजे जागतिकीकरण आणि तिसरी उदारीकरण. मी टोल आकारून उड्डाणपूल बांधण्याची कल्पना पुढे आणली आणि राबविली तेव्हा माझ्यावर इतकी टीका करण्यात आली की विचारायची सोय नाही. माझ्या पक्षातून देखील तेव्हा माझ्यावर टीका झाली. आमचे एक मोठे चिंतक आहेत ते तर मला म्हणाले की, टोलमधून पैसे घेऊन असे पूल बांधण्याची गरज काय आहे ? कशासाठी अशा प्रकारे पैसे गोळा करून पूल बांधतोस ? मी त्यांना म्हटले की, मी हे पूल अशासाठी बांधतो आहे की, मी मागास भागातील माणूस आहे. मी मुंबईतील उड्डाण पूल कॅपिटल मार्केटमधील पैशातून बांधले. आणि संपूर्ण बजेट मी खेड्याकडे वळविले. 16 हजार गावांना पक्के रस्ते करण्यासाठी हे बजेट मी ग्रामीण भागाकडे वळविले. गडचिरोली जिल्ह्यात मी 2.60 कोटीचे रस्ते बांधले. कारण मी हा विचार केला की, ग्रामीण भागातील माणसाला, गरीब माणसाला, ज्याला आजपर्यंत न्याय मिळाला नाही त्याला न्याय दिला पाहिजे. ते करायचे असेल तर जेथे पर कॅपिटा इन्कम आणि जेडीपी जास्त आहे तेथे त्यांच्यासाठी If you want good service, you have to pay for it. हे तत्त्व लागू केले. अशा प्रकारे सरकारचा सगळा पैसा मी गरीब माणसासाठी वळविला. सभापती महोदय, "Inspiration behind this was to give

..... एएए 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

priority to rural and poor sector of the society." गरीब आणि शोषित पीडित माणसाकडे बजेटचा स्रोत वळविला पाहिजे. नागपूर, पुणे, मुंबई सारख्या शहरामध्ये सरकारने स्वत:चा पैसा खर्च करण्याची गरज नाही. ग्रामीण भागामध्ये, विशेषत: गडचिरोली जिल्ह्यात आजही अशी स्थिती आहे. ... श्री.सुरेश द्वादशीवार यांनी एक पुस्तक लिहिले आहे की सिरोंचा भागामध्ये आजही तेथील लोक मिठाऐवजी लाल मुंग्या बारीक करून खातात. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 3बी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

सभापती महोदय, खेडयापाडयामध्ये 18 तास लोडशेडींग असते. शाळा आहे तर शाळेची इमारत नाही, इमारत आणि शिक्षक असतील तर विद्यार्थी नाहीत. आणि तिन्ही असतील तर शिक्षण नाही. अशाप्रकारची परिस्थिती ग्रामीण भागात आहे. सभापती महोदय, दवाखान्यांची अशी स्थिती आहे की, 80 टक्के दवाखान्यांमध्ये डॉक्टर नाहीत. ते गावात रहात नाहीत कुणाला भेटत नाहीत. कुणाचेही राज्य येऊ द्या. हे डॉक्टर लोक राजकारणी लोकांचे आवडते आहेत. आम्ही काय पाप करतो? आमच्या येथील डॉक्टरची बदली गडचिरोली जिल्हयात झाली की ती बदली रद्द करण्यासाठी आम्ही मंत्र्यांकडे जातो. त्यांच्याकडे डॉक्टर नाहीत, औषधे नाहीत, शिक्षक नाहीत. श्री. शरद जोशी म्हणतात, त्यांच्या विचारात तथ्य आहे. ते म्हणतात "खेडयातील लोक हे भारतातील लोक आहेत आणि मुंबई, पुणे नागपूरातील लोक इंडियातील आहेत". त्यांच्याकडे शेअर मार्केटचा इंडेक्स आहे. दुर्दैवाची स्थिती अशी की, मध्यंतरी शेअर मार्केटचा इंडेक्टस आकाशाला छेदत नव्हता. दुसरीकडे शेतकरी आत्महत्त्या करीत होते. एकीकडे मॉलमध्ये चकचकाट होता आणि दुसरीकडे तरुण बेरोजगार मुले रोजगार नाही म्हणून आत्महत्त्या करीत होती. या स्थितीतून मार्ग काढावयाचा असेल तर जगातील सर्व अर्थशास्त्रज्ञांनी लिहिले आहे की, किमान काही गोष्टींच्या बाबतीत राज्य सरकारने त्यांचे धोरण ठरविले पाहिजे. यामध्ये पहिली गोष्ट कोणती असेल तर समाजातील जो गरीब, दलित, शोषित, पिडीत माणूस आहे, जो गावात रहातो. गांधीजींनी म्हटले होते ते खरे आहे. ते म्हणाले की, "We want maximum production with the involvement of maximum number of person." "या देशात जास्तीत जास्त लोकांच्या सहभागातून जास्तीत जास्त उत्पादन झाले पाहिजे." आणि पंडित जवाहरलाल नेहरुंचे असे सूत्र होते की, "We want maximum production with the help of technology." दोन्ही विचारांना आपापल्या परीने महत्व आहे. परंतु गांधीजींचे विचार आपण विसरलो.

सभापती महोदय, मी बांबूपासून उत्पादन करणाऱ्या एका संस्थेचा अध्यक्ष आहे. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेबांना घेऊन मी भंडाऱ्याला गेलो होतो. एकटया चायनामध्ये बांबूपासून उत्पादन करणाऱ्या 50 लाख लोकांना रोजगार मिळाला. माननीय मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण साहेब बांबूपासून बनविण्यात आलेल्या वस्तू पाहून खूप प्रभावीत झाले, त्यावेळी ते उद्योगमंत्री होते. माननीय वनमंत्री श्री. बबनराव पाचपुते यांच्याकडे बैठक झाली त्यावेळी मी म्हटले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

की, बांबू व्यवसायामध्ये गरीब, आदिवासी लोक काम करतात. बांबू हे कंस्ट्रक्शनकरिता वापरले जाऊ शकते, बांबूचे धर बनविले जाऊ शकते. जंगलातील या बांबूवर आधारीत उद्योगामधून 20 ते 25 लाख लोकांना व्यवसाय मिळाला पाहिजे. भंडारा जिल्हयात बांबूपासून चटया बनविल्या जातात. एकटया डब्लूसीएलमध्ये करोडो रुपयांच्या चटया विकत घेतल्या जात होत्या. त्या चटया आता घेणे बंद झाले. तेथील चटया बनविणाऱ्या कामगारांच्या संघटनेचे नेते आमचे एक आमदार आहेत. हळू हळू बांबूचा वापर कमी होत चालला, आणि हे कामगार बेकार झाले. म्हणून याबाबत "मॉर्डनायझेशन अँड वेस्टर्नायझेशन" असा एक प्रचलित शब्द आहे. आम्ही वेस्टर्नायझेशनला विरोध करुन मॉडर्नायझेशनला पाठिंबा दिला पाहिजे. कॉम्प्युटरायझेशन असले पाहिजे, ही टेक्नॉलॉजी असली पाहिजे. परंतु कुठे? महानगरपालिकेचा कचरा उचलून त्यावर खत तयार करण्यासाठी कॉप्युटर टेक्नॉलॉजीची गरज काय? त्यासाठी आपल्याकडे तंत्रज्ञान उपलब्ध आहे. परंतु तेथील सफाई कामगाराला बाजूला करुन त्याचा रोजगार हिसकावून घेता कामा नये. कुठे मॉडर्नायझेशन करावयाचे आणि कुठे करावयाचे नाही याचे आपण पथ्य पाळले पाहिजे.

सभापती महोदय, मी फक्त पाच मुद्दे सांगून माझे भाषण संपविणार आहे. या देशामध्ये इन्फ्रास्ट्रक्चरची कामे सुरु करा असे म्हटले जाते. मला भारतातील दोन उद्योगपती भेटले त्यांनी दोन सूचना केल्या. पहिली सूचना अशी की, जर केंद्र व राज्य सरकारने पुढाकार घेतला आणि हाऊसिंग लोन 6 किंवा 7 टक्क्यांनी देण्यास सुरुवात केली तर उद्योग मंदीमुळे मागे पडलेल्या स्टील आणि सिमेंटच्या कोअर सेक्टरमध्ये एकदम वाढ होईल. यामध्ये 10 टक्के व्याज दराने कर्ज देणाऱ्या बँकांचे 4 टक्क्यांचे नुकसान होईल. हे जर सरकारने दोन वर्षे सहन केले तर 15 हजार कोटी रुपये लागतील. परंतु यामधून बेसिक कोअर इंडस्ट्री एकदम वरच्या स्तरावर येईल. सभापती महोदय, तिसरी सूचना वादाची आहे. मी त्या गोष्टीचा समर्थक आहे. काही गोष्टी सत्य बोलाव्या लागतात. त्या आपण मानल्या पाहिजेत. स्वित्झर्लंडच्या बँकामध्ये भारतीय लोकांचे भरपूर पैसे आहेत. आतापर्यंत जागतिक मंदीमुळे त्या पैश्यावर शून्य टक्के व्याज मिळत होते, आता निगेटीव्ह व्याज सुरु झाले आहे.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

म्हणजे पैसे बँकांमध्ये टाकल्यावर 2 टक्के, 3 टक्के व्याज मिळण्याऐवजी ते मायनस होत चालले आहे. डॉलर आणि रुपयाच्या फ्लक्च्युएशनमुळे ते अस्वस्थ आहेत. माझी विनंती आहे की, जशी आपण व्हालंटरी योजना जाहीर करतो त्याप्रमाणे एकदा योजना जाहीर करा की, जगात जेथे जेथे पैसे असतील ते त्यांनी आणावेत आणि ते पैसे त्यांनी सरकारजमा करावेत. हे वादाचे मुद्दे आहेत. पण या परिस्थितीत आपल्या शेअर मार्केटचा डॉलरमधील आपला पैसा अमेरिकेतील उद्योगपतींनी काढून घेतला, ब्रिटनच्या उद्योगपतींनी पैसा काढून घेतला त्यामुळे शेअर मार्केट एकदम डाऊन झाले. त्यामुळे सगळे डाऊन झाले. दुर्दैव असे आहे की, तुम्ही आहात कसे यापेक्षा दिसता कसे याला महत्व आहे. शेअर मार्केट डाऊन झाल्यानंतर लगेच सगळे लोक आपले भाग पाडावयास लागले. त्यांनी मला असे सुचविले की, त्यांना 5 वर्षाचे बॉण्ड द्यावेत आणि पाच वर्षानंतर रिझर्व बँकेने त्यांचे पैसे 5 टक्के व्याजाने परत करावयाचे. ते पैसे देतील आणि आपण त्यांना बॉण्ड देऊ. त्यांचा असा अंदाज आहे की, या देशामध्ये कमीतकमी 5 लाख 80 हजार कोटी पेक्षा जास्त पैसे बाहेरुन येतील आणि आपली इकॉनॉमी वर येईल. मध्यंतरी रिझर्व बँकेने प्रयत्न केला. 70-80 हजार कोटी रुपये एकदा टाकले परंतु वर काही दिसत नाही. त्यामुळे शासनाने याचा विचार करावा.

सभापती महोदय, आपल्या सगळ्या सेक्टर्समध्ये कृषी सेक्टर महत्वाचे आहे. आपण त्याला महत्व दिलेले नाही. केंद्र सरकारमध्ये सिंचन खाते नाही. ते जलसंवर्धन खाते आहे. एका एकराला जेव्हा पाणी मिळते त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न अडीचपटीने वाढते. एकदा मी सातारा, सांगली येथून सोलापूरला जावयास निघालो. मला तो रस्ता नक्की माहीत नाही. त्यावेळी आटपाडी, सांगोला वगैरे भागातून गेलो. त्यावेळी आचारसंहिता असल्यामुळे मी खाजगी गाडीतून प्रवास करीत होतो. माझ्या शेजारी मुख्य अभियंता बसलेले होते. मी त्यांना सांगितले की, या गावात पाणी आले आहे हे मी सांगू शकतो. तुम्ही फक्त मला माहिती सांगा. मी सोलापूरला जाईपर्यंत माझे सगळे भविष्य खरे ठरले. त्या मुख्य अभियंत्यांनी मला प्रश्न विचारला की, पश्चिम महाराष्ट्रातील हा सगळा दुष्काळी भाग असताना प्रत्येक वेळी आपण हे कसे ओळखत होता ? मी त्यांना सांगितले की, ज्या गावात पाणी गेले त्या गावात सिमेंट कॉन्क्रीटची दुकाने होती. ज्या गावात पाणी गेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. नितीन गडकरी ....

तेथील हॉटेलमध्ये गर्दी होती, ज्या गावात पाणी गेले तेथील कपड्याच्या दुकानांमध्ये गर्दी होती. ज्या गावात पाणी नव्हते त्या गावात टिनाचा पानठेला होता आणि दुकानात गर्दी नव्हती. लोकांचे चेहरे सुकले होते. जोपर्यंत शेतीला पाणी मिळत नाही तोपर्यंत गावाचा विकास होऊ शकत नाही. ही विकासाची पहिली किल्ली आहे. आज इरिगेशनमध्ये आजच्या किमतीनुसार महाराष्ट्रात 80 हजार कोटी रुपयांचे प्रकल्प प्रलंबित आहेत. त्याची किंमत वाढत आहे. गोसीखूर्द प्रकल्प 672 कोटी रुपयांमध्ये होणार होता त्याची किंमत 8970 कोटी रुपये झालेली आहे. विलंब झाल्यामुळे किंमत वाढलेली आहे. आता इरिगेशन आणि रस्ते प्रकल्पामधील 40 टक्के इन्व्हेस्टमेंट ही स्टील आणि सिमेंटवर आहे आणि सिमेंटमध्ये कारटेल झालेले आहे. 100 वेळा दरोडेखोरांना माफी द्या पण त्यापेक्षाही सिमेंट उद्यागांचे मालक बेकार आणि बदमाश आहेत. हे त्यांच्यापेक्षा वर आहेत. आम्ही एक निर्णय घेतला. तो निर्णय घेणाऱ्यामध्ये मी होतो. आम्ही असा निर्णय घेतला की, सिमेंटमध्ये 30 टक्के फ्लाय ॲश घालावी. थर्मल पॉवर स्टेशनमधून कोळशाची जी राख बाहेर निघते. त्यासंदर्भात या विधिमंडळामध्ये पर्यावरणाच्या संदर्भातील प्रश्न येत होते. मी काही इंजिनिअर नाही. माझा समज असा होता की, जेव्हा सिमेंटमध्ये फ्लाय ॲश टाकतो तेव्हा सिमेंटमध्ये भेसळ होते. एखादी इमारत पडली तर असे म्हणत होतो की, काय करणार, सिमेंटमध्ये राख मिसळतात म्हणून असे होते. सत्य असे आहे की, सिमेंटमध्ये राख टाकल्यामुळे सिमेंटची स्ट्रेंग्थ वाढते. वरळी-वांद्रे पुलाचे जे काम सुरु आहे त्या ठिकाणी समुद्रामध्ये जे कॉन्क्रीटचे काम चालू आहे त्या कामासाठी जे सिमेंट बंधनकारक केले आहे ते 30 टक्के फ्लाय ॲशवालेच असले पाहिजे. ते प्युअर सिमेंट नाही. चंद्रपूरचे सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. आमच्याकडे हजारो ट्रक फ्लाय ॲश फुकट घेऊन जातात. चंद्रपूरचे एल ॲंड टी, माणिकगढ यांची भांडणे सुरु आहेत. ही फ्लाय ॲश या कंपनीला द्या, त्या कंपनीला द्या हे सांगण्यासाठी खासदार-आमदार दिल्लीपर्यंत जातात. एकेकाळी जी फ्लाय ॲश सर्व पर्यावरणाचा सत्यानाश करावयाची ती फ्लाय ॲश घेण्यासाठी लाईन लागलेली आहे. त्यासाठी आमदार,खासदार आणि नेत्यांचे फोन जातात. ही फ्लाय ॲश एक्स्पोर्ट होते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/ श्री.बरवडनंतर 16:10

श्री.नितीन गडकरी.....

नाशिकच्या फ्लाय ॲशतून दोहा येथील एअरपोर्टचे काम सुरु आहे. मी सुध्दा फ्लाय ॲशचा धंदा सुरु केला असून 2 हजार टन फ्लाय ॲश निर्यात करतो. आपल्या येथील फ्लाय ॲशमधून दोहा व दुबई येथे एअरपोर्टचे काम चालू आहे. नाशिकच्या महानगरपालिकेच्या महापौरांना भेटून मी विनंती करुन सांगितले की, सिमेंटमध्ये 30 टक्के फ्लाय ॲश टाकून नाशिकचे रस्ते तयार करावेत. पण त्यासाठी ते तयार नाहीत. सध्या सिमेंटच्या एका बॅगची किंमत 265 रुपये आहे. कराशिवाय बॅगची किंमत 56.50 रुपये आहे, विविध करासहित बॅगची किंमत 98 रुपये होते. तरीही सिमेंटची बॅक 265 रुपयांना विकली जाते. या सिमेंट मार्केटवर 6 लोकांचे नियंत्रण आहे. महाराष्ट्र शासनाकडून सिमेंटसाठी लिज दिली जाते. सिमेंटच्या लिजसाठी, चुनखडीसाठी गडचिरोली जिल्हयात कशी भांडणे सुरु आहेत हे माननीय मुख्यमंत्र्यांनाही माहीत आहे. विदर्भात खाण हा विभाग आहे. शासनाने असे जाहीर केले पाहिजे की, जो माणूस सिमेंटचा कारखाना सुरु करील त्याला आम्ही चुनखडी देऊ, फ्लाय ॲश देऊ त्या कारखान्यामध्ये शासनाची 35 टक्के इक्वीटी राहील आणि जेवढे उत्पादन निघेल त्यातील 35 टक्के उत्पादनावर महाराष्ट्र सरकारचा अधिकार राहील. त्याचा सरकार वेगवेगळया कामासाठी उपयोग करील. ते सिमेंट उत्पादन खर्चात 15 टक्के समाविष्ट करुन उपलब्ध झाले पाहिजे, म्हणजे सरकारला सिमेंटचे पोते 115 रुपयास उपलब्ध होईल. महाराष्ट्र सरकारच्या विविध कामांसाठी लागणारे सिमेंट 115 रुपये किंमतीप्रमाणे मिळाले तर सिंचन आणि रस्त्याच्या प्रकल्पांची किंमत सरळ 15 टक्क्यांनी कमी होईल. हे करीत असताना तुमचा 10 ते 20 वर्षाचा कर आहे तो सिक्यूटराईज केला जाईल, त्याच्या बदल्यात तुम्ही शासनाला उधारीवर 8 हजार कोटीचे सिमेंट द्यावे असे त्यांना सांगावे. लोखंड उत्पादक कंपनीला 10 हजार कोटी रुपयांचे सिमेंट देण्यास सांगावे आणि महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पातील जे कंत्राटदार आहेत त्यांना असे सांगावे की, तुम्ही बँक रेट नुसार डिफर पेमेंटवर प्रोजेक्ट पूर्ण करावेत. तसेच तुम्हाला लेबरसाठी जो खर्च येईल तो 5 वर्षात व्याजासहित दिला जाईल असेही सांगावे. त्यामुळे कृष्णा खोऱ्यातील सर्व प्रकल्प 4 वर्षात पूर्ण होतील. पश्चिम महाराष्ट्रत एक टेंभू योजना पूर्ण झाली तर तेथे काय चमत्कार होणार आहेत ते तेथील सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. म्हणून सिंचनाचे प्रकल्प सुरु करण्याकरिता इन्होव्हेटिव्ह ॲप्रोच घेऊन त्यातून मार्ग काढावा. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये मंदीचे दुष्परिणाम दिसत आहेत त्यातून तेथील जनता बाहेर येईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.नितीन गडकरी.....

स्टील उद्योगांनी स्टीलचे उत्पादन कमी केल्यामुळे धोका निर्माण झाला आहे. त्याचे कारण कारटेल हे आहे. त्यामुळे चीनने ऑर्डर रद्द केल्या आहेत. रायगड जिल्हयातील जेएनपीटीमध्ये ज्यांनी भंगार आणले ते पळून गेले. ते भंगार सध्या पडून असल्यामुळे त्याचा लिलाव सुरु आहे. सध्या स्टीलचे रेट डाऊन झाल्यामुळे त्यांच्यावर ती वेळ आली. म्हणून स्टील उत्पादकांना सांगावे की, सरकार तुमच्याकडून स्टील घेईल. राज्य सरकारच्या आणि केंद्र सरकारच्या विविध करांची 10 वर्षांची किंमत काढून ती सिक्यूटराईज करुन तेवढया किंमतीचे स्टील शासनाला द्यावे. त्यापैकी 40 टक्के रक्कम कृष्णा खोरे, विदर्भ सिंचन महामंडळाच्या अंतर्गत असलेल्या प्रकल्पांना दिली तर उर्वरित 60 टक्क्यांमधून 20 टक्के त्यांचा फायदा असेल. या प्रकल्पांवर होणारा इतर खर्च बँकाच्या व्याजाच्या दराप्रमाणे 5 वर्षात दिला जावा. ज्या प्रकल्पाला 9 वर्षे लागतात तो प्रकल्प 2 वर्षात पूर्ण झाला तर महाराष्ट्रातील सिंचन क्षमता वाढेल आणि ग्रामीण भागाचे चित्र बदलेल त्यातून हा प्रश्न पुष्कळअंशी सुटू शकेल.

सभापती महोदय, आपल्या देशाचे क्रुड ऑईलचे बिल 2 लाख 80 हजार कोटी रुपये आहे. त्यावेळी एका बॅरलची किंमत 148 डॉलर इतकी होती. आता ती परमेश्वराच्या कृपेमुळे 38 रुपयांवर आली आहे. देशाचा प्रश्न सोडवावयाचा असेल तर त्या दृष्टीकोनातून विचार केला पाहिजे. त्यावेळी माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी दिशा दाखविली होती. 'Diversification of agriculture towards energy and power sector.' अशी संकल्पना त्यांनी मांडली होती. या देशातील शेतकरी देशासाठी लागणारे डिझेल व पेट्रोल तयार करु शकतो. माझ्याकडे त्याचा प्रकल्प आहे हे मी अनेकवेळा बोललो आहे, कोणाला बघावयाचा असेल तर बघायला यावे. सध्या मी 28 मे.वॉट वीज तयार करतो. नागपूर शहरासाठी पुरेल इतकी वीज तयार होते. हे करणे शक्य आहे. आपल्याकडे ऊसाच्या चिपाडापासून वीज निर्मिती होते. आपल्याकडे गावागावात असे पॉवर प्रोजेक्ट निर्माण झाले पाहिजेत. त्यामुळे लोडशेडिंगचा प्रश्न सुटेल आणि रोजगारीची निर्मिती होईल. शासनाने इथेनॉलचे उत्पादन बंद केले आहे. सध्या साखर कारखाने वाईट स्थितीत आहेत.अमेरिकेत मक्यापासून साखर तयार केली जाते. युरोपमध्ये बीटपासून साखर तयार केली जाते आणि आपल्याकडे ऊसापासून साखर तयार केली जाते.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही

(श्री. नितीन गडकरी....

बीटमध्ये देखील मोठ्या प्रमाणात शुगर आहे. वसंतदादा को-ऑप. शुगर इंडस्ट्रिजमध्ये या बीटवर प्रयोग सुरु केलेले आहेत. मी बीटची शेती केली त्यावेळी साडेतीन किलोचा एक कंद निघाला. या बिटमध्ये 18 टक्के शुगर आहे आणि 110 दिवसात येणारे हे पीक आहे. या पिकाला पाणीही कमी लागते. या बिटपासून डायरेक्ट इथेनॉल तयार होते. हे इथेनॉल पेट्रोलमध्ये 35 टक्के आणि डिझेलमध्ये 35 टक्के गेले तर 2.80 लाख रु. मिळतात. ग्रामीण भागात 20 कोटी रु. गेले तर ग्रामीण भागातील लोक मुंबईकडे कशाला जातील ? गावे संपन्न झाली पाहिजेत. पर कॅपिटा इन्कम, जीडीपी वाढला पाहिजे. आता आपण शहरी भागातील लोकसंख्या 35 टक्के आणि ग्रामीण भागातील लोकसंख्या 65 टक्के आहे असे सांगतो. खेड्याकडे चला असे जेव्हा महात्मा गांधी म्हणाले त्यावेळी खेड्यातील लोकसंख्या 85 टक्के आणि शहरातील लोकसंख्या 15 टक्के होती. पुढच्या वर्षी नगर विकासाचा अहवाल येईल त्यामध्ये ही लोकसंख्या शहरी 50 टक्के आणि ग्रामीण 50 टक्के अशी असेल. याचे कारण काय, तर ग्रामीण भागातील 36 विधानसभा मतदारसंघ कमी झालेले आहेत आणि ठाणे जिल्ह्यामध्ये लोकसेभेचे 4 मतदारसंघ वाढलेले आहेत. गावामध्ये रोजगार मिळाला असता, गावात रस्ते असते, पिण्यासाठी स्वच्छ पाणी असते, दुभती जनावरे असती, मुलांकरिता शाळा असत्या तर मग तो चपराशाची नोकरी करण्यासाठी, मजुरी करण्यासाठी शहराकडे कशाला आला असता ? ह्या गोष्टी ग्रामीण भागामध्ये नसल्यामुळे शहरी प्रश्न, झोपडपट्टयांचे प्रश्न निर्माण झालेले आहेत..(अडथळा) सभापती महोदय, मी निवडून आलो नाही तरी चालेल, परंतु देश पुढे गेला पाहिजे, राज्यातील गरिबांचे कल्याण झाले पाहिजे.

सभापती महोदय, मला हे सांगायचे आहे की, महाराष्ट्रावर हे मंदीचे सावट येईल त्यासाठी सरकारने एक कार्यक्रम तयार करावा आणि हा कार्यक्रम तयार करीत असताना आम्हाला विश्वासात घ्यावे. राज्याच्या विकासाचा प्रश्न हा केंव्हाही पक्षीय राजकारणाचा विषय होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे एका पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत आणि मी देखील एका पक्षाचा प्रदेशाध्यक्ष आहे. आम्ही सरकरने आखलेल्या कार्यक्रमाला सहकार्य करु. निवडणुकांच्या रिंगणात आपण हारु किंवा जिंकू परंतु महाराष्ट्रामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होऊ देणार नाही. हे सरकार संवेदनशील आहे असे मला वाटते. मिहान प्रकल्पाच्या संदर्भात मिटींग

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी...)

घेण्यासंबंधी मी गेल्या 15 दिवसात 4 वेळा माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली. पण त्यांना वेळ नाही.या मिहान प्रकल्पामध्ये 20 हजार कोटींची गुंतवणूक येत आहे. माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख हे जेव्हा जेव्हा नागपूरला यायचे त्यावेळी ते मिहानच्या संदर्भात नागपूरमध्ये मिटींग घ्यायचे. नागपूरच्या मिहान प्रकल्पाला त्यांनी चालना दिली. विद्यमान मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण हे देखील या प्रकल्पाला चालना देतील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. 20हजार कोटी गुंतवणुकीमुळे विदर्भाची इकॉनॉमी बूस्ट होणार आहे. जहाँ जहाँ पैर पडे संतन के वहाँ पर हो जाए बंटा ढार- ज्याचा राजा बेपारी त्याची जनता भिकारी. सरकारचे धंदा किंवा व्यापार करणे हे काम नाही. प्रमोद महाजन आणि धिरुभाई अंबानी यांना धन्यवाद दिले पाहिजेत. टेलिफोनच्या 12 कंपन्या देशात आल्या. आमच्याकडे जेव्हा फोन नव्हता त्यावेळी मी माझ्या बहिणीला फोन करण्यासाठी एका सरकारी अधिका-याच्या घरी जाऊन गुपचूप फोन करीत असे. कारण त्यावेळी फोन करण्यासाठी 67 रुपये लागत होते. आता मी 1 रुपयामध्ये बोलतो. अजून 10 कंपन्या येऊ द्या आणि होऊ द्या कॉम्पिटिशन. शेवटी अशी स्थिती येईल की जी आता आलेली आहे... मला एका कंपनीचा डायरेक्टर म्हणाला की, मी बस ड्रायव्हर आणि कंडक्टरला 15 हजार टेलिफोन फुकट देतो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीकरणाधीन नाही

श्री.नितीन गडकरी.....

मला ते भेटले. कंपनीचे नाव घेत नाही. 15 हजार टेलिफोन फुकट देतो, आमच्या पैशाने. फक्त त्यांनी फोन केले पाहिजेत. म्हणजे त्यांचे मीटर चालू. कंपन्या आल्या त्यामुळे स्पर्धा निर्माण झाली. म्हणून दर्जा सुधारला. फायदा कोणाचा झाला? फायदा रिक्षावाल्यांचा झाला. आज भाजीवाला फोन करतो आणि बाजारात टोमॅटोचा भाव काय आहे याची माहिती घेतो. अशी क्रांती झाली. याचे कारण कै.राजीव गांधी यांचे तत्कालीन सहकारी सॅम पित्रोदा यांना सॅल्यूट केला पाहिजे. कै.प्रमोद महाजन, कै.राजीव गांधी यांनी त्या काळात तंत्रज्ञान क्षेत्रात क्रांती केली. पूर्वी इंडियन एअरलाईन्स ही एकमेव कंपनी विमान वाहतूक क्षेत्रात होती. आता पाच कंपन्या पुढे आल्या आहेत. आता विमानतळावर आम्ही जायच्या आधीच त्या कंपनीच्या मुली आम्हाला घ्यायला येतात. गडकरी साहब आये क्या? याचे कारण म्हणजे स्पर्धा निर्माण झाली. ही स्पर्धा का वाढली याचे कारण कंपनीला आता स्टेक लागला. आपली कंपनी टिकली पाहिजे. स्पर्धेमुळे ग्राहकांचा फायदा झाला. कम्युनिस्ट आणि कम्युनिझम टेक्नॉलॉजी लिबरलायझेशनला मान्यता देत नाही. लिबरेलायझेशन झाले पाहिजे, प्रायव्हेटायझेशन झाले पाहिजे, ग्लोबलायझेशन झाले पाहिजे. याला पर्याय नाही, हे कोणी थांबवू शकत नाही. आज चायनामध्ये जी गुंतवणूक झाली ती नॉन रेसिडेंट चायनीज जे इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूरमध्ये राहतात त्यांनी केली. अमेरिकेमध्ये जे चायनीज आहेत ते श्रीमंत आहेत. या चायनाने इकॉनॉमी ओपन केल्यानंतर एन.आर.चायनीज लोकांनी 4500-5000 कोटी डॉलर्सची गुंतवणूक आणली, त्यामुळे चीन हा देश जगातील आर्थिक महासत्ता बनला. परंतु आपण मंदीला घाबरायचे कारण नाही. 18 वे शतक हे मुघल राज्याचे होते. 19 वे शतक हे इंग्रजांचे होते. युनियन जॅक सर्व ठिकाणी फडकत होता. 20 वे शतक हे सुपरपॉवर अमेरिकेचे होते. सगळीकडे अमेरिकेचा बोलबाला होता. 21 वे शतक हे आय.टी. आणि बायो टेक्नॉलॉजीचे शतक आहे. हिंदुस्थानच्या इकॉनॉमीमध्ये दरवर्षी 1 लाख 20 हजार कोटी रुपयांची भर या उद्योगांच्या माध्यमातून पडते. आता हे उत्पन्न 80 हजार कोटी रुपयांवर आले. जगातील सॉफ्टवेअर इंजिनिअर्समध्ये भारतीयांनी आपला झेंडा फडकवला आहे. त्याला कुठेही मॅच नाही. माझे तर म्हणणे आहे की, तुम्ही अधिकाधिक मेडिकल कॉलेज उघडा. हे जे इंजिनिअरिंग आणि मेडिकल कॉलेजचे मालक आहेत, ठेकेदार आहेत जे 200 ते 1000 कोटी रुपयांचे मालक झालेले आहेत ते विद्यार्थ्यांना सांगतात माझ्या कॉलेजमध्ये ये, मी प्रवेश देतो. आमचे सरकार आले की

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

पहिले काम करु ते म्हणजे मेडिकल कॉलेज काढली जातील. फुकट जागा देऊ. जेणेकरुन लोकांचे कपडे फाटले जातील. मेडिकल कॉलेजची फी 20 हजार, 15 हजार, 8 हजार रुपये होऊ द्या. स्पर्धा निर्माण होऊ द्या. या क्षेत्रात सगळयात मोठी इन्व्हेस्टमेंट येणार आहे. भारताची ही स्ट्रेंग्थ आहे. तिचा फायदा होऊ द्या. ज्याप्रमाणे 67 रुपयात केला जाणारा फोन 1 रुपयावर आला त्याप्रमाणे इंजिनिअरिंगची फी 5 हजार रुपयांवर, 10 हजार रुपयांवर आली पाहिजे. स्पर्धेतून गरीब माणसाचा फायदा होतो.

सभापती महोदय, माझी विनंती एवढीच आहे की, एज्युकेशनमध्ये काय करायचे, ॲग्रीकल्चरमध्ये काय करायचे, इंडस्ट्रीमध्ये काय करायचे, इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये काय करायचे, पॉवर सेक्टरमध्ये काय करायचे, मेडिकल एज्युकेशनमध्ये काय करायचे, पब्लिक हेल्थमध्ये काय करायचे याची उपाययोजना ठरवून, रुपरेषा ठरवून धोरण निश्चित करावे. आम्ही शासनाला सहकार्य करु. हे राज्य पहिल्या नंबरवर आले पाहिजे. आज सहाव्या-सातव्या नंबरवर गेले याचे मला वाईट वटते. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हे जे जागतिक मंदीचे आव्हान आहे, यातून जे संकट उभे राहणार आहे ते लक्षात घेता यावर मात करुन पुढे जाणारे धोरण या निमित्ताने सरकारने ठरविले आणि या अडचणीवर मात करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितच या मंदीचा कोणताही परिणाम या राज्याच्या प्रगतीमध्ये जाणवणार नाही. There are some people who convert the problems into opportunity. जे समस्यांचे रुपांतर संधीत करतात.

(नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

"There are many people in politics and in India they convert opportunities in problems." काही असे असतात ते संधीचे रुपांतर प्रश्नात करतात. म्हणून ही संधी, पर कॅपिटा इन्कम आणि जी.डी.पी. वाढला नाही. यासाठी आपल्याला ग्लोबलायझेशन, प्रायव्हेटायझेशन आणि लिबरलायझेशनसंबंधीचे धोरण घेत असताना त्याला सपोर्टिंग असे धोरणही घेतले पाहिजे. देशातील गरीब माणूस विकासामध्ये आला पाहिजे. पब्लिकला एन्करेज करणे आवश्यक आहे. एमएसआरडीसीच्या माध्यमातून फ्लाय ओव्हर बांधल्यामुळे कोणता परिणाम झाला हे आपण पाहतच आहोत. यासाठी लागलेले 40 हजार कोटी रुपये हे सरकारचे नव्हते तर प्रायव्हेट पैसा होता तो बाहेर आला, विकासामध्ये आला. मग त्यात स्टोन क्रशर्स असतील, छोटे छोटे ठेकेदार व मशिनरी असेल असे अनेक धंदे त्यातून चलनात आले. या सर्व क्षेत्रात या मंदीच्या दृष्टीने विचार करुन एक समृध्द व संपन्न राज्य म्हणून बनवावयाचे असेल तर माझी अशी विनंती आहे की, यासंदर्भात शासन जे धोरण ठरविणार ते ठरवित असताना सर्वपक्षीय लोकांना विश्वासात घेऊन ठरवावे. पुस्तकातील अर्थशास्त्र बाजूला ठेवून आणि एकविसाव्या शतकातील अर्थनितीचा व विकासाचा वेध घेऊन धोरण घेतले तरच त्याचा लोकांना फायदा आहे व तीच आज जनतेची सुध्दा मागणी आहे. मी नागपूरला एक प्रदर्शन आयोजित केले होते. त्या प्रदर्शनाला 2.50 लाख एवढे लोक उपस्थित होते, दरवाजे बंद केल्यानंतर बाहेर सुध्दा 40 हजार लोक शिल्लक होते. पुण्यात गेलो त्या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. देवीसिंह शेखावत, माननीय राष्ट्रपतींचे पती हे होते तेथे सुध्दा असंख्य मुले उपस्थित होती. याचा अर्थ स्पष्ट आहे की, जनतेची मागणी सुध्दा आज हीच आहे. कारण लोकांना आमच्या भांडणात इंटरेस्ट नाही, त्यांना रोजगार पाहिजे, त्यांना विकासाच्याच राजकारणात इंटरेस्ट आहे. म्हणून माझी अशी विनंती आहे की, या अनुषंगाने जर शासनाने आपले धोरण आखले तर उद्याचा महाराष्ट्र हा देशात पहिल्या क्रमांकावर असेल. सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगल्या विषयावर चर्चा उपस्थित केली आहे. या चर्चेतून आर्थिक चिंतन झाले असून मी समाधानी आहे, म्हणून सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो आणि मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले पुन्हा आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावर येथे चर्चा उपस्थित केली आहे.....

तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव) : संध्याकाळी 6.00 वाजता या प्रस्तावावरील चर्चा माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह संपवावयाची आहे. आता फक्त अर्धा तास चर्चेसाठी उरलेला आहे, आणि नंतरचा वेळ उत्तरासाठी असेल. सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले भाषण करावे.

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेची वेळ सायंकाळी 5.00 वाजता ठरविली होती परंतु एक तास या चर्चेसाठी वाढवून घेतलेला आहे. निदान 6.00 वाजेपर्यंत तरी ही चर्चा संपली पाहिजे, अशी मी विनंती करतो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी तसेच श्री. नितीन गडकरी यांनी या राज्यातील उद्योग का बंद पडत आहेत त्यावर उपाययोजना काय याबाबत मात्र काहीच सांगितले नाही. आज आपल्या राज्यातील उद्योगांना सर्वात जास्त धोका गुजरात राज्याचा आहे. कारण गुजरातचे मुख्यमंत्री वेगळ्याच प्रकारे काम करीत आहेत. माझ्या गावात नेटको टाईल्स ही कंपनी असून टाईल्समध्ये अग्रगण्य असलेली ही कंपनी आहे, ती आता दोन वर्षांनी बंद होणार आहे. कारण गुजरात शासनाने या कंपनीला बोलावून घेतले. मी यासंदर्भात स्वत: चौकशी केली असता मला असे समजले की, गुजरातच्या मुख्यमंत्र्यांनी या कंपनीला वेगवेगळया सवलती देण्याचे मान्य केले, अशा प्रकारे हा उद्योग दुसरीकडे जाण्याचा घाट घातलेला आहे. मी त्यांना सांगितले की, आपल्याला पाहिजे ती मदत या राज्यात दिली जाईल, परंतु कारखाना दुसऱ्या राज्यात नेऊ नका. त्यावेळेस मला सांगण्यात आले की, आम्ही आपल्या शासनाकडे गेलो असता आमच्यासाठी आपले अधिकारी दरवाजाच उघडत नाहीत परंतु गुजरातचे मुख्यमंत्री स्वत: दरवाजा उघडण्यासाठी उभे होते. अशा प्रकारची जर शासनाची मानसिकता असेल तर त्याचाही विचार होणे आवश्यक आहे. ही सिस्टम आपण बदलणार की नाही ? असा या निमित्ताने माझा प्रश्न आहे. परंतु आपल्याकडे तर मंत्रीच दोन दोन महिन्यांनी बदलत आहेत व या परिस्थितीचा फायदा मात्र अधिकारी घेत आहेत. मी माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी एवढा उद्योगपती नाही.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

परंतु मी सुध्दा दोन चार प्रकारचे धंदे करतो. धंदे कसे करतात याची मला पूर्ण माहिती आहे. आज कोल इंडस्ट्रीज फार भयानक परिस्थितीतून जात आहे. जेएनपीटी मध्ये तीन बर्थ पूर्णपणे बंद पडलेले आहेत. माझ्या पोर्टमध्ये जे स्टील ठेवलेले त्याची कस्टम डयूटी भरण्यासाठी सुध्दा आता पैसे शिल्लक नाहीत. स्टीलचे रेट उतरल्यामुळे माझ्या पोर्टमध्ये जे काही स्टील ठेवले आहे त्याची कस्टम डयुटी भरली तर त्या कस्टम डयूटीचे सुध्दा पैसे सुटणार नाही अशी परिस्थिती आहे. आज माझ्याकडे 40 कोटी रुपयांचे स्टील पडून आहे. स्टील घेण्यासाठी पुढे कोणीही येत नाही अशी परिस्थिती आहे. सभापती महोदय, सल्फरचा भाव 400 डॉलर होता परंतु आज त्याच सल्फरचा भाव 40 डॉलर झालेला आहे. जागतिक मंदीचा फार गंभीर धोका आपल्याकडे सुध्दा निर्माण झालेला आहे. आर्थिक मंदीच्या संदर्भात आज या ठिकाणी गांभीर्याने चर्चा होत आहे. या गंभीर परिस्थितीवर शासन काय उपाययोजना करणार आहे हा माझा सवाल आहे. या ठिकाणी केवळ टॅक्स कमी करण्याच्या गप्पा होतात परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच होत नाही. शासनाला टॅक्स मिळाला नाही तर बजेट सादर करता येणार नाही. बजेट सादर झाले नाही तर ट्रक कोणी घेणार नाही, ट्रक कोणी घेतले नाही तर डीझेल कोणी घेणार नाही, डीझेल कोणी घेतले नाही तर टायर सुध्दा कोणी घेणार नाही, टायर कोणी घेतले नाही तर कोणी सेल्स टॅक्स, व्हॅट देणार नाही आणि व्हॅट कोणी दिली नाही तर बजेट सादर होणार नाही अशी लिंक चालूच राहील. सभापती महोदय, या ठिकाणी जागतीक मंदीच्या संदर्भात चर्चा सुरु आहे. या चर्चेला अडीच तासाचा अवधी देण्यात आलेला आहे त्यामुळे अशा भयानक प्रश्नाच्या संदर्भात अडीच तास चर्चा करुन त्यावर आपल्याला उपाययोजना करणे शक्य होणार नाही त्यासाठी शासनाने खरे म्हणजे या विषयाच्या संदर्भात एक दिवसाची चर्चा ठेवली पाहिजे.

सभापती महोदय, एमएससी बँकेच्या संचालकांची माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबरची बैठक साधारणत: एक तास चालली. माझ्या भागातील ग्रामपंचायतीचा निकाल आज जाहीर झाला होता त्या निकालाच्या बातम्या मी टी.व्ही.वर पहात होतो. मी चॅनल सर्च केला त्यावेळेस सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांचे आर्थिक मंदीच्या संदर्भात सभागृहातील भाषण टी.व्ही. वर सुरु होते. जागतिक मंदीच्या संदर्भातील त्यांचे भाषण एकल्यानंतर मी फार प्रभावीत झालो आणि टी.व्ही. बंद करुन तडक सभागृहात आलो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अमेरिकेच्या आणि रशियाच्या पॉलिसी संदर्भात विचार मांडलेले आहेत. कै. पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी रशियाची आणि अमेरिकेची पॉलीसी अवलंबिली नाही म्हणून हिंदुस्तानात प्रॉब्लेम्स निर्माण झाले आहेत असे सांगितले. रशियाची पॉलीसी चांगली होती परंतु लेनीन नंतर ती पॉलीसी चांगल्या प्रकारे राबवली न गेल्यामुळे रशिया ख-या अर्थाने मागे पडला आहे. माननीय गडकरी साहेबांनी 35 देशांना भेटी दिलेल्या आहेत परंतु मी सुध्दा 40-45 देशांना भेटी दिलेल्या आहेत. मी धंद्याच्या संदर्भात आणि इतर क्षेत्राचा सर्व अभ्यास केलेला आहे. ज्यावेळी रशियाची आर्थिक स्थिती खालावली तेव्हा सर्व लोक अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्यासंदर्भात उदाउदो करीत होते. आज अमेरिकेची आर्थिक परिस्थिती काय आहे? अमेरिकेत ज्यांनी घरे घेतलेली आहेत ते त्या घरांचे हप्ते सुध्दा भरु शकत नाहीत. आज अमेरिकेतील लोकांची घराचे हप्ते भरण्याची सुध्दा कपॅसिटी राहिलेली नाही त्यामुळे अमेरिकेतील बँका आणि फायनांस कंपन्या केसळल्या आहेत.

सभापती महोदय, मध्यंतरी मी चायनामध्ये ओषाण या शहरात क्रेन खरेदी करण्यासाठी गेलो होतो. चायनामध्ये सुध्दा आर्थिक मंदी मोठया प्रमाणात आहे. आर्थिक मंदीला तोंड देण्यासाठी चायना सरकारने 5 हजार कोटी डॉलरचे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

चायना सांगते आमच्याकडे मंदी वगैरे काही नाही. आम्ही सिमेंट एक्सपोर्ट करणार आहोत,आर्यन ओर एक्सपोर्ट करणार आहोत, आम्ही आमच्या पायावर उभे राहू शकतो.

सभापती महोदय, मी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना सांगू इच्छितो की, राज्यात कृषी उद्योग वाढला पाहिजे यात दुमत असण्याचे कारण नाही. आपण गांधीवादी विचारसरणीचे कार्यकर्ते व नेते आहात. कृषी उद्योग डबघाईस कोणी नेला ? राज्यातील सूत गिरण्या व कारखान्यांचे वाटोळे कोणी केले ? मागील 50 वर्षे या राज्यात काँग्रेस पक्षाची सत्ता होती. आज अशी परिस्थिती आहे की 40 कारखाने दुसऱ्यास चालविण्यास दिलेले आहेत. आज 500 कोटी रुपये सहकारी बँकांचे अडकून पडलेले आहेत याचे गांभीर्याने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. शेती उद्योग वाढला पाहिजे. आपण जोपर्यंत शेती मालावर प्रक्रिया करणारे पूरक उद्योग उपलब्ध करुन देत नाही तोपर्यंत शेती उद्योग वाढू शकणार नाही. आज एमएससीसीची मिटींग होती त्या मिटींगमध्ये सुध्दा मी मागणी केली. माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील अधिवेशन संपल्यानंतर पाच हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करणार आहेत असे त्यांनी बाहेर सांगितले. त्यांनी ही माहिती सभागृहात दिली नाही. माझा सरकारला सवाल आहे की, जी प्रोसिंसिंग युनिट बंद आहेत ती केव्हा सुरु करणार आहात ? माननीय अपांरपारिक ऊर्जा मंत्री श्री.विनय कोरे विदर्भात कारखाना काढून तो चांगल्या पध्दतीने चालवून दाखवितात. आमच्या कोकणातील सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे पुण्यात कारखाना काढून तो चांगल्या प्रकारे चालवून दाखवितात. तेव्हा सरकारने या सर्व गोष्टींचे आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे. आता राज्यावर जे मंदीचे सावट येऊ घातले आहे त्याबाबत राज्य सरकार कोणती पावले उलचणार आहे हे स्पष्ट केले पाहिजे.

सभापती महोदय, आज आपल्याकडे अशी परिस्थिती आहे की, कोणताही उद्योग सुरु करावयास असेल, त्यासाठी जर 7/12चा उतारा पाहिजे असेल तर किंवा अन्य काही बाबींसंदर्भात एनओसीची आवश्यकता असेल तर ती कशी दिली जाणार नाही याकडे अधिकाऱ्यांचा कल असतो. आपण कोणत्याही अधिकाऱ्याकडे गेला तरी आपणास आवश्यक असणारी माहिती मिळेलच असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

नाही. आपण वन विन्डो सिस्टीम केव्हा सुरु करणार आहात ? आज आपल्या राज्यात जे उद्योगधंदे सुरु आहेत त्यातील 50 टक्के उद्योगधंदे पुढील वर्षी दुसऱ्या राज्यात जाताना दिसतील. याचे कारण म्हणजे आपल्या राज्यात असलेले टॅक्स आणि बाजूच्या गुजरात राज्यात असलेले टॅक्स यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. आपल्या राज्यात उद्योगाची क्रांती व्हावी असे वाटत असेल तर आपल्या राज्याला गुजरात राज्याचे मुख्यमंत्री श्री.नरेंद्र मोदी यांच्यासारखा मुख्यमंत्री मिळावयास पाहिजे. तरच आपण या मंदीचा खऱ्या अर्थाने मुकाबला करु शकू असे वाटते.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

मी निश्चितपणे आपल्याला सांगू इच्छितो की, या संदर्भात राज्य सरकारने वेगळे धोरण जाहीर करावयास पाहिजे. माननीय श्री.अशोक चव्हाण आता नवीन मुख्यमंत्री झाले असून माझ्या त्यांच्याकडून वेगळया अपेक्षा आहेत. यापूर्वी ते उद्योग खात्याचे मंत्री होते त्यामुळे उद्योगामधील विविध अडचणी त्यांना माहीत आहेत. राज्य सरकारकडून माझी अशी अपेक्षा आहे की, राज्यामध्ये जे उद्योग आहेत ते चालूच राहिले पाहिजेत. त्याचप्रमाणे या उद्योगाच्या माध्यमातून कामगारांना व कर्मचा-यांना रोजगार मिळाला पाहिजे. यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. तसे जर झाले नाही तर त्यातून इतरही अनेक प्रश्न निर्माण होतील. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत या ठिकाणी बोलतांना असे म्हणाले की, मॉलमध्ये गर्दी आहे परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, मॉलमध्ये सुध्दा गर्दी नाही. मी एक को - ऑपरेटिव्ह डिपार्टमेन्टल स्टोअर्ससुध्दा चालवत असून त्याचा टर्न ओव्हर 60 ते 70 कोटी रुपयांचा आहे. परंतु दिवाळी नंतर तेथील विक्री 30 टक्क्यानी कमी झालेली आहे. सहा महिन्यानंतर आणखी मोठया प्रमाणावर मंदीची झळ पोहोचणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी या ठिकाणी अतिशय चांगले विचार मांडले आहेत मंदीच्या संदर्भात तातडीने कोणत्या उपाययोजना करावयास पाहिजेत याबाबत त्यांनी उल्लेख् केला असून या तातडीच्या उपाययोजने बाबत शासनाने खुलासा करावयास पाहिजे तसेच सध्या जे उद्योग सुरु आहेत ते चालू कसे राहतील याचे उत्तर आजच्या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो .सभापती महोदय, या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधान सभेने निवडलेल्या) सभापती महोदय, या ठिकाणी मांडण्यात आलेल्या प्रस्तावावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, 1992 साली डब्लू.टी ओ. चे सभासदत्व भारताने स्वीकारले होते. जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्था यांचा स्वीकार आपल्या देशाने केला परंतु आज या संबंधी काय स्थिती आहे.? जगातील जवळजवळ एक लाखा पेक्षा जास्त लोकांचा रोजगार या मंदीमुळे गिळला गेला आहे. आपल्या देशात वा राज्यात कोणीही रोजगारापासून वंचित राहता कामा नये या दृष्टीने धडपड सुरु आहे. अजून त्या स्थिती पर्यत आपण गेलो नाही परतु तेथे पर्यत आपण जाणार नाही याची खात्री देता येत नाही.

सभापती महोदय, मंदीच्या संदर्भात बोलत असतांना बॅन्कीग अर्थ व्यवस्थेसबंधी उल्लेख करणे आवश्यक आहे. बॅन्कावर देशातील प्रत्येक नागरिकाचा प्रचंड विश्वास होता परंतु आता जागतिक मंदी आली असून त्यामुळे या बॅन्का टिकतील काय ? छोटया बॅन्का किंवा ग्रामीण भागातील बॅन्का टिकतील काय ? की फैक्त राष्ट्रीयकृत बॅन्काच टिकतील ? या बॅन्काच्या सदर्भात रिझर्व्ह बॅन्क ऑफ इंडियाचा रोल काय राहणार आहे ? ग्रामीण भागातील साध्या पत संस्थांची स्थिती काय राहणार आहे ? यासबंधी सर्व सामान्य व्यक्तीच्या मनात संभ्रम निर्माण झालेला आहे. याबाबतीत देखील शासनाला विचार करावा लागणार आहे.

सभापती महोदय, बांगला देशात तेथील रिझर्व्ह बॅकेच्या नियमाच्या बाहेर जाऊन ग्रामीण बॅन्का स्थापन करण्यात आल्या होत्या. या ठिकाणी आपल्या देशातसुध्दा त्याकरिता काही वेगळा कायदा करता येईल काय, वेगळे काही नियम करता येतील काय , वेगळी काही उपाययोजना करता येईल काय याचा विचार केला पाहिजे. या संदर्भात रिझर्व्ह बॅन्क ज्या पध्दतीने आशावाद निर्माण करीत आहे, रिझर्व्ह बॅक ज्या पध्दतीने सहकार्य करीत आहे त्यातून आपली अर्थव्यवस्थ्ा खरोखर सावरणार आहे काय यासबंधी गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

सभपती महोदय या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री नितीन गडकरी यांनी अत्यंत सुरेख असे विवेचन केलेले आहे . त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. त्यांनी ग्रामीण भागातील शे्ंती या विषयाच्या संदर्भात लक्ष वेधले असून शेतीकडे जास्तीत जास्त लक्ष दिले गेले पाहिजे.सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी यांनी लोकांची क्रयशक्ती वाढवावी लागेल असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले असून आपले भांडवल वाढवावे लागेल तसेच ते टिकवावे लागेल . हे भांडवल कमी होणार नाही या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांनी सांगितले होते तेव्हा याबाबीत दक्षता घ्यावी लागेल.

नतर श्री. सुंबरे

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. दराडे ....

आपल्याकडे मनुष्यबळ आहे, कच्चा माल आहे. त्यासाठीच त्याआधारे छोटे छोटे उद्योग करणे गरजेचे आहे. आज असे झाले आहे की, या मुक्त अर्थव्यवस्थेच्या स्पर्धेमध्ये बाहेरच्या भांडवली देशांमध्ये, साम्राज्यवादी देशांमध्ये काय आपसात स्पर्धा व्हायची ती होऊ देत, फ्रान्स आणि जपानला काय करायचे आहे, इंग्लंड आणि अमेरिकेला काय करायचे आहे .. कारण साम्राज्यवादाचा आणि भांडवलदारी अर्थव्यवस्थेचा तो त्यांचा अंगभूत दोष आहे. त्यांच्यामध्ये अशा प्रकारची स्पर्धा होते आणि त्यातून अशी मंदी येते. परंतु ही अर्थव्यवस्था स्विकारीत असताना भारत एवढा मोठा स्वयंभू असला पाहिजे की, या ठिकाणचे भांडवल टिकवणे, आयात-निर्यातीमध्ये जगात आपले वर्चस्व निर्माण करणे, लघु उद्योगांना जास्तीत जास्त चालना देणे आणि मोठे उद्योग सांभाळत असताना, जगाच्या स्पर्धेत जात असताना या गोष्टी करणे ही तारेवरची कसरत आहे. म्हणून ही जी आजची संधी आहे, मंदीचा हा काळ माझ्या दृष्टीने भारताला लाभलेली ही एक संधी आहे. या संधीचा आपण फायदा घेऊन, जगात आलेल्या या मंदीचा फायदा घेऊन, .. आज जगातील महासत्ता स्वत:शीच भांडत आहेत. त्यांच्यात अंतर्गत कलह निर्माण झालेले आहेत. त्यांची अर्थव्यवस्था कोसळते आहे. अशा परिस्थितीत आपल्याला मुक्त अर्थव्यवस्थेची दालने उघडी आहेत. अशा वेळी केवळ आम्हाला मंदीचा फटका बसणार नाही एवढेच समाधान मानून न घेता या मंदीचा कालावधी एक संधी म्हणून आपण स्वीकारला पाहिजे आणि माझ्या देशाचे वर्चस्व संपूर्ण जगामध्ये स्थापन झाले पाहिजे. मी या निमित्ताने आमच्या स्नेही सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना सांगू इच्छिते की, आपल्या नॅनोमुळे देखील फार मोठे चलन बाजारात येणार आहे. निर्यातीला फार मोठी संधी मिळणार आहे. तेव्हा या मंदीवरील अनेक उत्तरात आपल्या छोट्या नॅनोचे उत्तर देखील आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती म्हात्रे यांनी या सदनात एकदा नॅनोचा विषय काढला होता, रिक्षा आणि टॅक्सीसाठी नॅनोला मान्यता मिळावी असा विषय त्यांनी येथे मांडला होता. त्याची आठवण झाली म्हणून मी त्यांना हे सांगितले. पण मला सांगावयाचे आहे की, सभापती महोदय, या ठिकाणी एक बाब आपण निश्चितपणे लक्षात ठेवली पाहिजे की, या मंदीतून आपल्या देशाला कोठले क्षेत्र तारून नेणार असेल तर ते क्षेत्र कृषी क्षेत्र आहे. मागील अनेक वर्षांपासून शेती क्षेत्रात माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी जी भूमिका घेतली आहे ती म्हणजे शेतीतील शेतकरी जगला पाहिजे, त्याचे उत्पादन वाढले पाहिजे. त्यातही त्यांनी दोन

..... 3के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. दराडे ....

बाबींवर विशेष भर दिलेला आहे. तो म्हणजे ठिबक सिंचन, स्प्रिंकलर, फळबाग योजना, फळ-प्रक्रिया आणि दूध उत्पादन व त्यावरील प्रक्रिया. या क्षेत्रांकडे आपण विशेष भर दिला, ज्या गुंतवणूकी करावयाच्या त्या टक्केवारीच्या प्रमाणात म्हणजे कृषी क्षेत्रात केलेल्या खर्चाची टक्केवारी ही केंद्र सरकारमध्ये पवार साहेबांनी वाढविली असली तरी ती समाधानकारक नाही, त्यात वाढ झाली पाहिजे आणि राज्य सरकारनेदेखील कृषी क्षेत्रात अधिकाधिक वाढ करून या क्षेत्रातील माझ्या शेतकऱ्यांचा प्रत्येक माल, ज्याप्रमाणे केशर, हापूस आंबा जातो, तसा जगाच्या पाठीवर जाईल, प्रत्येक प्रक्रिया उद्योग जगाच्या पाठीवर जाईल याचा आपण विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, यामध्ये आणखी एक क्षेत्र आहे, हे क्षेत्र आपल्याला निश्चितपणे या मंदीतून देखील तारून नेऊ शकते आणि ते म्हणजे सेंद्रिय खताचे. आज केंद्र सरकारला खतांसाठी 2 लाख कोटी रूपयांपर्यंत सबसिडी द्यावी लागते आहे. आपल्या शासनाने असा निर्णय घेतला की, सेंद्रीय खताला विशेष प्रोत्साहन द्यायचे, त्याचे प्रकल्प उभे करण्यासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्याला विशेष सहाय्य करायचे. मला या ठिकाणी सांगावयास आनंद वाटतो की, अगदी रांगोळ्या पासून ते शिरगोळ्या पासून तयार केलेले, काहीही खर्च न लागता उत्पादित केलेले एक ग्राम खत एक एकर जमिनीला पूरक होते. दुभत्या गाईच्या शेणापासून तयार केलेले 30 ग्राम खत एका एकराला फायदेशीर होते. काडीकचऱ्यापासून तयार केलेले खत पुरेसे होतं. तेव्हा हा जो सेंद्रीय खताचा प्रकल्प आहे तो कमी खर्चामध्ये होऊ शकतो. त्यामुळे केंद्रीय सरकारला आज रासायनिक खतासाठी जी सबसिडी द्यावी लागते त्यावरील एक उपाय म्हणून, पर्याय म्हणून हा एक चांगला मार्ग आहे. आपल्याला कल्पना आहे की, आज राज्यावर 1 लाख 44 हजार 325 कोटी रूपयांचे कर्ज आहे. तरीही आपल्याला व्याजापोटी एक वर्षामध्ये 12,406 कोटी रूपये द्यावे लागतात. 2007-08 चा आर्थिक पाहणी अहवाल सादर केला आहे त्यात माननीय अर्थमंत्र्यांनी सांगितले आहे की, आपण आपल्याकडील विकासाचा दर 9 टक्के पर्यंत कायम ठेवण्याचा प्रयत्न करू. गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र राज्य निश्चितपणे अग्रेसर आहे. 1991 ते 2007 च्या दरम्यान 3 लाख 79 हजार 190 कोटी रूपयांची गुंतवणूक आपण केलेली आहे आणि देशामध्ये आपले राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे. आपल्याकडील दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या आज 12 लाख 15 हजाराच्या वर गेलेली आहे. या परिस्थितीमध्ये देखील विकासाचा दर कायम ठेवण्याचा आपण

.... 3के 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. दराडे ....

निश्चितपणे प्रयत्न करीत आहोत. सध्या आपल्यासमोर असलेली जी आव्हाने आहेत त्यातील सर्वात मोठे आव्हान हे भाववाढीचे आहे. तेल आणि अन्नधान्याच्या वाढत्या किंमती, शासनाचा वाढता खर्च, यामुळे भाववाढ होते आणि ही भाववाढ 112 टक्क्यांपर्यंत गेलेली आहे. ही कमी करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न आपल्याला करावे लागतील. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 3एल 1 ..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. श्रीमती उषाताई दराडे...

आपल्या आर्थिक वाढीचा दर सन 2008 मध्ये 10 टक्क्यापर्यंत जाणार होता. तो 9 टक्क्यापर्यंत जरी नेण्याचा आपणास प्रयत्न करावयाचा असला तरी तो केला पाहिजे. याबाबतीत मला केंद्र सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. आज तेलावर आपला खर्च अधिक प्रमाणात होतो. आपणास लागणाऱ्या तेलापैकी 70 टक्के तेल आपण बाहेरच्या राज्यातून विकत आणतो. येणाऱ्या भविष्य काळात तेलाच्या विहिरी आणि कोळश्याच्या खाणी जगाच्या पाठीवर आपण विकत घेत आहोत. आपल्या देशात सुध्दा ज्या ज्याठिकाणी अशाप्रकारच्या खनिज तेलाच्या विहिरी आहेत, आणि कोळश्याच्या खाणी आहेत त्या आपण शोधून काढल्या पाहिजेत. कोळश्याचे प्रमाण जरी कमी झाले असले तरी आपण तेल निर्माण करु शकतो. त्यामुळे आपला देश याबाबतीत सुध्दा स्वयंपूर्ण झाल्याशिवाय रहाणार नाही. साधारणपणे एप्रिल ते जून 2008 पर्यंत तेल खात्यातील तूट 1700 कोटी डॉलरपर्यंत वाढली. त्याचे कारण असे की, 70 टक्क्यापर्यंत आपण तेल विकत घेत होतो. मागील वर्षीच्या जानेवारीपर्यंत ही तूट फक्त 100 कोटी डॉलरची होती. तेव्हा तेलाच्या बाबतीत देश संपन्न करण्यासाठी त्या दिशेने पाऊल टाकणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, याठिकाणी अर्थव्यवस्थेच्या बाबतीत आपल्याला एका गोष्टींचा विचार करावा लागेल. आंतरराष्ट्रीय पातळीवर आमची पत किती आहे? आंतरराष्ट्रीय बाजारात आमची जमा 2500 कोटी डॉलरची होती. ही गोष्ट जानेवारीपूर्वीची आहे. आणि जानेवारी ते मार्चपर्यंत ती 2024 कोटी डॉलर पर्यंत कमी झाली. आपण कितीही म्हणत असलो की,आपल्याला मंदीचा फटका बसलेला नाही. तरीही काही प्रमाणात फटका बसण्यास सुरुवात झाली नाही. हे प्रमाण यापुढील काळात जास्त वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता निश्चितपणे माननीय पंतप्रधान, रिझर्व्ह बँक याबाबतीत आपल्याला दिलासा देण्याचा प्रयत्न करीत आहेत. मघाशी याठिकाणी एका मुद्दयावर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये बांधकाम विभाग, गृहनिर्माण विभाग असेल त्या विभागाच्या माध्यमातून सिमेंट आणि लोखंड यामध्ये किती गुंतवणूक करावयाची आणि हा उद्योग कशाप्रकारे सावरावयाचा यावर मी जास्त बोलणार नाही. परंतु एक गोष्ट निश्चित आहे की,सेन्सेस किती वाढला? तो आठ हजारापर्यंत वाढला की,दहा हजारावर गेला? या चर्चेभोवती फिरण्याची आपल्याला सवय लागली आहे. सेन्सेस किती वाढला याची आपण चर्चा करीत असतांना ग्रामीण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ॲड. श्रीमती उषाताई दराडे...

भागातील शेतकऱ्याचे दरडोई उत्पन्न किती वाढले? याची चर्चा करण्याची आपल्याला सवय लागत नाही. आजच्या मिडीयामध्ये सेन्सेस किती उंचापर्यंत गेला, सोन्याचे भाव किती वाढले यापेक्षा पालक भाजीचे भाव कसे आहेत? बटाटयाचे भाव कसे आहेत? कांद्याचे भाव कसे आहेत? देशाला डाळी व अन्नधान्याची किती गरज आहे? त्याचे भाव कसे आहेत?. उत्पादन खर्च वजा जाता तो भाव शेतकऱ्याला परवडतो की नाही? आज देशामध्ये कडधान्य निर्माण करण्याची गरज आहे. देशात आज ज्वारी किती पिकत आहे? आपण गेल्या काही वर्षात या देशामध्ये गहू पिकविण्यात यशस्वी झालो आहोत. यावर्षी आपल्याला गहू आयात करण्याची गरज भासणार नही. परंतु भविष्यात गहू निर्यात करण्याची परिस्थिती कशी निर्माण होईल त्यादृष्टीने कृषी ओरिएंटेड, रुरल ओरिएंटेड अशाप्रकारची अर्थव्यवस्था करावी लागेल. त्याकरिता पहिल्यांदा आपल्याला शिक्षणावरील खर्च वाढवावा लागेल. सर्वांसाठी शिक्षण हे धोरण आपल्याला स्वीकारावे लागेल. सर्वांचे आरोग्य नीट कसे राहील याचा आपल्याला विचार करावा लागेल. मघाशी माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मंदीची सर्वात जास्त झळ ही विकर सेक्शनला बसते, त्यातल्या त्यात महिलांना बसते. आज अशी परिस्थिती आहे की, शहरातील महिलांना त्यांचे हिमोग्लोबिन टिकविणारे सुध्दा अन्न मिळत नाही ही परिस्थिती आहे. आमच्या ग्रामीण भागातील महिलांचा देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत सहभाग आहे. त्या दिवसाचे 16 तास काम करतात, परंतु ते काम करुन मिळणाऱ्या पैशामधून त्यांची क्रयशक्ती वाढत नाही. त्यांच्या उत्पादनाला किंमत मिळत नाही,किंवा तिने केलेले उत्पादन हे तिनेच केले आहे, किंवा निर्माण केलेली ज्वारी ही तिच्याच मालकीची आहे असा कन्सेप्ट समाजासमोर जात नाही. त्यामुळे तिने निर्माण केलेल्या ज्वारीचा भाव आणि त्याला लागणारा खर्च यामध्ये स्त्री आणि पुरुष यामध्ये दोघांचे जाणारे श्रम त्यामधून त्याला मिळालेला मोबदला आणि मुंबईच्या उद्योगामधून एखाद्याला मिळणारा नफा या दोन्हींचा मेळ कुठेच बसत नाही.

सभापती महोदय, मी इकॉनॉमिक्सची विद्यार्थीनी नसल्यामुळे विमान कंपन्यांची अर्थव्यवस्था मला समजत नाही. मला एके दिवशी मुंबईला जायचे होते. माझ्या शेजारी बसलेले सद्गृहस्थ मला विचारीत होते की, आपल्याला विमानाचे तिकिट किती रुपयांना पडले? मी म्हटले की, मला रु.8450 रुपये द्यावे लागले. ते मला म्हणाले की, मला रु.10000 द्यावे लागले. मी कारण विचारले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

ॲड. श्रीमती उषाताई दराडे...

तर त्यांनी सांगितले की, मी अर्ध्या तासानंतर तिकिट घेतले. मला औरंगाबादहून मुंबईला जायचे असेल तर आणि जर मी इंडिगो विमानाने गेले तर मला रु.4200 रुपये खर्च करावे लागतात., जेट कंपनीच्या विमानाने गेले तर रु. 6000 रुपये लागतात आणि एअर इंडियाच्या विमानाने गेले तर रु.5800 रुपये लागतात. सर्व कंपन्यांच्या विमानासाठी तेवढेच इंधन लागते, विमानात बसायला आम्हाला तेवढीच जागा मिळते. आणि विमानात खायला 25 रुपयांचे पदार्थ देत असतील. परंतु या स्पर्धेमध्ये आपण या संधीचा फायदा आपण कसा घेतला पाहिजे हे मला समजत नाही.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे .....

आता आपण मंदीची संधी अशी घेतली पाहिजे की, जगातील लोकांनी बीड जिल्ह्यातील वंजारवाडीत डोंगरामध्ये राबणाऱ्या बाईला तिच्या श्रमाचा मोबदला एवढा मिळेल की, तिच्या मुलाची संगणक निरक्षरता वाढणार नाही आणि तिचा मुलगा सॉफ्टवेअर इंजिनियर होऊन जगाचा बाप बनेल. जोपर्यंत आपण या पध्दतीने डिक्लास होऊन जाणार नाही तोपर्यंत हे होणार नाही, आज खाणीमध्ये काम करणाऱ्यांच्या मुलांना शिक्षण नाही. आपण जागतिकीकरणाचे स्वप्न बघतो. आपण यान अवकाशात पाठवतो. पण खाणीमध्ये काम करणाऱ्या माझ्या भगिनीच्या लेकराला शिकण्याची सोय नाही. आज बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे त्या विषयावर बोलल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. माझी भगिनी शाळा सुरु होण्याच्या वेळेला बैलाच्या पाठीवर झूल टाकते, बैलाला चंगाळे बांधते आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये कारखान्यावर जाते. कर्नाटकमध्ये कारखान्यावर जाते आणि ज्यावेळी परत येते त्यावेळी परीक्षेची वेळ आलेली असते. त्यांच्या लेकरांनी काय परीक्षा द्यावयाची ? आपण त्यांच्यासाठी कारखान्यावर साखरशाळा सुरु केल्या. म्हणजे लेकरांनी पाचटाच्या झोपडीमध्ये राहावयाचे, साखरशाळेमध्ये शिकावयाचे आणि आपण ग्लोबलायझेशनचे स्वप्न बघावयाचे. बीड जिल्ह्यामध्ये 100 निवासी शाळा आपण का सुरु करीत नाही ? त्यामुळे एकही लेकरु आईच्या आणि बापाच्या मागे, कोयत्याच्या मागे जाणार नाही. त्याने काय आदर्श घ्यावा ? आई-बापाने कोयत्याने ऊस तोडून यावयाचे आणि त्या ठिकाणी मुलाला काय शैक्षणिक वातावरण असणार आहे ? त्या ठिकाणी आरोग्य विषयक काय वातावरण असणार आहे ? म्हणून हे सर्व करीत असताना जे विकर सेक्शन आहेत, जे भटके आणि विमुक्त आहेत त्यांचा विचार केला तर आपल्याकडे ओबीसी महामंडळ आहे पण अजून कर्ज देऊ शकलो नाही. मागासवर्गीयांचे आणखी महामंडळ आहे. मुलांच्या परीक्षेची वेळ आली पण अजून शैक्षणिक कर्ज देऊ शकलो नाही. या सगळ्या गोष्टींचा आपल्याला फायदा ध्यावा लागेल आणि विकर सेक्शनची क्रयशक्ती वाढवणे, त्याच्या श्रमशक्तीला प्रतिष्ठा देणे आणि सेंद्रीय शेती, फळप्रक्रिया तसेच त्याची आयात आणि निर्यात यासंदर्भातील धोरण बदलणे आणि जगाच्या पाठीवर अन्नधान्य निर्माण करणारा, फळ उद्योग

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ SBT/ MMP/ KTG/

श्रीमती उषा दराडे .....

निर्माण करणारा, दुधाची गंगा आणणारा एकमेव देश म्हणून जर आपला देश उभा राहिला तर आपण महासत्ता झाल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारचा आशावाद मी व्यक्त करते. ही जी मंदीची परिस्थिती आहे तिला एक संधी समजून आपल्या देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न आपण सगळ्यांनी मिळून बघावे अशा प्रकारचा आशावाद व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपविते.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, जागतिक अर्थव्यवस्थेत आलेल्या मंदीचा परिणाम राज्यातील कामगार व उद्योगधंद्यावर होत असून राज्यातील प्रामुख्याने असलेले वाहन उद्योग याबाबत माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यासंदर्भात शासनाने करावयाच्या उपाययोजनेबाबत हा जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे मी मनापासून स्वागत करतो. मला खूप आनंद झाला की, आपण एका चांगल्या विषयाला हात घातला. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सुरुवात करताना या विषयाची व्याप्ती आणि सुरुवात कोठे आहे हे सांगितले. सुरुवात अमेरिकेमध्ये आहे असे त्यांनी सांगितले. त्या अमेरिकमेध्ये आइनस्टाईनने 1955 साली जे एक वाक्य म्हटले ते जाणीवपूर्वक सुरुवातीला वाचतो. त्यांनी असे म्हटले होते की, एक भयंकर विचार सतत माझा पाठपुरावा करीत असतो तो हा की माझ्या देशाने, अमेरिकेने स्वत:च्या स्वार्थासाठी एका नव्या प्रकारच्या वसाहतवादाला जन्म दिला आहे. जुन्या काळातील युरोपच्या वसाहतवादापेक्षा तो वेगळा आहे, छुपा आहे. अमेरिकी भांडवल परदेशी गुंतवून त्या देशांना अमेरिकेवर अवलंबून राहायला भाग पाडून त्यांच्यावर वर्चस्व राखले जाते या धोरणाबद्दल किंवा त्याच्या परिणामाबद्दल जो विरोधी सूर काढेल त्याला अमेरिकेच्या शस्त्रूसारखी वागणूक दिली जाते असे बेल्जियमच्या राजमातेला 1955 साली अल्बर्ट आईनस्टाईन यांनी पत्र लिहिले होते. त्या अमेरिकेची ही मानसिकता आता आपण स्वत: पाहात आहोत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

किंबहुना, देश स्वतंत्र झाल्यानंतर कै.सी.डी.देशमुख यांनी 1956 साली लोकसभेमध्ये उद्‌गार काढले होते. त्यावेळी सर्व इंश्यूरंस कंपन्या होत्या. त्यावेळी ते असे म्हणाले होते की, 'या सर्व कंपन्या बदमाश आहेत, लुटारु आहेत. कौटिल्याच्या काळात फसविण्याचे 42 प्रकार होते. परंतु या प्रकारात न भूतो न भविष्यती अशी वाढ झालेली आहे.' लेहमन बँक बुडाली त्यामुळे जगात मंदीची लाट आली आहे. त्या मंदीच्या लाटेची चर्चा सर्वत्र सुरु आहे. आपल्याला त्याची अजून फारशी झ ाळ पोहोचलेली नाही. मंदीचा आकार 'व्ही, यू, एल' या इंग्रजी अक्षरांप्रमाणे असतो. 'व्ही' प्रकारात मोडणारी मंदी जेवढया वेगाने येते तेवढयाच वेगाने ती कमी देखील होते. 'यू' प्रकारात मोडणारी मंदी ही काही काळ स्थिरावते, कारण तिला खाली बेस असतो आणि 'एल' प्रकारातील मंदी असते ती अर्थव्यवस्थेला सपाट करुन जाते, कारण त्या 'एल' या अक्षरात खाली सरळ रेष असते. या प्रकारात मोडणारी मंदी धोकादायक असते आणि आताची मंदी याच प्रकारची आहे. ही मंदी काही काळ स्थिरावणारी आहे. मी याबाबत विचार करतो तेव्हा मला असे दिसते की, ज्या राष्ट्रांची लोकसंख्या कमी आहे त्यांना त्याचे धोके किंवा त्याचे परिणाम फार कमी प्रमाणात भोगावे लागतात. त्याच्या उलट आपल्याकडे त्याचे परिणाम जास्त प्रमाणात भोगावे लागणार आहेत, कारण आपल्या देशाची लोकसंख्या जास्त आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी 20 टक्के जनता स्वच्छ पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे, जवळजवळ 50 टक्के लोकसंख्या म्हणजे 40 कोटी लोक अशिक्षित आहेत. दोन तृतीयांश लोकसंख्या आरोग्याच्या पायाभूत सुविधांपासून वंचित आहे आणि 40 टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या म्हणजे 34 कोटी जनता विपन्नावस्थेत आहे. विपन्नावस्थेत असलेल्या लोकसंख्येचा यासंदर्भात विचार करावा लागेल. 1991 साली देशात जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण आले. देशात एल.पी.जी. म्हणजे लिबरलायझेशन, प्रायव्हेटलायझेशन आणि ग्लोबलायझ ेशन आले. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी म्हटल्याप्रमाणे त्याला पर्याय नाही. त्यांनी मघाशी टेलिकम्युनिकेशनमधील रिव्हॉल्यूशन सांगितले. परंतु आतंकवाद्यांनी त्याचाच आधार घेतला. सेटलाईटच्या माध्यमातून या प्रगतीचा गैरवापर केला. म्हणजे प्रगती कशी आपल्या मुळावर येते ते लक्षात येते. केंद्रात

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ SBT/ KGS/ MMP/

श्री.अरविंद सावंत.....

श्री.वाजपेयी यांचे सरकार असताना विकासाचा दर 6 ते 8 टक्क्याच्या वर गेला होता. हा दर 9 टक्क्याच्या वर जाईल असे वाटले होते, प्रत्यक्षात हा दर खाली खाली गेला. सध्या तो 6 टक्के इतका आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी याचा उल्लेख आपल्या भाषणात केला आहे. देशाचा जीडीपीचा दर 9 टक्क्यावर आला आहे. त्याचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत, त्याची झळ सर्वांना पोहोचत आहे. भारतात मुक्त अर्थव्यवस्था, मुक्त बाजार व्यवस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या आहेत. त्याचे किती तरी कौतुक करण्यात आले. स्व.इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. तसा निर्णय घेण्यासाठी धाडस लागते. त्यांनी ते धाडस दाखविले म्हणून आज सरकारने घेतलेल्या निर्णयांची या बँकांच्या माध्यमातून अंमलबजावणी होत आहे. खाजगी बँकांच्या माध्यमातून सरकारच्या निर्णयांची अंमलबजावणी होत नाही. आयसीआयसीआय बँक शासनाला मदत करणार नाही. कारण त्या बँकेला केवळ व्यवसाय करावयाचा आहे. स्टेट बँक एक रुपयांचीही आकारणी न करता तुम्हाला सर्व नोंदी करुन देते, याच्या उलट याच कामासाठी आयसीआयसीआय ही बँक चार्ज आकारते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत..

खाजगीकरणाचा हा परिणाम आहे. यांचा प्रत्येक पैसा हा इन्व्हेस्टमेंटसाठी आहे. सभापती महोदय, हेज नावाचा फंड आपणास माहीत आहे काय ? या हेज फंडामध्ये श्रीमंत लोक पैसे एकत्र करतात आणि एका डॉलरवर 40 डॉलर कर्ज घेतात. जगातील वेगळी अर्थ व्यवस्था ही मंडळी चालवितात. अमेरिकेमध्ये खाजगीकरण आणि उदारीकरणाने कितीही वेगवेगळे घटक आले तरी शेवटी त्याला स्टॅग्नेशन आणि सॅच्युरेशन आहे. आपण 40 हजार रोजगार निर्माण करण्याचे सांगत होता. त्याचे पुढे काय झाले ? किती लोकांना रोजगार मिळाला ? आपल्याकडे जेवढ्या म्हणून नवीन कंपन्या आल्या त्यांनी किती रोजगार निर्माण केला आणि किती घालविला ? मग ह्या कंपन्या कम्युनिकेशनच्या क्षेत्रातील असतील अथवा अन्य क्षेत्रातील असतील. आज आपल्याकडे एस.टी.मध्ये हजारो कर्मचारी काम करीत आहेत. या एस.टी.ला पर्याय म्हणून आपण खाजगी बसेसना परवानगी दिलेली आहे. खाजगी बसेसमध्ये प्रवाशांकडून कितीही पैसे घेतले जातात. या खाजगी बसेसमुळे रोजगार वाढला की कमी झाला ? एस.टी.ची नोकर भरती थांबली. खरे म्हणजे, रोजगार वाढला नाही तर तो थांबला. हे स्टॅग्नेशन, सॅच्युरेशन आहे. या स्थितीला सरकारकडे काय उपाय आहे? सभापती महोदय, मी फार खोलात न जाता केवळ मुद्दे मांडणार आहे. मध्यंतरी डब्ल्यूटीओने गॅट आणि डंकेल आणले. अशा त-हेने बदल घडत राहिले. हे बदल पहिल्यांदा सोव्हिएट रशियामध्ये घडले. अमेरिकेसारख्या विकसित देशामध्ये आर्थिक मंदी आली हा दुसरा बदल झाला. सुरुवातीला सोव्हिएट रशिया आणि अमेरिका ही दोन जगातील ताकदवान राष्ट्रे मानली जात होती.त्यानंतर चीनने उचल खाल्ली. सभापती महोदय, आपण सेझ जाणता. त्यामधील कायदे काय आहेत ? हे सर्व घडत असताना आपण सेझ आणला. त्या सेझला वेगळा कायदा लागू आहे. या सेझमध्ये जे जे आय.टी.सेक्टर आले त्यांना कामाचे बंधन राहिले नाही. या नोक-यांमध्ये हायर ॲण्ड फायर अशी स्थिती आहे. आमचा कामगार कायदा अजून अस्तित्वात आहे. या कामगार कायद्याला धुडकावून आपण सेज आणला. सेज म्हणजे वेगळे संस्थान. तेथे डोकावायचे नाही, काही पहायचे नाही. तेथील सर्व प्रोडक्टस् एक्सोर्ट ओरिएण्टेड. या सेझमध्ये 16-16 तास राबवून घेतले जाते. 40-50 हजार रु. पगार दिला जातो. परंतु त्याचबरोबर कोणत्याही क्षणी कामावरुन काढले जाते. एका

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत....)

फटक्यामध्ये जेट ऐअरवेज्ने कर्मचा-यांना काढून टाकले होते. जोरदार विरोध झाला म्हणून त्यांच्या नोक-या टिकल्या. सभापती महोदय, या जेट ऐअरवेजमधील, किंग फिशर मधील किती लोक परमनण्ट आहेत आणि किती लोक कॉण्ट्रॅक्टवर काम करतात ? म्हणून सरकारी नोक-याकडे लोक येतात. ग्रामीण भागातील शेतक-याला वाटते की माझ्या मुलाला निदान शिपायाची तरी सरकारी नोकरी लागली पाहिजे. कारण शेती बुडाली तरी पगार मिळतो. सभापती महोदय, भारतीय तरुणी जेव्हा सौदर्य स्पर्धा जिंकू लागल्या त्याचवेळी इन्फोसीस, सत्यम सारख्या कंपन्यांनी भारताच्या आय.टी. सेक्टरमध्ये प्रवेश केला आणि त्यांनी या क्षेत्रामध्ये प्रचंड प्रगती सुरु आहे असे चित्र उभे केले. आता एक मंदीची लाट आल्यानंतर सगळी आय.टी. इण्डस्ट्री कोलमडून पडली. आऊटसोर्सिंगवर चाललेल्या अमेरिकेसारख्या प्रगत आणि विकसित देशात बेरोजगारी निर्माण झाली. या आर्थिक मंदीची तितकीशी झळ अजून आपल्याला लागलेली नाही, म्हणून ही चर्चा येथे उपस्थित झालेली आहे.

....नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आपण हे धोके लक्षात घेतले पाहिजेत आणि ते धोके लक्षात घेऊनच आपण कामे केली पाहिजेत. या सर्व कंपन्या आल्यानंतर जेव्हा हे धडले, मग सर्व डॉमिनन्स कोणाचा आला? इंटरनॅशनल मॉनेटरी फंड आणि वर्ड बँक डिक्टेट करावयास लागले. त्यांनी नंतर या गोष्टींची सगळी पुनर्बांधणी करण्यास सुरुवात केली. तेव्हा त्यांनी टर्म डिक्टेट केल्या. त्या टर्मस् मी जाणीवपूर्वक वाचतो. त्या टर्म्स मधून बाहेर कसे पडावयाचे हे तुम्हीच आम्हाला सांगा. आयातीला खुली सूट आणि निर्यातभिमुख उत्पादनाला प्रोत्साहन देणे. औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रातील परकीय गुंतवणुकीवरील सर्व निर्बंध, देशी चलनाचे अवमूल्यन करणे, सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करणे, खुल्या बाजारपेठेच्या व्यवहारामध्ये शासनाचा हस्तक्षेप काढून घेणे, वेतन कपात करणे, शासनाचा खर्च कमी करणे, अबकारी कर वाढविणे यासारख्या अन्य तरतुदी ज्यामुळे देशांतर्गत मागणीचा खप कमी होईल. देशी उत्पादकांचा मुख्य उद्देश निर्यात हाच असेल, स्ट्रक्चरल ॲडजेस्टमेंट लोन तेव्हाच तुम्हाला मिळेल. These are the terms dictated by International Monetary Fund. शासनाने सेझ आणला आहे, परंतु सेझमधील हा एक धोका तुम्ही लक्षात घेतला नाही. कर्मचा-यांना वेतन मिळते. परंतु ते वेतन केव्हाही बंद करतील. सेझमधील हा फार मोठा धोका तुम्ही लक्षात घेतला नाही. कर्मचा-यास युनिटमधून केव्हाही कमी केले जाऊ शकते, त्याचे वेतन केव्हाही थांबवू शकले जाऊ शकते. सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी टाटा कंपनीचा सकाळी उल्लेख केला. बजाजने काय केले? कायदा अस्तित्वात असताना बजानने एका दिवसात कारखाना बंद केला. बजाज काही सेझमध्ये नाही. बजाजने कारखाना बंद करताना शासनाला धुडकावून लावले. कारखाना का बंद केला? तो पूर्ववत सुरु करा, असे सांगण्याची बजाजला शासनाची हिम्मत झाली नाही. खटाव मिलची मालकीण शासनाने सांगूनही बैठकीला येत नव्हती. यासंबंधी माननीय कामगार मंत्र्यांना माहिती आहे. गरीब माणूस कसा वाचणार? त्यांना वाचविण्यासाठी शासनाकडे काय मार्ग आहेत? बजाजने कारखाना बंद केला आणि कारखान्यातील आतील जागेचा वापर दुस-या कामासाठी केला जाणार आहे. त्या ठिकाणी ऑटोमोबाईल इंडस्ट्री होती ती तेथून हलविणार आणि त्या जागेवर कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधणार आहे. सर्व कामगारांना सांगितले की, तुम्ही घरी बसा. मी तुम्हाला घरी बसून पगार देतो. अशा कंपनी मालकांवर शासनाचा काय कंट्रोल आहे? एस.ई.झेड.वर तुमचे काय कंट्रोल काय आहे? या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

गोष्टींचा खुलासा होणे आवश्यक आहे. आम्ही तर शासनाला विचारणार आहोत की, पुढे काय घडणार आहे? अराजक सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. माननीय शिवसेना प्रमुख यासंबंधी नेहमी बोलत असतात. त्यांना भय वाटत आहे की, या देशाचे पुढे काय होणार आहे? परवा जे मुंबईत घडले ती एक सुरुवात आहे. अराजक सदृश्य परिस्थिती या देशावर चारही बाजुंनी येणार आहे. अमेरिकेची ही एक स्टाईल आहे. अमेरिकेतील परराष्ट्र सचिव श्रीमती कोंडोलिसा राईस मुंबईतील घटनेची पाहणी करण्यासाठी आल्या होत्या. त्यावेळी त्या वेगळे बोलल्या. पाकिस्तानात गेल्यानंतर त्या वेगळे बोलल्या आणि आता त्यांना दम देत आहेत की, मंदी हटवावयाची असेल तर युध्द झाले पाहिजे. एकमेकात युध्द होऊ द्या, म्हणजे आमच्या शस्त्रांची विक्री करता येईल. त्यामुळे आमच्या देशातील मंदी दूर होईल. अमेरिकेतील कंपन्या वाचविण्यासाठी 7 लाख अब्ज डॉलर म्हणजे 20 हजार कोटीचे बेलआऊट पॅकेज जॉर्ज बूश यांनी जाहीर केले. परंतु त्या कंपन्या वाचू शकल्या नाहीत. या मंदीची झळ आपल्याला देखील लागणार आहे.

सभापती महोदय, या टर्ममध्ये आणखी काही मुद्दे हाती घेतले आहेत. त्यांनी सरकारचा बाजारातील हस्तक्षेप थांबविण्याचा मुद्दा हाती घेतला आहे तसेच राजकोषीय तूट कमी करण्याचा मुद्दा हाती घेतला आहे. कामगार कायद्यात बदल करावयाचा, कल्याणकारी योजनेत बदल करावयाचा असे मुद्दे हाती घेतले आहेत. या सगळया गोष्टींचे परिणाम आपल्याला भोगावे लागणार आहेत. तैवान आणि दक्षिण कोरियाने ते केले नाही. मालाचे इंपोर्ट करण्यापेक्षा त्यांनी स्वत:चे प्रॉडक्शन मोठया प्रमाणात वाढविले. सन्माननीय सदस्य श्री. छाजेड यांनी शेवटचे वाक्य वापरले की, क्रयशक्ती वाढविली पाहिजे. शासन ही क्रयशक्ती कशा प्रकारे वाढविणार आहे याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात सांगावे. असंघटित कामगार बेरोजगार होणार आहेत, सुशिक्षित कामगारवर्ग बेरोजगार होणार आहे. क्रयशक्ती वाढविताना कामगारांचे वेतन वाढले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी एक अतिशय सुंदर उदाहरण दिले. एक रुपयाचे नाणे पडले, ते नाणे काढण्यासाठी दोन रुपये लागणार आहेत. ते दोन रुपये देऊन टाकू. परंतु यामुळे तीन रुपये चलन वाढणार आहे. ते तीन रुपयांचे चलन बाजारात खेळते कसे करणार? ते चलन खेळते केले तरच मंदीतून काही प्रमाणात सुटका होऊ शकते. या देशात, या राज्यात बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या. या कंपन्यांचे उद्दिष्ट काय आहे यासंबंधी शासनाकडून आम्हाला माहिती हवी आहे. देशात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत..

खाजगीकरण मोठया प्रमाणात होत आहे. मोठया प्रमाणात स्पर्धा सुरु झाली असे सांगितले जाते. परंतु यासंदर्भात अंबानी एका वाक्यात बोलून गेले की...

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

कर लो दुनिया मुट्ठी में. बाकीच्यांनी मरा. मला जगू द्या. जगा आणि जगू द्या हा मुद्दाच नाही. मी जगणार, तुम्ही मेलात तरी हरकत नाही. स्पर्धेत सुध्दा मारले जातात. किती अमालगमेट झाले? एअरलाईन्स कंपन्यांचे उदाहरण समोर आहे. इंडिपेण्डन्ट काल चालत नाही? इंडियन एअरलाईन्स आणि एअर इंडियाबद्दल टिंगल करता येते. सरकारचे जे चालले आहे ते चांगले आहे असे म्हणणे नाही. परंतु त्यातील चुका आणि चांगल्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. सरकार हे वेल्फेअर स्टेट आहे. सरकारने कोणताही धंदा करायचा नाही. परंतु शासन चालविताना सर्वसामान्य माणसांना न्याय देणारी भूमिका करणारे कायदे केले पाहिजेत. त्यावर बंधन असले पाहिजे. म्हणून मी म्हणालो, तुम्ही त्यांचे काही करु शकला नाहीत. तुम्ही त्या मालकांना हात लावू शकला नाहीत. बजाजने कारखाना बंद केला. टाटा कंपनीने सांगितले आठ दिवस कारखाना बंद ठेवणार. नॅनो गाडीची निर्मिती होणार, एक्सपोर्ट होणार आणि त्यातून पैसे मिळणार. हे रोमँटिकल आहे. प्रॅक्टिकल वेगळे असते. बेरोजगारांच्या समस्यांबद्दल सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अधिक विस्तृतपणे सांगितले आहे. त्याबद्दल शासनाकडे कोणते उपाय आहेत? त्याच्या पलिकडचे धोके त्यांनी सांगितले. सावधान व्हा. गुजराथ आपल्याकडचे कारखाने घेऊन चालला आहे. जे त्या राज्याला करता येते ते आम्हाला का करता येत नाही? ही निष्क्रियता का? आम्हाला वेळ नाही. आमचा वेळ आमची खुर्ची सांभाळण्यात जातो. ते दिल्लीला गेले की हे दिल्लीत जातात. शासनासाठी, महाराष्ट्रासाठी, मुंबईसाठी, शेतकऱ्यांसाठी, पाण्यासाठी, पैसा मागण्यासाठी गेले नाहीत. गेले फक्त मला खुर्ची द्या म्हणून. ज्याकडे दुर्लक्ष होते तेथे अधिक लक्ष द्यायला पाहिजे.

सभापती महोदय, ठाणे-बेलापूर भागातील किती कारखाने बंद पडले? म्हणून मी मुद्दाम एसईझेडचा विषय मांडला. तो लक्षात घ्या. उद्दिष्ट चांगले आहे. परंतु ते वेगळे संस्थान निर्माण होत आहे. त्याच्या आतमध्ये शिरकाव नाही. कामगारांचा कायदा लागू नाही. ज्याप्रमाणे सिगारेटच्या पाकिटावर "Smoking is Injurious to Health" ही धोक्याची सूचना लिहिलेली असते तशा पध्दतीची माहिती नमूद केली जाते, जी वाचताही येत नाही. रिलायन्स मोबाईलचे बिल घ्या किंवा रिलायन्स एनर्जी कंपनीचे बिल बघा. दुर्बिण लावून भिंगातून वाचावे लागेल मगच कळेल किती बिल आले आहे, अन्यथा कळतच नाही. अशा पध्दतीने कारभार चालू आहे. मघाशी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.अरविंद सावंत.....

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी साहेब म्हणाले की, कापसाला आम्ही भाव दिला. केंद्रीय कृषिमंत्र्यांनी 3000 रुपये भाव देऊन शेतकऱ्यांची क्रयशक्ती वाढविली. किती शेतकऱ्यांना पैसे मिळाले याची आकडेवारी सभागृहाला दिली जाईल का? किती वेळा तुम्ही पैसे दिले? कसे कसे हप्त्याने दिले? त्याला कसे कसे नागवले हे सांगा. म्हणजे सभागृहाला कळेल त्या शेतकऱ्याला तुम्ही कसा न्याय दिला. रोजगार हमी योजनेचा कायदा तुम्ही बदललात. त्या कायद्यान्वये शासनाने द्यायचे कॉन्ट्रिब्यूशन तुम्ही बंद केले. वर असे सांगितले की, रोजगार हमी योजनेचा पैसा खर्च होत नाही. त्यामुळे सरकारचे कॉन्ट्रिब्यूशन देण्याची कायद्यातील तरतूद काढली पाहिजे. मी त्या समितीवर होतो. सातत्याने मी याबद्दल विरोध दर्शविला. परंतु सरकारने ऐकले नाही. त्या कायद्यामध्ये अकुशल कामगारांसाठी तरतूद केलेली आहे. सुशिक्षितांसाठी कोणतीही तरतूद नाही. त्या योजनेची सीमा ही फक्त विहिरी आणि रस्ते या पलिकडे नाही. श्रमशक्तीचे हे काम आहे. आज लाखो बेरोजगार खेड्यापाड्यामध्ये आहेत, जे एसएससी, बारावी, पदवीधर झालेले आहेत. शिकल्यामुळे शेतातील काम करणे त्यांना कमीपणाचे वाटत असेल. रस्त्यावर काम का करावे? हे नैसर्गिक आहे. म्हणून रोजगार हमी योजनेची कक्षा वाढवावी, कायद्यात बदल करावा अशी मी मागणी केली. जो निधी सरकारकडून द्यायला पाहिजे, जो पैसा खर्च होत नाही तो पैसा उपयोगी पडला असता आणि लाखो बेरोजगारांच्या हाताला काम मिळाले असते. अजूनही वेळ गेलेली नाही. कोणीतरी एक येतो आणि त्याच्या डोक्यात ही कल्पना सुचते आणि पैसा काढून घेतला जातो. रोजगार हमी योजनेच्या कायद्यात बदल करु नका म्हणून मी कडाडून विरोध केला होता. आता त्याप्रमाणे बदल करावा अशी विनंती करतो.

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

शेवटचा एक मुद्दा सांगून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे. या निमित्ताने मला बर्तोव्ह ब्रेक्स यांच्या कवितेतील चार ओळी वाचून दाखवावयाच्या आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की,

ताटातली भाकरी हिसकावणारेच शिकवितात अपरिग्रह,
म्हणतात, समाधान असतं मानण्यात,
गोळा करुन कर ज्यांना पोसतात,
तेच करतात त्यागाची आवाहने,
तृप्त होऊन ढेकर दिल्यावर ते भुके कंगालांना
गाऊन दाखवतात उद्याची छान स्वप्ने,
देशाला खड्डयात नेऊन सोडणारेच,
म्हणतात कारभार फार अवघड,
साध्या माणसाचं काम नाही ते,
कारभार फार अवघड.

अशा प्रकारे परिस्थिती फार अवघड आहे व त्यातून मार्ग काढावयाचा आहे व त्यासाठी क्रयशक्ती वाढली पाहिजे. दुसरा मुद्दा म्हणजे रोजगार हमी योजनेचा जो पैसा दुसरीकडे वळविला तो परत आणून त्याची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. जेणेकरुन निवडणुकीचे काम करणारे सुशिक्षीत बेरोजगार व शिक्षकांना तो देता येईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

जय हिंद जय महाराष्ट्र.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याची परवानगी मागतात.)

उपसभापती : आता माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सुरु होईल. या चर्चेला 3.00 तास होऊन गेलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराला फक्त अर्धा तासच शिल्लक राहिला आहे. त्यामुळे आता कुठल्याही सन्माननीय सदस्यांनी बोलण्याचा आग्रह धरु नये.

श्री. नवाब मलिक : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी नियम 260 अन्वये एका महत्वाच्या मुद्यावर सभागृहात चर्चा उपस्थित केली आहे .....

श्री. नितीन गडकरी : महोदय, माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्या श्रीमती मधू जैन या नवीन सदस्या आहेत, त्यांना कृपया बोलण्याची संधी द्यावी तसेच आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जामा यांनाही आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. आणखी दोन तीन सदस्यांना प्रत्येकी पाच पाच मिनिटे तरी बोलण्याची संधी आपण द्यावी. हवं तर या प्रस्तावाचे उत्तर उद्या सकाळी ठेवावे.

श्री. विनोद तावडे : महोदय, आज या प्रस्तावावरील चर्चा पूर्ण करुन उद्या सकाळी त्याचे उत्तर दिले तरी चालेल.

उपसभापती : सर्व सन्माननीय सदस्यांचा आग्रह आहे की, उद्या सकाळी या प्रस्तावावरील चर्चेचे उत्तर दिले तरी चालेल. परंतु आता 6.00 वाजता ही चर्चा मी संपविणार आहे, याला सदस्यांची मान्यता असेल तरच मी हे मान्य करतो.

(अनेक सन्माननीय सदस्य होकारार्थी उत्तर देतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा : सभापति महोदय, मेरा पाईंट ऑफ ऑर्डर है. जब इस प्रस्ताव पर चर्चा शुरु हुई तब अगर कोई समय सीमा तय हुई होती तो मैं समझ सकता था. लेकिन इस प्रस्ताव पर शुरु में जिन सम्माननीय सदस्यों ने भाषण किया, उनके लिए कोई समय सीमा तय नहीं थी और अब जब हमारा बोलने का नंबर आया तो 5 मिनट, 10 मिनट का समय तय किया जा रहा है. मैं यह बात कई बार कह चुका हूं कि बाद में बोलने वालों को कम समय दिया जाता है.

उप सभापति :कई सम्माननीय सदस्य यह बात इसके पहले भी कह चुके हैं,सौ बार कह चुके हैं. लेकिन इस पर कोई अमल नहीं करता. सम्माननीय सदस्या श्रीमती मधु जैन आप अपना भाषण शुरु कीजिए.

श्रीमती मधु जैन (विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, विश्व अर्थव्यवस्था में उत्पन्न मंदी के संबंध में यहां पर जो प्रस्ताव रखा गया है, मैं उस पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. जैसा कि सब को मालूम है कि आज विश्व मंदी का असर हर देश और हर व्यक्ति पर किसी न किसी रुप में, जिस तरह से भी हो उस तरह से और किसी न किसी प्रमाण में पड़ा है. जिस प्रकार से विश्व के अन्य देशों पर मंदी का असर हुआ है तो स्वाभाविक है कि मंदी का असर हिन्दुस्तान पर भी होगा. जिस तरह से अमेरिका की पूरी अर्थव्यवस्था डिस्टर्ब हो गई, वहां के बड़े-बड़े बैंक दिवालिया हो गए, उसी तरह से विश्व के अन्य देशों की अर्थव्यवस्था पर भी इस मंदी का विपरीत प्रभाव पड़ा है. सवाल यह है कि इस आर्थिक मंदी के दौर में भारत की स्थिति क्या है ? सभी देशों की निगाह भारत की ओर है. भारत के प्रधानमंत्री श्री मनमोहन सिंग के नेतृत्व में G-20 देशों ने मंदी का मुकाबला कैसे किया जाए, इस संबंध में रुपरेखा तैयार की है. मंदी से निपटने के लिए 16 महीने का कार्यक्रम बनाया गया है. कई उपाय सुनिश्चित किए गए हैं, जिन उपायों द्वारा भारत एवम् अन्य देश मंदी का मुकाबला करेंगे. जो उपाय तय किए गए हैं, उन पर अमल भी शुरु हो गया है. इन उपायों के कारण ही महंगाई दर जो पाँच प्रतिशत से बढ़कर 12 प्रतिशत तक चली गई थी, वह फिर कम होकर 6 प्रतिशत तक आ गई है. यही नहीं जो ब्याज दर बढ़ गई थी, खास तौर से गृह कर्ज पर जो ब्याज दर बढ़ गई थी, उस ब्याज में भी कटौती की गई है. ब्याज दर कम होने के कारण मकानों की मांग बढ़ गई है. उसी प्रकार से डालर की तुलना में रुपये की कीमत जो 39 रुपये से बढ़कर 50 रुपये हो गई थी, वह कम होकर 46 रुपये पर आ गई है. आर्थिक मंदी की स्थिति में यह जो

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मधु जैन ....

परिवर्तन आ रहा है, उसके पीछे विश्व स्तर पर उठाए गए कदम है. भारत सरकार द्वारा भी कई कदम उठाए गए है. इस मंदी की वजह से विश्व में पूरी बैंकिंग सिस्टम डिस्टर्ब हो गयी है लेकिन भारत में बैंकिंग सिस्टम पूरी तरह स्थिर और मजबूत बनी हुई है. इसकी यह वजह है कि केन्द्रीय सरकार ने मंदी से निपटने के लिए कई कदम उठाए हैं. लेकिन हम महाराष्ट्र में यह देखना चाहते हैं कि राज्य में कोई विपरीत परिस्थिति निर्माण होने की संभावना ध्यान में रखकर महाराष्ट्र सरकार क्या उपाय कर रही है और क्या उपाय कर सकती है. हम सब के सामने यही विचार आ रहा है कि हमारी सरकार क्या उपाय करेगी. मुंबई हिन्दुस्तान की आर्थिक राजधानी है. आज हमारे महाराष्ट्र में बहुत सारे उद्योग है. इन उद्योगों पर मंदी का असर न हो इसलिए इस परिस्थिति को ध्यान में रखते हुए उस पर उपाय करने के लिए महाराष्ट्र को लीडरशिप लेनी चाहिए.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री शर्मा ...

अशुद्धीरित प्रत / परिशुद्धीरित नाही

ASS/ KTG/ SBT/ . . . . श्रीमती मधु जैन का भाषण जारी, पूर्वी तालेवार. 17:30

हमारे सामने प्रश्न यह है कि महाराष्ट्र के अन्दर हम मंदी का सामना किस तरह से करेंगे. मंदी का सामना करने के लिए सरकार के पास कुछ नीतियाँ होती हैं. सरकारी खर्च, इन्ट्रेस्ट रेट, मनी सप्लाय, टॅक्स और इन्सेटिव्स, ये कुछ मेजर्स हैं, जिनके द्वारा कोई भी सरकार मंदी का सामना करती है.

सभापति महोदय, जहां तक सरकारी खर्चे का सवाल है, मुझे लगता है कि महाराष्ट्र सरकार को इस पर काफी ध्यान देने की जरूरत है. हम इन्पफ्रास्ट्रक्चर क्षेत्र में सरकारी खर्चे बढ़ा सकते हैं. बड़े दुख की बात यह है कि रोड्स के लिए केन्द्रीय सरकार द्वारा दिया गया फंड वापस चला गया, पिछले साल 450 करोड़ रूपए वापस चले गए. हमें इस ओर बहुत ज्यादा ध्यान देना चाहिए. भविष्य में इस तरह के लॅप्स न होने दिए जाएं, ताकि उसके द्वारा हम राज्य के अन्दर इन्फ्रास्ट्रक्चर मजबूत कर सकें.

सभापति महोदय, जब हम जागतिक मंदी की बात करते हैं तो लोडशेडिंग के बारे में विचार करना आवश्यक है. हमारे प्रदेश के कारखानों के सामने मुख्य समस्या लोडशेडिंग की है और इस वजह से उनका कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन बहुत अधिक हो जाता है. सरकार को कुछ इस प्रकार के उपाय करने चाहिए बिजली की उपलब्धि अधिक हो सके और इसके द्वारा इन्डस्ट्री का कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन कम हो सकता है. इस प्रकार से हम इन्टरनेशनल मार्केट में अधिक कंपटीटिव हो सकते हैं. इस बारे में मैं एक विशेष उल्लेख यह करना चाहती हूँ कि महाराष्ट्र में इलेक्ट्रिकसिटी का डिस्ट्रीब्यूशन लॉस 33 प्रतिशत है, जबकि गुजरात में यह 12 प्रतिशत है और इस बारे में इन्टरनेशनल स्टॅन्डर्ड 5 से लेकर 7 प्रतिशत तक है. इसको कंट्रोल करने के लिए सरकार को तुरन्त कदम उठाने चाहिए. अगर हम डिस्ट्रीब्यूशन लॉस में कमी कर सके तो हमें काफी बड़ी तादाद में बिजली उपलब्ध हो सकती है, जिसके द्वारा हम इन्डस्ट्रियल प्रॉडक्शन बढ़ा सकते हैं और हमारे कारखानों का जो नुकसान हो रहा है, वह नहीं होगा. प्रॉडक्शन बढ़ने के कारण हमारी कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन कम होगी और हम इन्टरनेशन मार्केट में कम्पटीटिव हो सकते हैं.

सभापति महोदय, इरीगेशन प्रोजक्ट्स के बारे में माननीय सदस्य श्री. गडकरी जी ने काफी चर्चा की है, इसलिए मैं इस बारे में कुछ नहीं कहूंगी, लेकिन यह अवश्य कहना चाहती हूँ कि हमें सभी क्षेत्रों में इन्फ्रास्ट्रक्चर को मजबूत करने की जरूरत है.

. . . 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, आखिर में मैं एक ही बात कहना चाहती हूँ कि इन्सेन्टिव के द्वारा सरकार प्रॉडक्शन बढ़ा सकती है. "सी" क्षेत्र, "डी" क्षेत्र और बॅकवर्ड एरिया में महाराष्ट्र सरकार की तरफ से इन्सेन्टिव नहीं हैं. अगर इन क्षेत्रों में इन्सेन्टिव दिए जाएं तो कॉस्ट ऑफ प्रॉडक्शन कम होगा और इसका लाभ मजदूरों को भी मिलेगा. मैं आशा करती हूँ कि बढ़ती हुई जागतिक मंदी का सामना करने के लिए महाराष्ट्र सरकार उपाय-योजना करेगी और उचित कदम उठाएगी. धन्यवाद.

. . . भाषण पूर्ण . 3T 3

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, मंदी किस कारण से है, उसका ग्लोबल कारण क्या है, समय की कमी को देखते हुए मैं इस बारे में कुछ नहीं कहना चाहता. इस विषय पर हमारे सत्ताधारी पक्ष और विपक्ष के माननीय सदस्यों ने बहुत अच्छे विचार प्रकट किए हैं. सभागृह में इस बात पर ज्यादा विचार हो रहा है कि महाराष्ट्र शासन को क्या उपाय-योजना करनी चाहिए. इसलिए मैं मंदी के ग्लोबल कारण में न जाते हुए 2-4 सुझाव आपके सामने रखना चाहता हूँ. महाराष्ट्र शासन को शॉर्ट टर्म और लॉंग टर्म कदम उठाने चाहिए. मंदी का असर महाराष्ट्र के ग्रामीण क्षेत्र में और छोटे शहरों में दिखना चालू हो गया है. मंदी के असर की वजह से हमारा इन्वेस्टमेंट कम हो रहा है और एक्सपोर्ट 10-11 प्रतिशत तक कम हो गया है. टेक्सटाइल इन्डस्ट्री, आई.टी सेक्टर और दूसरे क्षेत्रों में ग्रामीण क्षेत्र और छोटे शहरों में मंदी का असर धीमे धीमे आ रहा है.

. . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जामा .....

लेकिन ग्रामीण क्षेत्र में, शहरी क्षेत्र में जहां बिल्डिंग कंसट्रक्शन का काम चलता है, वहां गृहनिर्माण उद्योग से जुड़े कामगार मंदी की वजह से बेरोजगार हो गए हैं. मंदी की वजह से गृहनिर्माण उद्योग में इनवेस्टमेंट नहीं हो रही है. आयात-निर्यात कम हो गया है. इस स्थिति से निपटने के लिए भारत सरकार को कदम उठाना चाहिए और राहत पहुंचानी चाहिए. शीघ्र उपाय के अंतर्गत इस दिशा में कदम उठाए जा सकते हैं. दीर्घ उपाय के अन्तर्गत सिंचाई और रोड के संबंध में ध्यान दिया जा सकता है. केपिटल एक्सपेंडीचर में वृद्धि हो सकती है. मैं यहां पर इस संबंध में यह भी कहना चाहता हूं कि केन्द्रीय सरकार द्वारा राज्य सरकार को दिए गए 450 करोड़ रुपये रोड के कार्य पर खर्च नहीं हो सके, जिसके कारण यह धनराशि केन्द्रीय सरकार को वापस करनी पड़ी है. मेरी यह मांग है कि केन्द्रीय सरकार द्वारा मंजूर की गई और प्रदान की गई धनराशि अगर खर्च नहीं होती है तो इसे क्रिमिनल अफेन्स माना जाना चाहिए और जो कर्मचारी/अधिकारी इसके लिए दोषी है, जिन्होंने लापरवाही बरती है, उनके खिलाफ कार्रवाई की जानी चाहिए. इस प्रकार का नियम बनाना चाहिए. क्योंकि सिंचाई योजना और रोड के कार्य न होने के कारण जनता सफर हो रही है. आर्थिक मंदी को दूर करने के लिए, ग्रामीण अर्थव्यवस्था पर कोई विपरीत परिणाम न हो, इसके लिए केन्द्रीय सरकार ने पॅकेज दिया है. वित्त मंत्रालय ने हाई पावर कमेटी बनाई है. लेकिन महाराष्ट्र सरकार ने कोई कदम नहीं उठाया है. महाराष्ट्र सरकार को भी कदम उठाना पड़ेगा. मेरा यह सुझाव है कि उद्योगों को सहायता प्रदान करने के लिए अगर सरकार कोई पॅकेज बनाती है तो सरकार की तरफ से उद्योगों के मालिकों के सामने यह कंडीशन रखनी चाहिए कि वे कामगारों की छंटनी न करें. मैं ट्रेड युनियन का प्रतिनिधि होने के नाते यह मान भी सकता हूं कि मजदूरी कम कर दें लेकिन कामगारों का रोजगार सुरक्षित रहना चाहिए. यह जो विश्व में मंदी आई है, वह अस्थाई है. आगामी समय में यह स्थिति नार्मल हो जाएगी. वैसे भी हमारे देश में मंदी का असर कम ही है और धीरे धीरे हो रहा है. दूसरा मेरा यह सुझाव है कि गांव और शहरों में जो बेरोजगार युवक है, उनके लिए कोई योजना बनाई जाए और उन्हें राहत दी जाए.

श्री दिवाकर रावते : छठवें वेतन आयोग के अनुसार वेतन दिया जाना चाहिए या नहीं, इस बारे में आपकी क्या राय है ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/

17:35

श्री सय्यद जामा : मैंने यह कहा है कि ट्रेड युनियन का नेता होने के नाते मैं यह मान सकता हूं कि मंदी काल में कुछ मजदूरी कम होती हो तो हो लेकिन कामगारों का रोजगार नहीं जाना चाहिए. कामगारों को नौकरी से नहीं निकाला जाना चाहिए. दूसरी बात यह है कि मंदी के कारण ग्रामीण उद्योगों पर बहुत बुरा असर हो रहा है. लघु एवम् कुटीर उद्योगों को आर्थिक सहायता देकर मजबूत करना चाहिए. आज लघु एवम् कुटीर उद्योग किस परिस्थिति से गुज़र रहे हैं, यह बात सब को मालूम है. जिस प्रकार से चीन में घर-घर में छोटे-छोटे उद्योग चलाए जाते हैं और उन्हें राहत पहुंचाई जाती है, उसी प्रकार से हमारे राज्य में भी सरकार द्वारा इन छोटे उद्योगों को जीवित रखने के लिए कार्यक्रम बनाया जाना चाहिए, पॅकेज करना चाहिए. पब्लिक सेक्टर के संबंध में सम्माननीय सदस्य श्री गडकरी जी ने अभी बताया कि आदर्श अर्थव्यवस्था क्या होगी. मैं उसमें नहीं जाना चाहता. उदार नीति होनी चाहिए या और कौनसी नीति होनी चाहिए, कौनसी नीति अच्छी है. मैं इस बारे में अभी कुछ नहीं कहना चाहता. लेकिन आज़ादी मिलने के बाद भारत के प्रथम प्रधानमंत्री श्री पंडित जवाहरलाल नेहरु ने पांचवी पंचवर्षीय योजना के माध्यम से जो रुपरेखा रखी थीं और 1956 में जो प्रस्ताव पास किया गया था, उसके कारण ही आज हमारा देश चंद्रयान छोड़ने की क्षमता रखता है. मैं यह कह रहा था कि हमारा पब्लिक सेक्टर भी मजबूत होना चाहिए.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री शर्मा

अशुधारित प्रत / शशिधारित नहीं

आज अगर हमारे देश में मंदी का असर थोड़ा कम है तो उसका मुख्य कारण यह है कि हमारी बँकिंग, इन्श्योरेन्स और पब्लिक सेक्टर के हाथ में हमारा इन्वेस्टमेंट है. इसलिए हम बचे, नहीं तो हमारे यहां भी मंदी का तेज असर दिखाई देता.

सभापति महोदय, मेरा एक और सुझाव है. लोकल बॉडीज में चुनकर जाना पॉलिटिकल एंबिशन हो गया है. आज स्थिति यह है कि लोकल बॉडीज में कहीं हम शासन में हैं, कहीं दूसरे लोग शासन में हैं, कहीं अपोजीशन शासन में है. मेरा सुझाव यह है कि लोकल बॉडीज को आर्थिक दृष्टि से मजबूत करना चाहिए, ताकि सरकार की सब्सिडी कम रहे. ग्राम पंचायत, जिला परिषद, नगर परिषद, महानगरपालिका अगर मजबूत रहेंगी, सेल्फ जनरेटिंग रहेंगी तो गरीब और छोटे लोगों को इसका फायदा होगा और उनको संरक्षण मिलेगा.

सभापति महोदय, कॉन्ट्रेक्ट लेबर एबॉलीशन एक्ट कॉन्ट्रेक्ट वर्कर्स को संरक्षण देने में बिल्कुल प्रभावी नहीं है. उनके लिए कुछ तो मिनिमम सुविधा देनी चाहिए, समान काम के लिए समान वेतन तय करना चाहिए. मेरा अगला मुद्दा यह है कि . . . .

उपसभापती : समय कम है, इसलिए आप अपना शेष भाषण माननीय मंत्री महोदय के पास लिखकर दे दीजिए.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, हमारे देश में मंदी का असर होने की संभावना दिख रही है तो ऐसे समय में हमारे देश के बड़े उद्योगपतियों के खर्चे के उपर रोक लगनी चाहिए, इन लोगों के द्वारा पैसे का बहुत वल्गर डिस्प्ले हो रहा है.

सभापति महोदय, मेरे अभी 2 मुद्दे और बाकी हैं. मैं इन मुद्दों को लिखकर दे रहा हूँ.

. . . . .

भाषण पूर्ण . 3V 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी जागतिक मंदीच्या परिणामाच्या संदर्भात जो प्रस्ताव येथे मांडला आहे. त्याबाबत काही मुद्दे मी थोडक्यात पण वेगाने मांडणार आहे.

एक म्हणजे ज्या प्रकारची अर्थव्यवस्था आपण स्वीकारली आहे त्यातील फायदे किती आणि तोटे किती याची चर्चा कितीही केली तरीही आर्थिक उदारीकरण हे एक दुधारी शस्त्र आहे. त्यामुळेच जगामध्ये आज जी मंदी निर्माण झाली आहे तिच्या दुष्परिणामापासून आपण स्वत:ला आपली कितीही इच्छा असो वा नसो वाचवू शकत नाही. मंदीमुळे राज्याचे 25 टक्के उत्पन्न घटणार आहे असे विधान माननीय श्री.जयंत पाटील यांनी ते अर्थमंत्री असताना केलेले आहे. माननीय पंतप्रधानांनी जेव्हा वेगवेगळ्या उद्योग समूहाचे लोक त्यांना या संदर्भात भेटायला गेले तेव्हा पायाभूत सुविधांसाठी सरकारने आम्हाला संरक्षण द्यावे अशी मागणी त्या लोकांनी पंतप्रधानांकडे केली. त्यावर माननीय पंतप्रधानांनी नॅशनल हौसिंग बँकेला 10 हजार कोटी रूपयांचा निधी दिलेला आहे. असे असले तरी मोठ्या प्रमाणात परदेशात आपल्या कडील तरूणांची मोठी रिघ लागली होती पण जेव्हा तेथे या मंदीचा फटका त्या लोकांना बसू लागायला सुरूवात झाली आहे असे म्हटल्याबरोबर येथे कामगार कपातीपासून आपण स्वत:ला मुक्त ठेवू शकत नाही ही त्यातील वस्तुस्थिती आहे. अगोदरच मोठ्या प्रमाणात आयटी सेक्टर आणि बँकींग सेक्टरमधील लोक आहेत की ज्यांना भरपूर पगार मिळत आहेत त्यामुळे त्यांच्यामध्ये आणि इतर लोकांमधील आर्थिक दरी वाढत होती. त्याकडे या सदनाचे लक्ष जेवढे जायला पाहिजे होते तेवढे गेले नाही. म्हणूनच आज राज्य सरकारपुढे खरा प्रश्न असा आहे की, जेथे ही दरी वाढलेली आहे अशा घटकांसाठी सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेचे कवच कसे देणार याची फार मोठी जबाबदारी सरकारवर आलेली आहे असे मला निश्चितपणे सांगावेसे वाटते. सभापती महोदय, ज्या ज्यावेळेस आपण सामाजिक आणि आर्थिक सुरक्षेचा विचार करतो त्यावेळेस मात्र दुर्दैवाने त्या निधीमध्ये भ्रष्टाचार झालेला दिसतो. त्याची मी तीन उदाहरणे आपल्यासमोर मांडीन. एक म्हणजे 'समाजकल्याण विभागामध्ये 200 कोटींचा घोटाळा' अशा बातम्या येतात आणि त्यावर आपण वेगवेगळ्या वेळेस चर्चाही येथे करतो. दुसरे बॅकवर्ड रिजन डेव्हलपमेंट फंड की ज्यात परिसर विकास आणि व्यक्तिगत लाभार्थी विकास यासाठी पंचवार्षिक योजनेतून आपल्याला पैसे

..... 3व्ही 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

मिळाले परंतु आपण तेथे कौन्सिल तयार केले नाही. म्हणून या सर्व परिस्थितीत माझा मुद्दा असा आहे की, ज्या जागतिक मंदी आणि सेन्सेक्सचा आमच्याशी संबंध नाही असे आपण म्हणत असलो आणि मी स्वत: शेअर्सच्या व्यवहारात नसले तरी अतिशय जवळून या विषयाची मला माहिती आहे आणि सेन्सेक्स आणि शेअर बाजारात कोणीच विचार करीत नव्हते ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

जो शेअर निर्देशांक गेल्या तीन वर्षात प्रचंड वाढत गेला. तो कधी ना कधी तरी खाली येणार होता. याची जाणीव अनेक लोकांना नसल्यामुळे अनेक नवीन लोक शेअर बाजारात उतरले. त्यामुळे आज आत्महत्त्यासारख्या घटना शेअर बाजाराशी संबंधित लोकांमध्ये घडायला लागल्या आहेत. आत्महत्त्या करणारे सटोडियन नसून त्यामध्ये ज्यांनी लवकर सेवानिवृत्ती घेतली आहे अशा बऱ्याच मध्यमवर्गीय लोकांना याचा फटका संपूर्ण शेअर बाजार कोसळल्यामुळे बसला आहे.

सभापती महोदय, मी यानिमित्ताने एका गोष्टीकडे लक्ष वेधते की, या लोकांचे आपण कौन्सिलिंग करुन त्यांना नीट माहिती दिली पाहिजे. मंदीमध्ये काय होऊ शकते, किंवा काय होऊ शकत नाही. यामध्ये चुकीच्या सल्ल्याचा उपयोग केला तर त्याच्या घराचे संपूर्ण दिवाळे निघेल असे खूप लोक या शहरामध्ये दिसतात. दुसऱ्या बाजूला काही लोक त्या दु:खामध्ये सुख शोधत आहेत. योगा सेंटर, जिम्नॅशियम, मेडिटेशन सेंटर, धार्मिक केंद्र, स्वास्थ्य केंद्र ज्यामधून मानसिक तणावातून लोकांना मुक्त होता येईल अशा इंडस्ट्रीला मोठा बूम येणार आहे. ज्याप्रमाणे निवृत्त झाल्यानंतर बरेच लोक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्राकडे वळलेले आपल्याला दिसले. त्याप्रमाणे घरांचे भाव कमी होतील की काय, यावर सुध्दा आज चर्चा सुरु आहे. मला याठिकाणी एकच मुद्दा सांगावासा वाटतो की, स्पेशल ॲग्रिकल्चरल सेफगार्ड, ज्या धटकांना कोणतेही संरक्षण नाही. ते अजून भरडले जाणार आहेत. ज्यावेळी भाव कमी होतात त्यावेळी त्याचा फायदा मध्यम वर्ग आणि उच्च मध्यम वर्गाला झाला. आणि गरिबांना ते घर विकत घेण्यासाठी सुध्दा त्यांच्याकडे पैसे नसतील. आणि म्हणून एक सामाजिक सुरक्षेची मोठी योजना अणि त्यामधून केंद्र सरकारकडून मोठया प्रमाणात मदत मागू शकतो. आपण भ्रष्टाचार रोखला नाहीतर कोटयावधी रुपये आले तरी कुपोषित बालके तशीच रहाणार आहेत. ही त्यामधील वस्तुस्थिती आहे याकडे आपले लक्ष वेधावेसे वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-*----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी नियम 260 अन्वये याठिकाणी प्रस्ताव मांडला. त्या प्रस्तावावर सभागृहातील दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी अतिशय चांगली चर्चा केली आहे. या राज्याला आणि या देशाला एक दिशा देणारी अशाप्रकारची चर्चा त्यांनी घडवून आणली. या चर्चेमध्ये भाग घेत असतांना जवळपास 11 माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त केले. त्यामध्ये माननीय सदस्य श्री जयप्रकाश छाजेड, माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, माननीय सदस्य सर्वश्री. मधुकर चव्हाण, डॉ.दीपक सावंत, अरुणभाई गुजराती, . नितीन गडकरी, जयंत प्र. पाटील, अरविंद सावंत, माननीय सदस्या श्रीमती मधु जैन, माननीय सदस्य श्री. जामा आणि माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी आपापली मते याठिकाणी मांडली.

प्रामुख्याने आज या जगामध्ये जी आर्थिक मंदी आली आहे तिचे कारण काय आहे? याबाबत वेगवेगळया लोकांनी आपापले विचार मांडले. हे विचार मांडतांना जागतिक मंदीचे मूळ कुठे आहे हे सांगितले. याला जागतिक पातळीवर जबाबदार कुणी असेल तर अमेरिका हा देश आहे,असे माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत म्हणाले. त्या देशाची लोकसंख्या 4 टक्के असतांना सुध्दा ते आपल्या साधनसामुग्रीचा 40 टक्के उपभोग घेत आहेत. ही आर्थिक मंदी आल्यानंतर जगात नवीन सिस्टीम तयार झाली. ही नवीन सिस्टीम म्हणजे रिअलमध्ये गुंतवणूक न करता ट्रेडींगमध्ये केली जात आहे. ट्रेंडींग क्षेत्र कोणते? एक म्हणजे शेअर मार्केट आणि दुसरा ट्रेड फॉरवर्ड ट्रेडींग, म्हणजे पैसे न मागता मार्केटमध्ये न जाता घरी वस्तू आणून दिली जाते. ही सर्व खरेदी कॉप्युटरवर ऑनलाईन केली जाते. कॉप्युटरची विक्री करणे आणि त्यामधून उत्पन्न निर्माण करणे हा नवीन ट्रेंड या जगात आलेला आहे. त्यामध्ये भारत देश देखील सहभागी झाला आहे. रिअल मार्केटमधील व्हॅल्यू काय आहे? याचा अभ्यास न करता हा ट्रेड निर्माण करण्यात आला आहे. येणाऱ्या काळात तेलाची किंमत 200 डॉलरपर्यंत होऊ शकते. तरीही लोक खरेदी करावयास निघाले आहेत. आपल्याकडे जास्त पैसे असल्यामुळे लोकांनी या ट्रेडींगला सुरुवात केली आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नवाब मलिक .....

वायदा बाजार सुरु झाला. तेलाची, क्रूड ऑईलची वस्तू असेल, धान्य असतील, आयर्न ओअर असतील, मेटल्स असतील किंवा शेअर बाजारातील इंडेक्स असतील या सर्वांची खरेदी विक्री वास्तविक न होता नुसत्या वायदा बाजारावर सुरु झाली आणि त्याच्यातून काही लोकांनी चिक्कार पैसे कमावले. त्यांनी चिक्कार पैसे कमावल्यानंतर काही मध्यमवर्गीय लोक, लहान व्यापारी, कमी पैसे असणारे लोक सुध्दा त्याकडे आकर्षित झाले. त्यांच्या मनामध्ये अशी भावना निर्माण झाली की, आपण कमी पैशामध्ये जास्त नफा मिळवू शकतो. आज आयर्न ओअरचा भाव 2 हजार रुपये प्रती टन असेल तर उद्या या इकॉनॉमिक बुस्टमुळे आयर्न ओअरचा भाव 4 हजार रुपये प्रती टन होऊ शकते. क्रूड ऑईलचे भाव 200 डॉलरपर्यंत जाऊ शकतात. एका कंपनीच्या शेअरचा भाव 100 रुपये होता, त्याचा भाव 600 रुपये, 800 रुपये झाला आणि उद्या 2 हजार रुपये भाव होईल या आशेने गुंतवणूक झाल्यानंतर विशेषत: काही ठराविक लोकांनी कट रचला आणि भाव कोसळवून टाकला आणि या गरीब लोकांचे, लहान लोकांचे पैसे काही ठराविक लोकांच्या तिजोरीत गेले आणि जगात अशी मानसिकता निर्माण झाली की, जगामध्ये आता आर्थिक मंदी आलेली आहे. परिस्थिती बदललेली आहे. त्यातून काही लोकांनी कर्ज काढून तिकडे गुंतवणूक केली पण त्यांना पैसे देता येत नाहीत. अमेरिकेतील बँक बुडाली आणि बँक बुडाल्यानंतर अमेरिका स्वत: समोर आली आणि त्यांनी बेल आऊट पॅकेज देण्याची तयारी दर्शवली. कारण ही तयारी त्यांनी दर्शविली नसती तर अमेरिका बुडाली असती. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले की, त्यांचे जे रेसेशन आहे, जी मंदी आहे त्याच्यातून बाहेर काढण्यासाठी त्यांना एखादे युध्द हवे आहे. त्यांना प्रत्यक्ष युध्द करता येत नाही. जगामध्ये ठिकठिकाणी त्यांनी युध्द केले, दोन देशावर हल्ले केले पण त्यातून काय निर्माण झाले हे सर्व जगाच्या समोर आहे. पण त्यांना प्रत्यक्ष युध्द करता येत नाही. त्यामुळे ते देशादेशांमध्ये भांडणे निर्माण करुन त्यांची शस्त्रे कशी विकली जातील आणि आर्थिक मंदीतून अमेरिका बाहेर कशी येईल असे राजकारण होऊ शकते असे सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी सांगितले. हे माझे मत नाही पण मी त्यांच्या मताशी सहमत होऊ शकतो. सन्माननीय सदस्य हात वर करीत आहेत. ते काय बोलू इच्छितात हे मला माहीत नाही पण परिस्थिती बदललेली आहे. जागतिक आर्थिक मंदीचे जे एक वातावरण निर्माण झालेले आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. नवाब मलिक .....

त्याच्यातून या भारतावर सुध्दा काही संकटे आलेली आहेत. या संकटाचा मोठा फटका इंडस्ट्रीला बसणार आहे. जेव्हा इंडस्ट्रीला मोठा फटका बसेल तेव्हा या इंडस्ट्रीमध्ये काम करणारे जे कामगार आहेत त्यांना सुध्दा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे आणि त्याची सुरुवात झालेली आहे. जेव्हा इंडस्ट्री बंद होईल, इंडस्ट्रियलायझेशन कमी होईल तेव्हा स्वयंरोजगाराची संधी कमी होऊ शकते. पण आजच्या घडीला जे कामगार कामावर आहेत त्यांच्यावर संकट येणार हे आपण नाकारु शकत नाही. त्यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी मागणी केली की, आपण या ठिकाणी एक समिती निर्माण करावी आणि त्या समितीमध्ये इंडस्ट्रीजचे लोक, कामगारांचे प्रतिनिधी आणि शासनाचे लोक असले पाहिजेत. मी आपल्याला आश्वासन देऊ इच्छितो की, आमची मानसिक तयारी आहे. आम्ही सी.आय.ए.ची बैठक बोलविणार होतो आणि त्या बैठकीत त्या सर्वांना आम्ही विनंती करणार होतो की, आपण अजिबात लॉकआऊट, रिट्रेंचमेंट, ले-ऑफची प्रकरणे कामगार खात्याच्या लोकांकडे आणू नका, या कामगारांना जगू द्या. अशी विनंती आम्ही येणाऱ्या काळामध्ये करणार आहोत. माननीय मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण करु आणि या आर्थिक मंदीतून या राज्याला फटका बसू नये यासाठी त्या समितीसमोर उपाययोजना ठेऊन आपण जे इंडस्ट्रीजचे लोक आहेत त्यांना विनंती करु. त्यांना बेल आऊट पॅकेज देण्याची गरज असेल, काही इन्सेन्टिव देऊन काही नवीन कारखाने निर्माण करण्याची गरज असेल तर आपण या बैठकीमध्ये आपण सर्व निर्णय घेऊन या आर्थिक मंदीचा फटका विशेषकरुन कामगारांना बसणार नाही याची उपाययोजना आम्ही करु. दुसरी अशी मागणी झाली की, या राज्यामध्ये लोकांची क्रयशक्ती वाढवली पाहिजे. जोपर्यंत भांडवल फिरत नाही, जोपर्यंत पैसा चलनामध्ये येत नाही तोपर्यंत आपण या मंदीतून बाहेर येऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी साहेबांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, मंदी कोठली आहे ? व्यावयाहारिक मंदी आहे की मानसिक मंदी आहे ? दोन्ही मंदी या देशामध्ये आलेली आहे असे मला वाटते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक....

त्यांच्याकडे पैसे आहेत, ते खरेदी करु इच्छित नाहीत. दोन भाऊ एकत्र राहतात, त्यांना घर खरेदी करावयाचे आहे, परंतु घराच्या किंमती आणखी खाली येतील असे त्यांना वाटते. म्हणजे मानसिक मंदीतून या देशाला, या राज्याला बाहेर काढण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी व इतर सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, जेथे जेथे आर्थिक मंदी येते तेथे तेथे इन्फ्रास्ट्रक्चरची कामे मोठया प्रमाणावर घेतल्याशिवाय मग तो देश असेल, राज्य असेल त्याला या मंदीतून बाहेर काढता येत नाही. या राज्यामध्ये रस्त्यांची कामे असतील, पुलांची कामे असतील, सिंचन प्रकल्पांना चालना देण्यासाठी ज्या ज्या सूचना याठिकाणी करण्यात आल्या आहेत त्याला मान्यता देऊन या राज्यात इन्फ्रास्ट्रक्चरची कामे घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शासन गुंतवणूक करणार आहे. या गुंतवणुकीतून कामे पूर्ण केली जातील, नवीन कामे घेतली जातील. त्याचप्रमाणे बीओटी तत्वावर काही कामे घेता येतील, त्याची छाननी करण्यात येईल. अशाप्रकारे राज्यात जास्तीत जास्त इन्फ्रास्ट्रक्चरची कामे सुरु करण्यात येतील. जागतिक मंदीवर चर्चा करताना असेही म्हटले गेले की, जे गुंतवणूकदार आहेत, जे पैसेवाले आहेत त्यांच्याकडे फॉरवर्ड ट्रेडिंगमध्ये, शेअर मार्केटमध्ये पैसा गुंतविण्याचा पर्याय उपलब्ध झाला होता. पण या क्षेत्रालाही आर्थिक मंदीचा फटका बसल्यामुळे या लोकांचीही त्या मार्केटमध्ये गुंतवणूक करण्याची मानसिकता नाही. एखाद्या उद्योगामध्ये वार्षिक 20 टक्के नफा होईल असा प्रस्ताव त्यांना मिळाला तर ते या क्षेत्रात अजिबात गुंतवणूक करणार नाहीत. परंतु ते इन्फ्रास्ट्रक्चर या क्षेत्रात मात्र गुंतवणूक करु शकतात. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी मी अमेरिकेमध्ये, युरोपमध्ये, इस्त्राईल या देशांमध्ये जाऊन आलो आहे. परंतु त्या देशांमध्ये इन्फ्रास्ट्रक्चर विकसित करण्याची मुळीच संधी उपलब्ध नाही. तेथे एखादा इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रोजेक्ट व्हायबल होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत म्हणाले की, लोकसंख्या ही आपली समस्या आहे. परंतु जग बदललेले आहे, काळ बदललेले आहे. लोकसंख्या ही आपली समस्या नाही तर ती ॲसेट झालेली आहे. या देशामध्ये कोणताही प्रोजेक्ट आणला तर तो व्हायबल होऊ शकतो. शेअर मार्केटमध्ये फॉरवर्ड ट्रेडिंगमध्ये होणारी गुंतवणूक थांबलेली असल्यामुळे अशा गुंतवणूकदारांकडे पडून असलेला पैसा व्हायबल प्रोजेक्टमध्ये गुंतविण्यासाठी जगात कोणती जागा चांगली असेल तर ती भारतामध्ये आहे. अनेक देशात लोकसंख्या जास्त आहे. चीनमध्ये गुंतवणूकदारांनी गुंतवणूक करावयाचे म्हटले तरी तेथील राजकीय परिस्थितीमुळे तेथे कधी काय होईल हे सांगता येत नाही, त्यामुळे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नवाब मलिक....

गुंतवणूकदारांना कधीही हुसकावून लावल्यावर त्यांचे पैसे बुडतील अशी तेथे स्थिती आहे. पण या देशातील अधिकाधिक गुंतवणूक होण्यासारखी परिस्थिती आपण निर्माण केली तर मला वाटते की, येणा-या काळात आर्थिक मंदीतून संधी निर्माण करुन आपण या मंदीतून बाहेर पडू शकतो. 110 कोटी इतकी लोकसंख्या असलेल्या देशाला या मंदीतून संधी प्राप्त होऊ शकते. असे म्हटले गेले की, अठरावे शतक हे मुघलांचे होते, एकोणिसावे शतक हे इंग्रजांचे होते, विसावे शतक हे अमेरिकेचे होते आणि एकविसावे शतक हे भारताचे होऊ शकते आणि सन 2025 पर्यंत आपला देश सुपर पॉवर होऊ शकतो, आर्थिक महासत्ता होऊ शकतो असे एका रिपोर्टमध्ये नमूद केलेले आहे. देशातील परिस्थिती बदलल्यामुळे आता जातीपातीचे राजकारण चालणार नाही असे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी म्हटले आहे. लोकांना विकासाचे आणि रोजगार निर्माण करणारे राजकारण पाहिजे. दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईवर आतंकवाद्यांकडून हल्ला झाला त्यावेळी सर्व देशवासीयांनी जात, पात, धर्म, पक्ष विसरुन, एकत्र येऊन त्या आतंकवाद्यांशी मुकाबला करण्याची तयारी दर्शविली होती. जर या देशातील सर्व राजकीय पक्ष, सर्व सामाजिक कार्यकर्ते, कामगार वर्ग, उद्योगपती, भांडवलदार या सर्वांनी मिळून उपाययोजना केली तर येणा-या 2025 पर्यंत हा देश आर्थिक महासत्ता होऊ शकतो अशी परिस्थिती आहे. आपण इतर देशांकडे पाहतो पण काहींचे असे म्हणणे आहे की, या क्षेत्रात शासनाने गुंतवणूक केली पाहिजे. काहींचे असे म्हणणे आहे की, खाजगी क्षेत्राला प्रोत्साहन दिले पाहिजे. असे वेगवेगळे विचार समोर आले आहेत. पण या दोन्ही विचारातून आपल्या देशाला पुढे कसे नेता येईल, आपल्या देशाला या आर्थिक मंदीतून बाहेर कसे काढता येईल, हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, मला आणखी काही मुद्यांबाबत उत्तर द्यावयाचे आहे. त्यामुळे मला आणखी वेळ लागणार आहे. परंतु सभागृहाची वेळ 6 वाजेपर्यंत असल्याचे आपण घोषित केलेले आहे. त्यामुळे या प्रस्तावावरील कामगार विभागाच्या संदर्भातील माझे अपूर्ण राहिलेले उत्तर मी उद्या देईन. तसेच उद्योग विभाग आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्यावतीने सुध्दा उत्तर दिले जाणार आहे. सभापती महोदय, आपण आम्हाला उद्या उत्तर देण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : सभागृहाची वेळ आपण 6 वाजेपर्यंतची ठरवली होती. माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण अपूर्ण राहिलेले असल्यामुळे त्यांनी आपले उर्वरित भाषण उद्या पुढे सुरु करावे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 24.12.2008 रोजी सकाळी 9.45 पुन: भरेल. सकाळी 9.45 ते 10.30 वाजेपर्यन्त विशेष बैठक होईल. त्यानंतर सकाळी 11.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 01 मिनिटाने, बुधवार, दिनांक 24.12.2008 रोजीच्या सकाळी 9.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही